# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास

## (History of Travel and Tourism in India)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग २**

**इतिहास**

Optional : Paper 417

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
एम. ए. भाग - २ करिता (भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-58-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये प्रस्तावना, भारतामधील पर्यटनाचा वारसा, सांस्कृतिक साधने, समकालीन पर्यटन प्रवाह इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.


■ **संपादक** ■

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
इतिहास विभाग प्रमुख,
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(भारतातील प्रवास आणि पर्यटनाचा इतिहास**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ४१७ (ऐच्छिक)**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १, ४ |
| **डॉ. शिवाजी दत्तात्रय जाधव**<br>श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ |
| **डॉ. चांगदेव बंडगर**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. संजय नवले**<br>श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी | ३ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
इतिहास विभाग प्रमुख,
श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | भारतामधील पर्यटनाचा वारसा | ३५ |
| ३. | सांस्कृतिक साधने | ६५ |
| ४. | समकालीन पर्यटन प्रवाह | १२२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक–१

# प्रस्तावना

## ( Introduction )

---

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ पर्यटन अर्थ/व्याख्या

१.२.२ भारतातील पर्यटनाचा इतिहास

१.२.३ पर्यटनाचे प्रकार आणि स्वरूप

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस खालील गोष्टी स्पष्ट करता येतील.

१. पर्यटक व पर्यटन म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल.

२. पर्यटनाच्या व्याख्या स्पष्ट करता येतील.

३. भारतातील प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील पर्यटन विकास सांगता येईल.

४. पर्यटनाचे स्वरूप व प्रकार स्पष्ट करता येतील.

५. विविध प्रकारच्या पर्यटन स्थळांचे आकलन होईल.

## ४.१ प्रस्तावना

'प्रवास' हा माणसाचा फार प्राचीन काळापासूनचा छंद आहे. प्रवास करणे हा जरी छंद असला तरी

'पर्यटन' ही संज्ञा आधुनिक आहे. पर्यटक व पर्यटन ह्या संज्ञा परस्पर पूरक आहेत. पर्यटनामध्ये पर्यटक हा मूलभूत घटक असला तरी पर्यटकांचे प्रवास करण्याचे हेतू मात्र विविधांगी असतात. अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, नवीन व चमत्कारिक स्थळांचा शोध घेणे, पर्यावरणातील नवीन बदल अनुभवणे, धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेटी देणे व शिक्षण व व्यापार इत्यादीचा अंतर्भाव यामध्ये होतो. प्रवासाची ही ध्येये मात्र नवीन नाहीत. सध्या ज्या व्यवसायाला 'पर्यटन' म्हणतात त्याचे मूळ प्राचीन प्रवासात आढळते. मानवी संस्कृतीच्या विकासामुळे पर्यटनास एक व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे, वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षण प्रसार, व्यापार, सांस्कृतिक अभिसरण इत्यादीमुळे व्यापकता आली. दळणवळण क्षेत्रात झालेली क्रांती ही पर्यटनाला चालना व प्रेरणा देणारा महत्त्वाचा घटक आहे. पहिल्या महायुद्धानंतर पर्यटन हा एक सेवा उद्योग म्हणून समोर आला आहे. पर्यटन उद्योगाचे स्वरूप पारंपारिक नसले तरी यामध्ये रोजगारभिमुखता अधिक आहे. पर्यटन उद्योगात पर्यटकांना विविध सेवा-सुविधा द्याव्या लागतात. या सेवांचे स्वरूप पर्यटक कोणत्या पर्यटन स्थळी येतो, यावर आधारित असते. पर्यटनामध्ये प्रामुख्याने भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व धार्मिक हे प्रमुख प्रकार असले तरी सध्याच्या काळात जगातील पर्यटनाचे स्वरूप बदलले असून निव्वळ मनोरंजन हा त्यामधील प्रमुख प्रेरक घटक आहे. या अनुषंगाने प्रस्तुत घटकामध्ये पर्यटक, पर्यटनाची व्याख्या, पर्यटनाचा इतिहास व प्रकार याविषयी चर्चा केलेली आहे. त्याचा आपणास अभ्यास करावयाचा आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ पर्यटन अर्थ/व्याख्या

मानवाने विविध ठिकाणी केलेला हेतुपूर्वक प्रवास व वास्तव्य याला पर्यटन असे सर्वसाधारणपणे म्हटले जाते. मानवाच्या प्रवासाची सुरूवात जरी अनेक अर्थाने झालेली असली तरी आधुनिक काळात याला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. त्यामुळे पर्यटन हा अत्याधुनिक आर्थिक व्यवसाय झालेला आहे. मानवी जीवनाच्या अनेक अंगांशी त्याचा निकटचा संबंध निर्माण झालेला आहे. त्यामुळे त्याची व्याख्या करणे कठीण आहे. हे जरी खरे असले तरी पर्यटनाची व्याप्ती, स्वरूप, वैशिष्ट्ये इ. घटकांना अनुसरून काही व्यक्ती व संस्थांनी पर्यटनाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पर्यटनाची व्याख्या समजून घेण्याअगोदर 'पर्यटन' या शब्दाबद्दलची व्युत्पत्ती समजून घेणे महत्त्वाचे आहे.

'पर्यटन' 'Tourism' ही संज्ञा 'प्रवास' 'Tour' या शब्दाशी संबंधित आहे आणि प्रवास हा शब्द लॅटिन भाषेतील 'Tornus' या शब्दापासून आलेला आहे. 'Tornus' या शब्दाचा अर्थ 'वर्तुळ' (Circle) असा आहे. या शब्दापासून पुढे 'वर्तुळाकार प्रवास' ही संकल्पना रुढ झालेली आहे. 'Tornus' या शब्दाचे रूपांतर नंतर 'Tourn' मध्ये झाले. 'Tourn' या शब्दाचा अर्थ 'Journey' म्हणजेच प्रवास किंवा भ्रमंती असा होतो. प्रवास किंवा भ्रमंती ही शोध घेणे, शिकणे, अभ्यास करणे, व्यवसाय व आनंदासाठी होत असते.

'पर्यटन' हा आधुनिक काळातील शब्द तेराव्या शतकात प्रचलित झाला. याचा अर्थ ''एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करणे आणि मूळ ठिकाणी ठराविक काळात परत येणे'' असा होता. अथवा 'पर्यटन म्हणजे माणसाने त्याच्या नेहमीच्या राहत्या ठिकाणापासून इतरत्र केलेले अल्पकालीन स्थलांतर होय.' याखेरीज काही व्यक्ती व संस्थानीही पर्यटनाची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या खालीलप्रमाणे.

१. **हरमन श्युलर्ड** या ऑस्ट्रेलियन अर्थतज्ञाने सन १९१० मध्ये पर्यटनाची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. ''परदेशी माणसाचे एखाद्या देशात, प्रदेशात व शहरात आगमन, वास्तव्य, भ्रमंती आणि तेथून गमन म्हणजे पर्यटन होय.''

२. स्वीस शास्त्रज्ञ **प्रा. हुंझीकर** व **प्रा. कार्प** यांनी सन १९४२ मध्ये पर्यटनाची व्याख्या अधिक व्यापक व अर्थपूर्ण केलेली आहे. ''कायम स्वरूपाची वस्ती न करण्याच्या हेतूने व उत्पादनाशी संबंधित नसलेली, अपरिचित व्यक्तीच्या भ्रमंतीतून प्रस्थापित झालेली अपूर्ण घटना व संबंध म्हणजे पर्यटन होय.''

३. **जोस ॲरिलागा**, ''मोटारीने किंवा सायकलवरून फिरणे, गिर्यारोहण करणे, तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इत्यादीसाठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय.''

४. **जागतिक पर्यटन संघटना :** (World Tourism Organisation-WTO) या संघटनेने ४ मार्च १९९३ रोजी पर्यटनाची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, ''एखादी व्यक्ति आपल्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दुसऱ्या स्थळी सलग १ वर्षापेक्षा अधिक काळ न राहता आराम, उद्योग किंवा इतर कामासाठी भ्रमंती किंवा प्रवास करतो त्या सर्वांचा समावेश पर्यटनात होतो.'' ('Tourism Comprises the activities of persons travelling to and staying in places out side their usual environment for not more than one cousecutive year for leisure, business and other purposes.')

५. **पर्यटन संस्था (ब्रिटन) :** ''पर्यटन म्हणजे लोकांनी त्यांच्या राहत्या स्थानापासून काही अंतरावरील ठिकाणी अल्पकालीन केलेले स्थलांतर होय. हे स्थलांतर, संशोधन, व्यवसाय, मनोरंजन, ऐषआराम यासाठी केलेले असते.'' यालाच पर्यटन असे म्हणतात.

६. **कार्डिफ पर्यटन संस्था (ब्रिटन) :** या संस्थेने सन १९८१ मध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय पर्यटन चर्चासत्रात पर्यटनाची व्याख्या खालीलप्रमाणे केलेली आहे. ''पर्यटन म्हणजे एखाद्या व्यक्तीने घराबाहेर ऐच्छिक, ठराविक केलेली क्रिया होय. यात घराबाहेर एखादा मुक्काम केला किंवा नाही याचा सहभाग महत्वाचा नाही.''

७. **कॅराफ** या जर्मन तज्ञाने पर्यटनाचा संबंध अर्थव्यवस्थेशी लावला आहे. ते पर्यटनाची व्याख्या करताना असे म्हणतात की, ''पर्यटन हे आर्थिक संबंधाचे जाळे आहे.''

८. **डॉ. जिरॉमिन** यांनी पर्यटनाचा संबंध समान व्यवस्थेशी व समाजातील विविध प्रक्रियांशी लावत ते म्हणतात की, ''पर्यटन म्हणजे सामाजिक प्रक्रिया आहे.''

९. **फ्रिमन :** ''पर्यटन म्हणजे शोध आहे, जे आपणास माहित नाही, आपणास ज्ञात नाही, मानवी क्षेत्र व निसर्ग यातील हा एक शोध आहे.''

१०. **नार्मन :** या प्रसिध्द अर्थतज्ञाने पर्यटनाची व्याख्या आर्थिक दृष्टीकोणातून केलेली आहे, ते असे म्हणतात की, ''परदेशी जाणारी प्रत्येक व्यक्ती जी कायम वास्तव्य किंवा रोजगाराच्या कारणाव्यतिरिक्त जातात व इतरत्र मिळवलेला पैसा तिथे खर्च करतात, त्यास पर्यटक असे म्हणतात.''

११. **मराठी विश्वकोश** : ''जी व्यक्ती निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी चांगल्या स्थळांना भेट देणारी किंवा सौंदर्य स्थळांना भेट देणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.''

थोडक्यात, आपणास परिचित नसलेल्या प्रदेशात भ्रमंती करणाऱ्या अपरिचित व्यक्तीसंबंधी तेथील अपूर्व घटनांचा समावेश होतो. पर्यटन ही एक आनंददायी घटना आहे, की ज्यामध्ये मनुष्य प्रवास, भेटी दिलेली निरनिराळी ठिकाणे पाहणे, निवास, भोजन इत्यादीवर स्वत: कमविलेले पैसे खर्च करतो.

पर्यटनाच्या संदर्भातील वरील सर्व व्याख्यावरून पर्यटनाची काही मूलभूत वैशिष्ट्ये समोर येतात ती अशी की,

१) अनिवासी पर्यटनाचा पर्यटनामधील सहभाग अत्यावश्यक आहे.

२) पर्यटन स्थळाजवळ अस्थायी स्वरूपाचे वास्तव्य असावे.

३) तेथील वास्तव्य हे रोजगाराच्या उद्देशाने नसावे.

## १. पर्यटक म्हणजे कोण?

पर्यटनात 'पर्यटक' हा एक प्रमुख घटक आहे. पर्यटकाशिवाय पर्यटनाला कोणताही अर्थ राहत नाही. म्हणजेच पर्यटनात पर्यटक हा केंद्रीभूत घटक आहे. 'पर्यटक' या इंग्रजी भाषेतील 'Tourist' या शब्दाची व्युत्पत्ती सन १२९२ मध्ये झाली. लॅटिन भाषेतील 'Turnus' या शब्दापासून 'Tour' हा शब्द रुढ झाला तर 'Tour' या शब्दापासून 'Tourist' म्हणजेच 'पर्यटक' हा शब्द आलेला आहे. पर्यटक म्हणजे नेमके कोणास म्हणावे यासंबंधी काही व्यक्ती व संस्थांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या पुढीलप्रमाणे :-

१. **शब्दकोश** : ''जो आनंद उपभोगण्यासाठी प्रवास करतो तो पर्यटक होय.''

२. **ऑक्सफर्ड शब्दकोश** : ''जो उत्कंठेपायी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी किंवा गमतीजमतीसाठी अथवा मी असा प्रवास केला आहे सांगण्यासाठी भ्रमंती करतो त्यास 'पर्यटक' असे म्हणतात.

३. **लीग ऑफ नेशन** : या संघटनेने सन १९३७ मध्ये पर्यटकाची पुढील प्रमाणे व्याख्या केली आहे. ''एखाद्या देशाला भेट देणारी व कमीत कमी २४ तास वास्तव्य करणारी कोणतीही व्यक्ती म्हणजे परदेशी पर्यटक होय.'' (The term 'tourist' shall be principle be interpreted to mean any person tarvelling for a period of 24 hours or ore in a country other than that in which he usually resides.)

**४. संयुक्त राष्ट्र संघटना** (१९४५), ''एखाद्या देशात २४ तासांपेक्षा जास्त आणि कायमस्वरूपी वस्ती न करण्याच्या हेतूने ६ महिन्यांपेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती म्हणजे पर्यटक होय.

वरील व्याख्यांवरून पर्यटक कोणास म्हणावे यासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे समोर येतात ते असे.

(१) आनंदासाठी, खाजगी कामासाठी किंवा आरोग्यासाठी प्रवास करणारी व्यक्ती.

(२) बैठकीसाठी किंवा प्रतिनिधी या नात्याने (आमचे शास्त्रीय, प्रशासकीय, परराष्ट्रसंबंधी, धार्मिक कार्य अथवा खेळासाठी) प्रवास करणारी व्यक्ती.

(३) व्यावसायानिमित्त प्रवास करणारी व्यक्ती.

(४) सागरी मार्गाने प्रवास करणारी आणि समुद्र किनाऱ्याजवळ एखाद्या ठिकाणी २४ तासापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती (Persons arriving in the course & a sea cruise even when they stay less than 24 hours.)

खालील व्यक्तींना पर्यटक म्हणता येणार नाही.

(१) करारानुसार किंवा कराराशिवाय एखाद्या देशात व्यावसायानिमित्त येणारी व्यक्ती.

(२) एखाद्या देशात वास्तव्य करण्यासाठी येणारी व्यक्ती.

(३) वसतिगृहात किंवा शाळेत बाहेरून येणारी विद्यार्थी.

(४) सरहद्द भागात वास्तव्य करणारे आणि एका देशात राहून दुसऱ्या देशात काम करणारे.

(५) एखाद्या देशात न थांबता जाणारे प्रवासी इतकेच नव्हे तर त्यांचा प्रवास २४ तासापेक्षा जास्त झाला तरी त्यांचा पर्यटकात समावेश होत नाही.

## २. भारतासाठी पर्यटकाची व्याख्या :-

भारतामध्ये येणाऱ्या कोणत्या व्यक्तीस पर्यटक संबोधण्यात यावे अथवा भारतामधील स्थानिक व्यक्तींना कोणत्या परिस्थितीत पर्यटक समजण्यात यावे यासंबंधी काही निकष अथवा व्याख्या केलेली आहे.

## १. परदेशी पर्यटक कोणास संबोधावे :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या रोम येथील आंतरराष्ट्रीय पर्यटन परिषदेत सन १९६३ मध्ये पर्यटन खात्याने भारतातील पर्यटकांच्या संदर्भात पुढील व्याख्या स्विकारलेली आहे. ती अशी की, ''परदेशी पर्यटक म्हणजे परदेशी परवान्याने (Pass Port) मनोरंजन, अभ्यास, धार्मिक गोष्टी, खेळ, व्यवसाय, कुटुंब, बैठका अथवा विशिष्ठ कार्यासाठी भारताला भेट देणारी व किमान २४ तास देशात वास्तव्य करणारी व्यक्ती होय.''

वरील व्याख्येच्या अनुषंगाने खालील व्यक्ती भारतात पर्यटक समजली जावू शकत नाही.

१) देशात वास्तव्य करण्याच्या उद्देशाने येणारी व्यक्ती.

२) २४ तासापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती.

३) करार अगर बिगर करारान्वये एखाद्या व्यावसायासाठी किंवा पैसे कमविण्यासाठी येणारी व्यक्ती. याशिवाय पाकिस्तान, बांगलादेशात व भूतान या देशामधून येणारी कोणतीही व्यक्ती पर्यटक समजली जात नाही.

### स्वदेशी पर्यटक कोणास संबोधावे?

भारतामध्ये खालील प्रकारच्या व्यक्तीना स्वदेशी पर्यटक म्हणून ओळखले जाते.

१) धर्मशाळा, मंदिर, मशीद किंवा अन्य सामाजिक अथवा धार्मिक ठिकाणी मोफत आश्रय घेणारी व्यक्ती.

२) एखाद्या मित्राकडे अथवा नातेवाईकाच्याकडे २४ तासापेक्षा जास्त परंतु १५ दिवसापेक्षा कमी वास्तव्य करणारी व्यक्ती.

३) एखाद्या ठिकाणी भ्रमंतीसाठी आलेली आणि रात्री हॉटेल अथवा अन्य ठिकाणी पैसे देऊन वास्तव्यासाठी आश्रय घेणारी व्यक्ती.

पर्यटन व पर्यटकांचे विविध अर्थ, शब्द, व्युत्पत्ती व व्याख्या यांचा विचार करता पर्यटनांची काही अंगभूत वैशिष्ट्ये समोर येतात ती अशी,

१) पर्यटन हे व्यक्तींचा निरनिराळ्या ठिकाणी होणारा प्रवास, तेथील वास्तव्यामुळे निर्माण होते. त्यामुळे 'प्रवास' हा पर्यटनाचा गतिमान व 'वास्तव्य' हा स्थिर घटक मानला जातो.

२) पर्यटनामध्ये पैसे मिळवणे हा पर्यटकांचा हेतू नसतो, कारण पर्यटनात पर्यटक हा आनंद मिळविण्यासाठी जात असल्याने त्याच्या माध्यमातून रोजगार अथवा व्यवसाय करणे अपेक्षित नसते.

३) पर्यटनामध्ये व्यक्ती अथवा समूहाचा परस्पर संबंध असतो, त्यामुळे त्याचे स्वरूप सांघिक आहे.

४) पर्यटन हे हंगामी अथवा तात्कालीन स्वरूपाचे असते.

५) पर्यटकांच्या विविध कल्पना व प्रवृत्तींचे पर्यटनावर प्रभुत्व असते.

## स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १

### अ) रिकाम्या जागा लिहा.

१. पर्यटन हा शब्द ............. भाषेमधून आला आहे.

२. पर्यटनामध्ये .......... मिळविणे हा उद्देश नसतो.

३. भारतात ........ व ......... देशातील व्यक्तींना पर्यटक समजले जात नाही.

४. जागतिक पर्यटन संघटनेने ........... वर्षी पर्यटनाची निश्चित व्याख्या केली आहे.

५. कार्डिक पर्यटन संस्था ........... मध्ये आहे.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'Tornos' या शब्दाचा अर्थ काय?

२. पर्यटन हा शब्द कोणत्या शतकात प्रचलित झाला?

३. कोणत्या पर्यटकाला पर्यटक समजले जात नाही.

४. 'पर्यटन हे आर्थिक संबंधाचे जाळे आहे' असे कोणी म्हटले आहे.

५. कोणत्या वर्षी रोम येथे आंतरराष्ट्रीय पर्यटन परिषद संपन्न झाली.

## १.२.२ भारतातील पर्यटनाचा इतिहास (प्राचीन ते आधुनिक)

'प्रवास' हा मानवी जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. प्राचीन काळापासून मानव विविध कारणांकरिता प्रवास करत आहे. नवीन व चमत्कारिक ठिकाणांचा शोध, अज्ञात स्थळांचा शोध, पवित्र धार्मिक स्थळांना भेट, निसर्गातील बदल अनुभवणे, शिक्षण व व्यापार इत्यादींचा यामध्ये समावेश होतो. प्राचीन ते आधुनिक कालखंडात पर्यटनास एक व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. नागरीकरण, औद्योगिकीकरण, शिक्षण प्रसार, व्यापार व इतर उद्योगधंद्यांच्या विकासामुळे पर्यटनाचा विकास झालेला दिसतो.

### १. जागतिक पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

भारतातील पर्यटनाचा इतिहास अभ्यासण्या अगोदर जागतिक स्तरावर पर्यटनाच्या इतिहासाचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे. मानव आदिम काळापासून अन्न, पाणी व निवारा या मूलभूत गरजांसाठी भटकंती करू लागला आणि त्याच्या प्रवासाला प्रारंभ झाला. अग्नीचा शोध, हत्याराचा शोध व घर बांधण्याची संकल्पना यामुळे मानवी जीवन स्थिर होण्यास मदत झाली. शेतीच्या शोधाने कृषक संस्कृतीचा विकास झाला. इजिप्तमध्ये इ.स.पू. ४००० च्या दरम्यान जहाज बांधणीस सुरूवात झाली, यातून समुद्र प्रवासाला चालना मिळाली. पुढे मानवाला चाकाचा शोध लागला. जंगली प्राण्यांना पाळण्याची व त्याचा उपयोग वाहतुकीसाठी या संकल्पनेमुळे वाहतुकीच्या साधनामध्ये क्रांतीकारी बदल झाला. मानवी प्रवासाच्या कक्षा अधिक विस्तृत झाल्या. नवाश्मयुगात धार्मिक व सांस्कृतिक संकल्पनांचा विकास झाल्याने सण-उत्सवांची सुरुवात झाली.

कृषक संस्कृतीचा विकास व इ.स.पू. ६ व्या शतकात लागलेला नाण्याचा शोध पर्यटनास चालना देणारा प्रमुख घटक ठरला. कृषक संस्कृतीमुळे अतिरिक्त उत्पादनात वाढ झाली व नाण्याच्या शोधाने व्यापारास उत्तेजना मिळाली. याच काळात ग्रीक, इजिप्त व पुढे रोमन साम्राज्य काळात मोठ्या प्रमाणात

नागरीकरण घडून आले. वाढत्या व्यापारामुळे समुद्र प्रवासाला चालना मिळाली. यातून रेशीम रस्त्याचा विकास झाला (भूमध्य समुद्र ते फॅसिफिक समुद्र) हा रेशीम रस्ता जगातल्या महत्त्वाच्या नागरी संस्कृती व व्यापारी केंद्रामधून जात होता. यामध्ये ग्रीस, रोम, इजिप्त, चीन व भारत इत्यादीच्या समावेश होता. व्यापाराच्या माध्यमातून एका नवीन वर्गाचा उदय झाला.

मेसोपोटेमिया संस्कृतीमुळे पर्यटनाला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. या ठिकाणी घडून आलेले नागरीकरण जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचले. ग्रीक संस्कृतीमध्ये विविध धार्मिक स्थळांचा विकास झाल्याने धार्मिक पर्यटनाचा विकास झाला. इ.स.पू. ७७६ मध्ये ग्रीकमध्ये ऑलिंपिक स्पर्धा आयोजनास सुरूवात झाली. यामध्ये सहभाग घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक येवू लागले. रोमन कालखंडात मोठ्या प्रमाणात नवनवीन शोध लागले. आर्थिक व राजकीय क्षेत्रात झालेल्या बदलामुळे प्रवास व पर्यटन या संकल्पनेत बदल घडून आला. आर्थिक सुबत्तेमुळे एका नव्या गर्भश्रीमंत वर्गाचा उदय झाल्याने 'दुसरे घर' (Second Home) ही संकल्पना उदयास आली. नेपल्सच्या किंनाऱ्यावर रिसॉर्ल्टची निर्मिती झाली व 'आनंद प्राप्तीसाठी पर्यटन' ही संकल्पना पुढे आली. मात्र रोमन साम्राज्याच्या पाडावानंतर पर्यटनाला संकुचित स्वरूप येवून त्याला धार्मिक कृत्याचे स्वरूप प्राप्त झाले. हे धार्मिक पर्यटन मात्र उत्स्फूर्त स्वरूपाचे होते. पुनरुज्जीवन कालखंडात नवनवीन सुधारणा, रस्ते विकास, शहरीकरण यामुळे पर्यटनाला चालना मिळाली. १५ व्या शतकात युरोपमध्ये इटली सामाजिक सांस्कृतिक केंद्र बनलेले होते आणि याच काळात 'ग्रॅंड टूर' ही संकल्पना अस्तित्वात आली. मात्र प्रारंभिक काळात या ग्रॅंड टूरचे स्वरूप अभिजनवादी होते. ग्रॅंड टूर प्रमाणे या काळात 'समुद्र विहार' ही संकल्पनाही प्रसिध्द झाली. समुद्र विहार पर्यटनामुळे समुद्र किनाऱ्यावरील विश्रामगृहाचा विकास झाला. १८ व्या शतकाच्या अखेरीस समुद्र विहार हे पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनलेले दिसते. स्वच्छंदवादी (Romanticism) कालखंडाच्या उदयामुळे निसर्ग, भूप्रदेश आणि सौंदर्यविषयक घटक यांच्याकडे पर्यटकांचे लक्ष वेधले गेले. या कालखंडात विविध लेखक कवी, कलाकार यांनी नैसर्गिक जगाच्या मूल्यांविषयी लिखाण केले, ते लिखाण पर्यटकांना आकर्षित करू लागले. 'लॉर्ड बायटन', 'विल्यम वर्डस्वर्थ' यांच्या लिखाणामुळे पर्यटनास चालना मिळाली.

१८ व्या शतकात युरोपमध्ये वार्षिक सुट्टीची संकल्पना उदयास आली. सुट्टीमुळे लोक प्रवासाला निघू लागले, परिणामी १८ वे शतक हे प्रवासाचे शतक समजले जावू लागले. इ.स. १५५२ मध्ये इंग्लंडचा राजा सहावा एडवर्ड याने उपवास व धार्मिक दिवस साजरे करण्याचा कायदा केला. या सुट्टीच्या परिणामस्वरूप लोक घराबाहेर पडू लागले. १९ व्या शतकात पर्यटनास आनंदासाठी पर्यटनाचे स्वरूप प्राप्त झाले. इ.स. १८४० च्या दरम्यान साधारण १,००,००० लोक इंग्लिश खाडी पार करून जात. पर्यटन हा उद्योग म्हणून पुढे येवू लागला होता. कारण या काळात रेल्वेसारखा जलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध झालेला होता, सामाजिक संक्रमण खूप मोठ्या प्रमाणात होत होते व जनतेमध्ये पर्यटनाविषयी आकर्षण निर्माण झालेले होते.

पर्यटन व्यावसायाचा विकास व व्यावसायिक कौशल्य यासंदर्भात थॉमस कुक याचे नाव प्राधान्याने घेतले जाते. १९ व्या शतकात पर्यटन ही संकल्पना कुकने जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. इ.स. १८४१ मध्ये

थॉमस कुकने पहिली सफर ५७० पर्यटकांना घेवून लिसेस्टर ते लॉगबरो या दरम्यान केली. व्यावसायिक पर्यटनांची सुरूवात कुकने केली. १८५०-१९०० या कालखंडात खऱ्या अर्थाने पर्यटन हे जनसामान्यांसाठी व आनंदासाठी आहे याची खात्री कुकने पटवून दिली आणि आधुनिक अर्थाने पर्यटन ही संकल्पना जगासमोर आली.

## २. भारतातील पर्यटनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी (प्राचीन ते आधुनिक)

भारताला प्रदीर्घ ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. प्राचीन काळापासून भारतात विविध धर्म, पंथ, उपपंथ, जाती व अनेकविध भाषेमुळे बहुआयामी व सर्वसमावेश संस्कृती निर्माण झालेली आहे. सर्वसमावेशक संस्कृतीमुळे आज शेकडो ऐतिहातिक, सांस्कृतिक, धार्मिक स्थळे पर्यटनाचे आकर्षण बिंदू आहेत. सांस्कृतिक वारश्याबरोबर भारतातील बहुरंगी भौगोलिक परिस्थितीसुध्दा आकर्षणाचे केंद्र आहे. विविध प्रकारचे हवामान, प्राणी, पक्षी, जंगले, नद्या, धबधबे, पर्वत शिखरे, समुद्र किनारे इत्यादीने भारताचे नैसर्गिक दालन समृध्द आहे. हजारो वर्षाची प्राचीन संस्कृती, कला, नृत्यकला, गायन, लोककला, हस्तकला, चित्रकला, शिल्पकला व वास्तुकला इत्यादीने भारताला पर्यटनाचे नंदनवन बनविलेले दिसते.

## अ) प्राचीन भारतीय पर्यटनाचे स्वरूप :-

आज आपण ज्या आधुनिक अर्थाने पर्यटनाकडे पाहतो, त्याप्रमाणे प्राचीन कालखंडात त्याचे स्वरूप नव्हते. प्राचीन पर्यटनाचे स्वरूप काहीसे धार्मिक, शैक्षणिक व व्यापारी स्वरूपाचे होते.

### १. धार्मिक पर्यटन (तीर्थाटन) :-

प्राचीन काळापासून भारतात हिंदू, बौध्द, जैन या प्रमुख धर्माचा आणि उपपंथाचा उदय व विकास झाला. बौध्द धर्माचा जगाच्या काही भागात प्रचार आणि प्रसार झाला, त्याची ख्याती पसरली. विविध देशातील अनुयायी भारताकडे येण्यास उद्युक्त झाले. यातून धार्मिक पर्यटन अर्थात 'तीर्थाटनास' चालना मिळाली, विविध धर्मसंकल्पना खास करून शांती व पापमुक्ती या कल्पनेतून चारधाम यात्रा करण्याची प्रथा निर्माण झाली. यामध्ये पश्चिमेकडे द्वारका, दक्षिणेकडे रामेश्वर, पूर्वेकडे जगन्नाथपुरी व उत्तरेत हिमालयातील बद्रिनाथ इत्यादीचा समावेश होतो. याशिवाय कांचीमधील एकाश्मेश्वर, श्रीरंगमधील जंम्बुकेश्वर, तंजावरमधील ब्रहदीश्वर मंदीर, चोल मंदिर, ऐहोळेचे कैलासनाथ मंदिर, काशी इत्यादी धर्मस्थळे प्रसिध्दीस आली.

प्राचीन काळी हिंदू धर्माबरोबर बौध्द धर्माचा भारताबरोबरच शेजारील देशांच्यामध्येही प्रचार आणि प्रसार झाला. बौध्द धर्म संस्थापक गौतम बुध्द यांनी साध्या व सोप्या भाषेत दिलेला उपदेश, शांती आणि अहिंसेचा मार्ग पुढे सम्राट अशोक, ग्रीक सम्राट मिनान्दर, सम्राट कनिष्क यांच्या राजाश्रयामुळे याचा प्रसार आग्नेय आशिया बरोबर मध्य आशियातही झाला. साहजिकच भारत हा बौध्द धर्मियांच्यासाठी आकर्षणाचे

केंद्र झाले. विशेषत: गौतम बुध्दांचे जन्मस्थान लुम्बिनी, जेथे त्यांना ज्ञानप्राप्ती झाली ते गया आणि जेथे बुध्दाचे निर्वाण झाले ते कुशीनगर प्रसिध्दीस आले. सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रसारासाठी 'धर्मयात्रांचे' आयोजन केले. हिंदू व बौध्द धर्माबरोबर या कालखंडात जैन धर्माचा प्रसार आणि प्रचार झाला. प्राचीन भारतीय विविध राजसत्तानी या धर्माला राजाश्रय दिल्याने विविध ठिकाणी जैन मंदिरांची निर्मिती झाली. अबू पर्वतावरील जैनमंदिर, कर्नाटकमधील श्रवणबेळगोळ ही ठिकाणे विशेष प्रसिध्दीस आली. परिणाम प्राचीन भारतात हिंदू, बौध्द व जैन धर्माच्या माध्यमातून धार्मिक पर्यटन मोठ्या प्रमाणात होत राहिले.

## २. व्यापारी पर्यटन (अर्थाटन) :-

प्राचीन पर्यटनातील एक प्रमुख उद्देश म्हणजे व्यापार, भारत एक समृध्द व संपन्न देश म्हणून जगभर प्रसिध्द होता. ग्रीक व रोमन साम्राज्याशी येथून थेट व्यापार चालत होता. हडप्पा, मोहंजोदडो, तक्षशिला, उज्जैन, प्रतिष्ठान, वैशाली, पाटलीपुत्र, चंपा, नीलकंठ, श्रीवस्ती, तगर ही प्राचीन शहरे व्यापारासाठी प्रसिध्द होती. याशिवाय, रोरूक, भृगकच्छंक, कल्याण, सोपारा, ताप्रल्पिती ही बंदरे. समुद्रमार्गे चीन, ब्रम्हदेश, जावा, सुमात्रा, बॅबिलोन, इराण, रोम येथून व्यापारी भारतामध्ये येत असत. व्यापारी उद्देशाने भारतात येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण जास्त होते.

## ३. धार्मिक परिषदा आणि पर्यटन :-

प्राचीन काळात विविध धार्मिक परिषदा भरल्या. यामध्ये प्रामुख्याने बौध्द धर्माच्या चार परिषदा झाल्या. गौतम बुध्दांच्या निधनानंतर इ.स.पू. ४८३ मध्ये 'महाकश्यप' यांच्या अध्यक्षतेखाली राजगृह येथे पहिली बौध्द परिषद झाली यामध्ये ५०० भिक्षुकांनी सहभाग घेतला. दुसरी परिषद इ.स.पू. ३८५ मध्ये वैशालीचा राजा 'कालाशोक' याने आयोजित केली होती यामध्ये ७०० पेक्षा जास्त भिक्षुकांनी सहभाग घेतला. तिसरी परिषद सम्राट अशोकाने 'मोगली पुत्र तिस्स' याच्या अध्यक्षतेखाली पाटलीपुत्र येथे भरली होती यामध्ये १००० भिक्षुक सहभागी होते. चौथी परिषद वसुमित्राच्या अध्यक्षतेखाली काश्मिर सम्राट कनिष्काने भरविली होती यामध्ये ५०० पेक्षा जास्त भिक्षुक सहभागी होते. या परिषदाच्या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण होत असे. त्यामुळे विविध भागातून मोठ्या प्रमाणात लोक यामध्ये सहभागी होते.

बौध्द धर्माप्रमाणे जैन धर्माच्याही सभा भरत होत्या. इ.स. ३१३ मध्ये पहिली धर्मसभा मथुरा येथे व दुसरी सभा इ.स. ५१२ मध्ये वल्लभी येथे भरली होती. या धर्मसभामध्ये जैन अनुयायांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. इ.स. ६४३ मध्ये सम्राट हर्षवर्धनाने चीनी प्रवासी 'हू-एन-त्सँग' याच्या सन्मानार्थ कनौज येथे धर्मपरिषदेचे आयोजन केलेले होते. ही परिषद २३ दिवस सुरू होती व यासाठी विविध राजे उपस्थित होते. गंगा-यमुना नदीच्या तिरावर हर्षवर्धनाने एक धर्म सभा आयोजित केली होती, यामध्ये १८ राजे व ५ लाख लोकांनी सहभाग घेतला होता. पूर्वमध्यकाळात दक्षिणेत १९७ पांड्य राजानी तामिळ कवीची 'संगम' आयोजित केलेली होती, ही संगम अनेक वर्षे सुरू होती. या संगमाना विविध भागातील

कवी-पर्यटक हजेरी लावत. विविध धर्मियांच्या परिषदा, धर्मसभा व संगमाच्या माध्यमातून विविध साधक, भिक्षुक, कवी, विद्वान व सामान्य लोक हजेरी लावत. यामधून प्राचीन काळात पर्यटनाला चालना मिळत गेली.

## ४. शैक्षणिक पर्यटन (ज्ञानार्जन) :-

प्राचीन काळात भारतात विविध विद्यापीठे प्रसिध्दीस आली. यामधून बौध्द, जैन, हिंदू, धर्मग्रंथ, संस्कृत, वेद, पुराणे इत्यादी संबंधी अध्यापन होत असे. याचा अभ्यास करण्यासाठी देश-विदेशातून अभ्यासक भारतात येवू लागले. परिणामी यातून शैक्षणिक पर्यटनास चालना मिळालेली दिसते. इ.स.पू. ४ थ्या शतकात 'तक्षशिला' हे प्रसिध्द विद्यापीठ होते. याचबरोबर 'नालंदा', गुजरातमधील 'वल्लभ', बिहारमधील 'विक्रमशील', 'कांचीपूरम', 'श्रीपर्वत' या विद्यापीठाचा समावेश होता. शैक्षणिक दृष्टीकोनातून या विद्यापीठाला खूपच महत्त्व प्राप्त झालेले होते. या शैक्षणिक केंद्राना राजाश्रय मिळाल्यामुळे ही सर्व ठिकाणे शैक्षणिक पर्यटन स्थळे म्हणून विकसित झालेली दिसतात.

## ५. प्राचीन काळात भारतात आलेले परकीय पर्यटक (प्रवासी) :-

भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणे, विविध धर्मस्थळांना भेटी देणे यासाठी अनेक परकीय पर्यटक अर्थात प्रवासी भारतात येऊन गेलेले दिसतात. इ.स.३९९ मध्ये 'फा-हि यान' हा चीनी प्रवासी भारतात आला. त्याने मथुरा, श्रीवस्ती, कपिलवस्तू, वैशाली, पाटलीपुत्र, राजगृह, गया, वाराणसी, ताम्रप्लिती इत्यादी शहरांना भेटी दिल्या. इ.स. ६३० मध्ये 'हू-एन-त्सँग' हा दुसरा चीनी प्रवासी भारतात आला. त्याला बौध्द धर्माचा अभ्यास करावयाचा होता. इ.स. ६७३-८८ च्या दरम्यान तिसरा चीनी प्रवासी 'इ-त्सिंग' भारतात आलेला होता. 'इ-त्सिंग'साठी श्रीगुप्त नावाच्या राजाने बुध्दगया येथे एका विहाराचे निर्माण केले, त्याला 'चीनी विहार' असे संबोधले जाते. तिबेटमधील 'तारानाथ' नावचा पर्यटकही भारतात आल्याची नोंद मिळते.

# ब) प्राचीन कालखंडात पर्यटकांना मिळणाऱ्या सेवासुविधा :-

प्राचीन कालखंडात विविध राजे सम्राटानी बौध्द, जैन व हिंदू धर्माला राजाश्रय दिला. याच्या माध्यमातून विविध परिषदा, धर्मसभा व संगमाचे आयोजन केले. परिणामत: मोठ्या प्रमाणात साधक, भिक्षुक व सर्वसामान्य व्यक्ती या धर्मस्थळांना हजेरी लावू लागल्या. त्यामुळे या धर्मस्थळांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होत गेले. त्या अनुषंगाने काही मूलभूत सेवा सुविधांचा विकास झाला.

## अ) दळणवळणाचा विकास :-

पर्यटन विकासामध्ये दळणवळणाचा विकास हा महत्त्वाचा घटक आहे. प्राचीन काळात शहरीकरण व व्यापारी भरभराट यामुळे दळणवळणाच्या साधनांचा विकास झाला. यामध्ये रस्ते मार्ग व जलमार्गाचा समावेश होतो. वेळोवेळी रस्त्याची कामे केली जात, रस्त्याच्या कडेने झाडाची लागवड होत असे.

रस्त्याच्या विशिष्ट टप्प्पावरती पाणपोई व धर्मशाळांची निर्मिती केल्याचे उल्लेख सापडतात. प्रवासासाठी घोडागाडी, घोडे व इतर साधनांचा वापर होत होता.

## ब) निवास व्यवस्था :-

प्राचीन कालखंडात धार्मिक व व्यापारी उद्देशाने मोठ्या प्रमाणात लोक प्रवास करत. त्यामुळे या प्रवाशांची राहण्याची सोय व्हावी यासाठी विविध ठिकाणी 'धर्मशाळा'ची निर्मिती केलेली होती. प्रवाशांच्या सोयीसाठी या धर्मशाळा बांधल्यामुळे या माफक दरात किंवा मोफत असत. तेथील व्यवस्थापक या प्रवाशांना त्या-त्या भागातील सर्व बाबांची माहिती देत असे. मौर्य काळात प्रवाशांच्या सुविधा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात आल्याचा उल्लेख मिळतो. प्रवाशांसाठी व पशुपक्षांसाठी धर्मशाळांच्या अनुषंगाने सार्वजनिक दवाखाने सुरू केलेले होते. धर्मशाळेत राहणाऱ्या प्रवाशांची नोंद संबंधित शहरातील अधिकाऱ्यांना दिली जात असे.

## क) मार्गदर्शक सुविधा :-

प्राचीन काळी प्रवास करणे ही तशी साधी-सोपी गोष्ट नव्हती. प्रवाशी पर्यटकांना चोर, दरोडेखोर यांच्यापासून भिती असे. त्यामुळे त्या-त्या भागातील अनुभवी व विविध संकटाची माहिती असणारी मार्गदर्शक देखील उपलब्ध असल्याच्या नोंदी मिळतात. नैसर्गिक आपत्तीपासून दूर ठेवण्यासाठी 'अंतपालाची' नेमणूक केली जात. त्याच्यासाठी जो खर्च येत असे तो व्यापाऱ्यांच्या जकातीमधून वसूल केला जात असे. मौर्य काळात परकीय पर्यटकांची व्यवस्था करण्याकरिता स्वतंत्र खात्याची निर्मिती केलेली होती. या खात्यामार्फत त्यांच्या राहण्याची, प्रवासाची आणि वैद्यकीय मदतीची योग्य तरतूद केली जात होती.

## ड) प्रवासासाठी परवाना :-

परकीय व देशी प्रवासी अथवा पर्यटकांना राजदरबारातून परवानगी घेण्याची पध्दती होती, त्याला 'मुद्रा' असे म्हणत. जो प्रवासी मुद्रा न घेता प्रवास करील त्या व्यक्तीला दंड केला जात. त्यामध्ये देशी प्रवाशांना ११ पण व परदेशी प्रवाशाला ५०० ते १००० पणाचा दंड केला जात असे. मध्यमवर्गीय प्रवाशांना 'मुद्राध्यक्ष' या अधिकाऱ्याकडून परवानगी घ्यावी लागत होती.

एकूणच प्राचीन भारतीय लोकांचा प्रवास अथवा पर्यटनाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, धर्म, व्यापार, शिक्षण, धर्मपरिषदा, संगम इत्यादीच्या माध्यमातून प्रवासाला चालना मिळाली. यातून विविध प्रांतातील चालीरिती, रूढी-परंपरा, सांस्कृतिक जीवन यांची ओळख होण्यास मदत होत असे. याच कारणामुळे परकीय प्रवासीदेखील भारतात आले. त्या-त्या कालखंडातील विविध राज्यकर्त्यांनी प्रवाशांच्या सोयीकरिता, दळणवळण, राहण्याची, जेवण्याची, संरक्षणाची व मार्गदर्शकाची सोय केलेली दिसते.

## क) मध्यकालीन भारतीय पर्यटन :-

गुप्त साम्राज्याच्या ऱ्हासानंतर भारतात प्रादेशिक राज्ये अस्तित्वात आली. या राज्यांनी आपापल्या राज्यात संरक्षण व अंतर्गत विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले. व्यापार, उद्योग, कला क्षेत्रात विकास होत राहिला. या काळात इस्लामिक आक्रमणे होण्यास सुरूवात झाली. त्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होवू लागली. भारतातील आर्थिक संपन्नता हा या आक्रमणांचा प्रेरक घटक होता. ११ व्या शतकापासून पुढचा काळ हा राजकीय अनागोंदीचा व असुरक्षिततेचा होता. या अस्थिर व धामधुमीच्या वातावरणाचा परिणाम प्रवास व पर्यटनावरही झालेला दिसतो.

### अ) सुलतानशाही कालखंडातील पर्यटन :-

प्राचीन कालखंडाप्रमाणे मध्यकाळातही व्यापार हेच पर्यटनाचा प्रमुख उद्देश होता. सुरक्षेच्या कारणास्तव व्यापारी लोक तांड्याने प्रवास करत. या काळातही चोर, लुटारू, दरोडेखोर यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात होता, हे जरी खरे असले तरी जे राजमार्ग होते त्यावर व्यापारी तांडे व प्रवाशांच्या संरक्षणाची खबरदारी घेतली जात असे. प्रवाशांच्या सोयीसाठी धर्मशाळा अथवा सराया बांधलेल्या होत्या. कुतुबुद्दीन ऐबक, मुहमंद तुघलक, बल्बन, जलालुद्दीन खिलजीने राजमार्ग, नद्यांवर पूल, सराया बांधल्याचे व चोरापासून संरक्षणासाठी विशेष तरतुदी केल्याच्या नोंदी मिळतात. या काळात प्रवासाचे प्रमुख माध्यम म्हणून घोडा गाडी, बैल गाडी, गाढव, बैल यांचा वापर केला जात होता. कमी अंतरासाठी डोली अथवा पालखीचा वापर केला जात असे.

### ब) विजयनगरकालीन पर्यटन :-

दक्षिण भारतातील हिंदू साम्राज्य म्हणून विजयनगरचा उल्लेख होतो. विजयनगर कालखंडात मोठ्या प्रमाणात धार्मिक, सामाजिक, धार्मिक घटकांचा विकास होण्यास मदत झाली विशेषत: धार्मिक बाबतीत. त्यामुळे या काळात धार्मिक उद्देशाने होणाऱ्या पर्यटनात विकास झाला. कृष्णदेवरायाच्या काळात कृष्ण मंदिर, लक्ष्मीनृसिंह मंदिर व हंपीच्या मार्गावरील अनंतशयनगुडी मंदिर इत्यादी मंदिरांचे बांधकाम झाले. या मंदिरांच्या अनुषंगाने मोठ-मोठे धार्मिक उत्सव होवू लागले. या उत्सवासाठी खूप मोठ्या प्रमाणात लोक सहभागी होत. विजयनगरचे राजे धार्मिक वृत्तीचे असल्याने त्यांनी मोठ्या प्रमाणात धार्मिक कारणासाठी पर्यटन केल्याचे दिसते. एवढेच नव्हे तर त्यांनी विविध धर्मस्थळी सेवा सुविधा निर्माण केल्या. विजयनगर सम्राटानी बांधलेली हिंदू मंदिरे पुढील कालखंडात धार्मिक पर्यटन स्थळे म्हणून प्रसिध्द पावली.

### क) वास्को-द-गामा आणि भारताचा शोध :-

प्राचीन काळापासून भारतातून युरोपमध्ये खूप मोठ्या प्रमाणात मसाल्याच्या पदार्थांचा व्यापार चालत होता. इ.स. १४५३ मध्ये तुर्कानी रोमन साम्राज्यातील कॉन्स्टॅन्टिनोपल हे शहर जिंकून घेतले. हे शहर म्हणजे युरोपचे जूने प्रवेशद्वारच होते. मात्र कॉन्स्टॅटिनोपल वरील तुर्कांच्या वर्चस्वामुळे युरोपियन व्यापाऱ्यांच्या

पूर्वेकडील व्यापारासाठीचा खुष्कीचा मार्ग बंद झाला. पर्यायाने व्यापारासाठी त्यांना दुसऱ्या मार्गाचा शोध घेणे क्रमप्राप्त झाले. यातून नवीन जलमार्ग शोधण्याचा प्रयत्न सुरू झाला. पोर्तुगालच्या राजाने पोर्तुगालमधील धाडशी दर्यावर्दी खलाशांना यासाठी प्रोत्साहन दिले. यातूनच २१ मे १४९८ रोजी वास्को-द-गामा हा पोर्तुगीज खलाशी केप-ऑफ गुड होप या अफ्रिकेतील टोकाला वळसा घालून भारतात कलिकत बंदरात आला. गामाच्या या शोधामुळे युरोपीय लोकांना एका नव्या अवकाशाचा उदय झाला. भारताचा युरोपीयन लोकांशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला. युरोपमधील नव-नवीन शोध, विचार व संस्कृती भारतामध्ये येण्यास मदत झाली. भारतातील वैभवशाली संस्कृतीची विशेषत: आर्थिक संपन्नतेची भुरळ युरोपीय देशांना पडली. गामाच्या या साहसी कृत्याने प्रभावित होवून नव-नवीन प्रदेशांच्या शोधासाठी युरोपीय देशामध्ये चढाओढ निर्माण झाली. पुढे यातून पर्यटनाला चालना मिळाली.

## ड) मध्यकालीन कालखंडात भारतात आलेले प्रवासी :-

प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती, समाजजीवन व व्यापारी महत्त्व लक्षात घेता मध्यकालीन कालखंडात अनेक परकीय प्रवाशी येवून गेलेले दिसतात. मध्यकालीन पहिला प्रवासी म्हणजे ट्यूडेलामधील 'बेंजामिन' हा होय. त्याने इ.स. ११६० मध्ये सॅरोगासापासून प्रवासाला सुरूवात केली. सलग तेरा वर्षे प्रवास करून युरोप-पॅरिस व भारताला भेट दिली. प्रसिध्द मोरोक्कन प्रवासी इब्न बतुता महंमद तुघलकाच्या काळात इ.स. १३३३ मध्ये भारतात आला. त्याने १८ वर्षे दिल्लीमध्ये वास्तव्य केले. त्यांचे 'किताब-उल-रहेला' हे प्रवास वर्णन प्रसिध्द आहे.

इ.स. १२७१ मध्ये प्रसिध्द वेनिसीयन प्रवासी मार्को पोलो भारतात आला. त्याने आपल्या प्रवास वर्णनात येथील इतिहास, कृषी उत्पादन, भारत व युरोपमधील व्यापार यासंबंधी माहिती दिलेली आहे. १५ व्या शतकाच्या प्रारंभी इटालियन प्रवाशी निकोलो कौटी, इ.स. १४७० मध्ये रशियन व्यापारी अथेन्सियन निकीतीन, इ.स. १५०२-०४ च्या दरम्यान इटलीचा प्रवासी लुडोव्हीको दी वर्थेमा, पोर्तुगीत प्रवासी डोमिंगो पायस, बार्बोसा, फादर एन्थोनी मोसेरात इत्यादीचा समावेश होता. मुघल कालखंडात आलेला राल्फफिच (१५८८-९१) विल्यिम हॉकिन्स (१६१८-२३), विल्यिम फिच (१६०८), जोन जुरदा (१६०८-१७), थॉमस कोर्यत, सर थॉमस रो (१६१५-१९) एडवर्ड टैरी व फ्रेंच डॉक्टर फ्रान्सिस बर्नियर (१६५८) इत्यादी भारतात आलेले दिसतात. बर्नियरचे प्रवास वर्णन 'Travlles in the mughal empire' या नावाने प्रसिध्द आहे. याचबरोबर फ्रेंच जडजवाहिऱ्याचा व्यापारी जॉन बॅप्टिस्ट ट्रॅवेनियर, इटालियन प्रवाशी निकोलय मनुची यांचा उल्लेख होतो. मनुचीने 'Sterio-Do-Mogor' हे आपले प्रसिध्द प्रवास वर्णन लिहिलेले आहे. या परकीय प्रवाशांच्या प्रवास वर्णनातून तत्कालीन राजकीय, आर्थिक, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, रूढी-परंपरा, प्रथा, आचार-विचार, खाद्य संस्कृती कपडे, व्यापारी वस्तू, कृषी उत्पादने, शेती, प्राणी, पक्षी इत्यादीसंबंधी विपुल प्रमाणात माहिती मिळते. या प्रवाशांच्या प्रवास वर्णनामुळे युरोपमध्ये भारतीय इतिहास व संस्कृतीबद्दल एक प्रकारची उत्सुकता निर्माण झाली. भारतीय वैभवाची भुरळ युरोपमध्ये निर्माण झाली, परिणामी पुढे अनेक युरोपीय व्यापारी कंपन्या व व्यापारी भारतात आलेले दिसतात.

## इ) मुघल काळात प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा-सुविधा :-

मुघल कालखंडात अस्थिर राजकीय परिस्थिती कमी होण्यास मदत झाली. अनेक शहरे, व्यापारी पेठा, औद्योगिक केंद्रे, बंदरे यांचा विकास झाला. याच कालखंडात मुघल स्थापत्य कलेचा विकास झाला. परिणामी धार्मिक व व्यापारी पर्यटन सौंदर्य अभिरुचीतून होवू लागले. मुघल सत्ताधिशांनी प्रवाशांसाठी अनेक सेवा-सुविधा निर्माण केल्या. विशेषत: बाबराने आग्रा ते काबूल या राजमार्गावर ९-९ कोसावर उंच मिनार निर्माण केले. प्रत्येक १८ कोसावर घोडे व जल घरांची व्यवस्था केली. घोड्यांच्या चारा-पाण्याची व्यवस्था केली. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली, प्रवाशांसाठी वेगवेगळ्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. शेरशहा सूरीच्या काळात प्रत्येक सराईमध्ये 'हरकरे' नेमले. हे हरकरे दररोज ७०-८० मैल प्रवास करून संदेशांची ने-आण करत. अकबर-जहांगिराच्या काळात पक्के रस्ते बांधण्यावर भर दिलेला दिसतो. जहांगिराने मोठमोठ्या मार्गावर अंतर दर्शविणारे दगड उभारले, नदीवर पुल बांधले. सराई व प्रवाशांच्या संरक्षणाची व्यवस्था झाल्याने सर्वसामान्य लोकांच्या पर्यटनमध्ये वाढ झाली. मुघल सम्राट उन्हाळ्यामध्ये थंड हवेच्या ठिकाणी वास्तव्यास जात असत. ह्या गोष्टी मात्र सर्वसामान्य व्यक्तीला शक्य नव्हत्या. मुघल सत्ताधिशांनी जरी प्रवाशांसाठी सेवा-सुविधा निर्माण केल्या तरी त्या काळातील प्रवास हा खडतरच होता.

## ई) मराठा कालखंडातील पर्यटन :-

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केल्यानंतर महाराष्ट्रातील राजकीय अस्थिरता दूर होण्यास मदत झाली. इस्लामिक आक्रमणे काहीसी थांबली. सर्वसामान्य जनतेला धार्मिक उसंत मिळाली. पंढरपूर, कोल्हापूर, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर इत्यादी धार्मिक स्थळी सर्वसामान्य लोकांची भेट देण्याची संख्या वाढली. पेशवे धार्मिक वृत्तीचे असल्या कारणाने धार्मिक पर्यटन वाढीस लागले. पेशवे व मराठी सरदारांनी विविध ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी घाट बांधले, पुल बांधले, विहिरी खोदल्या, पिण्याच्या पाण्याची सोय केली. कोल्हापूरची अंबाबाई, जोतिबा इत्यादी ठिकाणचे महत्त्व वाढीस लागल्याने धार्मिक पर्यटानला चालना मिळाली. याकाळात 'काशी' यात्रेला 'पवित्र' यात्रेचा दर्जा प्राप्त झालेला दिसतो. त्यामुळे अनेक लोक काशी यात्रेला जात असत.

## ड) १८ ते २० व्या शतकातील पर्यटन :-

मुघल सत्तेच्या ऱ्हासानंतर भारतामध्ये छोटी-छोटी राज्य उदयास आली. या राज्यातील सततच्या संघर्षामुळे १८ व्या शतकात पर्यटनास अडथळे निर्माण झाले. अनेक व्यापारी मार्गावर दरोडेखोरांच्या संघटित टोळ्या कार्यरत होत्या. व्यापारी व यात्रेकरूंचे तांडे यांची लुटमार करत. राजकीय अस्थिरतेचा परिणाम शहरी उद्योगधंदे यांच्यावर झाला. परिणामी दिल्ली, आग्रा, मथुरा, लाहोर, बऱ्हाणपूर यासारख्या महत्त्वाच्या शहराची अधोगती झाली. मात्र या काळात युरोपीयन व्यापारी कंपन्यांच्या माध्यमातून युरोपशी व्यापार चांगल्या प्रकारे सुरू होता. या व्यापाराच्या माध्यमातून पर्यटन होत होते.

## अ) आधुनिक पर्यटनाची सुरुवात :-

ब्रिटीश राजवटीत आधुनिक अर्थाने व संयोजीत स्वरूपात पर्यटन ही संकल्पना पुढे आली. या काळात भारतात येवून गेलेल्या परकीय प्रवाशांनी भारताच्या वैभवशाली ऐतिहासिक-सांस्कृतिक वारशाचे वृत्तांकन युरोपभर केल्याने भारत आकर्षणाचे केंद्र बनत गेला. १९ व्या शतकात भारतात पर्यटन व्यावसायास नवी दिशा प्राप्त झाली.

## ब) थंड हवेच्या ठिकाणांचा विकास :-

ब्रिटीश कालखंडात भारतात थंड हवेच्या ठिकाणांचा विकास झाला. हीच ठिकाणे पुढे पर्यटनांची केद्रस्थाने बनलेली दिसतात. उन्हाळ्यात सपाट भूप्रदेश बराच तापत असल्यामुळे समशीतोष्ण कटिंबंधातील इंग्लंडमधून आलेल्या इंग्रजांना येथील उन्हाळा फारच त्रासदायक ठरत असे. त्यामुळे त्यांना उंच पर्वती भागात निसर्गरम्य ठिकाणी वास्तव्य करण्याची गरज निर्माण झाल्याने इंग्रज सत्ताधिश व काही भारतीय संस्थानिकांनी 'हिल स्टेशन' अर्थात थंड हवेची ठिकाणे निर्माण केली. इंग्रजांनी सिमला ही उन्हाळी राजधानी बनवली. त्याचबरोबर मसुरी, राणीखेत, दार्जिलिंग, पंचमगढीच्या टेकड्या इत्यादी थंड हवेची ठिकाणे म्हणून प्रसिध्दीस आली. या माध्यमातून पर्यटनास चालना मिळाली.

## क) दळणवळण सुविधांचा विकास :-

पर्यटन विकासामध्ये दळणवळण हा घटक महत्त्वाचा आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या पोस्ट विभागामार्फत प्रवासासाठी 'पालखी' पध्दतीची योजना सुरू केली. ज्या व्यक्तींना ह्या माध्यमातून प्रवास करावयाचा आहे, त्यांनी १५ दिवस अगोदर प्रवासाची पूर्व कल्पना संबंधित विभागाला द्यावी लागे. चार व्यक्तीकडून नेल्या जाणाऱ्या पालखीमधून हा प्रवास होत असे. ठराविक अंतर पार केल्यानंतर पालखीचे भोई बदलले जात असत. उन्हाळ्यामध्ये हा प्रवास रात्रीचा होईल. सर्व प्रवास मार्गदर्शकाच्या व दिवे घेवून फिरणाऱ्या गस्तवाल्यांच्या माध्यमातून होत असे. रात्रीच्या वेळी प्रवाशांना थांबण्यासाठी डाक बंगल्याची निर्मिती करण्यात आली. मात्र ही बाब फारच खर्चिक होती. इ.स. १८९० मध्ये टंटी मूल याने पहिली 'हॉर्स डाक' ही व्यवस्था सुरू केली. यामध्ये पालखीच्या ऐवजी घोड्याचा वापर होवू लागला. पहिल्या प्रकारच्या तुलनेत हा प्रवासकमी खर्चिक व वेगवान होता, त्यामुळे पर्यटनास गती मिळाली.

## ड) रेल्वेची सुरुवात :-

भारतीय उपखंडावर आपले प्रभुत्व निर्माण करण्यासाठी ब्रिटीशांनी येथे रेल्वेची निर्मिती केली. इ.स. १८५३ मध्ये ठाणे ते बोरीबंदर हा पहिला रेल्वेमार्ग बांधून सुरू करण्यात आला. पुढे १८६९ पर्यंत भारतात ६००० कि.मी. इतक्या लांबीचा रेल्वेबार्ग निर्माण झालेला होता. या आधुनिक दळणवळणाच्या साधनाचा फायदा ज्याप्रकारे ब्रिटिशांना झाला. त्याचप्रमाणे भारतातील प्रवाशांचा प्रवास सुखद व जलद होण्यासाठीही झाला. परिणामी, भारतात पर्यटन अधिक गतीने होण्यास मदत झाली. रेल्वे मार्गाच्या उभारणीमुळे भारतीय

पर्यटनास गती मिळाली. भारतातील प्रमुख शहरे व पर्यटन स्थळे रेल्वेच्या माध्यमातून एकमेकांना जोडली गेली. यामुळे कमी कालावधीत जास्त पर्यटन स्थळे पाहणे शक्य झाले.

## इ) सार्जंट समिती :-

ब्रिटीश सरकारला पर्यटनाचे महत्त्व माहीत होते. पहिल्या महायुध्दानंतर त्यांनी पर्यटनाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न सुरू केलेला होता. मात्र काही वर्षातच दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमू लागल्याने हा विषय बाजूला पडला. दुसऱ्या महायुध्दानंतर जाणीवपूर्वक पर्यटन विकासाकरिता संघटितरित्या प्रयत्न सुरू झाले. पर्यटनाला प्रोत्साहन देवून पर्यटन व्यवसायाचा विकास कसा करावा याचा विचार व उपाययोजना सुचविण्यासाठी इ.स. १९४५ मध्ये त्यावेळचे शिक्षणविषयक सल्लागार सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली ती समिती 'सार्जंट समिती' म्हणून ओळखली जाते. या समितीचा उद्देश पर्यटन विकासाच्या संभाव्यतेचे सर्वेक्षण करणे हा होता. या समितीने ऑक्टोबर १९४६ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. या अहवालात देशी व विदेशी पर्यटकांना उत्तेजन व पर्यटन उद्योगाच्या विकासाविषयी उपाययोजना सुचविल्या होत्या, त्या खालीलप्रमाणे :-

१) देशी-विदेशी पर्यटकामध्ये उत्तम हवामानाची ठिकाणे, निसर्ग सौंदर्य असलेली स्थळे, तीर्थक्षेत्रे, विश्रामगृहे, ऐतिहासिक व पुरातत्त्वशास्त्रीय स्थळे यांच्याविषयी रूची निर्माण करण्यासाठी नवीन संकल्पना सुचविणे.

२) जी पर्यटन स्थळे विकसित होणार आहेत व ज्यांची जाहिरात होणार आहे, अशा पर्यटनस्थळी भारतीय व परदेशी पर्यटकांसाठी काय सोयीसुविधा निर्माण कराव्यात. ज्यामध्ये रेल्वे स्टेशनपासूनची प्रवासाची सोय, निवासाची सोय, साहित्य व मार्गदर्शनपर पुस्तके, अधिकृत गाईड इत्यादीची माहिती असेल.

३) केंद्र सरकार, राज्य सरकार अथवा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीच्या पर्यटन विभागांना आवश्यक त्या सेवा-सुविधा पुरविण्यासाठी सुचना करण्यात याव्यात.

४) भारतातील देशी-विदेशी पर्यटकांच्या स्वरूपाचे व विस्ताराचे पुनर्रावलोकन केल्यानंतर त्यांच्या वाढीसाठी किंवा दुसरी पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी काय करता येईल याचा अभ्यास करणे.

सार्जंट समितीने केलेल्या शिफारशीनुसार पर्यटनासंबंधी पायाभूत गोष्टी, देशात व परदेशात पर्यटनासंबंधी जाहिराती, पर्यटन उद्योग हाताळण्यासाठी सर्व पातळ्यावरील लोकांमध्ये परस्पर संबंध इत्यादीवर भर देण्यात आला. सार्जंट समितीच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी पर्यटन उद्योगांचा संपूर्ण आराखडा उपलब्ध झालेला होता. पुढील काळात भारतात हॉटेल्सचे जाळे निर्माण झाले, दळणवळण क्षेत्राचा विकास होण्यास मदत झाली. ज्यामध्ये रस्ते, रेल्वे व विमान वाहतुकीचा समावेश होता. पर्यटनाशी संबंधित विविध विभागात समन्वयाचा अभाव होता, सार्जंट समितीच्या शिफारशीनुसार मध्यवर्ती पर्यटन संघटना स्थापन करण्यात आली.

## अ) मध्यवर्ती पर्यटन संघटना :-

पर्यटनाशी संबंधित विविध विभागात समन्वय साधण्यासाठी 'मध्यवर्ती पर्यटन संघटना' स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार दिल्ली, कोलकत्ता, मुंबई व मद्रास येथे प्रादेशिक पर्यटन, कार्यालये स्थापन करण्यात आली. याशिवाय पर्यटन वाहतूक अस्थायी समिती स्थापन करण्याची सूचना करण्यात आली. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर सार्जंट समितीच्या शिफारशींची मोठ्या प्रमाणात अंमलबजावणी सुरू केली. परिणामी पर्यटन उद्योगास चालना मिळाली.

## ब) पर्यटन वाहतूक समिती :-

भारतातील पर्यटन क्षेत्राचा विकास करण्याच्या उद्देशाने इ.स. १९४५ मध्ये वाहतूक मंत्रालय अंतर्गत पर्यटन विकासाविषयी एक वेगळी पर्यटन वाहतूक समितीची स्थापना करण्यात आली. या समितीच्या माध्यमातून देशांतर्गत पर्यटनाचा विकास होवू लागला. त्यामुळे इ.स. १९५५-५६ मध्ये या शाखेचा विस्तार करण्यात आला व याच्या चार उपशाखा निर्माण करण्यात आल्या.

### १. पर्यटन वाहतूक विभाग :-

देशी-विदेशी पर्यटकांच्या कायदेशीर बाबी, ट्रॅव्हल एजंटस्, हॉटेल व विश्रामगृहे यांचा विकास करणे, पर्यटकांची सांख्यिकी माहिती गोळा करणे, महिन्याचे अहवाल तयार करणे, मार्गदर्शकांना प्रशिक्षण देणे, पर्यटन केंद्राचा विकास करणे व पर्यटन ब्युरोची निर्मिती करणे इत्यादी बाबींची जबाबदारी या विभागाकडे होती.

### २. पर्यटन प्रशासन विभाग :-

पर्यटन विभागाचे अंदाजपत्रक तयार करणे, भारतात व परदेशात पर्यटन कार्यालये सुरू करणे, पर्यटन कार्यालयाला वित्तीय अधिकार देणे आणि पर्यटन कार्यालयांशी वेळोवेळी तपासणी करणे इत्यादी कामे पर्यटन प्रशासनाची होती.

### ३. पर्यटन जाहिरात विभाग :-

पर्यटन व्यवसायाशी संबंधित माहितीपत्रक, पोस्टर्स, मार्गदर्शक पुस्तके तयार करणे, वर्तमानपत्रे व मासिकात पर्यटन स्थळांची जाहिरात देणे व पर्यटनावरील प्रदर्शने भरविणे इत्यादी कामे पर्यटन जाहिरात विभागाची होती.

### ४. पर्यटन साहित्य वितरण विभाग :-

जाहिरात विभागाने तयार केलेली माहितीपत्रके, मार्गदर्शक पुस्तिका व पोस्टर्सचे पर्यटनस्थळी वितरण करणे.

### क) पर्यटन माहिती कार्यालये :-

देशात पर्यटनाचा विकास व्हावा म्हणून भारतात व परदेशात पर्यटन माहिती कार्यालये उघडण्यात आली. इ.स. १९५५ मध्ये ९ कार्यालये सुरू केली. या कार्यालयांना खालील जबाबदारी सोपविण्यात आलेली होती.

१) स्थानिक पर्यटन कार्यालयाशी संपर्क ठेवून समन्वय साधणे.

२) पर्यटन केंद्रांची अद्ययावत माहिती पर्यटकांना पुरविणे.

३) पर्यटनस्थळांची जाहिरात करणे.

४) स्वदेशी पर्यटकांच्या आवश्यक त्या गरजांची पूर्तता करणे.

### ड) परदेशात पर्यटन माहिती कार्यालयाची सुरूवात :-

भारतामध्ये परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी परदेशात पर्यटन माहिती कार्यालये सुरू करणे गरजेचे होते, त्या दृष्टीकोनातून इ.स. १९५२ मध्ये न्यूयॉर्क येथे पहिले पर्यटन माहिती कार्यालय सुरू करण्यात आले. इ.स. १९५५ मध्ये लंडनमध्ये, इ.स. १९५६ मध्ये पॅरिस येथे सदरची कार्यालये सुरू करण्यात आली. याचवर्षी ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व श्रीलंकेतही पर्यटन कार्यालये सुरू केली. या कार्यालयातून भारतातील प्रसिध्द पर्यटन स्थळांची जाहिरात करण्यात येत असे.

### इ) पर्यटन मंत्रालयाची स्थापना :-

भारतातील पर्यटनाच्या परिपूर्ण विकासासाठी लक्ष्य देण्यासाठी १ मार्च १९५८ रोजी वाहतूक मंत्रालयात पर्यटनासाठी एक वेगळे खाते सुरू करण्यात आले. यासाठी एका स्वतंत्र महासंचालकांची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर १४ मार्च १९६७ रोजी स्वतंत्ररित्या पर्यटन व नागरी वाहतूक मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली व ज्यांचा संपूर्ण कारभार एका पूर्णवेळ मंत्र्याकडे सोपविण्यात आला. त्यामुळे पर्यटन उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली.

### ई) पंचवार्षिक योजनेअंतर्गत पर्यटनाचा झालेला विकास :-

केंद्र सरकारने पर्यटन व्यावसायाचे महत्त्व ओळखून पर्यटन व्यवसायाच्या वाढीसाठी पंचवार्षिक योजनेंतर्गत विशेष प्रयत्न केले, त्याच्या परिणाम स्वरूप भारतात पर्यटन विकासाला चालना मिळाली.

### १) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमधील पर्यटन विकास : (१९५६-६१)

भारतामध्ये इ.स. १९५६-६१ या कालावधीत दुसरी पंचवार्षिक योजान राबविण्यात आली. या काळात पर्यटन विकासाची जबाबदारी वाहतूक मंत्रालयाकडे देण्यात आली. पर्यटन स्थळांची व तेथील वैशिष्ट्यांची माहिती भारतीय पर्यटक व भारतीय भाषांमध्ये पोहचविण्याची जबाबदारी या काळात निश्चित केलेली होती.

## २) तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१–६६) आणि भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना :–

इ.स. १९६१–६६ या कालावधीत तिसरी पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये पर्यटन विकासाची कामे विभाजीत करण्यात आली. ज्यामध्ये परदेशी पर्यटकांच्या सेवासुविधांची जबाबदारी केंद्र सरकारवर आणि पर्यटकांना पायाभूत सेवासुविधा पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारकडे देण्यात आली. इ.स.१९६३ मध्ये पर्यटन व्यावसायाचा विकास कसा करावा यासाठी 'झा समिती' नियुक्त करण्यात आली. या समितीने पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी स्वतंत्र मंडळ नेमण्याची शिफारस केली. त्यानुसार १) भारतीय पर्यटन वाहतूक महामंडळ, २) भारतीय पर्यटन महामंडळ, ३) हॉटेल महामंडळ स्थापन करण्यात आले. या तिन्ही मंडळांची कार्य स्वतंत्ररित्या चालू लागल्याने त्यांच्यात समन्वयाचा अभाव निर्माण झाला. त्यामुळे इ.स. १९६६ मध्ये तिन्ही महामंडळे एकत्र करून 'भारतीय पर्यटन विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली. या महामंडळाकडे पर्यटन स्थळांचा विकास, पायाभूत सेवा सुविधांचा विकास, पर्यटन स्थळाची जाहिरात व विविध पर्यटन महोत्सवांचे आयोजन करण्याची जबाबदारी देण्यात आली.

## ३) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९–७४) :–

चौथ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत पर्यटकांच्या पायाभूत सेवासुविधांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. विशेषत: विदेशी पर्यटक ज्या ठिकाणी प्रामुख्याने भेट देतात ती पर्यटन स्थळे यामध्ये निवासाची सोय, वाहतूक व्यवस्था व मनोरंजन यांचा समावेश होता.

## ४) पाचवी पंचवार्षिक योजना व पर्यटन विकास (१९७४–७९) :–

पाचव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत पर्यटकांसाठी निवास व्यवस्था बांधण्यासाठी २५ कोटीची तरतूद करण्यात आली. विशेषत: पयर्टन मुक्काम स्थळ रहदारी (Destination Traffic) ही संकल्पना राबविण्यात आली. या कालावधीत कोवालम (केरळ) गुलमर्ग (जम्मू–काश्मिर) कुलूमनाली (हिमाचल प्रदेश) व गोवा इत्यादी ठिकाणच्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यात आला. सांस्कृतिक पर्यटनाचा विकास करण्याबरोबरच ऐतिहासिक स्मारके व वारसा स्थळे यांच्यावर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले.

## ५) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०–८५) व टुरिझम सर्किट :–

भारताच्या पर्यटन विकासात सहावी पंचवार्षिक योजना महत्त्वपूर्ण मानली जाते. या योजने अंतर्गत पर्यटन विकासासाठी 'टूरिझम सर्किट' ही संकल्पना राबविण्यात आली. इ.स. १९८२ मध्ये पर्यटनविषयक राष्ट्रीय धोरणाची घोषणा करण्यात आली. या धोरणांतर्गत 'विशेष पर्यटन क्षेत्र' व 'पर्यटन सर्किट' या संकल्पनावर भर देण्यात आला.

## ६) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५–९०) :–

पर्यटनाच्या विकासासाठी या योजनेंतर्गत खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले, त्याचबरोबर

पर्यटन व्यावसायाला 'उद्योगाचा' दर्जा देण्यात आला. इ.स. १९८९ मध्ये पर्यटन प्रकल्पाला आर्थिक मदत करण्यासाठी 'वित्तीय महामंडळाची' निर्मिती करण्यात आली. हॉटेल व केटरिंग व्यवसायाला गती देण्यासाठी विविध प्रशिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली. रस्ते, रेल्वे व हवाई वाहतुकीच्या साधनांचा विकास करण्यावर भर दिला गेला.

## ७) आठवी पंचवार्षिक योजना (१९९०-९५) व नऊ कलमी कार्यक्रम :-

भारतातील पर्यटनाला चालना देण्यासाठी खाजगी गुंतवणुकीवर भर दिला व नऊ कलमी कार्यक्रम राबविण्यात आला.

१) सांस्कृतिक पर्यटन केंद्राचा विकास करणे.

२) देशातील विविध क्षेत्रात पर्यटनाची नवीन क्षेत्रे निर्माण करणे.

३) पायाभूत सेवासुविधात वाढ करणे.

४) विदेशी पर्यटकांच्या सोयीसाठी असलेली कार्यपध्दती सोपी करणे.

५) माफक दरात निवास व्यवस्था उपलब्ध करणे.

६) अभयारण्ये, हिवाळी क्रीडा केंद्रे व समुद्र किनाऱ्यांचा विकास करणे.

७) पर्यटक केंद्रात बाजारपेठांची निर्मिती.

८) राष्ट्रीय परंपरा पर्यटकांसाठी उपलब्ध करून देणे.

९) निवडक पर्यटन केंद्रे व क्षेत्राचा विकास करणे.

## ८) नववी पंचवार्षिक योजना (१९९५-२०००) :-

नवव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत इ.स. १९९६ मध्ये पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटनविषयक राष्ट्रीय धोरण तयार करण्यात आले. त्याचबरोबर एक विशेष कृती समितीची स्थापना करण्यात आली. या समितीवर सिक्कीम, जम्मू-काश्मीर व ईशान्य भारतातील पर्यटन स्थळाचा विकास करण्याची जबाबदारी देण्यात आलेली होती. विशेषत: रोजगार निर्मिती व परकीय चलनात वाढ करणे हे ध्येय होते.

## ९) दहावी पंचवार्षिक योजना :-

दहाव्या पंचवार्षिक योजने अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात ९० पर्यटने केंद्र विकसित करण्याचे निश्चित केले गेले.

## पर्यटनाला चालना देणारे विशेष अभियाने :-

भारतामध्ये इ. स. २००० नंतर पर्यटन विकासासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी विशेष अभियाने राबविण्यात आली. यामध्ये 'इनक्रेडिबल इंडिया'

(२००२), 'व्हिजिट इंडिया' (२००९), 'अतिथी देवो भव' (२०११) इत्यादीचा विशेषत्वाने उल्लेख होतो. या अभियानांतर्गत भारतातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व निसर्ग पर्यटन इत्यादी संदर्भात देश व विदेशात जाहिरात करण्यात आली. विशेष पर्यटन महोत्सव व मेळावे आयोजित केले गेले. जेणेकरून भारतीय पर्यटनाला प्रोत्साहन व चालना मिळाली.

## स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. 2

### अ) रिकाम्या जागा लिहा.

१. धार्मिक दिवशी सुट्टी.......... देशातून सुरू झाली.

२. १९५० मध्ये टंटी मूल याने ........... कंपनी स्थापन केली.

३. .......... शतकात ग्रँड टूर ही संकल्पना अस्तित्वात आली.

४. जैन धर्माची पहिली सभा ..............येथे भरली.

५. वित्तीय महामंडळाची स्थापना ............ पंचवार्षिक योजनेत केली.

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. आधुनिक पर्यटन व्यवसायाचा जनक कोणाला संबोधले जाते.

२. भारतात थंड हवेची ठिकाणी कोणी विकसित केली.

३. सार्जंट समितीची स्थापना केव्हा झाली.

४. भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना केव्हा झाली.

५. कोणत्या पंचवार्षिक योजनेमध्ये टुरिझम सर्किट ही संकल्पना राबविण्यात आली.

## १.२.३ पर्यटनाचे प्रकार आणि स्वरूप

मानवाला आदिम काळापासून विविध प्रदेशाबद्दल आकर्षण व जिज्ञासा वाटत असल्याने या जिज्ञासेपोटी त्याने प्रवास करायला सुरूवात केली. पर्यावरणातील बदलासाठी इतरत्र जाणे नव-नवीन प्रदेशांचा शोध घेणे, आनंद प्राप्त करणे, तिर्थयात्रेला जाणे असे त्याचे स्वरूप होते. आज पर्यटनाचे स्वरूप व प्रकार सतत बदलत असून पर्यटन हा एक सेवा उद्योग म्हणून समोर आला आहे. गेल्या दशकात पर्यटनांचे स्वरूप बदलले असून पर्यटन हे गतिमान झाले आहे तसेच त्याचे विविध व नाविन्यपूर्ण प्रकारही समोर येत आहेत. प्रस्तुत उपघटकात आपण पर्यटनाच्या प्रकाराविषयी जाणून घेणार आहोत.

### अ) पर्यटनाचे विविधांगी स्वरूप :-

पर्यटनाचे स्वरूप विविधांगी असल्याने पर्यटनाला आज उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पर्यटनात

पर्यटक हा मुख्य घटक आहे. पर्यटक प्रवासाला निघाल्यापासून त्यांचा संबंध विविध घटकांशी येतो. मोटार, रेल्वे, विमान, जहाज, निवास, पर्यटक मार्गदर्शक, पर्यटन स्थळी वस्तूची विक्री करणारे व बाजारपेठ इ. अनेक घटकांशी त्यांचा संबंध येतो आणि हा संबंध बहुतांशी आर्थिक घटकांशी असतो, त्यामुळे पर्यटन हा उद्योग बनला आहे.

### १. हंगामी स्वरूप :-

पर्यटन हा ठराविक काळात म्हणजेच हंगामी स्वरूपाचे असते. पर्यटनाचे स्वरूप मनोरंजनात्मक असल्याने पर्यटक वर्षातील तिन्ही हंगामात पर्यटनाचा आनंद घेतात. परंतु यात होणाऱ्या हालचाली किंवा प्रवास अल्पकालीन असतो. उदा. उन्हाळी हंगाम असल्यास थंड हवेचे ठिकाण, पावसाळ्यात धबधबे पाहणे, निसर्ग सौंदर्य आणि जंगल भ्रमणासाठी हिवाळा ऋतू निवडला जातो.

### २. भौगोलिक स्वरूप :-

पर्यटनाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास भौगोलिक घटक पर्यटनास कारक घटक ठरतात. हवा, समुद्र, भुरूप, बर्फ, थंड हवामान, पर्वत पठार, बेटे, धबधबे इ. पर्यटकांना आकर्षित करातत. त्यामुळे काही अंशी पर्यटनाचे स्वरूप भौगोलिक स्वरूपाचे आहे.

### ३. ऐतिहासिक, सांस्कृतिक व धार्मिक स्वरूप :-

विविध संग्रहालये, किल्ले, ऐतिहासिक स्मारके, वास्तु, वाडे, मंदिरे, मशीदी इ. ऐतिहासिक गोष्टी पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात जातात.

### ४. मनोरंजनात्मक स्वरूप :-

निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेणे, समुद्रात पोहणे, बर्फावरून घसरणे इ. गोष्टीत आनंद घेणे व मौजमजा करणे इ. स्वरूपाच्या असतात.

### ५. पर्यटनाची व्याप्ती :-

पर्यटनाचा इतिहास पाहिल्यास जागतिक पर्यटनाची व्याप्ती अगदी मर्यादित होती. दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने त्याचे स्वरूप मर्यादित होते. नातेवाईकांना भेटणे, व्यापार, यात्रा इत्यादी उद्देशांनी हा प्रवास प्रेरित झालेला होता. परंतु सोळाव्या शतकाच्या नंतर खास करून सागरी मार्गाचा शोध लागल्यानंतर प्रवास व पर्यटनाची संकल्पना व व्याप्ती वाढली. पर्यटनाची संकल्पना उदयास आली व पर्यटन क्षेत्राच्या कक्षाही रुंदावत गेल्या. सतराव्या शतकापर्यंत नवीन क्षेत्राचे शोध घेण्याचे कार्य व व्यापारापर्यंत पर्यटनाची व्याप्ती वाढण्यास मदत झाली.

१८ व्या शतकात युरोपमध्ये वार्षिक सुट्टीच्या संकल्पनेचा उदय झाला व पर्यटनाच्या स्वरूपात बदल झाला ज्यामध्ये अधिक व्यापकता आली. उत्तम दळणवळणाच्या सोयीत सुरक्षित प्रवास यामुळे पर्यटनाला

प्रोत्साहन मिळाले. १९ व्या शतकात रेल्वेमार्ग, जलमार्ग, हवाईमार्ग इत्यादीचा विकास झाल्यामुळे पर्यटनाची व्याप्ती अधिकच वाढली. औद्योगिक क्रांतीने आर्थिक संपन्नता युरोपीय देशात आली व वार्षिक सुट्ट्यामुळे पर्यटनाचा विकास झपाट्याने झाला. सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक, भौगोलिक, धार्मिक, ऐतिहासिक घटकांना केंद्रभूत करून पर्यटनाची व्यापकता वाढत आहे.

## ब) पर्यटनाचे प्रकार :-

पर्यटन हा बहुरूपी स्वरूपाचा व्यवसाय/उद्योग असून त्याचे विविध प्रकार आहेत. पर्यटन उद्योगाचे आर्थिक स्वरूप समजून घेण्यासाठी त्याचे प्रकार समूजन घेणे महत्त्वाचे आहे. पर्यटनाचे पर्यटक संख्या, पर्यटनाचा कालावधी, पर्यटनाचा हंगाम, पर्यटनाची गती, पर्यटनाचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व ऐतिहासिक स्वरूपानुसार देखील पर्यटनाचे प्रकार किंवा वर्गीकरण केले जाते. पर्यटन स्थळाचे आकर्षण, पर्यटनासाठी येणारा आर्थिक खर्च व पर्यटनाचा टप्पा हे पर्यटनाच्या वर्गीकरणाचे अन्य आधार आहेत.

### १. कालावधीनुसार

(अ) अल्पकाळाचे पर्यटन (ब) दीर्घकालीन.

### २. पर्यटक संख्येनुसार

(अ) व्यक्तिगत (ब) सामूहिक/समूह.

### ३. प्रदेशानुसार :-

(अ) परदेशी (ब) देशांतर्गत.

### ४. पर्यटनाच्या हंगामानुसार :-

(अ) उन्हाळी (ब) पावसाळी (क) हिवाळी.

### ५. गतिक्षमतेनुसार :-

(अ) निवासी पर्यटन (ब) तात्पुरते पर्यटन (क) भटके पर्यटन.

### ६. पर्यटनाच्या हेतुनुसार :-

(अ) धार्मिक (ब) ऐतिहासिक (क) भेटी-गाठी (ड) शैक्षणिक (इ) संशोधन (ई) मनोरंजन (फ) सांस्कृतिक (ग) आरोग्य (म) कृषी पर्यटन (त) साहसी (न) निसर्ग पर्यटन.

### ७. पर्यटनाचे साधनानुसार :-

(अ) पायी (ब) रस्ते मार्ग (क) रेल्वे मार्ग (ड) वायू मार्ग (इ) जल मार्ग.

## १. पर्यटनाच्या कालावधीनुसार पर्यटनाचे प्रकार :-

या पर्यटन प्रकारात प्रवासाचा कालावधी व पर्यटकाचा मुक्कामाचा कालावधी किती याचा विचार करून खालील दोन प्रकार पडतात.

अ) **अल्पकाळाचे पर्यटन :** या पर्यटनाचा कालावधी एक दिवस ते दहा दिवस इतका असतो. असे पर्यटक दीर्घकालीन पर्यटनास जाऊ शकत नाहीत अशांचा यामध्ये समावेश होतो. व्यक्ती किंवा समूह जेव्हा मर्यादित हेतूने व अगदी थोड्या प्रदेशाच्या पर्यटनासाठी बाहेर पडतो तेव्हा त्याचे पर्यटन हे अल्पकाळाचे पर्यटन असते.

ब) **दीर्घकालीन पर्यटन :** दीर्घकालीन पर्यटनाचा कालावधी दीर्घ म्हणजे काही आठवडे किंवा महिने असतो. एखादी व्यक्ती किंवा समूह दीर्घ काळासाठी मोठ्या उद्देशाने आणि अमर्याद प्रदेश अथवा अंतरासाठी बाहेर पडतात, त्यास दीर्घकालीन पर्यटन असे म्हणतात. उदा. गिर्यारोहन, चारीधाम इ.

## २. पर्यटकांच्या संख्येनुसार पर्यटनाचे प्रकार :-

प्रवासात पर्यटकांच्या सोबतच्या सहकाऱ्यांच्या संख्येनुसार पर्यटनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात ते खालीलप्रमाणे :-

अ) **व्यक्तिगत पर्यटन :** व्यक्तिगत पर्यटन म्हणजे एक व्यक्ती अथवा पर्यटकांचे अख्खे कुटुंब निश्चित केलेल्या ठिकाणी जातात, त्यांचा कार्यक्रम ते स्वत: आखतात आणि त्यात ते त्यांच्या स्वत:च्या इच्छेनुसार हवा ते बदल करतात त्यास व्यक्तिगत पर्यटन असे म्हणतात. या प्रकारात पर्यटक प्रवासाचा मार्ग, भोजन, निवास, प्रवासाचे माध्यम इ. स्वत:च ठरवतात व काही प्रसंगी त्यात बदलही करतात व हव्या त्या सोयी ते मिळवण्याची खात्री करतात.

ब) **सामूहिक/समूह किंवा गट पर्यटन :** समूह पर्यटनास काही वेळा संयोजित पर्यटन असेही म्हणतात. या प्रकारात गट आयोजकांनी आयोजित केलेल्या सहलीमध्ये सहभागी होतो. त्यासाठी जो खर्च आयोजकांनी निश्चित केला आहे तो त्यास भरावा लागतो यामध्ये पर्यटन स्थळे, निवास, भोजन व प्रवासाचे माध्यम संयोजक ठरवतात व ते निश्चित असते त्यामध्ये पर्यटकांना कोणतेही स्वातंत्र्य किंवा निवड असत नाही.

## ३. प्रदेशानुसार पर्यटनाचे प्रकार :-

या प्रकारामध्ये एखाद्या पर्यटक किंवा समूह किंवा दूरचा प्रवास करतो यावर आधारित असते. या पर्यटनास राज्य अथवा देशाच्या सिमा असत नाहीत.

अ) **परदेशी पर्यटन :** एखादा व्यक्ती अथा व्यक्तीसमूह आपल्या देशाच्या सीमा ओलांडून दुसऱ्या

देशांच्या सीमाहद्दीत जातो व तेथे पर्यटन करतो त्यास परदेशी पर्यटन असे म्हणतात. यात एका देशातील व्यक्ती दुसऱ्या देशातील ठिकाणे पाहण्यासाठी भ्रमंती करतो. यामध्ये परदेशी चलन व विविध परवाने आवश्यक असतात. उदा. पासपोर्ट, व्हिसा. अलीकडच्या काही दशकात हवाई वाहतूकीत झालेल्या क्रांतीकारक बदलामुळे या प्रकारातील पर्यटनात मोठा बदल व प्रगती झालेली आहे.

**ब) देशांतर्गत पर्यटन :** स्वदेशी अथवा देशांतर्गत पर्यटन म्हणजे देशातल्या देशांतर्गत केले जाणारे पर्यटन. एखादी व्यक्ती अथवा व्यक्तीसमूह आपल्या इच्छेनुसार/आर्थिक ताकदीनुसार व कोणत्याही प्रकारच्या प्रशासकीय परवान्याशिवाय देशांतर्गत पर्यटनास सहभागी होवू शकतो. यामध्ये प्रवासाच्या विविध साधनांची उपलब्धता असते शिवाय यामध्ये भाषा, धर्म यांचा फारसा अडसर नसतो.

## ४. पर्यटनाच्या हंगामानुसार पर्यटनाचे प्रकार :-

**अ) उन्हाळी पर्यटन :** ज्या प्रदेशामध्ये अधिक उष्ण स्वरूपाचा उन्हाळा असतो अशा प्रदेशातील किंवा देशातील व्यक्ती अथवा व्यक्ती समूह ज्या भागात थंड हवेची ठिकाणे आहेत अशा भागात सहलीचे आयोजन करतात. युरोपीय देशामध्ये मार्च ते जून अखेर असे उन्हाळ्यातील पर्यटनाचे आयोजन केले जाते.

**ब) पावसाळी पर्यटन :** पर्यटनासाठी पावसाळी हंगाम जास्त उपयुक्त नसला तरी काही हौसी पर्यटक, साहसी पर्यटक, पावसाळी पर्यटन करतात. जास्त पावसाच्या ठिकाणी पडणारा पाऊस, धबधबे, पावसाळ्यातील धुके पाहण्यासाठी अशा ठिकाणी पर्यटकांचे आयोजन केले जाते. उदा. आंबोली, खंडाळा, चेरापूंजी, मौसिनराम.

**क) हिवाळी पर्यटन :** साधारणत: ज्या प्रदेशात सर्वाधिक थंडी असते किंवा तेथे हिवाळे बर्फाच्छादित असतात. अशा प्रदेशात पर्यटक पर्यटनासाठी जातात. हिवाळा हा ऋतू पर्यटनासाठी अधिक चांगला समजला जातो. हिवाळ्यातील बर्फावर पर्यटन करण्यासाठी काही हौसी पर्यटक पर्यटनासाठी जातात. युरोपीय पर्यटक या काळात उन्हाचा आस्वाद घेण्यासाठी भारतात येतात.

## ५. गतिक्षमतेनुसार पर्यटनाचे प्रकार :-

पर्यटक एखाद्या ठिकाणी दीर्घकाळ वास्तव्य करतो किंवा तो वास्तव्य करून सतत प्रवास करीत राहतो. अशावेळी प्रत्येक ठिकाणी अल्पकाळ वास्तव्य करतो. यामुळे पर्यटक प्रवासातील आपला वेळ कसा घालवतो या आधारावर पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

**अ) निवासी पर्यटन :** एखाद्या पर्यटकाने कोणत्यातरी एकाच पर्यटन स्थळी किमान एक महिना

वास्तव्य केलेले पर्यटन म्हणजे निवासी पर्यटन. यामध्ये पर्यटक एखाद्या शांत व निसर्गरम्य पर्यटन स्थळाची निवड करतो. उदा. उन्हाळ्यात महाबळेश्वर येथे पुणे-मुंबई येथून आलेले श्रीमंत लोक उन्हाळा संपेपर्यंत तेथेच राहतात.

**ब) तात्पुरते पर्यटन :** एखाद्या पर्यटकाने एखाद्या पर्यटन स्थळी व्यतीत केलेला एक महिन्यापेक्षा कमी कालावधी तात्पुरत्या पर्यटनामध्ये मोडतो. पर्यटक अशा पर्यटन प्रकारात एखाद्या ठिकाणी एका महिन्यापेक्षा अधिक काळ वास्तव्य करीत नाही.

**क) भटके पर्यटन :** काही विशिष्ठ पर्यटक त्यांच्या प्रवासात सातत्याने भटकत राहतात. एका ठिकाणी त्यांचे स्थिर वास्तव्य असत नाही. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सतत प्रवास करतात. एकाच ठिकाणी पाच रात्री पेक्षा अधिक वास्तव्य करीत नाहीत. या भटक्या पर्यटकांचे पर्यटनाचे उद्देश निवासी व तात्पुरत्या पर्यटकापेक्षा भिन्न स्वरूपाचे असतात. असे पर्यटन युरोपमध्ये वसंत व हेमंत ऋतुत मोठ्या प्रमाणात आयोजित केले जाते.

## ६. पर्यटनाच्या हेतुनुसार पर्यटनाचे प्रकार :-

पर्यटक काही विशिष्ट ध्येय अथवा हेतूने पर्यटनाला बाहेर पडतात. यामध्ये पर्यटकाचे ते निश्चित ध्येय असते. त्याअनुषंगाने ते पर्यटनास बाहेर पडतात.

**अ) धार्मिक पर्यटन :** प्राचीन काळापासून धार्मिक पर्यटन प्रसिध्द आहे, त्याला 'तीर्थाटन' असे संबोधले जात असे. जसे चारधाम यात्रा, हज यात्रा इ. युरोपीय देशांच्या तुलनेत आशियाई देशामध्ये विशेष भारत, चीन, जपान, थायलंड, मलेशिया इ. देशामध्ये धार्मिक पर्यटनाचे प्रमाण जास्त आहे. भारत बौध्द व हिंदू तीर्थस्थळांना लाखो लोक दरवर्षी भेट देतात. विशेषत: हिंदू धर्मामध्ये ज्या जत्रा-यात्रा, उत्सव संपन्न होतात, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. उदा. पंढरपूर, तुळजापूर, जेजुरी, जोतिबा इत्यादीच्या यात्रा.

**ब) सांस्कृतिक पर्यटन :** प्रत्येक प्रांत व देशाची व तेथील नागरिकांची एक संस्कृती असते. देशाची प्रतिष्ठा तेथील सांस्कृतिक घटकावर अवलंबून असते. अनेक देश त्यांच्या सांस्कृतिक वैभवाकरिता प्रसिध्द आहेत. त्यामुळे त्या देशात अथवा प्रांतात जावून तेथील संस्कृतीचा अभ्यास आणि अनुभव घेणे हे पर्यटकाचे ध्येय असते. जगातील अनेक देशांच्या सांस्कृतिक स्थळांची नोंद जागतिक वारशामध्ये झालेली आहे. साहजिकच पर्यटकांचे ते आकर्षण असते. उदा. मलेशियामधील पुत्रजया, इजिप्तमधील पिरॅमिड, व्हॅटिकन मधील सेंट पीटर चर्च, भारतामधील लाल किल्ला, ताजमहाल, अंजठा-वेरूळ लेणी, खजुराओ येथील मंदिरे इत्यादी. देशा-देशातील, रूढी-परंपरा, खाण-पाण, सण-उत्सव, आहार-पोशाख, रीतीरिवाज इत्यादीचा अभ्यास व अनुभव घेण्यासाठी आवर्जून भेट देतात.

**ब) ऐतिहासिक पर्यटन :** पर्यटकांना अथवा सर्वसामान्य लोकांनाही इतिहासाबद्दल आणि ऐतिहासिक वास्तूबद्दल खूपच उत्सुकता असते. ऐतिहासिक स्मारके, राजवाडे, किल्ले, चर्च, मशिदी, गढया, महाल, शहरे, पुरातत्त्वीय स्थळे, संग्रहालये इत्यादी ठिकाणांना भेट देवून तेथील इतिहास जाणून घेण्यासाठी पर्यटक भेट देतात. प्राचीन संस्कृत्यांचा उदय व विकास कसा झाला, त्या संस्कृत्यांचे आज उपलब्ध असलेले अवशेष जे पुरातत्त्वीय स्थळे तेथेही पर्यटक आवर्जून भेट देतात. त्याचबरोबर ज्या ठिकाणी काही महत्त्वपूर्ण ऐतिहासिक घटना घडल्या तेथेही पर्यटक उत्सुकतेने भेट देतात.

**क) शैक्षणिक पर्यटन :** जगभरामध्ये विद्यार्थी, संशोधक, अभ्यासक त्यांच्या आवडीच्या स्थळी व ठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून तेथील अभ्यास करतात. तेथे अभ्यासू वृत्तीने जाण्याचा त्यांचा हेतू असल्याने ते तेवढ्याच दृष्टीकोनातून त्या पर्यटनस्थळांकडे पाहतात. यामध्ये इतिहास संशोधक, वन्यजीव अभ्यासक, वनस्पतीशास्त्र, भूगोलतज्ञ, भूगर्भशास्त्रज्ञ, लोकसंस्कृतीचे अभ्यासक, भाषाशास्त्राचे अभ्यासक व विद्यार्थ्यांचा समावेश होतो. पाने, फुले, वृक्ष, वेली, नद्या, माती, खडक, पाऊस, विविध प्राणी, पक्षी, कीटक यांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन अभ्यास करणे हा या पर्यटकांचा उद्देश असतो.

**ड) सण–उत्सवाचे पर्यटन :** जगाच्या कानाकोपऱ्यात विविध जातीधर्म, पंथ यांचे वैशिष्ट्यपूर्ण सण–उत्सव मोठ्या अनोख्या पध्दतीने साजरे होतात. भारतासारख्या देशात खूप मोठ्या प्रमाणात जत्रा–यात्रा, उत्सव साजरे होतात. यामधून त्या–त्या भागातील सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक वारसा जोपासला जातो. या जत्रा–यात्रांच्यामधून आनंद व मनोरंजन ही मोठ्या प्रमाणात होते, त्याची अनुभूती घेण्यासाठी जगभरातून मोठ्या संख्येने पर्यटक अशा ठिकाणांचा भेट देतात. उदा. पंढरपूरची वारी, नाशिकचा कुंभमेळा, वाराणसीचा कुंभमेळा, गोव्यातील कान्हिव्हेल, मुंबई–पुणे येथील गणेश उत्सव इत्यादी. जगभरामध्ये असे अनेक उत्सव असतात जेथे पर्यटक आवर्जून हजेरी लावतात. जसे की, स्पेनमधील, 'ला टोमॅटिनो' चीनमधील 'आईस व स्नो' रशियामधील 'व्हाईट नाईट फेस्टिव्हल' ब्राझीलमधील 'कार्निव्हल' याला लाखोच्या संख्येने पर्यटक भेट देतात.

**इ) ग्रामीण पर्यटन :** जागतिकीकरण व शहरीकरण आणि औद्योगिकीरणाच्या कचाट्यात सापडलेला शहरी माणूस आज शांति मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे. गतिमान व धकाधकीच्या जीवनातून विश्रांतीसाठी लोक आता ग्रामीण भागात शांतीच्या ठिकाणी पर्यटनासाठी येत आहेत. ग्रामीण संस्कृतीचे आकर्षण, ग्रामीण जीवन, कृषी संस्कृती, निसर्गरम्य परिसर, बोटीतून फिरणे, मासे पकडणे, चिखलात खेळणे, बैलगाडी फिरवणे असे अनेक नवीन पर्याय पर्यटक हाताळू लागले आहेत. बऱ्याच भागामध्ये दुसरे घर (Second Home) म्हणून अतिदूर व निसर्गरम्य ग्रामीण भागाचा लोक विचार करत आहेत.

**ई) कृषी पर्यटन :** युरोपीय देशात कृषी पर्यटनाची संकल्पना प्रथम आली. शेतामध्ये जाऊन स्वत:साठी फळे, पालेभाज्या आणणे, शेतात पीके कसे घेतात त्याचा अनुभव घेणे अशी कृषी पर्यटनाची ही नवीन संकल्पना. शहरी भागातील लोकांना खेड्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधण्यास, मुलांना शेतात घेवून आपण जे दैनंदिन जीवनात फळे, पालेभाज्या खातो त्या कशा उगवतात, त्याची शेती कशी करतात. याचा प्रत्यक्ष शेतावर जावून अनुभव घेणे म्हणजे कृषी पर्यटन. कृषी पर्यटनाची सुरूवात युरोपमध्ये झाली असली तरी याचा भारतातही मोठ्या प्रमाणात विस्तार होत आहे. उदा. शिरूर तालुक्यातील मोराची चिंचोली येथे समूह शेतीतून कृषी पर्यटनाची खूप मोठ्या प्रमाणात सुरूवात केलेली आहे. या ठिकाणी 'भात लावणी शिबीर'च्या माध्यमातून कृषी पर्यटन ही संकल्पना राबविलेली दिसते.

**फ) शहरी पर्यटन :** इ.स. १९८० च्या दशकात शहरी पर्यटनाची सुरवात झाली. पॅरिस, लंडन, न्यूयॉर्क, दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, इंदोर, मसुरी, मथुरा, जयपूर ही शहरे पर्यटकांची आकर्षण केंद्रे आहेत. या शहरांच्यामध्ये पर्यटकांना विशेष आकर्षण वाटेल असे उपक्रम राबविले जातात. करमणूक, आशय, नाईट लाईफ, शॉपिंग, क्रिडा स्पर्धा, उद्योग-व्यवसायाशी संबंधित प्रदर्शने येथे भरविले जातात. जगातील काही शहरे ही त्यांच्या वैशिष्ट्यामुळे प्रसिध्द आहेत. उदा. शॉपिंग सिटी, सांस्कृतिक शहर, मनोरंजन शहर, नाईट लाईफ सिटी इत्यादी.

**ग) आरोग्य पर्यटन :** आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्य पर्यटन हा प्रकार जलद गतीने वाढत आहे. गतीमान व धकाधकीच्या जीवनात लोकांची जीवनशैली बदलेली आहे. परिणामी अनेक लोक आपल्या आरोग्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे अनेक पर्यटक आपले आरोग्य सांभाळ्यासाठी आरोग्याशी संबंधित सेवा ज्या ठिकाणी मिळतात तेथे जाणे पसंत करतात. उदा. शरीराच्या मसाज, प्राणायाम, विपश्यना, वजन कमी करणे, वाढविणे, न्यूट्रिशन प्रोग्राम, स्पा ट्रीटमेंट, सोना बाथ इत्यादी सेवा विशिष्ठ ठिकाणीच उपलब्ध असतात, त्यामुळे त्याठिकाणी पर्यटक आवर्जून भेट देतात. चीन, जपान, भारत, थायलंड ही पारंपारिक व आयुर्वेदिक मसाजसाठी पर्यटकांचे आकर्षण केंद्रे आहेत. भारतामध्ये केरळ राज्य आयुर्वेदिक 'पंचकर्म' उपचार पध्दतीसाठी प्रसिध्द आहे. महाराष्ट्रातील लोणावळा येथील 'आत्मसंतुलन केंद्र' मन:शांती व योगासनासाठी प्रसिध्द आहे.

**म) वैद्यकीय पर्यटन :** वैद्यकीय पर्यटन म्हणजे उपचार घेण्यासाठी दुसऱ्या देशामध्ये जाणे होय. विकसनशील देशातील लोक वैद्यकीय सेवेसाठी विकसित देशामध्ये जात असत आणि जातात. परंतु अलीकडील विकसित देशातील लोक कमी खर्चात वैद्यकीय उपचारासाठी विकसनशील देशामध्ये येत आहेत. इ.स. २०१४ मध्ये जॉर्डनला 'मेडिकल डेस्टिनेशन ऑफर इयर' हा ॲवॉर्ड प्राप्त झाला आहे. सध्या इस्त्राईल, इराण, भारत, ब्राझील, कोस्टारिका, मेक्सिको, हाँगकाँग,

सिंगापूर, थायलंड इत्यादी देश वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिध्द आहेत. भारतात वैद्यकीय पर्यटनाचा विकास झपाट्याने होत आहे.

**भ) इको पर्यटन :** इको पर्यटन अर्थात पर्यावरण अथवा निसर्ग पर्यटन होय. यामध्ये एखाद्या पर्यटनस्थळाचा नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा ऱ्हास न करता केलेले पर्यटन. या पर्यटनाचा मुख्य उद्देश नैसर्गिक पर्यावरणाचा कमीतकमी ऱ्हास करणे, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे, परिसंस्थांचे जतन करणे, सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या पर्यटनस्थळांचे जतन करणे व पर्यटनस्थळी असणाऱ्या स्थानिक लोकांना त्रास होणार नाही असे वर्तन करणे. थोडक्यात निसर्गाच्या सानिध्यात राहणे या अर्थाने इको पर्यटनाचा विकास झपाट्याने होत आहे.

**न) डूम पर्यटन :** जागतिक स्तरावर अशी काही पर्यटन स्थळे आहेत की, भविष्यात ती हवामानाच्या बदलाने, प्रदूषणाने अथवा जागतिक तापमान वाढीच्या परिणाम स्वरूप नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, अशा ठिकाणी भेट देणे म्हणजे 'डूम पर्यटन' होय. उदा. ऑस्ट्रेलियातील ग्रेट बॅरिअर रिफ.

**स) लैंगिक पर्यटन** (Sex Tourism) **:** लैंगिक पर्यटन म्हणजे अशा ठिकाणी अथवा देशांत जाणे जिथे वेश्या व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो. यामध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटक येतात. केवळ शरीरसुख प्राप्त करणे व त्यासाठी वाट्टेल तेवढा पैसा खर्च करण्याची तयारी पर्यटकाची असते. लैंगिक पर्यटनाची सुरुवात आग्नेय आशियामध्ये झाली व आजही मोठ्या प्रमाणात येथे या पर्यटनाला चालना मिळत आहे. थायलंड, नेपाळ, श्रीलंका, व्हिएतनाम, हाँगकाँग व बाली या देशात अशा प्रकारचे पर्यटन चालते. युरोपमधील काही देश यासाठी प्रसिध्द आहे. विशेषत: नेदरलँडमधील ॲमस्टरडॅम व हॅम्बर्ग हे यासाठी प्रसिध्द आहेत. भारतामध्ये गोवा, पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग यासाठी प्रसिध्द आहेत. या पर्यटनामध्ये मद्यसेवन, रेव्हा पार्ट्या, अंमली पदार्थ मोठ्या प्रमाणात विकले जातात, त्याचा विपरित परिणाम समाजावर होत आहे.

## स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. 3

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. अल्पकालीन पर्यटनाचा कालावधी ............. दिवसांचा असतो.

२. तात्पुरते पर्यटन ................ पर्यटन म्हणतात.

३. धार्मिक पर्यटनाला ........... पर्यटन म्हणतात.

४. स्पेनमध्ये ............ महोत्सव जगप्रसिध्द आहे.

५. केरळ ............ उपचार पध्दतीसाठी प्रसिध्द आहे.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या पर्यटकाला पर्यटक समजले जात नाही.

२. इजिप्त कोणत्या वास्तुसाठी प्रसिध्द आहे.

३. कार्निव्हल महोत्सव कोणत्या देशामध्ये प्रसिध्द आहे.

४. भात लावणी शिबीर हे कोणत्या पर्यटनाचा प्रकार आहे.

५. व्हाईट नाईट फेस्टिव्हल कोणत्या देशात भरतो.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **कालिका पर्यटन** : हंगामी पर्यटन.
- **पथिकाश्रम** : निवास प्रकार.
- **रिसॉर्ट** : सागरी किनारा, पर्वतीय प्रदेश, निसर्ग सानिध्यात, बांधलेले हॉटेल.
- **स्पा** : समुद्र पर्यटन.
- **डाक बंगला** : रात्रीच्यावेळी थांबण्याची सरकारी जागा.
- **तीर्थाटन** : धार्मिक पर्यटन.
- **पंचकर्म** : आयुर्वेदिक उपचार पध्दती.
- **इको पर्यटन** : निसर्ग पर्यटन.

## १.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

**अ)** १. *लॅटिन.*

२. *पैसा.*

३. *पाकिस्तान व बांग्लादेश.*

४. *४ मार्च १९९३.*

५. *ब्रिटन.*

ब) १. *वर्तुळाकार प्रवास.*

२. *१३ वे शतक.*

३. *२४ तासापेक्षा कमी वास्तव्य.*

४. *कॅराफ.*

५. *१९६३.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

अ) १. *इंग्लंड.*

२. *हॉर्स डाक.*

३. *१५०० ते १८२०.*

४. *३१३.*

५. *सातव्या.*

ब) १. *थॉमस कुक.*

२. *ब्रिटीश.*

३. *१९४५.*

४. *१९६६.*

५. *सहावी पंचवार्षिक योजना.*

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे**

अ) १. *१ ते १०.*

२. *एका महिन्यापेक्षा कमी.*

३. *तिर्थाटन.*

४. *ला टोमॅटिनो.*

५. *पंचकर्म.*

ब) १. *२४ तासापेक्षा कमी वास्तव्य.*

२. *पिरॅमिड.*

३. *ब्राझील.*

४. *कृषी पर्यटन.*

५. *रशिया.*

## १.५ सारांश

मानव प्राचीन काळापासून प्रवास करीत आहे. प्रवास हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्राचीनकाळी नवनवीन स्थळांचा, प्रदेशांचा, चमत्कारिक वस्तूंचा शोध घेणे यासाठी प्रवास केले जात असे. मानवी संस्कृतीचा विकास जसजसा होत गेला, तस-तसे पर्यटनाच्या संकल्पनेत बदल होत गेला. पर्यावरणातील बदल अनुभवणे हे धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेट देणे यावर लक्ष केंद्रित झाले. प्राचीन प्रवासाच्या तुलनेत आधुनिक पर्यटनांची व्याख्या, स्वरूप व प्रकार बदलले दिसतात. पर्यटन हे पैसा मिळविण्याचे साधन बनले आहे. दैनंदिन धकाधकीच्या जीवनातून चार दिवस आरामात घालवणे हे सध्याच्या पर्यटनाचे स्वरूप आहे. पर्यटन व पर्यटक ह्या दोन भिन्न संकल्पना आहेत मात्र परस्पर पूरक व परस्परावर अवलंबून आहेत. पर्यटन हे सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, धार्मिक व भौगोलिक घटकावर अवलंबून असलेले दिसते. हे जरी खरे असले तरी आधुनिक दळणवळणाची साधणे व नव-नवीन शोधामुळे पर्यटनाला चालना मिळालेली दिसते. १९ व्या शतकामध्ये दळणवळणाच्या विकासामुळे पर्यटनाला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पर्यटनास विशेष चालना मिळाली. २० व्या शतकात वाढते नागरीकरण, औद्योगिकीकरण, राहणीमान, शिक्षणाचा प्रसार इत्यादीमुळे पर्यटन हे जागतिक झालेले आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.

१. पर्यटन म्हणजे काय ते सांगून पर्यटन व पर्यटक यांच्या व्याख्या स्पष्ट करा?

२. आधुनिक व जनव्यापी पर्यटनाचा उदय कसा झाला ते स्पष्ट करा?

३. भारतातील मध्ययुगीन पर्यटन विकासाची माहिती द्या.

४. पर्यटनाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

५. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून घडून आलेला पर्यटन विकास स्पष्ट करा.

### ब) टिपा लिहा.

१. पर्यटनाचे स्वरूप.

२. कृषी पर्यटन.

३. मध्ययुगीन पर्यटनाचे स्वरूप.

४. पर्यटन विकास महामंडळ.

५. सार्जंट समिती.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **Bhatia A. K. :** *"Tourism Development Principles & Practices."*

२. **Bhatia A. K. :** *"Tourism in India",* Sterling Publication, Delhi.

३. **खतीव, के. ए.** : *''पर्यटन भूगोल''*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४. **नागतोडे, पी. एम., पारधी दिगंबर** : *''पर्यटन भूगोल''*, विद्या प्रकाशन, नागपूर.

५. **सांगळे, शैलजा** : *''पर्यटन भूगोल''*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.


❀ ❀ ❀

घटक–२

# भारतामधील पर्यटनाचा वारसा

## ( Heritage )

---

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे

२.२.२ भारतातील नैसर्गिक पर्यटन स्थळे

२.२.२.१ अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने

२.२.२.२ सरोवरे, जलप्रपात

२.२.३ भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

२.२.३.१ उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

२.२.३.२ दक्षिण भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ क्षेत्रीय कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील उद्दिष्ट्ये साध्य होतील.

१. भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळांची ओळख होईल.

२. भारतातील भौगोलिक पर्यटन स्थळांची माहिती मिळेल.

३. उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळांची माहिती सांगता येईल.

४. दक्षिण भारतातील धार्मिक पर्यटन स्थळांची माहिती सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक

भारतासारखी भौगोलिक विविधता आणि विविध ऋतूत बदलणारे हवामान असणाऱ्या देशात पर्यटन उद्योगाकडे वेगळ्या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे आहे. आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे देश अपवाद सोडले तर जगातल्या कुठल्याच देशात भारताइतकी विविधता पहायला मिळणार नाही. आपल्याला बर्फाच्छादित हिमशिखरांपासून प्रवाळद्विपांपर्यंत सर्व प्रकारची वैविध्यपूर्ण भौगोलिक संपन्नता लाभली आहे. अशा विविधपूर्ण नैसर्गिक पर्यटनामुळे येथील आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

भारताला नैसर्गिक संपन्नतेबरोबर प्रदीर्घ अशी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. ब्रिटिश काळात ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा विशेष विकास झाला नाही. त्यामुळे येथील शेकडो ऐतिहासिक स्थळे नष्ट झाली असून त्यातील काही अवशेषांच्या रूपात तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. कांही ऐतिहासिक स्थळांनी आजही आपले महत्त्व टिकवून ठेवले आहे. तर काही स्थळांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. भारतीय पर्यटन उद्योगावर ऐतिहासिक घटकांचा मोठा प्रभाव आहे. भारतात येणाऱ्या एकूण पर्यटकांपैकी ५४ टक्के पर्यटकांना येथील ऐतिहासिक स्थानांमध्ये विशेष रस असतो. भारतामध्ये प्राचीन वारसा सांगणारी शेकडो ऐतिहासिक पर्यटन स्थळे, अवशेष, स्मारके रूपात सर्वत्र विखुरलेली आहेत.

भारताला ऐतिहासिक परंपरेबरोबर प्रदीर्घ धार्मिक परंपरा लाभलेली आहे. हिंदू, मुस्लिम, जैन, बौध्द आणि ख्रिश्चन धर्मियांमुळे एक वेगळी आणि सर्वसमावेशक संस्कृती निर्माण झाली आहे. यामुळे येथे विविध धार्मिक पर्यटनस्थळांचा विकास झालेला आहे. भारताच्या पर्यटनाच्या व्यापक विस्तारांमुळे जगातील प्रत्येक पर्यटकाला काही ना काही देण्याची क्षमता या देशात आहे. प्रस्तुत घटकामध्ये भारतामधील विविध भागातील ऐतिहासिक, नैसर्गिक पर्यटन स्थळांची चर्चा केलेली आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ भारतातील ऐतिहासिक पर्यटन स्थळे

- **ऐतिहासिक पर्यटन स्थळे म्हणजे काय?**

पर्यटनाचा आत्मा म्हणून ऐतिहासिक स्थळांचा उल्लेख करता येईल. ऐतिहासिक घटक, घटना याबद्दल लोकांना कुतूहल व आस्था असते. अशा स्थळांना भेटी देण्याची इच्छा व तेथील इतिहास जाणून घेण्याची इच्छा पर्यटकांना असते. यामुळे या स्थळांना पर्यटक भेटी देत असतात. भारताला प्रदीर्घ अशी ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. विविध राजवटीमध्ये संरक्षणासाठी, राहण्यासाठी तसेच प्रशासकीय सोयीसाठी वास्तूची निर्मिती केली गेली. त्यातील काही वास्तूशिल्पे अवशेषाच्या रूपाने आपले स्थान टिकवून ठेवलेली आहेत.

## ❑ राजवाडे :-

### १. सिटी पॅलेस :-

जयपूर, राजस्थान येथील सवाई जयसिंग दुसरा याने बांधलेला १८ व्या शतकातील सिटी पॅलेस राजवाडा हा मुघल, राजपूत आणि इंग्रज काळातील उत्कृष्ठ बांधकामाचा नमुना म्हणून प्रसिध्द आहे. गुलाबी शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहरातला हा राजवाडा आता ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय म्हणून ओळखला जातो.

### २. हवा महल :-

'गुलाबी शहर' (Pink City) जयपूर येथील 'हवा महल' राजस्थानचे प्रतिक या रूपाने जगभर प्रसिध्द आहे. या इमारतीला तब्बल ३६५ खिडक्या आणि झरोके आहेत. याची निर्मिती इ.स. १७९९ मध्ये महाराज सवाई प्रतापसिंह यांनी केली होती. राजस्थानी आणि फारशी स्थापत्यकलेचे संमिश्र रूप असलेली ही इमारत जयपूरच्या 'बडी चौपड' चौकापासून 'चांदी की टकसाल'कडे जाणाऱ्या मार्गावर स्थित आहे. हवामहलचे आनंदपोल आणि चांदपोल नावाचे दोन दरवाजे आहेत. गुलाब शहर जयपूरची ही वास्तू आपल्या अद्‌भूत बनावटीमुळे आज जगविख्यात आहे.

### ३. आमेर महल, जयपूर :-

जयपूरच्या प्रमुख ऐतिहासिक स्थळामध्ये 'आमेर महल' चा समावेश आहे. मोघल व राजपूत शैलीचा वापर करून १६ व्या शतकामध्ये या किल्ल्याची निर्मिती करण्यात आली. या भव्य महालाची तुलना जगातील शानदार महालांशी केली जाते. आमेर महालात विशाल जलेब चौक, शिला माता मंदीर, दीवाने आम, गणेश महल, शीश महल, सुख मंदीर, मुगल गार्डन, राण्याचे महल पाहण्यासारखे आहेत. शीश महल मधील काचेचे नक्षीकाम अदभूत आहे.

### ४. लक्ष्मीविलास पॅलेस :-

भारतामधील सर्वात भव्य रचना असलेला पॅलेस म्हणून 'लक्ष्मी-विलास' ओळखला जातो. इंडो-सार्सेनिक शैलीतील हा पॅलेस महाराजा सयाजीराव गायकवाड तिसरे यांनी १८९० मध्ये बडोदा येथे बांधला. हा पॅलेस ५०० एकरात उभा असून यामध्ये विशेषत: एलव्हीपी बॅंकेट्स, मोती बाग पॅलेस तसेच फतेहसिंग संग्रहालय आहे. या पॅलेसमध्ये राजा रवी वर्मा आणि जगभरातून जमविलेल्या अनेक कलाकारांची चित्रे आहेत.

### ५. जयविलास पॅलेस :-

मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर येथे इ.स. १८७४ मध्ये महाराजा जयजीराव सिंधिया यानी भव्य इमारत

बांधली. या पॅलेसमध्ये 'जिवाजीराव सिंधिया संग्रहालय' केलेले आहे. या पॅलेसमधील दरबार हॉल विशेष प्रसिध्द आहे. दरबार हॉलमधील आतील भाग गिल्ट आणि सोन्याच्या फर्निचरने, हॉल अनेक झूमरांनी सुशोभित केलेला आहे.

### ६. म्हैसूर पॅलेस (कर्नाटक) :-

महाराजा पॅलेस, म्हैसूरच्या कृष्णाराज वोडियार यांचा आहे. यापूर्वी हा राजमल चंदनाच्या लाकडापासून बनवलेला होता. एका दुर्घटनेत महालाचे प्रचंड नुकसान झाले, त्यानंतर याची पुर्ननिर्मिती करण्यात आली. म्हैसूर पॅलेस द्रविड, पौर्वात्य आणि रोमन स्थापत्य कलेचा अदभूत संगम आहे. ग्रेनाईट दगडांनी बनलेला हा महल गुलाबी दगडांच्या घुमटांनी सजलेला आहे. इतर महालाप्रमाणे येथे अनेक कक्ष आहेत ज्यामध्ये भव्य चित्रे आणि राजेशाही हत्यारे ठेवण्यात आली आहे. येथील राजेशाही पोशाख, आभूषणे, बारीक नक्षीकाम केलेले भलेमोठे दरवाजे या महालाची शोभा वाढवितात.

### ७. फत्तेपूर सिक्री :-

आग्रा शहरापासून ४० कि.मी. अंतरावर फत्तेपूर सिक्री हे शहर आपला ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा टिकवून आहे. मोगल बादशहा अकबराने हे वसवले आहे. या शहरात मोगल संस्कृती आणि कला यांची झलक पाहण्यास मिळते. फत्तेपूर सिक्री येथील सर्वात उंच इमारत म्हणजे बुलंद दरवाजा आहे. इ.स. १६०२ मध्ये अकबराने गुजरात विजयाच्या आनंदाप्रित्यर्थ या इमारतीची निर्मिती केली. या व्यतिरिक्त येथे जामा मशीद, शेख सलीम चिश्ती याची समाधी, दिवाण-ए-आम, दिवाण-ए-खास, पंचमहल, बिरबलाचा महल इत्यादी प्रमुख इमारती आहेत.

## ❑ मिनार :-

### १. चारमिनार :-

हैद्राबाद शहराची ओळख बनलेला चारमिनार इस्लामिक वास्तूकेलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. इ.स. १५९१ मध्ये शहरातील प्लेगची साथ संपल्याच्या आनंदामध्ये महमद कुली कुतूबशाह याने या सुंदर वास्तूची निर्मिती केली. हैद्राबाद शहराची ओळख बनलेला हा मिनार एक चौरसाकार चार मिनारांनी बनलेली प्रभावशाली वास्तू आहे. त्याच्या आर्कमध्ये रोज रोषणाई केली जाते.

### २. कुतूब मिनार :-

भारतीय कलेचा एक उत्तम नमुना असलेला हा मिनार दक्षिण दिल्ली शहरातील मेहरोली भागात आहेत. कुतूब मिनार लाल दगडानी बांधलेला आहे. कुतुबुद्दीन ऐबकाच्या नावावरून त्याला 'कुतूब मिनार' असे संबोधले जाते. या मिनारावर सर्व बाजूनी कुराणाची वचने खोदलेली आहेत.

## ❑ किल्ले :-

### १. मेहरनगढ :-

राजस्थानच्या जोधपूरमध्ये स्थित मेहरनगढ हा भारतातील सर्वात मोठ्या किल्ल्यांपैकी एक आहे. राव जोधा यांनी १४५९ च्या सुमारास या किल्ल्याची उभारणी केली. किल्ल्याभोवती अतिशय जाड-दीर्घ अशी दगडांची भिंत आहे. आत प्रवेशासाठी किल्ल्याला सात दरवाजे आहेत. या किल्ल्यातील संग्रहालय प्रसिध्द आहे. या संग्रहालयात विविध शस्त्रे, चित्रे, पोषाख व इतर ऐतिहासिक ठेवा असलेले साहित्य पहावयास मिळते.

### २. चित्तोडगढ किल्ला :-

राजस्थान मधील एक प्रमुख किल्ला म्हणून 'चित्तोगढ' प्रसिध्द आहे. हा किल्ला आशियातील सर्वात मोठा किल्ला म्हणून ओळखला जातो. मीराबाई पासून राणी पद्मिनीपर्यंत अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक बाबींचे स्थान म्हणून याची ओळख आहे.

### ३. गोवळकोंडा किल्ला :-

गोवळकोंडा किल्ला हैद्राबादपासून ५ कि.मी. अंतरावर वसलेला आहे. या किल्ल्याची निर्मिती वारंगलच्या राजांनी १४ व्या शतकात केली. मौल्यवान खड्यांसाठी हा भाग प्रसिध्द आहे. कुतूबशाही काळात या किल्ल्यात राजधानीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. किल्ल्यातील कमानी, दरवाजे, कोरीव खांब, मंदिर, मशिदी इ.साठी प्रसिध्द आहे.

### ४. देवगिरी किल्ला (दौलताबाद) :-

महाराष्ट्रातील काही उत्तम किल्ल्यांमध्ये देवगिरी किल्ल्याची गणना होते. रामदेवराव यादवांपासून निझामशाहीपर्यंत अनेक राजांचे कर्तृत्व पाहिलेला हा किल्ला औरंगाबादमधील महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. या किल्ल्यांची रचना वैशिष्ट्यपूर्ण असून येथे पंच धातूंपासून बनलेली मेंढातोफ आहे.

### ५. रायगड :-

रायगड किल्ला महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वत रांगांमध्ये वसलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी इ.स. १६७४ मध्ये मराठा साम्राज्याची राजधानी म्हणून घोषित केली. या किल्ल्यावर मराठा कालखंडातील विविध वास्तू पाहावयास मिळतात. दरवर्षी शिवजयंती आणि शिवराज्याभिषेकावेळी येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात.

### ६. मुरुड-जंजिरा किल्ला :-

मुरुड-जंजिरा किल्ला जलदुर्ग असून तो अरबी समुद्र किनाऱ्यावरती मुरुड शहरानजीक आहे. राजापूरी

बंदरातून किल्ल्यावरती जाण्यासाठी बोटीची सोय आहे. या किल्ल्यावर मध्ययुगीन कालखंडामध्ये निर्माण झालेल्या अनेक वास्तू पाहावयास मिळतात. किल्ल्यावर 'कलालबांगडी', 'चावरी', 'लांडा कासम' या तीन महाकाय तोफा मुख्य आकर्षण आहेत.

### ७. सिंधुदुर्ग :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारी पराक्रमाची साक्ष देणारा महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग किल्ला पर्यटकांचे खास आकर्षण आहे. मालवण येथील समुद्रातील कुरटे बेटावर साडेतीनशे वर्षांपूर्वी साकारण्यात आलेल्या किल्ले सिंधुदुर्गला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी समुद्रात साकारलेला हा किल्ला मराठाकालीन वास्तूशास्त्राचा एक उत्तम नमुना आहे. या किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवराजेश्वर मंदिर पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. या किल्ल्यास विस्तृत अशी तटबंदी पाहवयास मिळते.

### ८. ग्वाल्हेर किल्ला :-

ग्वाल्हेर किल्ला मध्य प्रदेश राज्यामध्ये स्थापित आहे. या किल्ल्याची निर्मिती राजा मानसिंगाने १४८६ ते १५१६ या कालावधीमध्ये केली. २ मैल लांब व ३५ फूट उंच याची तटबंदी आहे. हा किल्ला ३० फूट उंचीच्या गठीवर बांधलेला आहे. १४ व्या शतकात तटबंदीच्या बाहेरच्या बाजूवर ७६५ बुध्द मूर्ती उभारण्यात आल्या आहेत.

### ९. लाल किल्ला (दिल्ली) :-

लाल किल्ल्याचा पाया शहाजहानच्या काळात रचण्यात आला. या किल्ल्याची निर्मिती अष्टभूजाकृती करण्यात आली आहे. लाल किल्ल्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे मुमताज महल, रंग महाल, दीवाण-ए-आम, दिवाण-ए-खास, हसास आणि शाह बुर्ज. हा किल्ला भारताची शान आहे. याच किल्ल्यावर स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी भारताचे पंतप्रधान राष्ट्रीय ध्वज फडकवतात.

## ❑ लेणी आणि स्तूप :-

### १. उदयगिरी लेणी :-

मध्यप्रदेशमधील विदिशा जिल्ह्यात उदयगिरीची लेणी आढळतात. ही लेणी बेस नदीच्या काठावर वसलेली आहेत. इ.स. ५ व्या शतकात गुप्तकाळात या लेण्याचे कोरीव काम झालेले आहे. इथे असलेले भूवराहचे शिल्प अतिशय देखणे आहे. भूदेवीला पाताळातून बाहेर आणणारा विष्णूचा वराह अवतार येथे अतिशय रेखीव कोरलेले आहे. डावा पाय किंचित दुमडून शेलावर ठेवलेला आणि उजवा पाय ताठ असलेल्या अशा आसनात हा वराह उभा असून डाव्या खांद्यावर भूदेव दिसतो. पाठीमागील भिंतीवर या वराहाचे अभिवादन करणाऱ्या विविध देवदेवता कोरलेल्या आहेत.

## २. बराबर लेणी :-

बिहार मधील जेहानाबाद जिल्ह्यातील मखदूमपूरजवळ बराबर लेणी आहेत. या लेण्या मौर्यकाळापासून अस्तित्वात आहेत. या गुहेच्या काही भिंतीवर सम्राट अशोकाने कोरून घेतलेले काही मजकूर आहेत. बराबरमधील बहुतेक सर्वच लेणी दोन खोल्यांच्या आत आहेत. ज्या पूर्णपणे ग्रॅनाईट या दगडात कोरलेल्या आहेत.

## ३. घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी :-

मुंबईपासून ६-७ मैल अंतरावर समुद्रात घारापुरी या लहान बेटावर डोंगरात या लेण्या आहेत. या लेण्या भव्य आकारांच्या शिल्पांसाठी प्रसिध्द आहेत. पाषाणात खोदलेल्या या लेण्या इ. स. ९ वे शतक ते १३ वे शतक या कालखंडात निर्माण करण्यात आल्या आहेत. १९८७ साली या लेण्यांना युनेस्कोने जागतिक वारसा स्थानाचा दर्जा दिला. घारापुरी लेण्यांच्या प्रवेशद्वाराजवळ हत्तीचे प्रचंड आकाराचे शिल्प होते. यावर या लेण्यांना 'एलिफंटा' लेणी असे नाव पडले.

## ४. सांची :-

मध्यप्रदेशाची राजधानी भोपाळ आणि विदिशा यांच्यामध्ये वसलेला सांची स्तूप जगभरातील भ्रमंती करणाऱ्या पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. इ.स.पू. तिसऱ्या शतकात सम्राट अशोकाने सांची स्तूपाची निर्मिती केली. हा स्तूप शांती, आस्था, साहस आणि प्रेम यांचे प्रतिक आहे. बौध्द धर्माची शिकवण जनमाणसापर्यंत पोहचविण्यासाठी या स्तूपाची निर्मिती सम्राट अशोकाने केली. या स्तूपाचे ऐतिहासिक महत्त्व ओळखून युनेस्कोच्या जागतिक वारसांच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

## ५. अजिंठा लेणी :-

इ. स. पूर्व २ रे शतक ते इ. स. ४ थे शतक अशा प्रदीर्घ कालखंडामध्ये २९ बौध्द लेण्याची निर्मिती करण्यात आली. बौध्द धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली अंजिठा लेणी भारताची जागतिक पर्यटन पातळीवर ओळख करून देणारे महत्त्वाचे स्थळ आहे. अजिंठा लेण्यामध्ये गौतम बुध्दाच्या विविध भावमुद्रा तसेच बौध्द तत्त्वज्ञानाला चित्रशिल्पात चित्रित करण्यात आले आहे. जागतिक वारसा स्थळांमध्ये या लेण्याचा समावेश आहे.

## ६. वेरुळ :-

औरंगाबाद शहरापासून ३० कि. मी. अंतरावरील वेरुळ गावात जगप्रसिध्द लेणी आहेत. सातमाळ पर्वत रांगेतील डोंगर कड्यात साधारणत: पाचव्या ते दहाव्या शतकात कोरलेल्या एकूण ३४ लेणी आहेत. यामध्ये १७ हिंदू, १२ बौध्द व ५ जैन लेणी आहेत. या लेण्यामधील प्रसिध्द असे कैलास मंदिर राष्ट्रकूट राजा कृष्ण (प्रथम) याच्या काळात निर्माण झाले. इ.स. १९५१ मध्ये भारत सरकारने या लेण्याला 'राष्ट्रीय स्मारक' म्हणून घोषित केले. तर युनेस्कोने इ.स. १९८३ मध्ये या लेण्यांचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत समावेश केला.

एकंदरीत भारतामध्ये अशी विविध प्रमुख ऐतिहासिक पर्यटन स्थळे पाहवयास मिळतात. या पर्यटनस्थळांच्या माध्यमातून पर्यटक येथील इतिहास आणि भारतीय शिल्पकलेचा अभ्यास करत असतात.

❑ **राजधान्या :-**

१. **भोपाळ** : मध्यप्रदेशची राजधानी आहे. येथे अनेक ऐतिहासिक स्थळे पाहण्यासाठी आहेत.

२. **ऐजवाल** : मिझोरामची राजधानी व राज्याचे सांस्कृतिक व धार्मिक केंद्र असलेले ठिकाण आहे.

३. **आगरताळा** : त्रिपुरा राज्याची राजधानी. बांगला देशापासून फक्त २ कि.मी. अंतरावर वसलेली आहे.

४. **बंगलोर** : कर्नाटक राज्याची राजधानी असलेले शहर, बगीचे, चौक, वस्तूसंग्रहालये यासाठी प्रसिध्द आहे.

५. **चंदीगढ** : हरियाणा व पंजाब राज्याची राजधानी असलेले शहर, अतिशय आल्हादायक वातावरण, सुनियोजित शहर म्हणून प्रसिध्द.

६. **भुवनेश्वर** : ओडिशाची राजधानी व मंदीरांचे शहर म्हणून ओळख.

७. **चेन्नई** : तामिळनाडू राज्याची राजधानी, लोकसंख्येनुसार देशातील पाचवे शहर, बंगालच्या उपसागरालगत वसलेले मोठे शहर.

८. **डेहराडून** : उत्तराखंडची राजधानी, अतिशय देखणे, आल्हादायक वातावरण असलेले शहर.

९. **गांधीनगर** : गुजरात राज्याची राजधानी, साबरमती नदीकाठी वसलेले.

१०. **गंगटोक** : सिक्कीमची राजधानी, समुद्रसपाटीपासून ५५०० फूट उंचीवर वसलेले शहर, आंतरराष्ट्रीय पुष्प उत्सव साजरा केला जातो.

११. **मुंबई** : महाराष्ट्राची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख.

१२. **रांची** : झारखंड राज्याची राजधानी, धबधब्यांचे शहर म्हणूनही ओळख.

१३. **रायपूर** : छत्तीसगढ राज्याची राजधानी, औद्योगिक केंद्र.

१४. **हैद्राबाद** : आंध्र प्रदेशची राजधानी, ऐतिहासिक शहर म्हणून ओळख.

१५. **इंफाळ** : मणिपूर राज्याची राजधानी, राज्याचे सांस्कृतिक शहर म्हणून ओळख.

१६. **ईटानगर** : अरुणाचल प्रदेशाची राजधानी, नैसर्गिक देणगी लाभलेले शहर.

१७. **जयपूर** : राजस्थानची राजधानी, गुलाबी शहर म्हणून ओळख.

१८. **पाटणा** : बिहार राज्याची राजधानी, गुरुगोविंद सिंगाचे जन्मस्थान.

१९. **लखनौ** : उत्तर प्रदेशाची राजधानी, गोमंती नदीकाठी वसलेले शहर, नवाबांचे शहर म्हणून ओळख.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

### अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. भारतातील सर्वात मोठा किल्ला असलेला मेहरनगढ ............ येथे आहे.

*अ) जोधपूर* *ब) जयपूर* *क) जैसलमेर* *ड) चंदीगढ.*

२. दौलताबादचा किल्ला .............. राज्यात आहे.

*अ) कर्नाटक* *ब) दिल्ली* *क) महाराष्ट्र* *ड) गुजरात.*

३. मध्यप्रदेशची राजधानी ............... आहे.

*अ) बंगलोर* *ब) भोपाळ* *क) सागर* *ड) लखनौ.*

४. .............. गुलाबी शहर म्हणून ओळखले जाते.

*अ) पाटणा* *ब) इंफाळ* *क) जयपूर* *ड) गंगटोक.*

५. हवामहल ............... राज्यात आहे.

*अ) राजस्थान* *ब) महाराष्ट्र* *क) कर्नाटक* *ड) आंध्र प्रदेश.*

### ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. धबधब्यांचे शहर म्हणून या शहराला ओळखले जाते?

२. एलिफंटा लेणी कोणत्या शहराजवळ आहे?

३. छत्रपती शिवाजी महाराजांनी कोणता किल्ला बांधला?

४. शनिवारवाडा कोणत्या शहरामध्ये आहे?

५. फत्तेपूर सिक्री हे शहर कोणत्या बादशहाने निर्माण केले?

## २.२.२ भारतातील नैसर्गिक पर्यटन स्थळे

पर्यटन व्यवसायाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. या व्यवसायाचे रूपही बदलत आहे. पूर्वी भारतामध्ये मुख्यत: पर्यटन क्षेत्र फक्त तीर्थक्षेत्रांशी संबंधित होते. नंतर ते ऐतिहासिक स्थलदर्शनाशी जोडले गेले. मानवाच्या प्रगतीला चालना मिळाल्यावर या क्षेत्राचा विकास होऊन नवे रुप प्राप्त झाले. आज भारतामध्ये नैसर्गिक पर्यटन स्थळांना पर्यटनाद्वारे महत्त्व प्राप्त झाले आहे. या पर्यटन स्थळांना देशविदेशातील पर्यटक भेटी देण्यासाठी येत असतात.

### २.२.२.१ गिरीस्थाने :-

भारतातील बहुसंख्य गिरीस्थाने ही स्वातंत्र्यपूर्वकाळापासून विकसित झालेली दिसून येतात. घनदाट जंगले, थंड हवामान, सरोवरे व तलाव ह्यांनी युक्त अशी डोंगरात वसलेली ठिकाणे गिरीस्थाने म्हणून ओळखली जातात. भारतात उत्तरेला सुचीपर्णी वृक्षांनी वेढलेली व अल्पाईन समशीतोष्ण वातावरणात बहुतांश गिरीस्थाने आपणास आढळतात, तर दक्षिणेकडील गिरीस्थाने ही तेथील सदाहरित जंगलांमुळे प्रसिध्द आहेत. दार्जीलिंगसारखी पूर्वेकडील गिरीस्थाने ही हिमालयीन हवामानामुळे प्रसिध्द आहेत. पश्चिम घाटातील गिरीस्थाने ही तेथील विषुवृत्तीय जंगलांमुळे प्रसिध्द आहेत. आता आपण भारतातील काही मोजक्या प्रसिध्द गिरीस्थानाची माहिती घेवू.

**१. सिमला :-**

हिमाचल प्रदेश राज्याची राजस्थानी आणि 'पर्वतांची राणी' म्हणून प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. इ.स. १८६४ साली ब्रिटिशांनी सिमला उन्हाळी राजधानी म्हणून घोषित केले होते. आंग्ल संस्कृतीच्या धाटणीतील इमारती, शाळा, दुकाने, रेल्वे स्टेशन ही तेथील महत्त्वाची पाहण्यासारखी ठिकाणे आहेत. साहसी खेळांसाठी तसेच जंगलातील फेरफटका मारण्यासाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे.

**२. मनाली :-**

हिमाचल प्रदेशाच्या कुलू जिल्ह्यातील निसर्गसुंदर शहर म्हणून मनाली प्रसिध्द आहे. महाभारतकार व्यासांची तपोभूमी, तसेच पांडवांच्या अज्ञातवासातील एक वास्तव्यस्थान म्हणून मनाली भोवती अनेक पौराणिक आख्यायिका गुंफलेल्या आढळतात. बर्फाच्छादित पर्वतशिखरे, उत्तुंग देवदार वृक्ष, जवळून वाहणारा व्यास नदीचा प्रवाह, थंड व आल्हाददायक हवामान यामुळे मनाली हे पर्यटकांचे आकर्षण ठरले आहे.

**३. दार्जिलिंग :-**

पश्चिम बंगालमधील सुप्रसिध्द अशा चहा मळ्यांसाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे. येथून 'कांचनगंगा' गिरीशिखरांचे अत्यंत विलोभनीय दर्शन दिसते. येथे प्रामुख्याने वनस्पती उद्याने, बौध्द मठ व प्राणीसंग्रहालये ही पर्यटकांची प्रमुख आकर्षणे आहेत.

**४. मुन्नार :-**

केरळमधील चहा मळ्यांसाठी प्रसिध्द असलेले हे ठिकाण निसर्गदत्त देणगीने समृध्द आहे. येथील सदाहरीत वृक्षांनी नटलेली जंगले, विपुल असे वन्यजीवन व इतर जैवविविधता नेहमीच पर्यटकांना आकर्षित करीत आलेली आहे. पर्वतारोहण, जंगलभ्रमण व इतर साहसी खेळांसाठी मुन्नार प्रसिध्द आहे.

**५. कोडाई कॅनॉल :-**

कोडाई कॅनॉल हे ठिकाण तामिळनाडू राज्यातील मदुराईपासून सुमारे १२० कि.मी. अंतरावर पलानी

डोंगर रांगात वसलेले आहे. येथील जैवविविधतेने नटलेली जंगल संपदा जगभर प्रसिध्द आहे. म्हणून या ठिकाणाला 'वनांची देणगी' म्हणून संबोधले जाते. येथे अनेक प्रकारच्या दुर्मिळ प्रकारच्या वनौषधी.मिळतात.

**६. उटी :-**

ब्रिटिश काळातील मद्रास परगण्याचे उन्हाळ्यातील मुख्यालय म्हणून उटी ह्या गिरीस्थानाची १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात निर्मिती झाली. येथे सुमारे २२ एकरातील सरकारी वनस्पती उद्यान पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. येथील सरोवरातील नौका विहार व निलगिरी पर्वतमधील 'दोडाबेट्टा' डोंगर शिखरापर्यंतचे जंगल पर्यटन अत्यंत संस्मरणीय आहे.

**७. मसुरी :-**

उत्तराखंड मधील डेहराडून जिल्ह्यात असलेले थंड हवेचे शहर म्हणून मसुरी प्रसिध्द आहे. हिमालय पर्वत रांगेची विलोभनीय दर्शन देणारे हे ठिकाण निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व आहे.

**८. श्रीनगर :-**

जम्मू-काश्मीर राज्याची उन्हाळी राजधानी म्हणून श्रीनगरची ओळख आहे. येथील दलसरोवर, नौकागृह (Housboat) व सुंदर बगीचे यामुळे पर्यटकांचा ओढा श्रीनगरकडे जास्त आहे. 'भूतलावरील स्वर्ग' म्हणून याची ओळख आहे.

**९. माथेरान :-**

रायगड जिल्ह्यात सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेले थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरान प्रसिध्द आहे. घनदाट झाडीने व्यापलेल्या आणि लाल पायवाटा यांनी भरलेला पठार पर्यटकांना आकर्षित करतो. कोणत्याही स्वयंचलित वाहनासाठी बंदी घातलेले हे महाराष्ट्रातील एकमेव गिरीस्थान आहे.

## २.२.२.२ सागर किनारे (बिचेस्) :-

सुमारे ७५०० कि.मी. सागरी किनारा असलेल्या भारतीय द्विपकल्पास अनेक वाळुयुक्त सागर किनारे लाभले आहेत. भारतीय समुद्रकिनारे येथील वर्षभर असलेली सूर्यकिरणे, विहंगम दृश्य यामुळे जगप्रसिध्द आहेत. यातील काही प्रमुख सागरी किनाऱ्यांचा आढावा पुढीलप्रमाणे :-

**१. कोवालम बिच :-**

केरळ मधील मलबार समुद्रकिनाऱ्यालगत असलेले कोवालम भारतातील सुप्रसिध्द बिच आहे. पाण्यातील खेळ व आयुर्वेदिक उपचारासाठी प्रसिध्द आहे.

**२. अलपुझ्झा बिच :-**

अरबी समुद्र व पुन्नामडा बॅकवॉटर ह्यामधील चिंचोळ्या जागेत असलेल्या अलपुझ्झा या ठिकाणास

'पूर्वेकडील व्हेनीस' असे संबोधले जाते. असंख्य पूल व पाटांचे जाळे असलेले हे ठिकाण पर्यटकांत खूप प्रसिध्द आहे.

### ३. अंजुना बिच :-

अंजुना बिच हे गोव्यातील प्रसिध्द बिच पैकी एक आहे. १९५०-१९६० दरम्यान हिम्पी पर्यटकाकडून शोध लागलेला हा बिच परदेशी पर्यटकांत खूप प्रसिध्द आहे. येथील अलबुकर्क मँशन व चापोरा फोर्ट प्रसिध्द आहे.

### ४. बागा-कलंगुट बिच :-

अत्यंत विस्तीर्ण असा बागा बिच गोव्यामध्ये येणाऱ्या परदेशी पर्यटकांचे आकर्षणाचे ठिकाण आहे. जलक्रिडा व मासेमारीसाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे.

### ५. जुहू बिच :-

जुहू बिच मुंबईतील जुहू-विलेपार्ले येथे आहे. हिंदी-मराठी चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे.

### ६. कन्याकुमारी बिच :-

तामिळनाडू राज्यातील अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व हिंद महासागर यांच्या संगमावर वसलेला हा बिच पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. कन्याकुमारी येथे विवेकानंद स्मारक, तिरुवल्लुबर पुतळा हे प्रसिध्द आहे.

### ७. लक्षद्वीप :-

लक्षद्वीप हे भारतातील सात केंद्रशासित प्रदेशांपैकी एक राज्य होय. येथील २७ बिचेसमधील १० बिचेस पर्यटकांसाठी खुली करण्यात आली आहे. यामध्ये अगाटी, आमीनी, ॲडरोट, बीत्रा, चेटलाट, कडमाट, कालपेनी, कवाराही, किलटान व लेनीकोप अशी बिचेस प्रसिध्द आहेत.

### ८. अंदमान बिचेस :-

अंदमान हे भारतातील आग्नेयेस असलेला एक केंद्रशासित प्रदेश आहे. येथील राधनगर बिच, हरमिनदर बिच ही प्रसिध्द पर्यटन स्थळे आहेत.

## २.२.२.१ अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने

भारतातील अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने ही जगभरातून मोठ्या प्रमाणात पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. भारतात एकूण '९६' राष्ट्रीय उद्याने तसेच ५०० च्या वर अभयारण्ये सर्वदूर पसरलेली आहेत. भारतातील काही ठिकाणे वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती व श्वापदांसाठी निर्माण केली गेली आहेत. भारतातील अशा जैवविविधता नटलेली काही राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये पुढीलप्रमाणे आहेत.

## १. जिम कार्बेट राष्ट्रीय उद्यान :-

हिमालयाच्या पायथ्याशी उत्तरांचलमध्ये असलेले जिम कार्बेट राष्ट्रीय उद्यान १९५२ साली अस्तित्वात आले. रामगंगा नदीच्या सानिध्यात असलेले हे उद्यान बंगाल वाघासाठी प्रसिध्द आहे. या उद्यानमध्ये ५८० प्रकारच्या पक्षांच्या प्रजाती, ५० प्रकारचे विविध प्राणी आढळतात.

## २. रणथंबोर राष्ट्रीय उद्यान :-

अत्यंत प्रसिध्द रणथंबोर असलेले हे राष्ट्रीय उद्यान जयपूरपासून १३२ कि.मी. अंतरावर आहे. वाघांसाठी प्रसिध्द या उद्यानात विपुल जैवविविधता आढळून येते. येथील वनखात्याने सुरू केलेली 'टायगर सफारी' पर्यटकांचे आकर्षण आहे.

## ३. सासण-गीर राष्ट्रीय उद्यान :-

आफ्रिकेनंतर आढळून येणाऱ्या सिंह या जंगली प्राण्यासाठी प्रसिध्द असलेले सासण-गीर हे ठिकाण गुजराथमधील जुनागढ जिल्ह्यात आहे. सुमारे १४२१ वर्ग कि.मी. परिसरात पसरलेले हे राष्ट्रीय उद्यान इतर अनेक सस्तन, सरपटणारे प्राणी व पक्षी यासाठी प्रसिध्द आहे.

## ४. बांधवगढ राष्ट्रीय उद्यान :-

बांधवगढ राष्ट्रीय उद्यान मध्यप्रदेशातील विंध्य पर्वतात उमरिया जिल्ह्यामध्ये स्थित आहे. या उद्यानमध्ये विविध जातीचे प्राणी आणि पक्षी पहावयास मिळतात. तसेच येथे गुंफा दर्शन, वाघांचे संग्रहालय, बांधवगढ किल्ला पर्यटनासाठी प्रसिध्द आहे.

## ५. काझीरंगा राष्ट्रीय उद्यान :-

आसाममधील गोलाघाट व नागांव जिल्ह्यामध्ये हे राष्ट्रीय उद्यान आहे. जगात सापडणाऱ्या भारतीय एकशिंगी गेंड्यापैकी दोन-तृतीयांश गेंडे या अभयारण्यात सापडतात. या जंगलामध्ये वाघ, अनेक हत्ती, पाणम्हशी, हरणे, अनेक दुर्मिळ पक्षी पहावयास मिळतात.

## ६. बंदीपूर राष्ट्रीय उद्यान :-

कर्नाटक राज्यातील उटी-म्हैसूर हमरस्त्यावर जैवविविधतेने विपूल अशा पश्चिम घाटात हे अभयारण्य वसलेले आहे. या अभयारण्यात मोठ्या प्रमाणात हत्ती पहावयास मिळतात.

## ७. पेरियार अभयारण्य :-

केरळ व तामिळनाडू राज्यांच्या सिमेवर असलेले पेरियार अभयारण्य जंगली हत्ती, गवारेडा, रानडुक्कर, सांबर, हरिण, जंगली कुत्रे, वाघ ह्यासाठी प्रसिध्द आहे. येथील निलगीरी लंगूर (वानर) प्रसिध्द आहे.

**८. वायनाड अभयारण्य :-**

केरळमधील वायनाड भागात हे अभयारण्य स्थित आहे. भारतीय बायसन, हत्ती, वाघ आणि हरिण असे विविध प्राणी येथे आढळतात. हिरवीगार जंगले आणि समृध्द वन्यजीव यासाठी प्रसिध्द आहे.

**९. पेंच :-**

मध्यप्रदेशातील सिवनी आणि छिंदवाडा जिल्ह्यात हे अभयारण्य आहे. रुडयार्ड किपलिंग यांनी लिहिलेल्या 'द जंगल बुक' या प्रसिध्द पुस्तकात या उद्यानाचा उल्लेख आढळतो. या अभयारण्यात प्रामुख्याने रॉयल बंगाल वाघ, अस्वले, बिबट्या, कोल्हा असे प्रमुख प्राणी आढळतात.

**१०. ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प :-**

महाराष्ट्रामधील सर्वात मोठे आणि जुने राष्ट्रीय उद्यान म्हणून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ओळखला जातो. चंद्रपूर जिल्ह्यामधील ६२५.४ चौरस किलोमीटर वर्गात हा प्रकल्प पसरलेला आहे. या जंगलामध्ये प्रामुख्याने रॉयल बंगाल वाघ मोठ्या प्रमाणात आढळत असल्याने जंगल सफरीसाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे.

**११. मानस अभयारण्य :-**

आसाममधील व्याघ्र प्रकल्पासाठी प्रसिध्द मानस अभयारण्य सुमारे ५१९ वर्ग कि.मी. मध्ये पसरले आहे. जैवविविधतेने नटलेल्या या ठिकाणी खैर, बेहडा, चंदन व इतर मिश्र जातींच्या वृक्षांसाठी आणि वाघ, जंगली, म्हैस, ससे, रानडुक्कर, हत्ती इत्यादी प्राण्यांसाठी प्रसिध्द आहे.

**१२. हिमाचल अभयारण्य समूह :-**

सुचीपर्णी जंगले, खोल दऱ्या, उंच डोंगर रांगा, विस्तीर्ण कुरणे यांनी युक्त असे ३२ अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने हिमाचलमध्ये स्थित आहेत. यातील चेल, धुराधर, मजथाल, रेणुका, कनवर, दरघाटी, कालाटोप, महाराणा प्रताप अभयारण्य प्रसिध्द आहेत.

**१३. नागरहोळ राष्ट्रीय उद्यान :-**

भारतातील विस्तीर्ण असे नागरहोळ राष्ट्रीय उद्यान म्हैसूरपासून ८० कि.मी. अंतरावर आहे. बांदीपूर, मुदुमलाई व वायनाड ही प्रसिध्द अभयारण्ये यात मोडतात.

**१४. बोरी अभयारण्य :-**

भोपाळपासून १२५ कि.मी. अंतरावर असलेले बोरी अभयारण्य सातपुडा पर्वतराजीच्या दक्षिणेकडील पायथ्यांशी वसलेले आहे. संमिश्र पाणझडीचे व बांबूचे जंगल असलेले हे ठिकाण वाघ, कोल्हे, जंगली कुत्रे, लांडगे, चितळ, सांबर, मिलगाय, गवा यासाठी प्रसिध्द आहे.

### १५. दांडेली अभयारण्य :-

कर्नाटक राज्यातील सर्वात मोठे अभयारण्य आहे. सुमारे ८३४ वर्ग कि.मी. इतके विस्तीर्ण आहे. साग वृक्षासाठी प्रसिध्द असलेले हे ठिकाण विपुल जैवविविधतेने नटलेले आहे. काली नदीच्या सानिध्यात असलेले हे ठिकाण दुर्मिळ औषधी वनस्पतीसाठी प्रसिध्द आहे. येथे ४०० च्या वर पक्षांच्या जाती-प्रजाती आढळतात.

### १६. इडूक्की अभयारण्य :-

केरळमधील हे अभयारण्य १९७६ साली अस्तित्त्वात आले. ७७ वर्ग कि.मी. विस्तीर्ण असे हे अभयारण्य तीन धरणांच्या 'इडूक्की' जल साठ्याने विपुल जीवसृष्टीची निर्मिती करते. जंगली हत्ती, वाघ, अस्वल, हरीण, गवारेडा, रानडुक्कर, कोब्रा नाग, अजगर व इतर दुर्मिळ सरपटणाऱ्या प्राण्यांसाठी हे अभयारण्य प्रसिध्द आहे.

## २.२.२.२ सरोवरे, जलप्रपात (Lakes, Waterfall) :-

पर्यटनाच्यादृष्टीने सरोवरे व जलप्रपात यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतामध्ये विविध भागातील सरोवरे, जलप्रपातांना पर्यटक मोठ्या संख्येने भेटी देत असतात. पर्यटन क्षेत्रात यांचा वाटा महत्त्वपूर्ण आहे. अशा काही प्रमुख सरोवर आणि जलप्रपात यांचा आढावा पुढीलप्रमाणे :-

### १. चिल्का सरोवर :-

ओडिसा राज्यातील पुरी, खुर्दा आणि गंजम जिल्ह्यात पसरलेले भारतामधील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून ओळखले जाते. भारतीय उपखंडात स्थलांतरित होणाऱ्या पक्षांसाठी हे ठिकाण प्रसिध्द आहे. येथे इराण, मध्य आशिया, सैनेरियातून येणारे अनेक स्थलांतरित पक्षी आढळतात.

### २. दाल सरोवर :-

पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून प्रसिध्द असणाऱ्या काश्मीर मधील श्रीनगर जवळ दाल सरोवर आहे. हे सरोवर शिकाराबोट हाऊससाठी प्रसिध्द आहे. हिवाळ्यात बऱ्याच वेळेला हे सरोवर गोठलेले असते. या सरोवराच्या परिसरात मुघलकालीन निशांत बाग, शालीमार बाग, चष्मेशाही, हजरतनल इ. ठिकाणे पाहण्यासाठी आहेत.

### ३. नक्की सरोवर :-

राजस्थान मधील माऊंट आबू परिसरात असलेल्या नक्की सरोवरात अनेक प्रकारचे मासे पहावयास मिळतात. या सरोवर परिसरात महाराजा फयपूर राजवाडा, दिलवाडा जैन मंदिर इ. प्रेक्षणीय स्थळे आहेत.

### ४. नैनिताल :-

हिमालयातील सर्वात मोठे सरोवर असून उत्तराखंड राज्यात वसलेले आहे. हे सरोवर १४१० मी. लांबीचे असून ४५५ मी. रुंदीचे आणि समुद्रसपाटीपासून १६०६ मीटर उंचीवर आहे.

### ५. वेण्णा सरोवर :-

महाराष्ट्रातील प्रसिध्द अशा महाबळेश्वर गिरीस्थान परिसरात वेण्णा सरोवर आहे. हे ठिकाण नौकाविहारासाठी प्रसिध्द आहे.

### ६. हुसेन सागर :-

हैद्राबाद मधील ह्दय आकाराचा असलेला हा तलाव मध्ययुगीन कालखंडात इब्राहिम कुली कुतूब शहा याने निर्माण केला. या तलावाच्या मध्यभागी इ.स. १९९२ मध्ये उभारलेली सुंदर अशी गौतम बुध्दाची मूर्ती आहे.

### ७. तामदिल सरोवर :-

मिझोराम राज्यात अेझवालमपासून ६ ते ८ तासांच्या अंतरावर तामदिल सरोवर आहे. मासेमारीसाठी प्रसिध्द असलेले देशातले सर्वात सुंदर देखणे असलेले सरोवर आहे.

### ८. सातताल सरोवर :-

उत्तराखंड येथील सातताल सरोवर म्हणजे सात लहान तलावांचा समुदाय आहे. रामताल, लक्ष्मणताल, सिताताल, नल-दमयंती ताल, पन्नाताल, पुर्णाविरल, वसुखावाल इ. मिळून सातताल सरोवरांची निर्मिती झाली आहे. विपुल प्रमाणात पक्षांची वस्ती असलेले हे सरोवर जैवविविधतेने नटलेले आहे.

### ९. प्राशर सरोवर :-

निळेशार काचेसारखे पाणी असलेले प्राशर सरोवर हिमाचल प्रदेशातील मंडी गावापासून सुमारे ५० कि. मी. अंतरावर स्थित आहे. सरोवराच्या समोर पॅगोडासारखे दिसणारे भव्य पराशर ऋषींचे सुंदर मंदिर आहे.

### १०. चंगू सरोवर :-

सिक्कीम मधील नशुलापास या भारत-चीन सिमेलगत हे सरोवर आहे. येथे जाण्याचा मार्ग अत्यंत दुर्गम व अवघड आहे. या सरोवर परिसरात याक प्राण्याचे दर्शन होते.

### ११. मानसताल व वूलर सरोवर :-

जम्मू-कश्मीरमधील मानसताल व वूलर सरोवर प्रसिध्द आहेत. मानसताल सरोवरानजीक असलेले

मुघल गार्डन अतिशय देखणे ठिकाण आहे. वूलर सरोवर आशिया खंडातील सर्वात मोठे गोडे पाण्यातील सरोवरांपैकी एक आहे.

## ❑ जलप्रपात (Waterfall) :-

### १. दूधसागर जलप्रपात :-

दूधसागर जलप्रपात गोव्यामधील मांडोवी नदीवर स्थित आहे. भारतातील सर्वात उंच जलप्रपातापैकी एक असून त्याची उंची ३१० मीटर आहे. या ठिकाणी मोठ्या संख्येने पर्यटक भेट देतात.

### २. नोहकालिकाय जलप्रपात :-

चेरापूंजी येथील सुमारे ३३५ मिटर्स उंचीवरून कोसळणारा हा जलप्रपात मेघालयातील एक प्रसिध्द पर्यटन स्थळ आहे.

### ३. जोग जलप्रपात :-

भारतातील नोहकालिकाय जलप्रपातानंतर दुसऱ्या क्रमांकाचा जलप्रपात आहे. कर्नाटक राज्यातील शरावती नदीवर स्थित आहे.

### ४. धुवांधार जलप्रपात (घुंधर) :-

मध्यप्रदेशातील भेडा घाटातील नर्मदा नदीवर धुवाँधार जलप्रपात असून ३० मीटर उंच आहे. हा जलप्रपात सुंदर अशा संगमरवरी खडकांमधून मार्गक्रम करतो.

### ५. चित्रकूट :-

छत्तीसगढ राज्यातील बस्तर जिल्ह्यात इंद्रावती नदीवर हा सुंदर असा जलप्रपात आहे. यास भारताचा नायगारा असे म्हटले जाते.

### ६. आंबोली :-

महाराष्ट्रातील अत्यंतिक पावसाचे ठिकाण म्हणून आंबोलीची ओळख आहे. समुद्र सपाटीपासून सुमारे ६९० मीटर उंचीवर असलेले हे स्थान निसर्गरम्य आणि चांगल्या हवामान व धबधब्यासाठी प्रसिध्द आहे.

### ७. एलिफंटा जलप्रपात :-

पूर्वेकडील स्कॉटलांड म्हणून प्रसिध्द असलेल्या शिलाँग येथे एलिफंटा जलप्रपात आहे. हा जलप्रपात तीन पायऱ्याचा धबधबा म्हणून प्रसिध्द आहे. याच्या बाजूस हत्तीच्या आकाराचा खडक आहे म्हणून ब्रिटिशांनी याला एलिफंटा हे नाव दिले.

### ८. भिमलाट जलप्रपात :-

राजस्थानमधील बूंदी जवळ भिमलाट जलप्रपात सुमारे ६० मीटर्स उंचीवरून कोसळतो. येथील उष्ण वातावरणात हा जलप्रपात आल्हाददायक वातावरण निर्माण करतो.

### ९. केम्पटी जलप्रपात :-

उत्तराखंडातील मसुरी येथे हा जलप्रपात पाहावयास मिळतो. सुमारे ३७१ मीटर उंचीवर वसलेले हे ठिकाण अत्यंत मनोवेधक आहे.

## ❑ हिमस्थाने :-

### १. आऊली :-

उत्तराखंडातील बद्रीनाथजवळील आऊली हे ठिकाणी बर्फावरील खेळांसाठी खूप प्रसिध्द आहे. सुमारे २५०० ते ३००० मीटर ऊंचीचे बर्फावरील उतार अनेक साहसी पर्यटकांना आव्हान करीत असतात.

### २. पहलगाम :-

समुद्र सपाटीपासून सुमारे ८,९५७ फूट उंचीवरील हे ठिकाणी काश्मीरमधील सर्वात सुंदर ठिकाणांपैकी एक आहे. येथे रक्त गोठवून टाकणारी थंडी व सुंदर निसर्गदृश्ये मनाला मोहिनी टाकीत असतात.

### ३. गुलमर्ग :-

जम्मू-काश्मीरमध्ये हे ठिकाण वसलेले आहे. जगप्रसिध्द गोंडोला केबल कारमध्ये बसून होणारे भ्रमण श्वास रोखून धरणारे असते. येथून जवळ असलेले अलणर सरोवर व तंगमार्ग ठिकाण सहलीसाठी प्रसिध्द आहेत.

### ४. पटणी टॉप :-

जम्मू-काश्मीरमधील हिवाळी सहल पटणी टॉपला भेट दिल्याशिवाय पूर्ण होत नाही. उधमपूर जिल्ह्यातील हिमालय पर्वत राजीत वसलेले हे ठिकाण निसर्गदत्त देणगीने नटलेले आहे.

याशिवाय हिमाचल प्रदेशातील कुफरी, खच्चर, उत्तराखंडमधील मुनसियारी, घनोलटी, जम्मू-काश्मीरमधील सोनमार्ग, लडाख, सिक्कीममधील कटाओ, अरुणाचल प्रदेशातील तवांग, पश्चिम बंगालमधील लावा ही ठिकाणे बर्फाच्छादित असल्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अतिशय महत्त्वाची आहेत.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-2

### अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ब्रिटिशांची ग्रीष्म ऋतूतील राजधानी म्हणून ...... हे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळखले जाते.
*अ) कुलू* *ब) मनाली* *क) सिमला* *ड) श्रीनगर.*

२. कोणते अभयारण्य ............. या ब्रिटिश शिकाऱ्याच्या नावाने आहे?

*अ) गिर* *ब) काझीरंगा* *क) कार्बेट* *ड) नोरी.*

३. आशिया खंडातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून ................ सरोवराचा उल्लेख केला जातो.

*अ) तामदिल* *ब) चिल्का* *क) सातताल* *ड) दाल.*

४. ................ पूर्वेकडील स्कॉटलंड म्हणून ओळखले जाते.

*अ) शिलाँग* *ब) पहलगाम* *क) सिमला* *ड) नैनिताल.*

५. जोग जलप्रपात .................. राज्यात आहे.

*अ) महाराष्ट्र* *ब) हिमाचल प्रदेश* *क) कर्नाटक* *ड) हरियाणा.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. काझीरंगा अभयारण्य कोणत्या प्राण्यासाठी प्रसिध्द आहे?

२. भारतामधील नायगरा म्हणून कोणत्या जलप्रपातला ओळखले जाते?

३. दाल सरोवर कोणत्या राज्यात आहे?

४. जिम कॉर्बेट अभयारण्य कोणत्या प्राण्यासाठी राखीव आहे?

५. पृथ्वीवरील स्वर्ग म्हणून कोणते राज्य ओळखले जाते.

## २.२.३ भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

भारत हा धार्मिक वारसा जपणारा देश म्हणून ओळखला जातो. येथे अनेक जाती धर्मांचे लोक आहेत आणि ते आपापल्या धर्माचे महत्त्व राखून आहेत. भारताच्या पर्यटन विकासात इतर घटकापेक्षा धार्मिक घटकांना विशेष महत्त्व आहे. येथे अनेक धार्मिक पर्यटन स्थळे विकसित झाली आहेत. या धार्मिक पर्यटन स्थळांचा आढावा पुढीलप्रमाणे :-

### ❑ पर्यटनाचे धार्मिक घटक :-

### १. मंदिरे :-

भारतामध्ये प्राचीन काळापासून धार्मिक परंपरा लाभलेले आहे. या धार्मिक परंपरेमध्ये हिंदू-जैन धर्मियांच्या मंदिराना पर्यटनदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये विविध भागात अनेक मंदिरांची निर्मिती झाली आहे. या मंदिराच्या माध्यमातून दरवर्षी येथे यात्रा काळात तसेच धार्मिकदृष्ट्या भेट देण्यासाठी अनेक भाविक भेटी देत असतात.

**२. समाध्या :-**

साधुसंतांच्या समाध्यांची ठिकाणे देखील धार्मिक ठिकाणे म्हणून प्रसिध्दीला येतात. उदा. आळंदी येथे संत ज्ञानेश्वर, शेगाव येथे गजानन महाराज इ. समाधी स्थळे धार्मिक कारणांमुळे प्रसिध्दीस आली आहे, त्यामुळे या भागात पर्यटन केंद्राचा विकास झाला आहे.

**३. दर्गे :-**

मुस्लिम धर्मियांच्या संतांचे व पिरांचे दर्गे यांना त्यांच्या धर्मात पवित्र स्थान आहे. अशी ठिकाणे मुस्लीम धर्मियांची पवित्र धार्मिक स्थळे आहेत. उदा. अजमेर येथील ख्वाजा मोईनुद्दीन चिस्ती, मुंबईमधील हजरत अली इ. दर्गे. या ठिकाणांना धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून महत्त्व प्राप्त झाले आहे.

**४. गुरुद्वार :-**

गुरुद्वार हे शीख लोकांचे पवित्र धार्मिक ठिकाण म्हणून ओळखले जाते. उदा. अमृतसरमधील सुवर्ण मंदीर, नांदेड मधील गुरुद्वार इ.

**५. गिरिजाघरे (चर्चेस) :-**

ख्रिस्ती लोक गिरिजाघरांमध्ये प्रार्थनेसाठी येतात. भारतातील काही गिरिजाघरे पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षणाचे स्थाने बनलेली आहेत. उदा. गोव्यातील सेंट कॅथड्रस चर्च इ.

## २.२.३.१ उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

❑ **जम्मू-काश्मीर :-**

**अ) वैष्णवी देवी मंदीर :-**

हिमालय पर्वतरांगेमध्ये स्थिर असलेले वैष्णवी देवी मंदिर हिंदू धर्मातील लोकप्रिय मंदिर आहे. हिंदू धर्मातील एक्कावन्न शक्तीपीठांपैकी हे एक महत्त्वाचे शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते. जम्मू आणि काश्मीर मधील त्रिकूट पर्वतरांगेमधील या मंदिराला दरवर्षी १ कोटीच्या आसपास भाविक भेट देत असतात.

**ब) अमरनाथ :-**

अमरनाथ जम्मू आणि काश्मीर राज्यातील पवित्र तीर्थस्थळ असून येथे नैसर्गिक गुहा आहे. ही गुहा श्रीनगर पासून साधारणपणे १३५ कि.मी. वर समुद्रसपाटीपासून १३६०० फूट उंचीवर आहे. येथील गुहेमध्ये बर्फाचे शिवलिंग तयार होते. ते पाहण्यासाठी दरवर्षी उन्हाळ्यात लाखो भाविक येथे भेट देतात.

**क) शंकराचार्य हिल :-**

श्रीनगरजवळ असलेल्या एका टेकडीवर इ.स. पूर्व २०० वर्षांपूर्वीचे शिवमंदीर आहे. हे मंदिर भाविकांचे पवित्र ठिकाण आहे.

**ड) हजरत चरार-ए-शरिफ :-**

जम्मू-काश्मीर राज्यातील मुस्लीम धर्मियांचे पवित्र ठिकाण म्हणून हजरत चरार-ए-शरिफ प्रसिद्ध आहे.

❑ **पंजाब :-**

**अ) अमृतसर :-**

अमृतसर पंजाबच्या वायव्य भागात भारत-पाकिस्तानच्या सीमेजवळ वसलेले शहर आहे. या शहरामध्ये शीख धर्माचे सांस्कृतिक केंद्र असलेले जगप्रसिध्द सुवर्णमंदीर आहे. शिखांचे गुरू अर्जुनदेवांनी इ.स. १५८५ रोजी बांधण्याची संकल्पना मांडली व इ.स. १६०४ साली हा गुरूद्वार बांधून पूर्ण झाला. संगमरवरी दगडाने बांधलेल्या या मंदिराच्या घुमटाला सोनेरी आवरण आहे. या मंदिरात शिखांचा पवित्र ग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवलेला आहे.

**ब) अकालतख्त :-**

सुवर्ण मंदिर शेजारी हे शिखांचे धार्मिक पीठ आहे. येथे प्राचीन शस्त्रास्त्रांचे संग्रहालय आहे.

**क) तरण तारण :-**

अमृतसरपासून २२ कि.मी. अंतरावर असलेले शीखांचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे.

❑ **उत्तर प्रदेश :-**

**अ) मथुरा-वृंदावन :-**

आग्रा येथून ५५ कि.मी. अंतरावर असलेल्या यमुना नदीच्या काठावर मथुरा व वृंदावन ही हिंदू धर्मीयांची तीर्थस्थाने आहेत. मथुरा हे भगवान श्रीकृष्णाचे जन्मस्थान आहे. येथे द्वारकाधिश मंदीर, विश्रामघाट, गीतामंदीर, सतीबुरुज, जामा मशीद इ. हिंदू-मुस्लिमांची धार्मिक ठिकाणे आहेत. वृंदावन येथे गोविंद देव मंदिर, मदन मोहन, जुगल किशोर व राधावल्लभ मंदिरे प्रेक्षणीय आहेत.

**ब) वाराणसी :-**

वाराणसी गंगेच्या काठावर वसलेले आहे. हिंदू धर्मीयांचे सर्वात पवित्र काशी विश्वेश्वराचे प्रसिध्द मंदीर येथे आहे. भारतातील बारा जोतिर्लिंगापैकी प्रमुख पीठ म्हणून ओळखले जाते. हिंदू पुराणांमध्ये व धार्मिक ग्रंथांमध्ये वाराणसीचा सातत्याने उल्लेख केलेला आहे. जगप्रसिध्द कुंभ मेळावा या ठिकाणी आयोजित केला जातो. दरवर्षी लाखो भाविक या ठिकाणाला भेट देतात.

**क) सारनाथ :-**

वाराणसी पासून १२ कि.मी. अंतरावर बौध्द धर्मीयांचे पवित्र स्थळ आहे. सम्राट अशोकाने बुध्दाच्या

धर्मचक्र परिवर्तनाचे स्मारक म्हणून सारनाथाचा स्तंभ उभारला. या ठिकाणी गौतम बुध्दाने प्रवर्तनाचे पहिले व्याख्यान दिलेले होते.

**ड) हरिद्वार :–**

हरी म्हणजे 'भगवान विष्णू' तर द्वार म्हणजे 'द गेट वे टू भगवान विष्णू'. भगवान विष्णूचे मंदीर असलेले चारधाम या पैकी एक पवित्र ठिकाण. गंगेच्या काठी वसलेल्या या ठिकाणी हर की पैरी, परमार्थ आश्रम, सप्तऋषी आश्रम, सप्त सरोवर, वान प्रस्थाश्रम, सतीकुंड, चांडीदेवी मंदीर इ. प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. येथे कुंभमेळाव्याचे आयोजन केले जाते.

**ई) ऋषीकेश :–**

हरिद्वार पासून जवळच असलेले हे ठिकाण हिंदूचे पवित्र धार्मिक ठिकाण आहे. येथे लक्ष्मण झुला, रामझुला, त्रिवेणी घाट, स्वर्गाश्रम, गीता भवन, परमार्थ निकेतन, शिवानंद आश्रम, सत्य नारायण मंदिर इ. धार्मिक ठिकाणे आहेत.

**प) गंगोत्री व यम्नोत्री :–**

हिमालयातील ३००० मीटर उंचीवरील अनुक्रमे गंगा व यमुना या नद्यांच्या उगमस्थानी असलेले ही पवित्र धार्मिक ठिकाणे लक्षावधी लोकांचे श्रध्दास्थाने आहेत. येथील हिमशिखरे, पर्वतरांगा, उंच देवदार वृक्ष याची शोभा अवर्णनीय आहे.

**फ) बद्रीनाथ :–**

गढवाल पर्वत श्रेणीत ऋषींगा व अलकनंदा या नद्यांच्या संगमावर वसलेले भारतातील चारधाम पैकी एक प्रमुख धाम म्हणून बद्रीनाथ ओळखले जाते. आद्य शंकराचार्यांनी आठव्या शतकात हे मंदिर बांधून नारायणाची मूर्तीची प्रतिष्ठापना केली. मंदिराच्या पायथ्याशी गरम पाण्याचे झरे आणि थोड्या अंतरावर वसुंधरा धबधबा आहे.

**ग) केदारनाथ :–**

केदारनाथ धार्मिक स्थळ बारा जोतिर्लिंगांपैकी एक असून समुद्रसपाटीपासून ३,५८३ मीटर उंचीवर उत्तरांचल राज्यात आहे. निसर्गरम्य परिसर, उत्तुंग बर्फाच्छादित पर्वतरांगा, उंच वृक्षे यामुळे हा परिसर प्रेक्षणीय आहे.

**ह) अलाहाबाद :–**

गंगा व यमुना या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले हिंदूचे पवित्र धार्मिक ठिकाण आहे. यास प्रयाग असेही म्हणतात. अलाहाबाद येथे पंडित नेहरूंचे जन्मस्थान, आनंद भवन, अकबराने बांधलेला किल्ला प्रेक्षणीय आहे.

## च) अयोध्या :-

अयोध्या हे हिंदू धर्मियांचे एक पवित्र धार्मिक ठिकाण आहे. येथे लहानमोठी ५०२६ मंदिरे आहेत. येथे भाविकांची सदैव गर्दी असते. रामजन्मभूमी म्हणून हे प्रसिध्द आहे.

## ❑ मध्य प्रदेश :-

## अ) खजुराहो :-

इ.स. ९५० ते १०५० च्या दरम्यान चंदेल राजवंशाच्या काळात शृंगारिक भावना असलेली कामशिल्पे असलेली मंदिरे बांधण्यात आली. लहान मोठी अशी ८५ मंदिरे बांधलेले असून आज २२ मंदिरे व्यवस्थित आहेत. बहुसंख्य मंदिरावर देवता, अप्सरा, नर्तिका यांची रेखीव शिल्पे आहेत. भव्य अशी कांडरिय महादेव व शिवमंदिर तसेच चौसष्ट योगिनी मंदिर, कालिकादेवी मंदिर, जगदंबा मंदिर, चित्रगुप्त, विश्वनाथ, लक्ष्मण, वराह, मातंगेश्वर ही मंदिरे प्रेक्षणीय आहेत. भारतातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हे पर्यटन खाते आहे.

## ब) उज्जैन :-

भोपाळपासून १८० कि.मी. अंतरावर क्षिप्रा नदीकाठी बारा जोतिर्लिंगापैकी एक पवित्र तीर्थस्थान आहे. या शहराच्या मध्यभागी गोपाळ मंदिर आहे. याशिवाय येथे जंतरमंतर व माळव्याच्या सुलतानाचा वाडा आहे.

## ५. बिहार :-

## अ) गया (बुध्द गया) :-

बिहारमधील पाटण्यापासून १७५ कि.मी. अंतरावर गया हिंदूंचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. गयेपासून १५ कि.मी. वर गौतमबुध्दांना साक्षात्कार झालेले 'बोधगया' हे बौध्द धर्मियांचे पवित्रस्थान आहे. येथील महाबोध मंदिर प्रसिध्द आहे. या मंदिरात बुध्दाची भव्य मूर्ती आहे. बोधगयाजवळ बोधीवृक्ष, अशोक स्तंभ, मुलचिंद सरोवर इ. पर्यटन स्थळे आहेत.

## ६. ओरिसा :-

## अ) जगन्नाथपुरी :-

भुवनेश्वरपासून ६० कि.मी. अंतरावर बंगालच्या समुद्रकिनाऱ्यावर जगन्नाथाचे अतिशय भव्य मंदिर आहे. चार धाम यात्रेतील जगन्नाथ मंदिर एक प्रमुख तिर्थस्थान असल्यामुळे येथे लाखो भाविक भेट देत असतात. गंगा राजा छोड गंगादेव याने ११ व्या शतकात या मंदिराची निर्मिती केली. येथे शंकराचार्यांचे मठ आहे.

## ब) कोणार्क :-

पुरी पासून ८५ कि.मी. अंतरावर जगप्रसिध्द कोणार्कचे सुर्यमंदीर आहे. नृसिंह देव लांगुला याने १३ व्या शतकात या मंदिराची निर्मिती केली. रथाचे २४ चाके व ७ घोडे हे सूर्यप्रकाश किरणाचे ७ रंग व सूर्यपरिक्रमाचे २४ तासाचे प्रतिक आहे असे हे मंदिर दर्शवितात. या मंदिरावर खजुराहो प्रमाणे श्रृंगारिक शिल्पे असल्यामुळे भाविक तसेच पर्यटकही दरवर्षी येतात.

## ७. राजस्थान :-

## अ) माऊंट अबू :-

माऊंट अबू हे अरवली पर्वतरांगेतील राजस्थानामधील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिध्द आहे. याचबरोबर येथील दिलवाडा मंदिर जैन धर्मियांचे प्रसिध्द धार्मिक ठिकाण आहे. येथील विमलवसही व लुणावसही मंदिरावर संगमरवरी दगडाचे सुंदर कोरीव काम केले आहे. अतिशय शोभिवंत असलेली मंदिरे भारतीय शिल्पकलेचा सुंदर व वैशिष्ट्यपूर्ण नमुना आहे. या मंदिराची निर्मिती ११ व्या ते १३ व्या शतकादरम्यान झाली.

## ब) राणकपूर :-

उदयपूर पासून १०० कि.मी. अंतरावर असलेले हे एक १५ व्या शतकातील जैन मंदिर आहे. मंदिरावर कोरीव काम नेत्रदीपक असून यात ८४ दालने व १४४० खांब आहेत.

## क) अजमेर :-

हिंदू-मुस्लिम संस्कृतीचा मिलाफ असलेल्या अजमेरचा दर्गा पर्यटकांचे आकर्षण आहे. येथे सुफीसंत खाजा मोईनुद्दीन चिस्ती यांचा भव्य दर्गा अआहे. दरवर्षी येथे एक आठवडा ऊरूस असतो.

## ८. गुजरात :-

## अ) सोमनाथ :-

गुजरातच्या किनारपट्टीवरील पाटण येथे सोमनाथ मंदिर आहे. बारा जोतिर्लिंग मंदीरांपैकी एक मंदिर म्हणून याची ओळख आहे. मध्ययुगीन काळात अनेक मुस्लिम आक्रमणकर्त्यांनी वारंवार आक्रमण करून अनेकवेळा उद्‌वस्थ केले. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला.

## ब) द्वारका :-

श्रीकृष्णाची द्वारका नगरी हे प्राचीन पुण्यक्षेत्र पोरबंदपासून १२४ कि.मी. अंतरावर आहे. येथे द्वारकाधीश मंदिर, रुक्मिणी मंदिर, आद्यशंकराचार्यांनी स्थापलेले शारदापीठ, भ्रदकाली मंदिर आहे. लाखो भाविक येथील मंदिरांना भेट देतात.

**क) गिरनार :-**

जुनागडपासून ५ कि.मी. अंतरावर जैन संप्रदायाचे धार्मिक स्थळ गिरनार मंदीर आहे. सुंदर कोरीव काम केलेली ५ मंदिरे येथे आहेत. गिरनारची चढाई दहा हजार पायऱ्यांची असून दत्त आणि गोरक्ष या दोनशिखरांचा मध्ये जैनांचे बाविसावे तीर्थकार भगवान नेमिनाथ यांचे पवित्र मंदिर आहे.

## २.२.३.२ दक्षिण भारतातील धार्मिक पर्यटन स्थळे

**१. कर्नाटक :-**

**अ) गोकर्ण :-**

कर्नाटक मधील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील कुमटा तालुक्यात 'गोकर्ण' हे पश्चिम किनारपट्टीवर छोटेसे मंदिर आहे. मुख्य मंदिर आणि देवता म्हणजे भगवान शिव, ज्याला महाबळेश्वर म्हणून देखील ओळखले जाते.

**ब) श्रवण बेळगोळ :-**

श्रवण बेळगोळ जैनाचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. येथे इंद्रपुरी टेकडीवर एक अखंड शिलेत कोरलेले १७ मीटर उंच गोमटेश्वराची मूर्ती आहे. चामुंडरायाने हे महाशिल्प निर्माण केले. या मूर्तीपर्यंत जाण्यासाठी ६०० पायऱ्या चढून जावे लागते.

**क) बेलूर :-**

१२ व्या शतकातील होयसळ मंदिर शिल्पकलेचे नाजूक कोरीव कामाचे अत्युत्तम, अप्रतिम नमुने पाहण्यासाठी बेलूर जावे लागते. येथे ४८ खांब असलेले सुंदर असे चेन्ना केशव मंदिर आहे.

**२. आंध्र प्रदेश :-**

**अ) तिरुपती :-**

दक्षिण भारतातील एक मोठे व श्रीमंत तीर्थक्षेत्र म्हणून तिरुपती बालाजी मंदिराची ओळख आहे. तिरूमला पहाडावर श्री बालाजीचे मंदिर आहे. हजारो यात्रेकरू व पर्यटक या मंदिराला दररोज भेट देत असतात.

**ब) श्रीशैलम :-**

श्रीशैलम निसर्गरम्य तीर्थक्षेत्र हैद्राबादच्या दक्षिणेस २२४ कि. मी. वर आहे. बारा जोतिर्लिंगापैकी एक तीर्थक्षेत्र म्हणून ओळखले जाते. छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटक स्वारीच्या वेळेला या मंदिराला भेट दिली होती व एका गोपूराचे निर्माण केले होते.

## ३. तामिळनाडू :–

### अ) रामेश्वर :–

भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील हिंदूचे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. मदुराईपासून १६० कि.मी. अंतरावर पाल्कच्या समुद्रधूनिवरील एका बेटावर वसलेले हे एक धार्मिक स्थळ आहे. श्री रामाशी संबंधित असलेले रामनाथ स्वामी मंदिर हे उत्कृष्ठ शिल्पकलेने तयार झाले आहे.

### ब) मदुराई :–

येथील मिनाक्षी मंदिर फार प्रसिध्द आहे. भारतातील उंच मंदिरामध्ये याची गणना केली जाते. मंदिराला चार प्रवेशद्वार असून रंगीत कोरीव कामाने तयार केलेली आहे.

## ४. महाराष्ट्र :–

### अ) पंढरपूर :–

पंढरपूर हे भीमा नदीच्या काठावर वसलेले वारकरी संप्रदायाचे पवित्र क्षेत्र आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश व मध्य प्रदेश भागातून विठ्ठल–रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येथे येतात. आषाढी–कार्तिकी एकादशीला भाविकांचा मेळा भरतो.

### ब) पैठण :–

औरंगाबाद जवळ गोदावरी नदीकाठी पैठण हे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. संत एकनाथांची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणजे पैठण होय. येथे एकनाथांची समाधी, दत्तमंदीर आहे.

### क) शिर्डी :–

अहमदनगर जिल्ह्यात शिर्डी हे प्रसिध्द धार्मिक क्षेत्र आहे. श्री साईबाबांची समाधी व मंदिर असलेले हे ठिकाण सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे.

### ड) त्र्यंबकेश्वर :–

बारा जोतिर्लिंगापैकी एक आणि गोदावरील नदीचा उगम यासाठी प्रसिध्द असलेले हे स्थान नाशिकपासून ३८ कि.मी. अंतरावर आहे. येथे कुशावर्त तीर्थ, निवृत्तनाथ महाराजांची समाधी, गंगाद्वार, गोरखनाथ गुंफा, ब्रम्हगिरी, गहिनीनाथ समाधी ही येथील प्रेक्षणीय स्थाने आहेत.

### ई) तुळजापूर :–

देवीच्या साडेतीन शक्तीपीठापैकी एक म्हणून तुळजापूरच्या भवानी मातेला ओळखले जाते. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून येथे भाविक मोठ्या प्रमाणात येतात.

**प) कोल्हापूर :-**

साडेतीन शक्तीपीठापैकी एक आणि दक्षिणकाशी म्हणून ओळख असलेले कोल्हापूरमध्ये महालक्ष्मीचे पवित्र धार्मिक स्थळ आहे. सुंदर कोरीव काम असलेल्या मंदिरामध्ये दरवर्षी नवरात्रीला मोठा उत्सव साजरा केला जातो. येथील दसरा महोत्सव म्हैसूरनंतर प्रसिध्द आहे.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-3

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. ............ येथे शिखांचे पवित्र सुवर्णमंदिर आहे.

*अ) अमृतसर* *ब) चंदीगढ* *क) लुधियाना* *ड) अमरनाथ.*

२. सम्राट अशोकाने ............. येथे बुध्दाच्या धर्मचक्र परिवर्तनाचे स्मारक स्तंभ उभारले.

*अ) हरिद्वार* *ब) सारानाथ* *क) बद्रीनाथ* *ड) केदारनाथ.*

३. गंगा व यमुना या दोन नद्यांचा संगम ............ येथे आहे.

*अ) अलाहाबाद* *ब) अमृतसर* *क) वाराणसी* *ड) मथुरा.*

४. ............... जोतिर्लिंग गोदावरी नदी काठी आहे.

*अ) तुळजापूर* *ब) कोल्हापूर* *क) त्र्यंबकेश्वर* *ड) पैठण.*

५. ................ हे साडेतीन शक्तीपीठ म्हणून ओळखले जाते.

*अ) कोल्हापूर* *ब) शिर्डी* *क) पंढरपूर* *ड) मदुराई.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नैसर्गिकरित्या बर्फाचे शिवलिंग कोठे तयार होते?

२. पंढरपूर हे धार्मिक ठिकाण कोणत्या नदी काठी आहे?

३. छ. शिवाजी महाराजांनी कर्नाटकमध्ये कोणत्या जोतिर्लिंगाला भेट दिली?

४. संत एकनाथांची जन्मभूमी म्हणून कोणत्या तीर्थक्षेत्राची ओळख आहे?

५. गौतम बुद्धांना कोणत्या पवित्र स्थानी साक्षात्कार झाला?

## २.३ सारांश

पर्यटन ही अनेक घटकांनी मिळून केलेली सांघिक कृती आहे. ज्यामध्ये मानवनिर्मित घटक व अनेक नैसर्गिक घटकांचा समावेश होतो. भारताला प्राचीन काळापासून धार्मिक, ऐतिहासिक परंपरा लाभलेली आहे. भारताच्या धार्मिक, ऐतिहासिक परंपरेची साक्ष देणारी अनेक वास्तूशिल्पे विविध भागात आढळतात. येथील

ऐतिहासिक वास्तू, किल्ले, स्मारके यांना पर्यटनात महत्त्वाचे स्थान आहे. तसेच भारत देश हा धार्मिक व सांस्कृतिक वारसा जपणारा देश आहे. भारतामध्ये अनेक धर्मांचा उदय आणि विकास झाल्यामुळे येथे धार्मिक वारसा जपणारी अनेक धार्मिक पवित्र ठिकाणांचा उदय विकास झाला. त्यामुळे ही पवित्र ठिकाणे धार्मिक पर्यटन स्थळे म्हणून नावारूपास आली.

भारतामध्ये ऐतिहासिक, धार्मिक पर्यटनस्थळांच्या विकासाबरोबर नैसर्गिक पर्यटनास महत्त्व लाभलेले आहे. संपन्न असा समुद्रकिनारा, समृध्द निसर्ग, मानव निर्मित अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने, भारतीय पर्यटनात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्याचबरोबर विविध प्रकारची सरोवरे, धबधबे हे सुरुवातीपासूनच पर्यटनाचे केंद्रबिंदू आहेत. ब्रिटिशकाळात विकसीत झालेली गिरीस्थाने आज पर्यटकांचे आकर्षणाचा एक भाग बनलेला आहे. भारतातील समृध्द अशा पर्यटन स्थळांमुळे येथे देश विदेशातील पर्यटक भेटी देण्यासाठी येत असतात. या पर्यटन स्थळांच्या विकासामुळे स्थानिकांना रोजगार प्राप्त होऊन येथील आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **गिरीस्थाने :** डोंगरावर वसलेली थंड हवेची ठिकाणे.
- **अभयारण्ये :** वन्यप्राण्यांसाठी राखून ठेवलेले संरक्षित वने.
- **स्तूम :** प्रतिकात्मक स्तंभ.
- **सरोवरे :** नैसर्गिक जलसाठा.
- **जलप्रपात :** नदीवरील पाण्याचा धबधबा.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे

**अ)** १. *अ) जोधपूर.*

२. *क) महाराष्ट्र.*

३. *ब) भोपाळ.*

४. *क) जयपूर.*

५. *अ) राजस्थान.*

**ब)** १. *रांची.*

२. *मुंबई.*

३. *सिंधुदुर्ग.*

४. *पुणे.*

५. *अकबर.*

- **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे**

**अ)** १. *क) सिमला.*

२. *क) कार्बेट.*

३. *ब) चिल्का.*

४. *अ) शिलाँग.*

५. *क) कर्नाटक.*

**ब)** १. *एकशिंगी गेंडा.*

२. *चित्रकूट.*

३. *काश्मिर.*

४. *वाघ.*

५. *काश्मीर.*

- **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे**

**अ)** १. *अ) अमृतसर.*

२. *ब) सारानाथ.*

३. *अ) अलाहाबाद.*

४. *क) त्र्यंबकेश्वर.*

५. *अ) कोल्हापूर.*

**ब)** १. *अमरनाथ.*

२. *भिमा.*

३. *श्रीशैलम.*

४. *पैठण.*

५. *बोधगया.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतातील पर्यटनात ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व विशद करा.

२. भारताच्या पर्यटन विकासात गिरीस्थानांचे महत्त्व सांगा.

३. पर्यटनात सरोवरांचे व जलप्रपातांचे महत्त्व विशद करा.

४. दक्षिण भारतातील धार्मिक पर्यटनस्थळांची माहिती द्या.

५. उत्तर भारतातील धार्मिक पर्यटन स्थळांची माहिती द्या.

## २.७ क्षेत्रीय कार्य

१. भारतातील प्रत्येक राज्यातील ऐतिहासिक वास्तूंची यादी तयार करा.

२. पूर्व व पश्चिम समुद्र किनाऱ्यालगतच्या पर्यटन स्थळांच यादी करा.

३. अभयारण्ये व राष्ट्रीय उद्यानातील वन्य प्राण्यांचा तक्ता करा.

४. आपल्या जिल्ह्यातील धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा अभ्यास करा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **डॉ. नागतोंडे, प्रा. पारधी** : ''पर्यटन भूगोल'', विद्या प्रकाशन नागपूर, २००६.

२. **खतीब के. ए.** : ''पर्यटन भूगोल'', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-२००६.

३. **Wildlife Holiday in India :** Outlook Traveller, New Delhi.

४. **w**ww.wikpedia.org.

५. **Bhatia A.K. :** *'Tourism iin India',* Sterling Publishers, Pvt. Ltd., New Delhi-1978.

६. **घैसास वासंती** : ''प्रवास, तंत्र आणि मंत्र'', राजहंस प्रकाशन, पुणे, १९९४.

७. **पोतदार (डॉ.) मीना, माने (डॉ), सी.यु. (संपा.)** : ''भूगोलशास्त्र'', दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१७.


❀❀❀

घटक–३

# सांस्कृतिक साधने

## ( Cultural Resources )

---

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ भारतीय खाद्य संस्कृती

  ३.२.२ भारतीय लोककला, वस्तुसंग्रहालये आणि कलादालने

  ३.२.३ भारतीय सण आणि उत्सव

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यासानंतर–

१. भारतीय खाद्य संस्कृतीचा इतिहास व खाद्य परंपराविषयक माहिती मिळेल.

२. भारतीय लोककलांची माहिती सांगता येईल.

३. वस्तुसंग्रहालय उदय, विकास व प्रकार याबद्दल माहिती समजून घेता येईल.

४. भारतातील प्रसिध्द प्रमुख कलादालनविषयक माहिती समजावून घेता येईल.

५. भारतातील प्रमुख सण आणि उत्सव याविषयी माहिती मिळेल.

६. भारतात साजरे केले जाणारे सण-उत्सव यांचे महत्त्व सांगता येईल.

## ३.१ प्रस्तावना

अश्मयुग काळापासून मानवी जीवनात 'प्रवास' हा घटक महत्त्वपूर्ण आहे. अज्ञात प्रदेशाचा शोध घेणे, धार्मिकदृष्ट्या पवित्र स्थळांना भेट देणे यासाठी मानव प्राचीन काळापासून प्रवास करत आला आहे. केवळ मनोरंजन, आनंद, प्रवास हा उद्देश न ठेवता मानवी समाज ज्ञान संपादन करण्याच्या उद्देशाने पर्यटन करू लागल्याने पर्यटनांस महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतातील विविधता ही जगातील पर्यटकांना आकर्षत करत असल्याने भारत पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण देश म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळापासून लाभलेल्या विविध धर्म, संस्कृतीचा सांस्कृतिक वारसा महत्त्वपूर्ण मानला जातो. प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतीय खाद्य संस्कृती, भारतातील प्रमुख लोककला, वस्तुसंग्रहालय परंपरा, कलादालने व भारतातील प्रमुख सण-उत्सवाची ऐतिहासिक परंपरा यादृष्टीकोनातून अभ्यास करणार आहोत. सदर अभ्यासाच्या माध्यमातून भारतातील पर्यटनदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटकांची जाणीव व जागृती करून तिचा पर्यटन उद्योगास कसा उपयोग करता येईल, याविषयी माहिती करून घेता येईल.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ भारतीय खाद्य संस्कृती

प्राचीन काळापासून प्रदीर्घ अशा विविध सांस्कृतिक परंपरा लाभल्या असून पारंपारिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून भारतामध्ये वेगवेगळ्या प्रदेशातील संस्कृतीमध्ये विविधता आढळते. भारतामध्ये विविध धर्माचे उगमस्थाने तसेच विविध धर्म, पंथ समूहाचे अनुयायी अनेक वर्षापासून वास्तव्यास आहेत. मानवी समूहामध्ये प्राचीन काळापासून परंपरागत चालत आलेल्या संस्कृतीमध्ये खाद्य, कला, सण, उत्साह यामध्ये विविधता आहे. प्रत्येक देश-प्रदेशाची ओळख तेथील भाषा, वेशभूषा, कला, साहित्य, स्थापत्य अशा वेगवेगळ्या बाबीतून व्यक्त होत असते. त्याचप्रमाणे त्या-त्या देशांत, प्रांतात केले जाणारे खाद्य पदार्थ त्या-त्या प्रांताचे प्रतिक असतात. सामान्यत: कोणत्या सणाला, ऋतूला कोणते पदार्थ केले जातात, लोक कोणता आहार घेतात यासाठी त्या-त्या प्रदेशातील भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक वातावरण व तेथे कोणकोणती पिके अथवा धान्य निर्माण होते. यावरून तेथील सण-उत्सवात, ऋतूत कोणते अन्न पदार्थ केले जातात व कोणते पदार्थ निषिध्द मानले जातात हे ठरविले जाते. काळाच्या ओघात धार्मिक, सामाजिक संदर्भ मिळत जावून एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती होते आणि हीच संस्कृती पुढे त्या-त्या प्रदेशाची खाद्य संस्कृती म्हणून पुढे येते.

#### अ) खाद्यसंस्कृतीचा इतिहास म्हणजे काय?

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात इतिहासाच्या मुख्य प्रवाही असलेल्या विविध विषयांकडे इतिहासकारांचे लक्ष वळलेले दिसते. त्यापैकी एक विषय म्हणजे खाद्यसंस्कृतीचा इतिहास होय. इ.स. १९७० च्या

दशकापासून खाद्यसंस्कृतीकडे सामाजिक/सांस्कृतिक इतिहासाची एक उपशाखा म्हणून न पाहता ती एक स्वतंत्र अशी ज्ञानशाखा म्हणून त्याकडे पाहण्यास सुरूवात झाली. खाद्य संस्कृती इतिहास ज्ञानशाखेस 'हिस्ट्री ऑफ डाएट' (History of Dity), 'हिस्ट्री ऑफ फूड (History of Foud) किंवा 'कुलिनरी हिस्ट्री' (Culanari History) या नावाने ओळखले जाते. मराठी भाषेतील अर्थ पाहता तो 'आहाराचा इतिहास, पाककलेचा इतिहास' असा होतो. पाककलेचा किंवा पाककृतीचा अभ्यास असे या खाद्यसंस्कृती अभ्यासाचे मर्यादित स्वरूप नसून ते 'प्लॅनेट टू प्लेट' म्हणजे अन्न-पिके निर्मातीपासून त्यावरती विविध प्रक्रिया करून, वेगवेगळ्या माध्यमांतून संस्कारित झालेल्या अन्नाचा आस्वाद घेण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा अभ्यास करणे अभिप्रेत असते. मानवाच्या खानपान संबंधित आचार-विचार आणि त्यातून प्रतिबिंबीत होणारा इतिहास म्हणजे खाद्यसंस्कृतीचा इतिहास होय. इ.स. १९४० च्या दशकात खाद्यसंस्कृती इतिहास लेखनाची सुरुवात भारतविद्येचे अभ्यासक डॉ. पी. के. गोडे यांनी भारतात केली. त्यांनी 'सम नोट्स ऑन द हिस्ट्री ऑफ इंडियन डाएट विथ स्पेशल रेफरन्स टू द हिस्ट्री ऑफ जेलेबी' या लेखनातून केली. तसेच भारतीय खाद्यसंस्कृतीवरती प्रकाश टाकण्याचे काम श्री ओम प्रकाश यांचे 'फूड ॲन्ड ड्रिंक इन एन्शंट इंडिया', डॉ. के. टी. अच्यया यांचे 'इंडियन फूड-ए-हिस्टॉरिकल कम्पॅनियन' यांच्या पुस्तकाने काही प्रमाणात केले आहे.

## ब) भारतीय खाद्यसंस्कृतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्राचीन कालखंडातील खाद्यसंस्कृतीचे विश्लेषण आयुर्वेद या ग्रंथामध्ये आढळते. आयुर्वेदातील तत्त्वज्ञानानुसार सात्वीक व चांगले अन्न ग्रहण केल्यास मानवी विचार व कृती देखील चांगली घडून येते. आयुर्वेदामध्ये असेही म्हटले आहे की, ('You are what you eat.') तुम्ही काय खाता यावरून तुम्ही कसे आहात हे समजत. यावरून प्राचीन कालखंडात भारतात आहारास मानवी जीवनात अधिक महत्त्व असल्याचे दिसून येते. आयुर्वेदानुसार भारतीय खाद्यांचे खालील प्रकार आढळतात.

१. **गोड :** गोड अन्न ग्रहण केल्यास मानवी शरीरात ऊर्जा निर्माण होऊन मानवी विचारांना तल्लख बनविण्याचे कार्य त्या माध्यामातून होते. हिंदू धर्म परंपरेनुसार शुभमंगल प्रसंगी गोड अन्न पदार्थ बनविले जातात.

२. **खारट :** आयुर्वेदानुसार खारट चवीचे अन्न हे मानवी शरीरातील पचनक्रियेस मदत करणारे ठरून ते मानवी शरीरातील मज्जासंस्थेला क्रियेला अडथळे निर्माण करणाऱ्या घटकांना नष्ट करते.

३. **तिखट :** मानवाच्या शरीरातील अन्न चयापचयाच्या क्रियेमध्ये मदत करण्याचे कार्य झणझणीत तिखट पदार्थ करीत असल्याचे उल्लेख आयुर्वेद करतो.

४. **कडू :** कडवट चवीचे पदार्थ आयुर्वेदानुसार मानवी शरीरातील रक्त शुध्दी करण्याच्या प्रक्रियेत मदत करतात.

५. **तुरट :** अल्सरसारख्या आजारांना उपाय म्हणून मानवी आहारात तुरट अन्नपदार्थांचा समावेश करण्याविषयी आयुर्वेदात म्हटले आहे.

६. **आंबट :** आंबट चवीचे खाद्यपदार्थ खाल्यास मानवीशरीरातील पचन संस्था व हृदय यांचे कार्य व्यवस्थीतपणे कार्यरत राहण्यास मदत करत असल्याचे उल्लेख आयुर्वेद करते.

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत 'पंचपक्वान्न थाळी' म्हणून ज्या आहाराचा उल्लेख केला जातो, तो आहार म्हणजे 'खारट, तिखट, कडू, तुरट, गोड, आंबट' इ. अन्नपदार्थांचा समावेश करून खाल्ले जाणारे अन्नपदार्थ असत.

हिंदू संस्कृतीत पवित्र मानला जाणारा भगवदगीता या ग्रंथात खाद्याचे तीन भागामध्ये विभागणी केली आहे. त्यामध्ये गुण, दर्जा आणि पावित्र्य यावरून सात्त्विक, राज्जासिक व तम्मस इ. विभाग प्रकार केल्याचे दिसते. या खाद्यांत्र विभागाचे वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१. सात्त्विक खाद्यामध्ये फळे, हिरव्या पालेभाज्या, धान्यापासून तयार होणारे पदार्थ, गोड पदार्थ इत्यादीचा समावेश होतो. सात्त्विक अन्न सेवनातून समृध्दी, आरोग्य, बुद्धीमत्ता व आनंद मिळतो असे विवेचन आहे.

२. राज्जासिका खाद्यामध्ये तिखट, आंबट, तुरट, तेलकट व चविष्ट प्रकारातील पदार्थांचा समावेश केला आहे. राज्जासिका अन्न सेवनातून सक्रियता, कार्यकुशलता निर्माण होण्यास मदत होते.

३. तम्मस खाद्य हे आरोग्यांस हानीकारक व धुंदी निर्माण करणाऱ्या अन्नाचा समावेश होतो.

हिंदू संस्कृतीत साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवामध्ये विशिष्ट खाद्य पदार्थांचा प्रामुख्याने समावेश केला जातो. त्यामध्ये विशिष्ट भौगोलिक, पर्यावरणीयदृष्ट्या उपलब्ध असणारी व तेथील हवामानास समरूप पिकणारी अन्नधान्य पिके ही तेथील लोकांच्या आहाराचा अविभाज्य घटक झालेला आढळतो. भौगोलिक विभागणीमुळे लोकांचा आहारदेखील विभागला गेल्याचे दिसते. तो आहार तेथील लोकांचा प्रमुख आहार म्हणून त्यांच्याकडे आढळतो.

## क) भारतीय खाद्य पदार्थ आणि त्याचे ऐतिहासिक पुरावे :-

भारतीय खाद्यसंस्कृती ही संमिश्र खाद्य संस्कृती असून त्यावरती विविध संस्कृत्यांचा प्रभाव पडलेला आहे. त्यामध्ये इंडो, आर्यन, तिबेटीयन, मंगोलियन, इस्लामिक, चायनिज खाद्य संस्कृतीचा प्रभाव असल्याचे आढळते. सुमारे पाच हजार वर्षांपूर्वी भारतामध्ये आर्य लोक आले ते सिंधु नदीच्या तीरावरती स्थायिक झाले. त्याच्या माध्यमातून सिंधू नदीच्या काठी मिश्र खाद्यसंस्कृती विकसित होण्यास सुरुवात झाली. यातून आर्यपूर्व चालत आलेली खाद्यसंस्कृती आर्य लोकांच्या आगमनामुळे मिश्रीत झाली. भारतामध्ये

विविध कालखंडात विविध राजवटीने आधीराज्य केले. त्यांचा प्रभाव भारतीय खाद्य संस्कृतीवरती पडलेला आढळतो. विविध राजवटीची विशिष्ट खाद्यसंस्कृती भारतीय खाद्यसंस्कृतीवरती परिणाम करणारी ठरत जावून कालपरत्वे भारतीय खाद्य संस्कृती बदलत गेली. भारतीय खाद्य पदार्थांविषयक प्राथमिक ऐतिहासिक पुरावे इ. स. पूर्व ३००० वर्षांपासूनच्या पुरातत्त्वीय साधनातून दिसून येतात. 'जिलेबी' हा मूळ पदार्थ अरेबिन व पर्शियन देशातील असून तो मुघल राज्यकर्त्यांबरोबर भारतात आला. दक्षिण भारतात प्रसिध्द असलेली 'इडली'चे वर्णन तमिळ कवी चावुनदर्य यांनी इ. स. १०२५ मध्ये आपल्या साहित्यात केले. 'डोसा' हा खाद्य पदार्थविषयक माहिती इ.स. ६ व्या शतकांतील संगम साहित्यामध्ये आढळतो. 'ढोकला' हा खाद्य अन्नपदार्थ पश्चिम भारतात प्रसिध्द असून त्याची ऐतिहासिक प्राथमिक नोंद इ. स. १०६६ मधील साहित्यात आढळते.

हिमाचल प्रदेशामध्ये 'सिद्दु' हे प्रमुख खाद्य असून दही व चटणी सोबत ग्रामीण भागात खाल्ला जातो. तेथील लोकांच्या समारंभात प्रमुख खाद्य म्हणून ठेवले जाते. 'चीलरा' हा बार्ली पासून बनवली जाणारा पदार्थ असून हिमाचल प्रदेशांची खासियत आहे. हिमाचल प्रदेशातील लाहूल भागात 'मार्चु' हा पदार्थ बनवला जातो. ग्रामीण भागातील 'पहगली, हलदा' या उत्सवात व लग्न व धार्मिक कार्यक्रमांत मार्चु पदार्थ बनवला जातो.

'किनेमा' हा पदार्थ सोयाबीनपासून बनवला जातो व त्याचे मुळ नेपाळी लोकांच्याकडे आढळते. हा पदार्थ फिरत नेपाळी लोकांच्याकडे येण्यासाठी प्रामुख्याने नेपाळनजीक असणाऱ्या दार्जीलिंग व सिक्कीम भागात राज्यकर्त्यांची राजवट होती व त्यांच्याकडूनच नेपाळी लोकांना मिळालेली देण आहे. भारताच्या ईशान्य भागात संबंधीत लोक पूर्वीपासून स्थायिक असून आर्चु हा पदार्थ त्याच्याकडून बनविला जातो व त्याची ती खास ओळख आहे. त्याचबरोबर हे नेपाळी भारतीयांची खाद्य संस्कृती ओळख म्हणून प्रमुख खाद्य 'सेलरोटी' हा असून विविध सण व उत्सवांत त्यांच्या माध्यमातून बनविला जातो.

गाईला हिंदू लोक 'गोमाता' मानतात. गाईचे दूध व त्यापासून बनविलेले पदार्थ धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या अधिक महत्त्व असून त्यास पवित्र मानले आहे. 'दही'चा उल्लेख वेद व उपनिषदांत केलेला आढळतो. मानवी व्यवहारांतील दही व त्याची बनविण्याची क्रिया याविषयी माहिती आढळते. दही हा पदार्थ हिंदू व बुद्धिस्ट लोकांच्या समारंभातील अविभाज्य घटक होता. 'घेऊ' हा दुधापासून बनवला जाणारा पदार्थ असून बुद्धिस्ट व हिंदू लोकांचा प्रमुख पदार्थ असून धार्मिक सणामध्ये प्रामुख्याने जन्म विधी, लग्नविधी, मृत्युविधी या दरम्यान हा पदार्थ बनवला जातो.

साधारणपणे ३०० ते ७५० इ.स. पूर्व मध्ये 'सोमरस' प्राशन करण्याचा संदर्भ मिळतात, त्यामध्ये प्रामुख्याने आदिवासी लोक त्यांचे सेवन करीत असत. वैदिक कालखंडात 'सोमरसा'चे पूजन केले जात होते. सोमरस हे आयुर्वेदिकदृष्ट्या आरोग्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण होते. 'सोमरस' हा प्रामुख्याने नैसर्गिक वनस्पतीपासून बनवला जात असे.

## ड) भारतीय सण, उत्सव व खाद्य संस्कृती :-

भारतामध्ये अनेक सण-उत्सव वर्षभर साजरे केले जातात. या सण-उत्सवास भौगोलिक, राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. सण अथवा उत्सवामध्ये विविध खाद्य पदार्थ बनवले जातात म्हणून त्यास खाद्य सांस्कृतिकांचा वारसा लाभलेला आढळतो. भारतातील सण-उत्सवानिमित्त केले जाणारे खाद्य पदार्थ खालीलप्रमाणे :- (हे पदार्थ विविध राज्यातील आहेत.)

१) वैशाखी : पिंडी चना, तीळाचे लाडू.

२) छटपूजा : ठेकुआ, तांदळांची खीर, मालपुआ, बालुशाही.

३) ख्रिसमस : बटाटे चीप्स, ख्रिसमस केक, सिमनेल केक, ख्रिसमस मलई.

४) दसरा : मोतीचूर लाडू, शेवयांची खीर, शेंगदाण्यांचा हलवा, चिकन करी, चिकन बिर्याणी.

५) दिवाळी : दुधपाल, केसरकाजू बर्फी, गाजर हलवा, खीर.

६) होळी : केसरभात, चिकन करी, बंगाल गरम दाळ, माल्पुआ, पोळी.

७) इद-उल झुआ : नवाबी बिर्याणी, शाही मटण कुर्मा, चिकन जालफ्रेजी सेवांचा.

८) जन्मअष्टमी : श्रीखंडपुरी, सोनेरी दही, गोपाल काला.

९) करवा चौथ : बटाटा कचोरी, मेथीची फरी, चिंच चटणी.

१०) लोहारी : अट्टा लाडू, खोबरा चिकली, तांदळांचे लाडू, पिनी.

११) सोनम : खा पोंगल, पुली पोंगल, खारे पोंगल.

१२) रक्षाबंधन : खोया बर्फी, खीर, पोळी.

१३) रमजान : नवाबी बिर्याणी, शाही मटण कुर्मा, कडेन्सड दुधाचे कर्ल, हलेम.

१४) संक्रांती : तीळ पापडी, दम आलु, दही चुरा, फोडणीचा भात, विविध प्रकारच्या भाकरी.

उपरोक्त सण-उत्सवांचे निमित्ताने जी खाद्य संस्कृती अस्तित्वात आली आहे, त्यावर भौगोलिक प्रदेशानुरूप वेगळेपणा असलेला आढळतो. प्रत्येक ठिकाणी हेच खाद्य त्या सण अथवा उत्सवानिमित्त मिळेल असे नाही. भारतीय खाद्य संस्कृती ही हिंदू व जैन धर्मियांच्या प्रभावाखाली असून शाकाहारी खाद्य संस्कृती अधिक प्रभावित झालेली आढळते.

## इ) भारतातील राज्ये व खाद्य संस्कृती :-

भारतामध्ये २०१९ नुसार २८ घटकराज्ये व ९ केंद्रशासित भू-प्रदेश असून तेथील हवामान, वातावरण, भौगोलिक जडणघडण, पिके, सण-उत्सव विभिन्न असून संबंधित घटकांचा खाद्य संस्कृतीवर

महत्त्वपूर्ण परिणाम झालेला आढळतो. मानवी आरोग्य व खाद्य परंपरा यांचा संबंध अबाधित ठेवून त्या वातावरणाशी अनुकूल आहार विशिष्ट सण उत्सवात बनवलेला आढळतो. भारतातील काही राज्यांची खाद्य संस्कृती पुढीलप्रमाणे :-

### १. काश्मीरी खाद्य संस्कृती :-

काश्मीर हा थंड वातावरण असलेला भू-प्रदेश आहे. हवामान थंड असल्याने शरीरात उष्णता निर्माण करणारा आहार येथे आढळतो. रोशन जोश, थोगई लांब करी, दम आलु हे काश्मीरी लोकांचे प्रमुख खाद्य आहे. काश्मीर भागात हिंदू-मुस्लीम व बुद्धिष्ट पंथांचे लोक असून सदर भागात मांसाहार केला जातो. काश्मीरी भागातील प्रमुख सण-उत्सवावर संबंधित खाद्यांचा प्रभाव असलेला आढळतो. काश्मीरी पंडीत देखील मांसाहार करतात. परंतु त्यामध्ये कांदा व लसूण घातलेला नसतो. 'काश्मीरी पुलाव' ही काश्मीरमधील शाकाहारी लोकांचे प्रमुख खाद्य असून मोठ्या प्रमाणात खाल्ल्या जात.

### २. पंजाबी खाद्य संस्कृती :-

पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात शिख व मुस्लीम धर्मिय लोक आढळतात. पंजाब भागात प्रसिध्द असलेली खाद्य संस्कृती म्हणजे बटर चिकन, सरसो का साग, मक्क्यांची भाकरी, छोले बटोरे, लस्सी व तंदुरी रोटी इ. होय. पंजाबमध्ये गहू, तांदूळ व दुधांचे पदार्थ मोठ्या प्रमाणात उत्पादित होतात. येथील उपलब्ध खाद्यान्नामुळे विशिष्ट खाद्य संस्कृती अस्तित्वात आलेली आढळते. पंजाब भागातील लोकांचे स्थलांतर (विविध कारणाने) विविध देशांत झालेले असून देशांतील विविध भागात त्यांनी स्वत:ची पंजाबी खाद्य संस्कृती सोबत नेलेली आढळते. आज संबंध भारतामध्ये 'पंजाबी थाळी' त्याची प्रसिद्ध आहे. त्यांच्या खाद्य आहाराचे वैशिष्ट्य म्हणजे बटर, दुग्धजन्य पदार्थ, लस्सी याचा अधिक प्रमाणात वापर, त्याचसमवेत शाकाहारी आहारास मांसाहारापेक्षा अधिक प्राधान्य असलेले आढळते.

### ३. राजस्थानी खाद्य संस्कृती :-

राजस्थान हे राज्य राजवाड्यांचे शहर म्हणून ओळखले जाते. राजस्थानमध्ये विविध राजपुत राजवटी अस्तित्वात होत्या. त्याच्या आहारासाठी वेगळ्या व स्वतंत्र स्वयंपाकगृहांची व्यवस्था प्रत्येक राजवाड्यावर असलेली पाहावयास मिळते. तत्कालीन खाद्य संस्कृती परंपरांगतरित्या पुढे वारसा स्वरूपात मात्र कालपरत्वे बदल होऊन वैशिष्ट्यपूर्ण खाद्य संस्कृती रुढ झालेली आढळते. दाल चुर्मा, घट्ट खिचडी, मेवा कचोरी, मिरची वडा, बेकरीमध्ये आढळणारे विविध बिकानेरी पदार्थ प्रसिदध आहेत. आज भारतामध्ये आढळणारे विविध स्नॅक सेंटर राजस्थानी खाद्य संस्कृतीचा प्रसार व स्वत:ची ओळख निर्माण केलेली आढळते, त्यामध्ये मेवा कचोरी-जोधपुर, मालपुवा-पुष्कर, रसगुल्ले-बिकानेर, पणिया आणि घेरीया-मेवार हे प्रसिद्ध खाद्य पदार्थ आहेत. बहुतांशी राजस्थानी लोक शाकाहारी असून गोड पदार्थाचे सेवन अधिक प्रमाणात करतात. राजस्थानी लोकांच्या आहारांत बाजरीची भाकरी विशेषत: आढळते.

## ४. महाराष्ट्रांची खाद्य संस्कृती :-

महाराष्ट्रांची भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक वातावरण, भौगोलिक परिस्थितीनुरूप आढळणारे पीके व विविध सण-उत्सव यानुरूप महाराष्ट्रांची खाद्य संस्कृती नावारूपाला आलेली आढळते. कोकण किनारपट्टीच्या भागांत मासेमारी अधिक प्रमाणात चालत असल्याने येथील आहारांत मासे व भात यांचा समावेश आढळतो. महाराष्ट्रात शाकाहारी व मांसाहारी याना प्राधान्य असलेले आढळते. आहारात ज्वारी, बाजरी, गहू, नाचणी व तृणधान्ये, मांसाहारामध्ये विशेषत: कोंबडी, बकरे यांच्या मांसाला अधिक मागणी आढळते.

महाराष्ट्रांची खाद्य संस्कृती मांसाहारासोबत शाकाहारी आहारास देखील प्राधान्य देते. आहारात मोठ्या प्रमाणात तृणधान्ये, दूध, दुग्धजन्य पदार्थ यांचा प्रामुख्याने समावेश असलेला आढळतो. महाराष्ट्रास स्थानिक पातळीवर पालेभाज्या मोठ्या प्रमाणात व तसेच घराशेजारील परसबागेत घरांसाठी पालेभाज्या पिकवण्यांची परंपरा अतिशय जुनी असलेली आढळते व आजही ती जपली जाते. महाराष्ट्रांमध्ये पालेभाज्यांचा वापर करून बनवला जाणारा 'गरगट्टा' विशेष प्रसिध्द असलेला आढळतो.

महाराष्ट्रांच्या खाद्य संस्कृतीमध्ये प्रत्येक जिल्ह्यांची विशिष्ट खाद्य आहारात्मक ओळख असलेली आढळते. उदा. कोल्हापूरची मिसळ व तांबडा पांढरा रस्सा हा जगप्रसिध्द आहे. सोलापूर जिल्ह्यांतील आहारामध्ये वापरण्यात येणारे काळे तिखट, लसुण, शेंगदाणा चटणी, सोलापूर पद्धतीचा भाकरी आणि ठेचा प्रसिध्द आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये हापूस आंबा अधिक उत्पादित होत असल्याने येथील आहारांत पोळी आणि आमरस, मासे व भात आढळतो. सांगली भागात आढळणारी अख्खा मसूर ही प्रसिद्ध आहे. सिंधुदुर्ग, रायगड व इतर किनारपट्टीवरील जिल्ह्यामध्ये मासे व वडा-कोंबडा प्रसिध्द आहे. विदर्भ भागांतील आहारांत प्रामुख्याने मांडे, आमरस, तिखटजन्य पदार्थांचा समावेश होतो. कानवले, दातरं, वाफेवरचे वडे, खाऱ्या, थाळीपीठ, सांजा, कणकेचा शिरा, उकडपेडी, भाकरी यांचा समावेश होतो.

## ५. गोवा खाद्य संस्कृती :-

गोवा हे राज्य पश्चिम किनारपट्टीवर असून या भागावर पोर्तुगीजांची राजवट दीर्घ काळ होती. परिणामी येथील भागांत मोठ्या प्रमाणात ख्रिश्चन लोकांचे वास्तव्य आढळते. ख्रिश्चन धर्मीयांचा प्रमुख आहार मांसाहार असलेला आढळतो. समुद्र किनारपट्टीचे सानिध्य असल्याने मासे, खेकडे यांचा आहारात समावेश अधिक प्रमाणांत असतो. गोव्याच्या खाद्य आहारामध्ये गोवा फिश करी, गोवा प्रॉज करी, पोर्क विन्दालु, चिकन शक्ती यांचा समावेश होतो. आहारामध्ये मध्यपान करण्याची प्रथा पूर्वीपासून चालत आलेली आहे. मांसाहाराबरोबर शाकाहारी आहारदेखील गोवा खाद्य संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. आहारामध्ये कोवळ्या नारळाचे दूध, हिरवी मिरची व तेलकटपणा हे येथील प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

## ६. आंध्रप्रदेशांची खाद्य संस्कृती :-

आंध्र प्रदेश राज्याला समुद्रकिनारपट्टी लाभलेली असल्याने लोकांच्या आहारामध्ये मासे आणि

तांदूळ यापासून बनवलेले पदार्थ प्रमुख आहेत. आंध्रप्रदेशमधील जेवणावळीची विशेष पध्दत असून केळीच्या पानावर आहार वाढला जातो. भात व दही, ताक हे प्रमुख आहार असून येथील जेवण याशिवाय पूर्ण होत नाही.

मुस्लीम लोकांचा प्रमुख आहार मांसाहार असून येथील लोकांची प्रमुख खाद्य संस्कृती म्हणून परंपरागतरित्या नावारूपाला आलेले आढळते 'हैद्राबादी दम बिर्याणी' हे हैद्राबादी लोकांचे प्रमुख खाद्य असून भारतांच्या कानाकोपऱ्यांत ती पोहचलेली आहे. आंध्रा चिकन करी बिर्याणी, 'कर्ड राईस, मेदू वडा' चा समावेश होतो. येथील आहारांचे वैशिष्ट्य म्हणजे अधिक तेलकट व अधिक तिखट होय. आंध्रप्रदेश भागात लाल मिरचीची लागवड अधिक मोठ्या प्रमाणात होते.

## ७. बंगाली खाद्य संस्कृती :-

पश्चिम बंगाल हा नद्यांच्या प्रवाहानेयुक्त व बंगालचा उपसागराची किनारपट्टी यामुळे मासे हे येथील लोकांच्या आहारामधील प्रमुख घटक असलेला आढळतो. बंगाली लोक खाण्याचे शौकीन असून माश्यांचे विविध प्रकार बनवितात. प्रामुख्याने पर्च, मलेट, क्रॅब, क्रॅप प्रॉन, क्रेफिश, लॉबस्टर हे प्रमुख मासे त्याच्या आहारांत समाविष्ट आहेत. पश्चिम बंगालमधील प्रमुख खाद्य संस्कृती म्हणजे भाज्या आलु, दोईमाच, बैंगन भजी, संदेश इ. होय.

## ८. केरळ खाद्य संस्कृती :-

केरळ राज्य प्रगत व साक्षर असून हिंदू बरोबर ख्रिश्चन व मुस्लिम लोकसंख्या जास्त आहे. लोकाचें प्रमुख खाद्य 'भात' असून समवेत 'रसम' व केळीच्या पानावर जेवणांची पारंपारिक प्रथा आहे. अप्पम, कल्लप्पम, पट्टु, कडला करी, इडियपान, पत्तीरी, माप ही येथील पारंपारिक खाद्य संस्कृती आहे. केरळ भागात मासेमारी अधिक होते. परिणामी येथील खाद्य संस्कृतीवर मासे व त्यापासून बनवले जाणारे विविध पदार्थ यांचा समावेश होतो. मांसाहारामध्ये पारंपारिकपणे चिकन करी, चिकन फ्राय, मासे/चिकन/मटण मौली, मीनकरी, मच्छी फ्राय, झींगा फ्राय, बीफ इ.चा खाद्य संस्कृतीत समावेश असलेला आढळतो. पारंपारिक आहार संस्कृतीमध्ये 'सद्या' 'सद्या पायसम' पायसम द्वारा विविध पदार्थ हे येथील प्रमुख वैशिष्ट्य आहे.

## ९. गुजरात खाद्य संस्कृती :-

गुजरात भागात हिंदू, मुस्लिम, जैन, बौध्द इ. विविध पंथीय लोक वास्तव्यास आहेत. पारंपारिकपणे अहिंसात्मक तत्वावर आधारित असलेल्या जैन व बौध्द धर्मियांचा प्रभाव येथील खाद्य संस्कृतीवर पडलेला आहे. त्यामुळे येथील शाकाहारी जपणारी खाद्य संस्कृती प्रमुख आहे. इतर धर्मीयांच्या माध्यमातून शाकाहार व मांसाहार खाद्य संस्कृती जपली गेली आहे. गुजरातमधील प्रमुख खाद्य संस्कृती म्हणजे पुरण पोळी, बाजरीची भाकरी, ढोकला, हांडवी, खांडवी, फाफडा, जेलेबी, खाखरा, गुजराती जत्रा, लसुण चटणी,

अंदीयु, मेथीचा थेपला, बेसण चिला इ. होय. गुजराती आहाराला ऐतिहासिक वारसा असून त्यांच्या माध्यमातून जपली गेली असून संबंध भारतात ती प्रसारित झालेली आहे.

### १०. बिहार खाद्य संस्कृती :–

बिहारी खाद्य संस्कृतीचा प्रभाव तेथील आजूबाजूच्या राज्यांवर, शेजारील देशांवर देखील पडलेली आहे. झारखंड, पूर्व उत्तरप्रदेश, बांग्लादेश, नेपाळ या भागावर कामाच्या निमित्ताने बिहारी लोकांच्या स्थलांतरामुळे प्रभाव पडलेला आढळतो. बिहारी खाद्य संस्कृतीवर हिंदु व बौध्द धर्माचा प्रभाव असून शाकाहार हा प्रमुख आहे. 'झाल मुरी', 'खिचडी', 'चोखा', 'बैंगन चोखा', 'धनिया चटणी सत्तु' ही बिहारच्या खाद्य संस्कृतीचे प्रमुख आकर्षण आहे. गोड पदार्थ म्हणून बिहार राज्यांतील 'मोतीचूर लाडू' संबंध भारतात प्रसिध्द आहे. मांसाहारामध्ये 'बिहारी कबाब' हे प्रसिद्ध असून शाकाहारामध्ये 'सोलीना', 'ग्राम आटा', 'सेत्तु रोटी' ही पूर्वापाररित्या प्रसिद्ध होतो. बिहारी खाद्य संस्कृतीमध्ये दुग्धजन्य पदार्थांचा समावेश मोठ्या प्रमाणात होतो.

### ११. ओडिशा खाद्य संस्कृती :–

ओडिशा खाद्य संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आहारांत तेलकट व तिखटांचे कमी प्रमाण हे होय. तांदूळ हे प्रमुख खाद्य आहे. ओडीशामध्ये पाखाला, पलाऊ, सागा, दही बैंगन, खाट्टा दाल्मा, संताळू, छानू राई, पसारा' ही प्रमुख खाद्य पदार्थ आहेत. ओडीशा भाग थंड भू–प्रदेश असून मांसाहार व मत्स्यपदार्थ यांचा देखील येथील खाद्य संस्कृतीवर अधिक प्रभाव आहे. उडीया फिश करी, उडीया थाळी भारतभर प्रसिध्द आहे.

### १२. तामिळनाडू खाद्य संस्कृती :–

तामिळनाडू हा समुद्र किनारपटटीवर असणारे राज्य असून येथील लोकांचे प्रमुख खाद्य मासे आहे. पारंपारिकपणे भात व मासे यापासून तयार होणारे विविध पदार्थ ही त्याची आहारात्मक ओळख आहे. तामिळनाडू भागांमध्ये कुज्हम्बू, साभार, परूप्पू, रसम, धायिर, कैदयाल्यास, पारसम, खीर, उशाप्पम, पोरीयल, पपदुम, ताजी यायिर पचिदी त्याचबरोबर मांसाहारामधील कुठवास्टू कुज्एम्बु, चेट्टीनाद काली मिर्च चिकन व तळलेली मासे ही खास स्थानिक खाद्य संस्कृती आहे.

### १३. कर्नाटक खाद्य संस्कृती :–

कर्नाटकमध्ये शाकाहारी व मांसाहारी जेवण प्रसिध्द आहे. विशेषत: उडुपी, मालनाडू आणि मंगलोरी प्रकारचे जेवण. दक्षिण कर्नाटकमध्ये रागी व भात आहारात प्रमुख आहे. किनारी भागात मासे व भात आहारात प्रमुख आहे. आहारामध्ये दही मोठ्या प्रमाणात खाल्ले जाते. नीर डोसा, कोरी गस्सी, कुंडापुरा कोलीसारू, म्हैसूर डोसा, आलु गेड्डा, म्हैसूर पाक, कुर्ग पांडी करी, बीसी वेलेबाथ, रावा केसरी, उडुपी

सांभर, सागू, चिरोती, चित्राना, मद्दूर वा, चित्राना, इडली हे प्रमुख आणि विशेष खाद्य पदार्थ कर्नाटकी खाद्य संस्कृतीची ओळख आहे.

प्राचीन कालखंडापासून भारतास खाद्य संस्कृतीची विशिष्ट अशी परंपरा लाभली आहे. भारतीय संस्कृतीच्या खाद्यान्नामध्ये समाविष्ठ झालेले विविध खाद्य पदार्थ हे भारतीय खाद्य संस्कृती ही कशाप्रकारे समीश्र बनत गेली हे दिसून येते. खाद्य संस्कृतीमध्ये भौगोलिक स्थानपरत्वे व हवामान यांचा प्रभाव व त्यानुसार तेथील भागात विशिष्ट आहार अस्तित्वात घेऊन त्या ठिकाणी त्याची स्वतंत्र ओळख जपली गेली आहे. त्याचबरोबर विविध सण-उत्सव केंद्र बिंदू मानून विशिष्ट आहार संस्कृती अस्तित्वात येऊन टिकून राहिलेली आढळते.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

### अ) खालील रिकाम्या जागी अचूक पर्याय निवडून पुन्हा लिहा.

१. प्राचीन कालखंडात खाद्यसंस्कृतीचे वर्णन ........... या ग्रंथात आढळते.
*अ) आयुर्वेद* *ब) यजुर्वेद* *क) सामवेद* *ड) ऋग्वेद.*

२. इ.स. १९४० भारतीय खाद्य संस्कृती इतिहास लेखनाची सुरुवात .............. यांनी केली.
*अ) डॉ. गोडे* *ब) डॉ. सायमन* *क) के.टी.आचार्य* *ड) अनुऋषी.*

३. मानवी शरीर आरोग्य .............. या तीन घटकामुळे संतुलीत असते.
*अ) गोड, खारट, तिखट* *ब) कडु, तिखट, आंबट*
*क) सात्त्विक, रज्जस्सीक, तमस* *ड) वात, पित्त, कप.*

४. जिलेबी हा पदार्थ .............. देशातील आहे.
*अ) अरेबिन* *ब) इराक* *क) इराण* *ड) अमेरिका.*

५. पिंडी चणा व तीळाचे लाडू हा प्रमुख पदार्थ ............... सणास केला जातो.
*अ) दसरा* *ब) दिवाळी* *क) ईद* *ड) बैसाखी.*

### ब) खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा.

१. भगवतगीता या ग्रंथांत खाद्यान्नाचे कोणते तीन प्रमुख प्रकार सांगितले आहेत?

२. भारतीय खाद्य संस्कृती कोणत्या स्वरूपाची आहे?

३. 'खाडी' हा खाद्य पदार्थ कोणत्या घटकापासून बनविला जातो?

४. रवा पौगल हा खाद्य पदार्थ कोणत्या सणानिमित्त बनविला जातो?

५. कोल्हापूरातील कोणता खाद्य पदार्थ प्रसिध्द आहे?

## ३.२.२ भारतीय लोककला, वस्तुसंग्रहालये आणि कलादालने

### अ) भारतीय लोककला :-

'लोकांची कला ती लोककला' अशी लोककलेची व्याख्या केली जाते. प्राचीन काळापासून भारतामध्ये समृध्द अशी लोककलांची परंपरा लाभली आहे. लोककला शब्द विविध अर्थाने वापरला जातो. नृत्य, नाट्य, गायन, वादन, विणकाम, भरतकाम, चित्र, शिल्प इ. स्वरूपातील लोकसमूह अविष्कारास लोककला हा शब्द वापरतात. तसेच बोहाडा, तमाशा, भारूडे, नौटंकी, रामलिला, खम, दंडार, दशावतरी खेळ याचबरोबर पारंपारिक लोकसंस्कृतीचे उपासक गोंधळी, वाघे, नंदिबैलवाले, पोतराज, भूल्ये, वासुदेव, चित्रकथी पांगुळ, बहुरूपे इ. यांचे कलाविष्कार यांच्यासाठी ही लोककला शब्द प्रचलित आहे. कोल्हाटी, दरवेशी, माकडवाले, गारूडी इत्यादी पारंपारिक खेळकऱ्यांची कला तसेच लोकसमूहात परंपरागत असलेली लोकगीते, लोककथा इ. विविध पारंपारिक कलांसाठी 'लोककला' हा समूह शब्द प्रयोग वापरला जातो. लोककलांच्या आविष्कारात परंपरागत लोकजीवन प्रवाह, लोकवर्तन व लोकधारण इ. बाबीचा अंतरिक सहसंबंध असतो. लोककला ही मानवी भावभावना, संस्कृती, मनोधैर्य व जाणीव इ. बाबींनी बांधल्या जावून त्या लोकसंस्कृतीचा एक अविभाज्य अंग बनत जाते. सदर घटकात सामूहिक परंपरागत लोककलांचा आढावा घेणार आहोत.

### ❑ संगीतकलेची पार्श्वभूमी :-

भारतीय संस्कृती व संगीताचा संबंध वैदिक युगातील विविध वेदाना मानला जातो. वेदांचे मूळ हे ओम असून अ उ आणि म (अ-ब्रम्हा, उ-विष्णू, म-महेश) या तीन ईश्वरीय शक्तीचे द्योतक मानले जाते. संगीतातील सप्तस्वर हे ओम्कारातूनच निघतात. ''वेदांना.साम वेदास्मि'' अर्थात सामवेद हे ओंकाराचे स्वरूप असून यालाच संगीत कलेचा पंचम वेद अथवा गंधर्व वेद म्हणून मानले जाते. संगीत कलेतील तीन अंगापैकी गायन हे प्रधान अंग असून नृत्य हा देखील एक स्वतंत्र असा आविष्कार असतो. परंतु गायन व नृत्य प्रकारांना आवश्यक असते तिसरे अंग म्हणजे वाद्यसंगीत होय. गायन, वादन आणि नृत्य इ. गोष्टी मिळून संगीत बनते.

#### प्राचीन काळ :-

प्राचीन ऋग्वेदातून संगीत हे उदित होवून सामवेदात विकसित व बाहारात गेलेले संगीत सामवेदाचा उपग्रंथ 'गंधर्ववेद' यामध्ये सप्तसुरांनीयुक्त पूर्ण दशेस प्राप्त झाले. विशेषत: गायन-वादन यासाठी मार्गदर्शक ग्रंथ म्हणून गंधर्व वेदास ओळखले जात असे. वेदातील परिशिष्टांना 'गाथा' असे म्हटले जात. गाथामध्ये संगीत कलेविषयी श्लोकांना 'गाथिका' या नावांनी संबोधले जात. यज्ञ विधी कार्यक्रमावेळी चातुर्वर्णिय समाजाच्या करमणुकीसाठी गायन, वादन, नृत्य, नाट्य इ. व्यक्तीगत तसेच सामूहिक संगीतविषयक कार्यक्रम केले जात. गांधर्व वेद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेदामध्ये सोळा हजार इतकी संगीतविषयक राग-रागिण्या

यांची व्युत्पत्ती दिली आहे. उपनिषद काळात संगीतविषयक साम गायनाचा उल्लेख आढळतो. या काळात संगीतास ब्रह्मानंद असे म्हटले जाऊ लागले. जाबालोपनिषदात विभिन्न संगीत स्वरांच्या नावाचा संबंध विविध देव-देवतांशी केला आहे. तैत्तिरीयोपनिषदामध्ये नाद, स्वर व त्यांचा उपयोग यासंबंधी उल्लेख आढळतो.

विविध पौराणिक वाङ्मयामध्ये संगीत कलातील सप्त स्वर, ग्राम, राग, तीन स्थान (मंद्र-मध्य-तार), मूर्च्छना, नृत्य, नाट्य आणि विभिन्न वाद्यांचे वर्णन केले आहे. महर्षि वाल्मिक लिखित रामायण या महाकाव्यात संगीत कलातील विविध वाद्ये, लय, ताल, मात्रा, सम तसेच संगीतमय दुण्यांचे वर्णनाबरोबरच मूर्च्छता, राग इ. बाबीचे उल्लेख येतात. महाभारतामध्ये 'साम' व 'गाथा' या गायन प्रकारांचा उल्लेख येतो. 'गाथा' या गायन प्रकारात पौराणिक आख्यायिका, वीर पुरुषांची साहस कृत्ये, राजे रजवाडे लोकांची स्तुतीपर आधारित प्रदीर्घ कथा-काव्य इ.चा समावेश होतो. तर ऋषीमुनी यांच्या आश्रमात सदैव साम व वेदमंत्रविषयक गोष्टींचा समावेश असे.

गुप्त आणि वाकाटक राजघराण्याचे राज्यकर्ते हे संगीतप्रेमी असल्याचे दिसून येते. समुद्रगुप्त यांच्या कार्यकाळात वीणा वादक छाया/टाक असलेली नाणी निर्माण केली गेली. गुप्त कालखंडात संगीत कलाविषयक विविध ग्रंथांची संस्कृत भाषेत निर्मिती झाली. त्यामध्ये महाकवी कालिदास, शुद्रक, भर्तुहरी, दंडी, भवभूती, बाणभट्ट, श्री हर्ष त्यांनी आपल्या ग्रंथात संगीत कलाविषयक उल्लेख केलेचे आढळते.

### ❀ मध्ययुगीन काळ :-

इ.स. १३ व्या शतकानंतर पर्शियन संगीतचा भारतीय संगीताशी संयोग होऊन एक नवीन संगीत कला प्रचलित झाली. या नवीन संगीत कला पध्दतीस 'उत्तर हिंदुस्थानी संगीत पध्दती' यानावाने संबोधले जाते. विकसित झालेली ही संगीत कला पध्दती म्हणजे 'ख्यालाची बहुढंगी गायकी' होय. अमीर खुस्रो यांनी वेगवेगळ्या गायन प्रकारातील आकर्षणाचे एकीकरण करून संगीत कलेत क्रांती घडवून आणली. 'पखवाज' या संगीत वाद्यातून त्यांनी 'तबला' व 'डग्गा' या संगीत वाद्यांची निर्मितीबरोबरच 'बीण' या संगीत वाद्यातील एक तुंबी कमी करून 'सतार' या तंतू संगीत वाद्यांची निर्मिती केली. पंडित शारंगदेव यांनी संगीत कलेवरती 'संगीत रत्नाकर' या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथास उत्तर भारत व दक्षिण भारत संगीत पध्दतीचा आधार ग्रंथ म्हणून ओळखले जाते.

सम्राट अकबर संगीतकला प्रेमी, आपल्या दरबारामध्ये अनेक संगीत तज्ञ आणि विद्वानांना राजाश्रय दिला. 'आईने अकबरी' या ग्रंथामध्ये सम्राट अकबर यांच्या दरबारात सुमारे ३६ संगीत तज्ञ असल्याचे उल्लेख येतात. सम्राट अकबरच्या कालखंडात भारतामध्ये संगीत घराणे परंपरा सुरू झाली. सम्राट अकबरा यांच्या समकालीन ग्वाल्हेर राजघराण्यातील राजा मानसिंह तोमर यांच्या कार्यकालापासून 'ग्वाल्हेर संगीत घराणे सुरू झाले.

मध्ययुगीन काळात भारतात भक्तीसंप्रदायाच्या माध्यमातून भक्तीसंगीत कला प्रकाराचा विकास झाला. यामध्ये सूरदास, संत कबीर, तुलसीदास, मीराबाई, तुकाराम, नामदेव इ. संत कवीच्या माध्यमातून संगीत कलेचा प्रचार आणि प्रसार झाला. मध्ययुग काळात 'टप्पा', 'त्रिवट', 'तराना', 'ठुमरी', 'कव्वाली' इ. संगीत प्रकारांना प्रारंभ झाला. मुघल साम्राज्याच्या अस्तानंतर ब्रिटिश शासन काळात संगीत कलेस मिळोलला राजाश्रय समाप्त झाला. त्यामुळे संगीत कलाकार, गायक, वादक हे संस्थानिकांच्या आश्रयास आले. यातूनच संस्थानिक घराणी संगीत कला उदयास आली. यामध्ये ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर, किराणा, पतियाळा, भेंडीबाजार, मेवाती इ. संगीत घराणी पध्दती उगम पावली.

## ❁ आधुनिक काळ :-

आधुनिक काळापासून भारतीय संगीत कलाविषयक अनेक ग्रंथांचे लेखन झाले. त्यामध्ये प्रामुख्याने मुहम्मद रजाकृत- नगमाते आसफी, प्रतापसिंह कृत - संगीतसार, सौरीन्द्र मोहन टागोर कृत- 'युनिवर्सल हिस्ट्री ऑफ म्युसिक', कंठ कौमुदी व संगीतसार, कृष्ण धवल बॅनर्जी कृत-गीत सुत्रधार इ. प्रमुख कृतीचा समावेश होतो. इ.स. १८०० ते १८५० या कालखंड त्यागराज, मुत्तुस्वामी दीक्षितार, श्याम शास्त्री यांनी संगीतविषयक अनेक संगीत रचनांची निर्मिती केली. वरींद्रनाथ टागोर यांनी विशिष्ट अशी 'रवींद्र संगीत' नावाची नाविण्यपूर्ण संगीतप्रणाली करून तिचा प्रचार केला. यातून पुढील काळात भारतात संगीत कला विद्यालय स्थापनेस सुरूवात झाली. लाहोर येथे ५ मे १९०१ रोजी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांनी 'गांधर्व संगीत महाविद्यालय स्थापन केले. पंडित भातखंडे यांच्या पुढाकाराने भारतातील विविध भागात अखिल भारतीय संगीत सम्मेलनाचे आयोजन करण्यास सुरूवात झाली. इ.स. १९१६ साली बडोदा येथे पहिले अखिल भारतीय संगीत संमेलन भरवण्यात आले. यानंतर इ.स. १९१८ साली दिल्ली येथे दुसरे, इ.स. १९१९ साली बनारस येथे इ.स. १९२५ मध्ये लखनौ येथे अखिल भारतीय संगीत संमेलन भरवून भारतीय संगीत कलेचे जतन, संवर्धन करून तिचा प्रचार आणि प्रसार घडवून आणला.

## ❁ लोकसंगीत :-

लोकांचे संगीत ते लोकसंगीत अशी लोकसंगीताची साधारण व्याख्या केली जाते. आपल्या आवडीनुसार, मनोरंजनासाठी लोकांनी स्वत: तयार केलेले व स्वत:च्या प्रदेशात प्रयुक्त केलेली 'देशी संगीत' म्हणून ही लोकसंगीताची व्याख्या केली जाते. आदिम, लोक, भक्ती कला आणि जनप्रियता या पाच प्रकारातील संगीत कोटीमधील लोकसंगीत ही एक कोटी आहे. लोकसंगीत प्रकारामुळे भारतीय संगीताच्या संपन्नत,विविधतेत आणि आकर्षणात अमाप अशी भर पडत गेली आहे.

लोकसंगीत प्रकारात गीत-संगीताच्या प्रभावाबरोबरच त्याच्या साथीस पारंपारिक वाद्ये आणि लय वाद्यांचा वापर अधिक प्रमाणात असतो. 'सामूहिकपणा' मौखिक परंपरेने पिढ्यान-पिढ्या चालत आलेल्या सामूहिक प्रकाराच्या लोकसंगीतातून वैयक्तिक भावभावना, सुखदु:खे यांच्याबरोबर सामूहिक इच्छा, आकांक्षा, भक्ती, आनंद, राष्ट्रीयता व पारंपारिकता याबाबीकडे लोकसंगीतात विशेष भर दिला जातो.

लोकसंगीतात संमिश्र स्वरूपाच्या प्रेरणा असतात. या प्रेरणा करमणूक, प्रबोधन, विशिष्ट हालचालीस मदत, कलाविष्कार, सामाजिक गोष्टीविषयक असतात.

भारतातील विविध राज्यातील प्रचलित लोकसंगीत नांवे पुढीलप्रमाणे :- पश्चिम बंगाल राज्यात- बाऊल, काश्मीर-वातावण, मध्यप्रदेश-पाई, अल्हा, राजस्थान-पानीहारी, गुजरात-दांडिया, मणिपूर-खोंगजोत पाखा, बिहार-सोहर, आसाम-तिकीट, अरुणाचल प्रदेश-ज-लीन-जा, न्याई ओंग, महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने लावणी, भारूड, ओवी, जागरण गोंधळ, भोडल्याची गाणी, वासुदेवाची गाणी, शेतातील पिक लावणी, पेरणी करतानाची गाणी, कोकणी गीत, दिवाळीची गाणी, लग्नाची गाणी, कोजागिरीची गाणी, पावसाची गाणी, गवळण, जात्यावरची गाणी, पोतराजाची गाणी, भलरी गीत, आदिवासी गीते, पोवाडे, मोटेवरची गाणी इ. प्रकाराच्या पारंपारिक गीत संगीताचा समावेश लोकसंगीत प्रकारात होतो.

## ❀ नृत्य कला :-

भारतीय नृत्यकला ही भारतीय संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. भारत जसा विविधतेने नटलेला आहे, तसाच वैशिष्ट्यपूर्ण लोकनृत्य परंपरांनी नटलेला आहे. भारतातील प्रादेशिक विविधतेनुसार अनेक प्रकारच्या लोकनृत्य परंपरा रुजत गेल्या. दक्षिण भारतीय संस्कृतीत भगवान शंकर व उत्तर भारतीय संस्कृतीत भगवान श्रीकृष्ण यांना सर्वश्रेष्ठ नर्तक व नृत्याची आराध्य दैवते मानली जातात. 'नटराज' शंकरास तर 'नटवर' म्हणून श्रीकृष्ण यांना संबोधले जाते. भरतमुनीच्या नाट्यशास्त्र ग्रंथामध्ये नृत्यकलेविषयी आख्यायिका आली आहे. भरतमुनीच्या 'तांडव नृत्य' (नृद्य नाट्य) व 'लास्य' (अभिनयर्तन) यांचा विविध प्रांतात विकास होऊन नृत्य कलेविषयाच्या विविध नृत्यप्रकार परंपरा निर्माण झाल्या. यातून पुढील काळात अभिजात नृत्यपरंपरा व प्रादेशिक लोकनृत्य परंपरा निर्माण होत गेल्या. अभिजात नृत्यपरंपरा मध्ये कथ्थक, कथकली, भरतनाट्यम, मणिपुरी, ओडिसी, कूचिपुडी व मोहिनी आट्टम इत्यादी सात नृत्यपरंपरांचा समावेश होतो. अभिजात नृत्य परंपराचे मुख्य अधिष्ठान हे धार्मिक असून ते आजच्या काळातही टिकून असल्याचे दिसून येते. परंतु प्रादेशिक प्रचलित लोकनृत्य परंपरा ह्या तेथील लोकजीवाचे प्रतिबिंबीत स्वरूपाच्या असतात.

जनसमूहात प्रचलित असलेल्या परंपरागत नृत्यप्रकार म्हणून लोकनृत्यांस ओळखले जाते. जनसमूहाच्या स्वाभाविक वृत्ती, आवडीनिवडी, सामाजिक, भौगोलिक परिस्थिती, रितीरिवाज व दैनंदिन जीवनातील हालचाली यांचे प्रतिबिंब लोकनृत्यामधून प्रकट होते. अशी लोकनृत्य ही लोकजीवनातून उत्क्रांत झालेली असतात. लोकनृत्य सामान्यतः सामूहिक रूपांतून सादर होतात त्यांना तालवाद्यांची व लोक संगीताची साथ असते. साधेपणा हा लोकनृत्याचा आत्मा असून त्यातील हालचाली उत्स्फूर्त आणि सहज स्वाभाविक स्वरूपाच्या असतात. नैसर्गिक वातावरण म्हणजे उघड्या माळरान जागेवरती, गावाबाहेर, देवळातील मंडपात/आवारात लोकनृत्य केली जातात. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय विविधतेमुळे लोकनृत्यांची समृध्द व वैविध्यपूर्ण अशी परंपरा भारतास लाभलेली आहे. भारतीय लोकनृत्य ही भारतीय राष्ट्रीय संस्कृतीचा एक अनमोल ठेवा आहेत. भारतातील विविध प्रदेशात त्या-त्या प्रादेशिक वैशिष्ट्यांची निदर्शक असलेले विविध नृत्य प्रकार आढळतात. ती पुढीलप्रमाणे :-

**१. आसाम :** आसाम राज्यातील बिहू या उत्सवप्रसंगी बिहू हे लोकनृत्य करण्याची परंपरा आहे. तसेच हुकारी, नटपूजा, वैशाख, खांबा लिभ, नृइरा लिम इ. वेगवेगळ्या प्रकारची लोकनृत्य वेगवेगळ्या प्रसंगी सादर केली जातात. मिझो या जमातीमध्ये ढोलकी वाद्याच्या वादनावरती हातात बांबू काठी घेऊन 'सुत्तलाम' हे नृत्य करण्याची परंपरा प्रचलित आहे.

**२. नागालँड :** नागालँड प्रदेशातील नागा जमात लोक हे शेतातील पीक कापणी हंगामात 'खोबा लिम' नृत्य स्त्री व पुरुष रांगामध्ये एकत्रितरित्या नृत्य करतात.

**३. मणिपूर :** मणिपूर प्रदेशातील लोकसमूहात रासलीला, लायहरीबा, संकीर्तन इ. वेगवेगळी लोकनृत्ये वेगवेगळ्या प्रसंगी केली जातात. 'रासलिला' नृत्यातून जनजीवनातील उत्स्फूर्त आनंदाचा आविष्कार लोक प्रकट करतात. 'लायहरोबा' हे पुरातन व पारंपारिक लोकनृत्यप्रकार असून त्यातून शिव-पार्वती देवतांच्या उपासनेचा व लीलांचा नृत्याविष्कार केला जातो. संकीर्तन या उत्साहप्रसंगी पुंग-चोलम करताल. चोलम हा नृत्य प्रकार करताना रस्त्यावरून धार्मिक आशयाने नृत्यगण करत नर्तक संघ जात असतात. यांस 'नांगर कीर्तन' नृत्य म्हणून ही ओळखले जाते.

**४. मणिपूरी नृत्य :** मणिपूरी नृत्य हे एक नृत्य कला प्रकार म्हणून ओळखला जातो. पारंपारिक मणिपूरी नृत्यांस जनसामान्यांची भक्तीचे साधन माणून मणिपूरी राज्यांतील लोकांनी तिचे जतन केले. मणिपूरबरोबरच त्रिपुरा, आसाम, बंगाल इ. प्रदेशांतही पारंपारिक मणिपुरी नृत्य रूढ आहे. मणिपुरातील वैष्णव संप्रदायांनी मणिपुरी नृत्यांचे अनेक पिढ्यान्पिढ्या तिचे जतन करून त्यामध्ये अनेक नवनवे प्रसंग व नवनवीन नृत्य रचना समाविष्ठ केल्या. त्यामध्ये रासलीला नृत्याचा समावेश करून विविध सण-उत्सव प्रसंगी त्याचे सादरीकरण करण्याची परंपरा निर्माण केली. मणिपुरी नृत्यांमधील आंगिक अभिनय हे वैशिष्ट्य मानले जाते. सदर नृत्यांतून नर्तक आपल्या शारीरिक अंगाच्या विशिष्ट अवयव भागावरती भर न देता भिन्न अवयवांवरती भर देऊन नाजूक व लयबध्द असा तोल साधून नृत्य करत असतो. या नृत्यातील चाली व भंगी (शरीर वळवण्याची क्रिया) ही नर्तकाजवळची गुरूकिल्ली मानली जाते. या नृत्यांच्या माध्यमातून तांडव, लास्य, प्रसारण्म्, ताल प्रबंध, तालीना, स्वरमाला, चतुरंग, कीर्तिप्रबंध इ. केले जाणारे वैशिष्ट्यपूर्ण नृत्य प्रकार प्रसिध्द आहेत.

**५. पं. बंगाल :** बंगाल राज्यात ढोल व करताल या वाद्यांच्या साथीने केले जाणारे 'कीर्तन' हे लोकनृत्य प्रचलित आहे. त्याचबरोबर 'जत्रा' हे नृत्य ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात केले जाते. तसेच 'गंभीर' मुखवटा नृद्य केले जाते. दोन काठ्या हातात घेऊन 'रायबेश' हे लोकनृत्यही बंगालमध्ये प्रचलित आहे. यास काटी नृत्य म्हणून ओळखले जाते. या लोकनृत्याबरोबरच पं. बंगालमध्ये मणिपुरी नृत्य जे अभिजात नृत्य कलेतील नृत्य प्रचलित आहेत.

**६. पंजाब :** पंजाबमधील 'भांगडा' हे लोकनृत्य प्रसिध्द असून ते कृषी नृत्य म्हणूनही ओळखले जाते. या नृत्यांतून ढोलाच्या तालावरती नाचणाऱ्या पुरुषांतील आनंद व चैतन्य यांचे उत्स्फूर्त दर्शन घडते.

भांगडा नृत्यांत उंच उड्या, गोल गिरक्या इ. विविध हालचाली ह्या अंगविक्षेपांसह केल्या जातात. तसेच स्त्रीयांचे 'गिध्दा', पुरुषांचे 'झुमर', स्त्री-पुरुषांची 'लाइलडी' ही लोकप्रिय नृत्ये आहेत.

**७. जम्मू आणि काश्मीर :** काश्मीर प्रदेशांत वासुकी नाग जत्रेमध्ये 'गद्दी' नृत्य करण्याची पंरपरा दिसून येते. तसेच स्त्रियांचे 'रोफ' तरुण मुलामुलींचे 'हिकात' ही लोकप्रिय लोकनृत्यं आहेत. काश्मीरमध्ये तरुण मुलांने स्त्री वेश धारण करून 'बचनग्मा' हे नृत्य करण्याची प्रथा आढळते. त्याचबरोबर स्त्री व पुरुष यांनी फेर धरून करण्याचे 'छज्जा' हे लोकनृत्य ही प्रचलित आहे.

**८. हिमाचल प्रदेश :** स्थानिक देवतेस प्रसन्न करण्यासाठी स्त्री-पुरुष सामूहिकपणे 'सांगला' नृत्य करतात. चंबा भागात लोक सणाच्या प्रसंगी 'झांझर' लोकनृत्य करतात. तसेच धनगर जमातीत ढोलाच्या साथीवरती स्त्री व पुरुषांचे सामूहिकपणे केले जाणारे 'दीपक नृत्य' ही लोकप्रिय लोकनृत्य प्रकार म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर गद्दी जमातीत प्रसिध्द 'गद्दी' लोकनृत्यांस ओळखले जाते.

**९. उत्तर प्रदेश :** उत्तर प्रदेशांत प्रामुख्याने रासलीला, नौटंकी, झोरा, छपेली, थाली इत्यादी पारंपारिक लोकनृत्ये प्रचलित आहेत. रासलिला या नृत्याचे अनेक प्रकार प्रचलित असून 'नौटंकी' हा पारंपारिक नृत्यकला प्रकार ही लोकप्रिय आहे. रासलीला, नौटंकी इ. पारंपारिक नृत्य सादर करणारे नर्तक हे व्यावसायिक स्वरूपाचे असतात. उत्तर प्रदेशातील कुमाऊँ जमातीत वेगवेगळ्या धार्मिक उत्सवप्रसंगी 'झोरा', छपेली आदी नृत्य प्रचलित आहेत. जोनसार या जमातीतील स्त्रीयांचे 'थाली' नृत्य प्रसिध्द आहे. कथ्थक नृत्यांस अभिजात नृत्य म्हणून ओळखले जाते. कथ्थक म्हणजे नृत्य, गायन व अभिनय यांच्या माध्यमातून कथ्थक हा कथा सांगणारा असा त्यांचा अर्थ होतो. कथ्थक नृत्य करणाऱ्या नर्तकांस एकनट, कथोपजीवी इ. नावाने संबोधले जाते.

**१०. राजस्थान :** राजस्थानमध्ये गावोगावी जाऊन सादर केले जाणारे भवाई जमातीचे 'भवाई' हे नृत्य प्रसिध्द आहे. यास 'खयाल' नृत्य नाट्य म्हणूनही संबोधले जाते. धार्मिक सण-उत्सव प्रसंगी स्त्री-पुरुषांचे सामूहिकपणे केले जाणारे 'घूमर' हे धार्मिक लोकनृत्य प्रसिध्द आहे. होळी सण प्रसंगी 'गैर' हे समूहनृत्य करण्याची परंपरा आहे. भिल्ल आदिवासी जमातीत 'गौरी' हे नृत्य केले जाते. गारूडी जमातीत 'झंकरिया' व 'पणिहरी' ही लोकनृत्ये करण्याची परंपरा रूढ आहे.

**११. मध्य प्रदेश :** मध्य प्रदेशातील गोंड आदिवासी जमातीत करमा उत्सवप्रसंगी 'करमा' हे वैशिष्ट्यपूर्ण नृत्य केले जाते. या नृत्यांतील घोड काठ्यांवरील नाच प्रेक्षणीय असतो. गोंड जमातीतील स्त्री-पुरुषांचे 'बीजपुतनी' समूहनृत्य प्रसिध्द आहे. या नृत्यात पुरुष मंडळी गायीची शिंगे व मोरपिसे डोक्याला बांधतात तर स्त्रीया तांब्यांच्या धातूपासून बनविलेले मुकुट व गळ्यात रंगीबेरंगी मण्याच्या माळा परिधान करून शेतात बीज पेरणी करतेवेळी एकत्रितपणे समूहनृत्य करतात. बंजारा जमातची ही लोकनृत्य विशेष प्रसिध्द आहे. लौटा, लांगी, गोंचा, लक्ष्मीआगर इ. पारंपारिक लोकनृत्यदेखील बंजारा जमातीत प्रचलित आहेत.

**१२. गुजरात :** 'गरबा' हे नवरात्रोत्सवात केले जाणारे लोकप्रिय असे लोकनृत्य असून अखंडदीप लावलेला सच्छीद्र दीपगर्भघट ठेवून त्याभोवताली स्त्रीया फेर धरून जे नृत्य करतात, त्यास गरबा/गरभाह नृत्य म्हणून ओळखले जाते. पुरुषवर्ग दसरा सणाच्या दुसऱ्या दिवशी 'गरबी' नृत्य करतात. कृष्णजन्मअष्टमी वेळी 'दांडिया रास' नावाचे रासलिला, कृष्णलिला नृत्य प्रामुख्याने पुरुष लोक करतात. या नृत्यप्रसंगी घुंगरू लावलेल्या काठ्या हातात धरून ढोल व सनई वाद्यांच्या साथीनी नृत्य करतात. शेतकरी लोकांचे 'कुछाडी' नावाचे पारंपारिक लोकनृत्य प्रसिध्द आहे. सौराष्ट्र प्रदेशातील कोळ्यांचे पारंपारिक 'पांघर' नृत्य ही लोकप्रिय आहे. श्रमिक लोकजीवनावरती आधारित 'टिपणी' हे वैशिष्ट्यपूर्ण लोकनृत्य प्रामुख्याने श्रमिक, कष्टकरी समाजातील स्त्रीयां करतात.

**१३. ओरिसा :** ओरिसा राज्यातील आदिवासी जमातीत प्रामुख्याने 'सुफल नृत्य', 'छाऊ', 'पाईक', 'किरातार्जुन', 'करमा', 'जंदुर' इ. प्रमुख पारंपारिक लोकनृत्य प्रचलित आहेत. मुडिया आदिवासी जमातीत रानबैलाची शिंगे परिधान करून विवाहप्रसंगी 'सूफल' नृत्य करण्याची प्रथा प्रचलित आहे. मयूरभंज भागातील पैका या आदिवासी जमातीत 'छाऊ' हे पारंपारिक युध्दनृत्य केले जाते. तसेच 'पाईक' हे नृत्य थंडीच्या दिवसात शेकोटी सभोवताली केले जाणारे पारंपारिक नृत्य प्रसिध्द आहे. 'फिरातार्जुन' हे नृत्य आक्रमक व जोशपूर्ण लोकनृत्य म्हणून ओळखले जाते. देव-देवतांच्या आराधनेसमयी 'करमा', 'जदुर' ही पारंपारिक नृत्ये केली जातात. ओरिसामधील ओडिसी नृत्यांस अभिजात नृत्य म्हणून ओळखले जाते. दासीनृत्य परंपरा म्हणून ओडिसी नृत्यांस ओळखले जाते. महेश्वर महापात्रा यांनी पारंपारिक ओडिसी नृत्यावरती इ.स. १२ व्या शतकात अभिनय चंद्रिका हा शास्त्रशुध्द ग्रंथ लिहिला. ओडिसी या अभिजात नृत्यांची परंपरा मंदिरात नाचणाऱ्या देवदासी व स्त्री वेशात नाचणारे नर्तक यांनी जीवंत ठेवली. देवदासींना 'नृतिका महारी' व नर्तक यांना 'गोटिपुआ' असे म्हणून संबोधले जाते. ओडिसी नृत्यप्रकार प्रामुख्याने मंगलाचरण, पल्लवी, बाटू नृत्य, अभिनय व मोक्ष नाट इत्यादी प्रकारांत सादर केले जातात.

**१४. गोवा :** संपूर्ण गोवा राज्यात पौष महिन्यात सार्वत्रिकरित्या 'धालो' नृत्य उत्साहात केले जाते.

**१५. कर्नाटक :** कर्नाटक राज्यामध्ये 'भूतकोला' घोडानाच', 'बलाकाट', 'करगा', 'यक्षगान' इ. लोकनृत्य प्रचलित आहेत. भूतपिशाचाश्य यांच्या निवारणार्थ दक्षिण कर्नाटक भागात 'भूतकोला' हे विशिष्ट देवतेचे पूजारी यांच्याकडून केले जाणारे हे भीतिदायक नृत्य प्रचलित आहे. 'घोडानाच' हे नृत्य शेतातील पीक कापणीनंतर घोड्यांचा नकली मुखवटा कमरेला बांधून नर्तक नृत्य करतो. त्यास 'घोडानाच' नृत्य म्हणून संबोधले जाते. सुगीच्या हंगामात पीक कापणीस आल्यावरती रंगीबेरंगी पोशाख परिधान करून 'बालाकाट' हे कृषिनृत्य केले जाते. 'करगा' हे नृत्य धार्मिक सण उत्साहप्रसंगी केले जाणारे वैशिष्ट्यपूर्ण लोकनृत्य आहे. कर्नाटक भागातील 'यज्ञगान' हे पारंपारिक लोकनृत्य असून ते उत्क्रांत होत जाऊन त्याचे नृत्यनाट्यात रूपांतर झाले आहे.

**१६. आंध्र प्रदेश :** आंध्र प्रदेशांत वंजारी जामातीत होळीच्या वेळी 'मदनरती' हे आकर्षक नृत्य केले जाते. यामध्ये मदन व रती यांच्या मातीच्या मूर्तीभोवती आकर्षक असे नृत्य वंजारी जमातीतील पारंपारिक लोकनृत्य करण्याची परंपरा आहे. आंध्र प्रदेशातील पारंपारिक धार्मिक चालीरितीनुसार ग्रामदेवतेला रेड्याचा बळी दिल्यानंतर त्याच्याभोवती फेर धरून 'डप्पू' वाद्याच्या तालावरती नाचण्याची प्रथा प्रचलित आहे. आंध्र प्रदेशातील स्त्री-पुरुषांचे सामूहिकपणे केले जाणारे 'मथुरी' हे लोकनृत्य उल्लेखनीय असे असते. धार्मिक सण प्रसंगी स्त्रियां बतकम्मा हे नृत्य करतात तर स्त्री-पुरुषांचे सामूहिकपणे 'माधुरी' नृत्य लोकप्रिय लोकनृत्ये आहेत.

आंध्र प्रदेशातील 'कूचिपूडी' नृत्यांस अभिजात नृत्य म्हणून ओळखले जाते. आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कूचिपूडी या गावातील नर्तकांनी 'कूचिपूडी' हा अभिजात नृत्य प्रकार रूढ केला म्हणून या नृत्यांस कूचिपूडी नृत्य म्हणून ओळखले जाते. सदर नृत्य हे चांदण्या रात्री (पूर्णिमा दिवशी) देवळांच्या आवारामध्ये करण्यांची प्रथा आहे. कूचिपूडी नृत्यांत शिवलीला नाट्यम्, ब्रम्हमेळा धार्मिक नृत्य नाटय, वैष्णव संप्रदायातील भागवत मेळे इ. नृत्यप्रकार समाविष्ठ असतात. या नृत्यांतील समाविष्ठ विविध पात्रे गद्यात्मक पद्यात्मक, वाचिक स्वरूपांचा अभिनय करणारी भारतातील एकमेव नृत्यपध्दती म्हणून ओळखली जाते. कूचिपूडी नृत्य शब्दम्, कलापम् व पद्म प्रकारामध्ये केले जाते.

**१७. तामिळनाडू :** तामिळनाडू प्रदेशात उगम पावलेला 'भरतनाट्यम्' हा भारतीय अभिजात नृत्य प्रकारातील सर्वात पुरातन नृत्यप्रकार आहे. भरतनाट्यम ही नृत्यपरंपरा देवदासी यांच्या माध्यमातून जोपासली गेली म्हणून त्यांस 'दासी-आट्टम' म्हणूनही संबोधले जाते. पारंपारिक भरतनाट्यम् नृत्यांत प्रामुख्याने स्त्री-नर्तिका नृत्य करतात.

तामिळनाडू प्रदेशात अभिजात नृत्याबरोबरच विविध लोकनृत्य प्रकारही प्रचलित आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने करगम्, कुम्मी, कुरवंजी, ओइलाट्टम, पिन्नल कोलाट्टम, चिंडू, अश्वनृत्य इत्यादी पारंपारिक लोकनृत्यांचा समावेश होतो. मरिअम्मा देवीच्या पूजेवेळी 'करगम' हे लोकनृत्य केले जाते. फुलांनी सजवलेले पितळी धातूचे हंडे डोक्यावरती ठेवून तुतारी व ढोल या वाद्यांच्या तालावरती 'करगम' हे नृत्य करतात. 'कुम्मी' हे वैशिष्ट्यपूर्ण नृत्य विवाहप्रसंगी टाळ्यांच्या तालावरती गोलाकार फेर धरून मुली करतात. 'पिन्नल कोलाट्टम' हे लोकनृत्य रंगीबेरंगी टिपऱ्या हातात घेऊन सामुदायिकपणे गोफ पध्दतीचे नृत्य करतात. 'कुराती' या डोंगराळ प्रदेशातील भटक्या जमातीचे भरतनाट्यम् या अभिजात नृत्याकडे झुकणारे 'कुरवंती' हे लोकनृत्य प्रचलित आहे. 'ओइलाट्टम' हे लोकनृत्य मंदिर आवारात देवीच्या उत्सवप्रसंगी एका हातात रूमाल व दुसऱ्या हातात रिपटी घेऊन पुरुष लोक हे लोकनृत्य करतात. भटक्या पारधी जमातीमध्ये प्रचलित 'चिंडू' हा वैशिष्ट्यपूर्ण नृत्य प्रकार आहे. चिंडू या नृत्य माध्यमातून चिमण्या पकडण्याचा अभिनय वैशिष्ट्यपूर्णरित्या केला जातो. आदिवासी जमातीत घोड्याचे तोंड लावलेली काठी दोन पायांच्यामध्ये घेऊन अश्वनृत्य करण्याची परंपरा आहे.

**१८. केरळ :** केरळमध्ये अभिजात नृत्य प्रकारातील 'कथकळी' (कथ्थक) हा एक लोकप्रिय नृत्यप्रकार म्हणून ओळखला जातो. कथकळी या नृत्य प्रकाराचा उगम कृष्ण-नाट्टम, रामनाट्टम इ. नृत्यनाट्यातून झाला आहे. या नृत्यांमध्ये डोळे आणि भुवया यांच्या हालचालीबरोबरच विविध, हस्तमुद्रा व भावरसांची जोड देवून नृत्य सादर करणे यांस महत्त्व असते. कथकळी नृत्यांत सुमारे २४ हस्त व त्यांच्या ७५० मुद्रांचा वापर केला जातो. दोन कथकळी नर्तक या नृत्यांच्या माध्यमातून न बोलता आपल्या विविध हास्तमुद्र व डोळे आणि भुवयाच्या भावमुद्राच्या हालचालीतून तासनतास बोलू शकतात अशी ही नृत्यकला आहे. वनवर्णन, स्वर्गवर्णन, युद्ध तयारी, रथ तयारी इ. कथकळी नृत्याची खास वैशिष्ट्ये म्हणून ओळखली जातात. सदर नृत्य माध्यमातून प्रभू रामचंद्र यांच्या जीवनातील कथा नृत्यांतून प्रकट केल्या जातात. नर्तकाच्या रंगभूषा, वेशभूषा, तसेच रंगमंच, संगीत, ताल, प्रयोग, नृत्य, नाट्य आणि नर्तक इ. बाबींना कथकळी या अभिजात नृत्य प्रकारात महत्त्वपूर्ण स्थान असते.

केरळमधील अभिजात नृत्यांबरोबरच लोकनृत्य ही प्रचलित आहेत. मोपला मुसलमान जमातीत 'कोलकळी' हे पारंपारिक लोकनृत्य केले जाते. 'भद्रकाळी' हे वैशिष्ट्यपूर्ण लोकनृत्य, देवताच्या मंदिरातील धर्मविधीवेळी केले जाते. 'काईकोट्टिकळी' हे भद्रकाली लोकनृत्य ओणम सणांच्या वेळी स्त्रीया करतात. पद्मनाभ स्वामीच्या उत्सवप्रसंगी 'वेलकळी' नामक पारंपारिक युध्द नृत्य केले जाते. या युध्दनृत्यातून कौरव-पांडव यांच्या युद्धांचे प्रतीकात्मक नृत्यांकन सादर केले जाते.

**१९. महाराष्ट्र :** महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने 'गजी नृत्य', 'आदिवासी नृत्ये', 'दंडार', 'कोळी नृत्य', 'गोफनृत्य', 'टिपरी नृत्य', 'लेझीम', 'दिंडी नृत्य', 'काला', 'दशावतारी', 'लावणी' इत्यादी पारंपारिक लोकनृत्य प्रकार प्रचलित आहेत.

१. **गंजीनृत्य :** धनगर जमातीतील एक प्रसिध्द असा गजीनृत्य प्रकार आहे. या नृत्यांस गजी ढोल, नृत्य म्हणून ही संबोधले जाते.

२. **आदिवासी नृत्ये :** महाराष्ट्रातील गौंड, भिल्ल, कातरी, कोरक, वारली इ. आदिवासी जमातीमध्ये प्रामुख्याने पारंपारिक वाद्यांच्या साथीने विविध नृत्ये केली जातात. त्यामध्ये ढोलाचा नाच, तारफ नृत्य, कडकलक्ष्मी, भगत, वीर इ. नृत्यांचा समावेश होतो.

३. **दंडार :** दिवाळी, होळी इ. सण उत्साहात विदर्भात 'दंडार' लोकनृत्य केले जाते. दंडार नर्तकांचे संघ गावोगावी जाऊन पारंपारिक पध्दतीचे दंडार नृत्य करतात.

४. **कोळी नृत्य :** सागर किनारी भागातील कुणबी, आगरी, कोळी समाजामध्ये विविध सण उत्साहवेळी कोळी नृत्य केले जाते. त्याचे अनेक पारंपारिक प्रकार रूढ झाले असून गौरी-गणपती सणावेळी 'चेऊली नाच' नृत्य केले जाते.

५. **गोकनृत्य/टिपरी नृत्य :** महाराष्ट्रातील दक्षिण भागात प्रामुख्याने कोजागिरी पौर्णिमेला तर

कोकण भागात गोकुळष्टमी उत्साहवेळी टिपरी व गोफनृत्य प्रचलित आहेत. या नृत्यामध्ये प्रामुख्याने कृष्ण रासक्रिडा संबंधित नृत्य असतात.

६. **लेझीम :** क्रीडाप्रधान लोकनृत्य प्रकार म्हणून लेझीम नृत्य प्रकारास ओळखले जाते. जोशपूर्णरित्या लहान वयातील मुलापासून ते वयस्क पुरुषमंडळी लेझीम सह हालगी वाद्यांच्या तालावरती आकर्षक सामूहिक नृत्य केले जाते. या नृत्यांत प्रामुख्याने कवायतसदृश्य हालचालीचा समावेश असतो.

७. **दिंडी नृत्य :** वारकरी संप्रदायातील वारकऱ्यांचा धार्मिक आशय असलेला असा दिंडी नृत्य प्रकार प्रचलित आहे. आषाढी व कार्तिकी एकादशीनिमित्त महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र भोवतालीच्या इतर भागातून विठ्ठल भक्तांच्या/वारकऱ्यांच्या दिंड्या विठ्ठल दर्शनासाठी निघतात. विठ्ठल भक्तीत तल्लीन होऊन दिंड्यामध्ये सहभागी वारकरी टाळमृदंगांच्या साथीवरती तालसुरात नाचतात, याला दिंडी नृत्य म्हणतात.

८. **काला :** गोकुळाष्टमीच्या दुसऱ्या दिवशी 'दहीहंडी' सण उत्साहात साजरा केला जातो. त्यावेळी दहीहंडी फोडण्यासाठी एकत्रित आलेल्या लोकांना गोविंदा या नावाने संबोधले जाते. दहीहंडी फोडण्याच्या कार्यक्रमात वैष्णव नृत्योत्व करतात त्यास 'काला' या नावाने ओळखले जाते. कोकण भागातही वैष्णव नृत्योत्व साजरा केला जातो. त्यास 'देहीकाला' या नावाने ओळखले जाते.

९. **दशावतारी :** कोकण व नाशिक भागात पारंपारिक दशावतारी नृत्य प्रचलित आहे. नाशिकमध्ये यांस 'बोहडा' या नावाने संबोधले जाते. दशावतारी नृत्य नाटकांत 'राधा' व 'गौळणी' यांच्यावरती नृत्यप्रकार केले जातात. विशेषत: राधा हे पात्र पुरुष नर्तक हे भडक व अलंकारिक वेशभूषेत नृत्य करतो. त्यास संकासूर या राक्षस पात्राची साथ असते. कोकण भागात दशावतारी नृत्य नाट्य होळी सणाच्या सुमारास केले जाते.

१०. **लावणी :** महाराष्ट्रातील तमाशा या लोकनाट्यात पारंपारिक लावणी हा नृत्य प्रकार सादर केला जातो. लावणी नृत्य हे साभिनय नृत्यगायनाचा म्हणजे 'अदा' हा या लावणी कलेचा प्रमुख गाभा असतो. फडावरची नृत्य लावणी आधिक लोकप्रिय आहे. लावणी सादर करणाऱ्या नृत्यांगानाची देहबोली, चेहऱ्यावरील हावभाव हे वेधक स्वरूपाचे असतात. त्यामुळे लावणी नृत्य गायन अधिक मोहक बनते.

११. **पारंपारिक नृत्ये :** महाराष्ट्रातील विविध भागातील पारंपारिक गीता बरोबरच वैविध्यपूर्ण नृत्ये करतात. मंगळा गौर, गौरीपूजा, कोजागिरी, नागपंचमी अशा सण, उत्सव प्रसंगी स्त्रीया पारंपारिक विविध नृत्ये करतात. झिम्मा फुगडी, गोफ, टिपऱ्या इ. नृत्यप्रकार केले जातात.

झिम्माफुगडी बरोबरच कोंबडा आगोटापागोटा, पिंगा, नाच गो घुमा, किस बाई किस इ. अनेक क्रिडा नृत्ये महाराष्ट्रातील ग्रामीण तसेच शहरी भागातील स्त्रीयांमध्ये प्रचलित आहेत. महाराष्ट्रातील कुणबी समाजातील स्त्रीमध्ये मंगळागौर उत्सवात गौरीचा नाच हा पारंपारिक नृत्य प्रकार केला जातो.

## ब) वस्तुसंग्रहालये :-

मानवी जीवनामध्ये वस्तुसंग्रहालयास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनाच्या दृष्टीकोनातून अनन्यसाधारण महत्त्व आहे. संग्रहालये ही दोन संस्कृतींना जोडून ठेवणारी व वर्तमानात दिशादर्शक म्हणून कार्य करणारी संस्था आहे. संग्रहालये ही एक प्रकारची समाजाचा आरसा असतात. ज्यामध्ये मानवी जीवन संस्कृतीच्या विविध अंगांचे प्रतिबिंब उमटलेले असते. मानवी संस्कृतीच्या प्रगतीचा आलेख प्राप्त होत असल्याने संग्रहालये ही भावी पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणारी एक ज्योत आहे. इतिहासविषयक संकल्पना बदलून आधुनिक विज्ञान, माहिती, तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इतिहास जसा घडला तसा जाणून घेण्याचा प्रयत्न होत आहे. इतिहास लेखनासाठी इतर साह्यकारी ज्ञानशाखातील एक साह्यकारी ज्ञानशाखा म्हणून वस्तुसंग्रहालयांस ओळखले जाते. दुर्मिळ, मौल्यवान वस्तूंचा संग्रह, वस्तूंची नोंदणी, संरक्षण, संशोधन, प्रदर्शन व मनोरंजनातून लोकांची ज्ञानवृध्दी करणे इ. मुख्य कार्य वस्तुसंग्रहालय करत असल्यामुळे इतिहास विषयांच्या लेखनात त्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. २१ व्या शतकापासून वस्तुसंग्रहालय एक शास्त्र या स्वरूपात पुढे येत असून त्यास ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व मनोरंजनदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. संग्रहालयातील दुर्मिळ, कलापूर्ण व मौल्यवान भौतिक वस्तू ह्या इतिहासलेखनाची अस्सल साधने/पुरावे म्हणून महत्त्वपूर्ण मानली जातात. मानवाचे सामाजिक परिवर्तन होण्यास, सामाजिक ऐक्य वाढण्यास व राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी वस्तुसंग्रहालयांची मदत होत आली आहे. वस्तुसंग्रहालय ही संज्ञा व्यापक स्वरूपाची असून त्यामध्ये प्राचीन काळापासूनच्या सांस्कृतिक अवशेषांचे संग्रह, जतन, संवर्धन, संशोधन, प्रदर्शन, मनोरंजन, लोकशिक्षण देण्याचे कार्य अविरतपणे चालत असते.

### १) वस्तुसंग्रहालयाची व्याख्या :-

दुर्मिळ, अमूल्य, कलापूर्ण, मौल्यवान, सांस्कृतिक मूल्य असणाऱ्या विविध वस्तूंचा संग्रह ज्या ठिकाणी केलेला असतो त्या ठिकाणास सामान्यत: संग्रहालय असे संबोधले जाते. संग्रहालय हा दोन शब्दापासून बनला आहे. संग्रह + आलय = म्हणजेच संग्रह केलेल्या वस्तुंचे स्थान होय. मराठी शब्दकोशात 'प्राचीन दुर्मिळ वस्तूंचा संग्रह जेथे केला जातो, ते स्थान म्हणजे वस्तुसंग्रहालय होय' असा वस्तुसंग्रहालय शब्दाचा अर्थ दिला आहे. कौतुक भांडार, पुराण संग्रह, चिडियाघर, जादूघर इ. शब्दानी ओळखले जाणारे शब्द कालबाह्य झाले आहेत. वस्तुसंग्रहालय हा एक भारतीय देवनागरी शब्द असून विविध वस्तूचे संग्रह स्थळ म्हणून आधुनिक काळातील व्यवहारात वापरतात. वस्तुसंग्रहालयास इंग्रजी भाषेत 'म्युझियम' (Museum) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या म्युझियम (Museum) शब्दाचे मूळ ग्रीक भाषेतील 'मोसियो'

(Maseion) या शब्दामध्ये आढळून येते. ग्रीकमधील कला, साहित्य व विज्ञानविषयक मूसेस (Muses) या एकत्रित रूपातील एकूण नऊ अधिष्ठात्री देव-देवतांचे प्रतिक म्हणून ओळखल्या जातात. कॅलियोप (Calliop) ही महाकाव्यांचे प्रतिक, क्लियो (Clio), इतिहास, इयूटर्न (Euterp), काव्यसंगीत थेलिया (Thalia), हास्यनाट्य व लोकगीत, मेल्योने (Melpomehe) - दु:ख, टर्प सिचाय, सामूहिक गायन व नृत्य, ईरटो - प्रेमगीत व आनंदहास्य, पोलिन्मिया - धार्मिक पवित्रता व स्तुती गीत व युरेनिया ही अवकाश व ज्योतिष विद्याच्या प्रतिक म्हणून उपरोक्त नऊ अधिष्ठात्री देव-देवता होत्या. थोडक्यात उपरोक्त मुझेसच्या नऊ अधिष्टात्री देव-देवता ह्या विविध प्रकारांतील विविध लोककला, नृत्यकला, गायनकला, नाट्यकला, काव्य, संगीत, कलात्मक वस्तु, बुध्दिमत्ता व विज्ञानज्ञान इत्यादी बार्बीशी जोडण्यात येतो. थोडक्यात विविध विषयांचा विविध प्रकारातील कलात्मक, दुर्मिळ, मौल्यवान वस्तुंचा ज्या ठिकाणी एकत्रित ठेवल्या जातात त्या ठिकाणांस 'वस्तुसंग्रहालय' असे म्हटले जाते. वस्तुसंग्रहालयांच्या उगमस्थानाकडे पाहिले असता वस्तुसंग्रहालय हे शास्त्र आहे. यांची जाणीव वस्तु संग्रहालयाच्या विषयक अनेक केलेल्या व्याख्या व त्याच्यामध्ये होत गेलेले बदलावरून दिसून येते, त्या पुढीलप्रमाणे :-

❋ **निक्लियस डी. एफ. (इ.स. १८२९)** : 'सामान्यत: उपलब्ध नसणाऱ्या वस्तूंचे गुप्त स्थळ म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.'

❋ **डॉ. जान्सन (इ.स. १८९०)** : 'मानवामध्ये ज्ञान व जिज्ञासा निर्माण करणाऱ्या वस्तूचे संग्रह स्थळ म्हणजे वस्तुसंग्रहालय होय.'

❋ **बेईली नाथन (इ.स. १८३७)** : 'वस्तुसंग्रहालय म्हणजे एक दृश्य अभ्यासाचे ग्रंथालय आहे.'

❋ **सर आशुतोश मुखर्जी (इ.स. १९१४)** : वस्तुसंग्रहालय ही एक अशी संस्था आहे की, 'जिच्यामध्ये वस्तूंचे संकलन करून सुरक्षित ठेवले जाते. ज्यांचा उपयोग जनसामान्यांना त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीविषयक ज्ञान, आनंद मिळवून देण्याच्या हेतूने केला जातो.'

❋ **बेन्जामिन गिलमॅन (इ.स. १९२३)** : 'वस्तुसंग्रहालय हे विविध वस्तू व प्रदर्शनाच्या सामुग्रीचा संग्रह होय.'

❋ **सर एफ. केन्याल (इ.स. १९२७)** : 'मानवी जीवनामध्ये ज्या गुणात्मक मूल्यमापनाची आवश्यकता असते, त्याच्याशी संबंधित प्रदर्शित केलेल्या वस्तूंना पाहून बघणाऱ्यांमध्ये सौंदर्यबोध, जिज्ञासा व आपल्या भूतकाळाविषयी आस्था निर्माण होते. अशा संग्रह स्थळांना 'वस्तुसंग्रहालय' असे म्हटले जाते.'

❋ **ए. एस. विटलिन (इ.स. १९४९)** : 'आजच्या संदर्भामध्ये वस्तुसंग्रहालय शब्दापासून अशा संस्थेचा बोध होतो की, जिच्यामध्ये अनेक प्रकारच्या वस्तूंचा संग्रह पाहणाऱ्यांना शिक्षण व मनोरंजन देणेच्या उद्देशाने केला गेला आहे.'

❋ **सर आर्थर किथ (इ.स. १९५०)** : 'वस्तुसंग्रहालय हे एक असे ग्रंथालय आहे की, ज्यांच्या कपाटामध्ये मानवी मेंदूकडून व्यक्त झालेले विचार मुद्रित, वस्तू रूपातून प्रकट नैसर्गिक कार्याचे मूळ रूप प्रामाणिकपणे संग्रहीत केले जाते.'

❋ **आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषद (आयकॉम) (इ.स. १९५१)** : 'वस्तुसंग्रहालयांची संज्ञा अशा संस्थेस दिली जावू शकते, जिच्यामध्ये सांस्कृतिक व वैज्ञानिक कला वस्तूंचे संरक्षण करून मुख्यत: ज्ञान, शिक्षण व मनोरंजनाच्या उद्देशाने वस्तूंचे प्रदर्शन केले जाते.' "Any permanent institution which conservs and displays for study, Education and Enjoyment, collection of objects of cultures of scientific significance."

❋ **एस. टी. सत्यमूर्ति (इ.स. १९६३)** : 'वस्तुसंग्रहालयांस आधुनिक युगामध्ये असे व्याख्यानित केले जावू शकते. ज्या निसर्गाचा आविष्कार व मानवी संरचनेची उत्तम पद्धतीने व्याख्या करते व ज्यांच्या उपयोग ज्ञान मिळविण्याबरोबरच मानवी सांस्कृतीच्या प्रसार व प्रचार करण्यासाठी व सामान्य जनतेस संस्कारित करणाऱ्यांच्या हेतूने वस्तूचा संग्रह केला जावू शकतो.'

## २) जागतिक वस्तुसंग्रहालयाचा उदय :-

वस्तूचा संग्रह करण्याची प्रवृत्ती अश्मयुग काळापासून मानवात विकसीत झाली. अन्नाच्या शोधात असणारा मानव विविध प्राण्यांची शिकार करून अन्न मिळवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची दगडी हत्यारे जवळ बाळगत असे. मानवाची संग्रह करण्याची ही प्रथमावस्था होती. मानवास लाभलेली आंतरिक सौंदर्यात्मक नैसर्गिक मानसिक गुणांमुळे त्यास सुंदर, दुर्मिळ, मौल्यवान वस्तू व अवशेषाबद्दलच्या कुतूहलापोटी तो वस्तूंचा संग्रह करत आला आहे.

### अ) प्राचीन काळ :-

प्राचीन काळात इजिप्तमध्ये मंदिराच्या शेजारी आपल्या मनोरंजनासाठी पशुसंग्रहालये तयार केली. इ.स. पू. १४०० मध्ये इजिप्तची राजकन्या ह्यूरने 'गार्डन ऑफ अक्लमेशन' नावाचे उद्यान तयार करून त्यामध्ये इजिप्तमध्ये न आढळणारे प्राणी आणून ठेवले. इ.स.पू. १२ व्या शतकात चीनमधील 'चौ' राजघराण्यातील चेन राजाने 'गार्डन ऑफ इंटेलिजन्स' नावाचे पशुसंग्रहालय निर्माण केले. इ.स.पू. तिसऱ्या शतकात ग्रीकमधील 'अथेन्स' या ठिकाणी प्राण्याच्या अध्ययन व संशोधनासाठी ॲरिस्टॉटल यांने प्राणी संग्रहालय निर्माण केले. इ.स.पू. २८० मध्ये तत्कालीन शासनकर्ता टोलॉमीने 'अंलेक्झाण्ड्रीया' या ठिकाणी 'म्युसेस' (Muses) देवतेचे मंदिर बांधून म्युसेस देवताच्या प्रित्यर्थ एक विद्यापीठ व वस्तुसंग्रहालय स्थापन केले. या वस्तुसंग्रहालयात टोलॉमीने जगभरातील दुर्मिळ व मौल्यवान दुर्मिळ हस्तलिखिते, विलक्षण अशी खगोल, शल्य यंत्रे आणि जैविक वस्तू इ.चे सुमारे चार लाख वस्तू संग्रहीत करून त्यांचा अभ्यास व संशोधनासाठी विविध विद्वानांना आमंत्रित केले.

## ब) मध्ययुगीन काळ :-

मध्ययुगीन (इ.स. ५ वे शतक ते इ.स. १५ व्या शतक) काळात युरोपमध्ये मानवी जीवनावरचे धर्माचे प्राबल्य वाढत गेले. धर्माच्या अनुषंगाने मंदिर बांधणी मोठ्या प्रमाणात वाढत गेली. राजे महाराजे ते सामान्य लोकांवरती असलेल्या धार्मिक प्राबल्यामुळे आपल्याकडील मौल्यवान व किंमती वस्तू मंदिरांना दान देऊ लागले. त्यामुळे युरोप खंडात धार्मिक मंदिरांनाच एक प्रकारे वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप प्राप्त झाले. तत्कालीन राजकारण, सांस्कृतिक व धार्मिक जीवनामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या धर्म प्रमुख, धर्म प्रवर्तक, संत यांच्या मृत्युनंतर त्याच्या शवाचे (थडग्याचे) रूपांतर त्याचे कार्याचे स्मरण भावी काळात कायमस्वरूपी रहावे म्हणून शव अवशेष संरक्षण स्थळास एक प्रकारे वस्तुसंग्रहालयाचे स्वरूप प्राप्त झाले. मध्ययुगातील राजे, सरदार, श्रीमंत व प्रतिष्ठित लोकांनी आपल्या स्वसंग्रही असणाऱ्या जुन्या मौल्यवान, दुर्मिळ, मौल्यवान कलापूर्ण वस्तूचा वापर आपली लोकप्रियता व महत्त्व वाढविण्यासाठी आपल्या संग्रहातील वस्तूचे प्रदर्शन भरवण्यास सुरूवात केली. मात्र हे प्रदर्शन समाजातील ठराविक लोकांनाच पाहण्यासाठी खुले असे.

## क) आधुनिक काळ :-

इ.स. १५ व्या शतकाच्या सुरुवातीस युरोप खंडात पुर्नरुज्जीवनाची चळवळ सुरू झाली. त्यामुळे मानवी जीवनावरती असणारे धार्मिक प्राबल्य कमी होऊन विज्ञानवादी, बुध्दीप्रामाण्यवाद यांचे प्राबल्य वाढवण्यास सुरूवात झाली. या कालखंडापासून सांस्कृतिक व वैज्ञानिक मूल्य असणाऱ्या वस्तू प्रदर्शनासाठी संग्रह करण्यात वाढ होत जाऊन अनेक संस्थांचा विकास झाला. या कालखंडाबाबत क्लार्क स्क्रीनर यांनी असे म्हटले आहे की, 'या कालखंडात अशी परिस्थिती निर्माण झाली की, वाढते वैज्ञानिक ज्ञान व उत्कृष्ट कलात्मकता दर्शविणाऱ्या वस्तूबद्दल पुर्ननिर्माण प्रक्रिया सुरू होऊन प्राकृतिक कुतुहलजन्य वस्तूंच्या संग्रहासाठी नवीन संस्थांचा उगम झाला.' यातूनच इ.स. १६८२ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात स्कूल ऑफ नॅचरल हिस्ट्री आणि अद्‌भुत बहुमूल्य व आनंद देणाऱ्या कलाकृतीतून जगातील पहिले आधुनिक 'अश्मोलियन म्युझियम' या वस्तुसंग्रहालयाची निर्मिती झाली. इ.स. १७४१ मध्ये उप्लस विद्यापीठामध्ये खाणकाम, औद्योगिक उद्योगधंदे या संबंधित वस्तू व वनस्पतीमधील रासायनिक प्रक्रिया संबंधित एक विभाग एकत्रित करून उप्लस बहुउद्देशीय संग्रहालय स्थापन झाले. इ.स. १७५३ मध्ये इंग्लंड देशात पहिले राष्ट्रीय संग्रहालय निर्माण केले गेले. अमेरिकेत इ.स. १७७३ मध्ये पहिले जनसंग्रहालय स्थापन झाले. फ्रान्समधील 'लावरे राजप्रसाद' यांस इ.स. १७९३ मध्ये गणतंत्रिक संग्रहालय (Museum of Re-public) म्हणून घोषित केले गेले. इ.स. १८३० मध्ये बर्लिनमध्ये लोकसंग्रहालयाच्या संकल्पनेतून, सांस्कृतिक, कला, इतिहास व तंत्रज्ञान या दालनाच्या माध्यमातून 'एंटलस संग्रहालय' स्थापन झाले. इ.स. १८७७ च्या काळापर्यंत युरोपमध्ये वेगवेगळ्या स्वरूपाची सुमारे २०० वस्तुसंग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये उल्लेखनीय वस्तुसंग्रहालय म्हणून इंग्लंडमधील इ.स. १८५१ मध्ये स्थापन झालेले 'व्हिक्टोरियो अल्बर्ट म्युझियम', अमेरिकेतील इ.स. १८७२ मध्ये स्थापन झालेले 'मेट्रो पालिंग्टन आर्ट म्युझियम' व जपानमधील टोकियो येथे इ.स. १८७२ स्थापन झालेले 'नॅशनल म्युझियम' यांचा उल्लेख केला जातो.

२० व्या शतकात सांस्कृतिक नवजागरण व ज्ञानप्राप्तीची मानवी इच्छामुळे वस्तुसंग्रहालय स्वरूपात बदल होून त्यांच्या संख्येत वाढ झाली. दुसऱ्या महायुद्धकाळात अमेरिकेत त्यांची संख्या २२०० पर्यंत गेली. इ.स. १९३० जर्मनमध्ये १५०० इतकी संख्या वस्तुसंग्रहालयांची झाली तर १९६२ पर्यंत इंग्लंडमध्ये त्यांची संख्या १००० पर्यंत पोहचली होती.

## ३) भारतातील वस्तुसंग्रहालयाचा उदय :-

### अ) प्राचीन कालखंड :-

भारतामध्ये प्राचीन काळात संग्रहालय सदृश्य अशा काही संस्थाचे अस्तित्व असल्याचे दिसते. प्राचीन भारतीय वाङ्मयामध्ये 'चित्रशाळा' विषयक उल्लेख मिळतात. याविषयी भवभूतीची उत्तर रामचरित, बाबा भट्ट यांचे अष्टांग संग्रह, श्री हर्ष यांचे नैषंधचरित इ. ग्रंथात चित्रशाळा विषयक माहिती मिळते. गौतम बुध्द यांचा महापरिनिर्वाणानंतर त्यांच्या पवित्र रक्षाअस्थीवरती बुध्दगगया, अमरावती, भारहूत, सांची इत्यादी ठिकाणी स्तूपाची निर्मिती केली गेली. यांच स्तूपावरती अनेक मूर्ती, शिलालेख कोरले गेले. हिंदू बौध्द, जैन धर्मीयांच्या मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्माविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. अशा प्रकारची प्राचीन काळातील वस्तुसंग्रहालय सदृश्य चित्रशाला, स्तूप, मंदिर, गुहा आदी ठिकाणी धार्मिक शिल्पे व चित्रे रेखाटून त्यामधून लोकांना आपल्या धर्मविषयक माहिती व सांस्कृतिक परंपराचे ज्ञान प्राप्त करून दिले गेले. इ. स. पू. ९ वे शतकातील तक्षशिला, इ. स. ५ वे शतकातील नालंदा, इ. स. ६ व्या शतकातील विक्रमशीला इ. विद्यापीठात धर्मगंज परिसर विकसित करून त्यामध्ये रत्नसागर, रत्नरंजित व रत्नोद्धती प्रकारातील भव्य स्वरूपाची ग्रंथालये निर्माण केली गेली होती.

### ब) मध्ययुग कालखंड :-

सरदार, उमराव, श्रीमंत लोक, राजे रजवाडे यांना दुर्मिळ व शोभिवंत मौल्यवान, किंमती वस्तूंचा संग्रह करून त्यांचे प्रदर्शन भरवून स्वत:ची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी उपयोग करून घेतला. मुघल सम्राट अकबर, जहाँगीर तसेच सरदार मिर्झाराजे जयसिंह, सवाई प्रतापसिंह यांनी तत्कालीन उत्कृष्ट चित्रकाराकडून अनेक चित्रकृतीची निर्मिती करून घेतली. छत्रपती शाहू महाराज यांनी सातारा येथे पशुपक्षी यांचा संग्रह केला. बाजीराव पेशवे, सवाई माधवराव पेशवा यांनी पुणे येथे विविध प्राण्यांचे संग्रहालय निर्माण केल्याचे उल्लेख प्राप्त होतात. अशा प्रकारची अवस्था ब्रिटिशाचे भारतात राज्य स्थापनेपूर्वीची वस्तुसंग्रहालयांची होती.

### क) आधुनिक कालखंड :-

ब्रिटिशांनी भारतामध्ये आपले साम्राज्य निर्माण करून राज्यकारभार करतानांच भारतातील कला

वस्तूचा शोध घेवून त्यांचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली. सर विल्यम जोन्स यांच्या अध्यक्षतेखाली ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने इ.स. १७८४ मध्ये 'एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या पुढाकारातून संस्था संग्रहातील भारतीय संस्कृतीविषयक बहुमूल्य अशा कलापूर्ण, दुर्मिळ, वस्तूच्या माध्यमातून २ फेब्रुवारी १८१४ रोजी कलकत्ता येथे भारतातील पहिले 'भारतीय वस्तुसंग्रहालय' नावाचे वस्तुसंग्रहालय स्थापन केले. या संग्रहालयाचा, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र, मानववंशशास्त्र, कला संस्कृती, उद्योग, शिल्पकला आदि विभागांचा विकास करून त्याचे बहुउद्देशीय स्वरूपाच्या संग्रहालयात रूपांतर केले. इ.स. १८५७ च्या उठावानंतर भारतात ब्रिटनची राणी महाराणी व्हिक्टोरिया यांची सत्ता सुरू झाली. महाराणी व्हिक्टोरिया राणीच्या अर्धशतसांवत्सरीक उत्सवानिमित्त मुंबई येथे इ.स. १८५७ मध्ये व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ड वस्तुसंग्रहालय (सध्याचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय) स्थापन केले गेले. भारताचे व्हाईसरॉय जनरल लॉर्ड कॅनिंग यांच्या कारकिर्दीत इ.स. १८६१ साली 'भारतीय पुरातत्वीय संरक्षण संस्था' स्थापन झाली. या संस्थेचे तत्कालीन संचालक सर अलेक्झांडर कनिंघ यांनी भारतीय पुरातत्वीय स्थळांचा शोध व सर्वेक्षण करून अनेक ठिकाणी उत्खनन केले. या उत्खनानातून प्राप्त अवशेष वस्तूचे प्रदर्शन वस्तूसंग्रहालय स्थापन करून प्रदर्शित केल्या. यामध्ये मद्रास येथे व्हिक्टोरिया टेक्निकल इन्स्टिट्युट म्युझियम (१८८७), उदकमंण्डल येथे शासकीय म्युझियम (१८८८), म्हैसूर येथे म्हैसूर राज्य संग्रहालय (१८६५), एर्नाकुलम येथे प्राणी विज्ञान व वनस्पतीशास्त्र संग्रहालय (१८४७), महना येथे घासीदास स्मारक संग्रहालय (१८७५), जयपूर येथे गर्व्हमेंट सेंट्रल म्युझियम (१८७६), कच्छ येथे कच्छ म्युझियम (१८८७) व विल्वेस्टर म्युझियम (१८९०), बडोदा येथे बडोदा संग्रहालय (१८९४), व कलादान, भावनगर येथे बरटन म्युझियम, जम्मू येथे (१८९८) श्री. प्रतापसिंह राजकीय संग्रहालय, लखनऊ येथे (१८६३) स्टेट म्युझियम (१८९८), मथुरा येथे मथुरा म्युझियम (१८७४), नागपूर येथे स्टेट म्युझियम (१८७४), मुंबई येथे प्राकृतिक म्युझियम (१८६३), पुणे येथे लॉर्ड रे इंडस्ट्रीयल म्युझियम (१८८८) इ. वस्तुसंग्रहालये भारतात स्थापन झाली.

लार्ड कर्झन यांची भारताच्या व्हायसरॉय पदावरती नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी भारतीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण संस्थेची पुर्नबांधणी करून सर जॉन मार्शल यांची संचालकपदी नियुक्ती केली. सर जॉन मार्शल यांनी संस्थेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी उत्खनन करून प्राप्त वस्तू अवशेषाचे विशेषत: अनेक ठिकाणी स्थळीय वस्तुसंग्रहालय भारतात निर्माण केली. उत्खनात सापडलेल्या वस्तूंच्या संरक्षणार्थ उत्खनाच्याच ठिकाणी स्थापन केली गेलेली अशी एकूण ११ स्थळीय संग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये जूनागढ (१९०१), सारनाथ (१९०४), चंम्पा (१९०८), जोधपूर (१९०९), खजुराहो (१९१०), वाराणसी (१९१०), नालंदा (१९१७), सांची (१९१९), हडप्पा (१९२१), मोहनजोदडो (१९२२), ग्वालियर (१९२२) या स्थळीय संग्रहालयांचा समावेश होतो. लॉर्ड कर्झन यांनी प्राचीन ऐतिहासिक वास्तू व वस्तूं यांचे जतन, संरक्षण व संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून 'एन्शंट मोनुमेंटस् प्रिझरवेशन ॲक्ट' (Ancient Monuments Preservation Act) हा कायदा इ.स. १९०४ साली भारतात लागू केला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये विविध संस्थाने विलीन केली गेली. या संस्थानांनी आपल्या संग्रही असलेल्या विविध कलापूर्ण, दुर्मिळ, मौल्यवान वस्तूचे आपल्या राजमहालात संग्रहालयाची निर्मिती केली. इ.स. १९५६ साली भारत सरकारने भारतातील वस्तुसंग्रहालयांच्या विकासासाठी 'सेन्ट्रल एड्वायझरी बोर्ड ऑफ म्युझियम' (CABM) कमिटीची स्थापना केली. तसेच इ.स. १९५९ मध्ये प्राचीन ऐतिहासिक स्मारके आणि पुरातत्त्वीय स्थळे हा कायदा भारत सरकारने पास केला. भारतातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी व त्याची तस्करी रोखण्यासाठी इ.स. १९७२ साली 'The Antiquarian and Art Treasures Act' हा कायदा पास केला. विविध कायद्याच्या माध्यमातून भारत सरकारने आपल्या प्राचीन काळापासून सांस्कृतिक वारसाचे जतन, संवर्धन, संरक्षण करून राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण केले. ब्रिटिश काळापासून ते इ.स. २००० सालापर्यंत भारतात विविध प्रकारातील सुमारे ६०० इतकी वस्तुसंग्रहालये निर्माण झाली आहेत.

## ४) वस्तुसंग्रहालयांचे प्रकार :-

भारतामध्ये १९ व्या शतकात ऐतिहासिक, कला आणि स्थळीय संग्रहालय असे प्रकार अस्तित्वात होते. २० व्या शतकापासून वस्तुसंग्रहालयांचे स्थापनेचे उद्दिष्ट व निकष इ. तत्त्वानुसार वर्गीकरण करण्यास सुरूवात झाली. यातून संग्रहालयांतील वस्तूंना प्राधान्य, विषय, निर्मिती व उद्देश इ. निकषांवरती वस्तुसंग्रहालयांकडे पाहिले जाऊ लागल्याने वस्तुसंग्रहालयांचे विविध प्रकार अस्तित्वात आले, ते खालीलप्रमाणे :-

### १. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय :-

ऐतिहासिक प्रकाराच्या संग्रहालयामध्ये दुर्मिळ व महत्त्वपूर्ण ऐतिहासिक अभिलेख, तैलचित्रे, छायाचित्रे, नाणी, शस्त्रास्त्रे, पत्रे, नकाशे, प्रतिकृती, निवासस्थाने इ. प्रकारच्या वस्तूच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण दालनाची मांडणी केलेली असते. तसेच पुरातत्त्वीय स्थळे, ऐतिहासिक स्मारके, युद्धभूमी आणि महत्वपूर्ण व्यक्ती यांच्या आठवणी म्हणून ही ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांची उभारणी केलेली असते. उदा. १) नॅचरल हिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग, पं.बंगाल (१९०३), २) व्हिक्टोरिया मेमोरियल वस्तुसंग्रहालय, कलकत्ता, पं.बंगाल (१९०६), ३) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय, लालकिल्ला, नवी दिल्ली (१९०९), ४) नॅचरल हिस्ट्री म्युझियम, त्रिवेंद्रम्, केरळ (१९३५), ५) टिपू सुलतान वस्तुसंग्रहालय, श्रीरंगपट्टनम्, कर्नाटक (१९५९), ६) फोर्टसेन्ट जॉर्ज वस्तुसंग्रहालय, मद्रास, तामिळनाडू (१९८४), ७) नॅशनल हेरीटेज प्रिझर्वेशन सोसायटी म्युझियम, बुंदी, राजस्थान.

### २. पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय :-

उत्खननात प्राप्त विविध पुरावशेषांचा पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालयात समावेश असतो. अश्मयुगी काळापासूनचे विविध पुराअवशेष, दगडी हत्यारे, मणी, नाणी, मातीची भांडी, शिलालेख, ताम्रपट, ताडपत्रावरील ग्रंथ, प्राचीन शिल्पकृती इ. उत्खननीय अवशेषांचा समावेश असतो. अशा प्रकारच्या

संग्रहालयातील दालनात विषयांनुसार, काळानुसार प्रदर्शन केलेला असते. उत्खनन स्थळाच्या ठिकाणीच स्थापन केलेल्या स्थळीय वस्तुसंग्रहालयांना (Site Museum) पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय म्हणून ओळखले जाते. हडप्पा, मोहेंजोदडो, तक्षशिला, नालंदा अशी काही स्थळीय संग्रहालय भारतात स्थापन केली आहे. उदा. १) आर्किऑलॉजिकल म्युझियम, मथुरा-उत्तरप्रदेश (१८७४), २) म्युझियम ऑफ ॲन्टिक्किरिज, भावनगर-गुजरात (१८८४), ३) गर्व्हमेंट सेंट्रल म्युझियम, जयपूर-राजस्थान (१८८७), ४) आर्किऑलॉजिकल म्युझियम, रेड फोर्ट-दिल्ली (१९०९), ५) ऑर्किऑलॉजिकल म्युझियम, खजुराहो-मध्यप्रदेश (१९१०), ६) आर्किऑलॉजिकल म्युझियम, विजापूर-कर्नाटक (१९१२), ७) आर्किऑलॉजिकल म्युझियम, अमरावती-आंध्र प्रदेश (१९५१), ८) लोकल आर्किऑलॉजिकल म्युझियम, चित्रदुर्ग-कर्नाटक (१९५१), ९) आर्किऑलॉजिकल म्युझियम, नागार्जुन कोंडा, आंध्र प्रदेश (१९५२), १०) आर्किऑलॉजिकल म्युझियम, बौध्दगया-बिहार (१९५६), ११) आर्किऑलॉजिकल म्युझियम, हळ्ळेबिड-कर्नाटक (१९६१), १२) हरियाणा प्रांतीय पुरातत्त्वीय वस्तुसंग्रहालय, गुरूकुल झांझर, हरियाणा (१९६१), १३) आर्किऑलॉजिकल म्युझियम, अहर-राज्यस्थान (१९६२), १४) आर्किऑलॉजिकल म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९६२).

## ३. कला वस्तुसंग्रहालय :-

मानवानी वेगवेगळ्या कालखंडात निर्माण केलेल्या विविध कलाकुसरीच्या हस्तकला वस्तूंचा कला प्रकारातील वस्तुसंग्रहालयात समावेश असतो. यामध्ये चित्रकला, मूर्तीकला, नक्षीकाम, भरतकाम, औद्योगिक कला, हस्तकला आदिवासी कला, पुरातत्त्वीय कला अवशेष, इ. प्रामुख्याने समावेश केला जातो.

## ४. विज्ञान व तंत्रज्ञान वस्तुसंग्रहालय :-

मानवी जीवनाच्या विकासातील विविध टप्पे, गतकाळात मानवाने आपले जीवनमान सुसह्य करण्यासाठी लावलेले विविध शोध आणि विविध क्षेत्रातील ज्ञान, शोध, विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात मानवाने केलेली प्रगती याविषयीची माहिती ही वस्तुरूपाने, मॉडेल रूपाने, यंत्र रूपाने, उपकरणे रूपाने, विषयानुसार विज्ञान व तंत्रज्ञानविषयक संग्रहालयांच्या दालनात समाविष्ठ केली जातात. उदा. १) विजयवाडा विज्ञान केंद्र, विजयवाडा-आंध्र प्रदेश (१८८७), २) नॅचरल हिस्ट्री म्युझियम, दार्जिलिंग-हिमाचल प्रदेश (१९०३), ३) हेरास इन्स्टिट्यूट ऑफइंडियन हिस्ट्री ॲन्ड कल्चर, मुंबई-महाराष्ट्र (१९२६), ४) म्युझियम ऑफ द सेंट्रल ग्लास ॲन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिट्युट, कलकत्ता-पं. बंगाल (१९३०), ५) हेल्थ म्युझियम, हैद्राबाद-आंध्र प्रदेश (१९४८), ६) राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय, कलकत्ता- पं. बंगाल (१९५६), ७) विश्वेश्वरैय्या इंडस्ट्रियल ॲन्ड टेक्नॉलॉजी म्युझियम, बंगलोर-कर्नाटक (१९६५), ८) ट्राईबल रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, भुवनेश्वर-ओरिसा (१९७२), ९) नेहरू विज्ञान केंद्र, पॉण्डेचरी (१९७७), १०) रमन ताराघर संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९९२), ११) नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई-महाराष्ट्र (१९८५).

## ५. औद्योगिक वस्तुसंग्रहालय :-

मानवाने विज्ञान क्षेत्रामध्ये लावले शोध हे प्रत्यक्षात व्यवहारामध्ये कोणत्या उद्योगामध्ये कशा पध्दतीने उपयोग केला जातो. 'ॲप्लीकेशन ऑफ सायन्स' याचे दिग्दर्शन औद्योगिक प्रकारच्या वस्तुसंग्रहालयांच्या माध्यमातून समाजाच्या ज्ञानवृध्दीसाठी संग्रहालयांच्या दालनात मांडले जातात. उदा. १) महात्मा फुले औद्योगिक वस्तुसंग्रहालय (लॉर्ड रे इंडस्ट्रीयल म्युझियम), पुणे (१८७४), २) गव्हर्मेंट इंडस्ट्रियल ॲन्ड कमर्शिअल म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९३९), ३) परमनंट इक्झिबिशन ऑफ बिल्डिंग मटेरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९४०), ४) कॅलिको म्युझियम ऑफ टेक्स्टाईल, अहमदाबाद (१९४९), ५) म्युझियम ऑफ सेंट्रल ग्लास ॲन्ड सिरॅमिक रिसर्च इन्स्टिटट्यूट, पं.बंगाल (१९४९), ६) हॉयवे म्युझियम, ट्रान्सपोर्ट भवन, नवी दिल्ली (१९६०), ७) कॉन्टेल इंडस्ट्रीयल म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९८०), ८) सेंट्रल इंडस्ट्रियल म्युझियम, मद्रास-तामिळनाडू (१९८०).

## ६. वैद्यकिय वस्तुसंग्रहालय :-

मानवी शरीररचना, शरीराचे कार्य, अवयव, मानवी आरोग्य, मानवी शरीरास उत्पन्न होणाऱ्या व्याधी. तसेच मानवी शरीर वैधिक शास्त्रज्ञ झालेली प्रगती, शोध, औधषे अशा विविध प्रकारच्या मानवी शरीर, अवयवविषयक दुष्य स्वरूपातील माहिती ही प्रतिकृती तक्ते. पोस्टर, इ. प्रदर्शन माध्यमातून वैद्यकिय प्रकारच्या संग्रहालयात वैद्यकियशास्त्राचे अभ्यासक, विद्यार्थी, सामान्यजन यांच्या ज्ञान वाढीसाठी प्रदर्शित केलेले असते. उदा. १) गॅट मेडिकल कॉलेज, मुंबई (१८४५), २) स्टॅन्ले मेडिकल कॉलेज (१९२५), ३) सेठ गोवर्धनदास मेडिकल कॉलेज, ४) बी.जे.मेडिकल कॉलेज, पुणे (१९४६).

## ७. बाल वस्तुसंग्रहालय :-

लहान मुलाच्या सर्वांगीण विकासासाठी त्याच्यात ज्ञानवृध्दी, बौध्दिक आकलन, संस्कार, नैतिकता रुजवण्याचे एक मनोरंजनक व शैक्षणिक जडणघडणीचे माध्यम म्हणून बाल वस्तुसंग्रहालये स्थापन केली जातात. अशा संग्रहालयाच्या माध्यमातून थोर व्यक्तीचे जीवन चित्रण, वैज्ञानिक तत्त्वे, सृष्टी विज्ञान, गती, गुरुत्वाकर्षण, जीव-विकास व नाश नैसर्गिक, वैज्ञानिक तत्त्वे, कला व विधा, कलाकुसरीच्या वस्तू, हस्तकला, चित्रकला, इतिहास संस्कृती याविषयक परिणामकारक, मार्मिक व सोप्या पध्दतीने मुलांची शैक्षणिक जडणघडण होण्याच्या दृष्टीकोन पुढे ठेवून प्रतीकृती, तक्ते, पोस्टर, प्रदर्शन इ. दृष्य स्वरूपातून बाल संग्रहालयाच्या दालनाची मांडणी केली जाते. उदा. १) बाल संग्रहालय, अमरेली-गुजरात (१९५२), २) नॅशनल चिल्ड्रन म्युझियम, नवी दिल्ली (१९५६), ३) बाल संग्रहालय, लखनौ-उत्तर प्रदेश (१९५७), (४) मोतीलाल नेहरू बाल संग्रहालय, (१९६८), (५) नेहरू बाल संग्रहालय, कलकत्ता-पं. बंगाल (१९७२).

## ८. मंदिर वस्तुसंग्रहालय :-

प्राचीन काळापासून धार्मिक ठिकाणे, मंदिर ही त्या-त्या लोकांच्या श्रध्देची व धार्मिक गरजा

पुरविणारी एक संस्था मानली जाते. धार्मिक मंदिरे, चर्च, मठ, आश्रम या ठिकाणांस लोक श्रध्देने विविध कलापूर्ण वस्तु अर्पण करत. त्यामुळे या ठिकाणी विविध प्रकारच्या कलापूर्ण, मौल्यवान वस्तूंचा संग्रह होत असतो. अशा मंदिराच्या अनुसंघाने संग्रहीत झालेल्या वस्तूच्या माध्यमातून भारतातील विविध मंदिर वस्तुसंग्रहालये स्थापन झाली. त्यामध्ये प्रामुख्याने १) बृहद्रीश्वर मंदिर, तंजावर (राजराजा संग्रहालय), २) श्रीरंगम मंदिर संग्रहालय, ३) मिनाक्षी-सुंदरेश्वर मंदिर संग्रहालय, मदुराई, ४) फोर्ट जॉर्ज म्युझियम, मद्रास, ५) सेंट्रल शिख म्युझियम, अमृतसर, ६) बिर्ला टपल म्युझियम, भोपाळ, ७) श्री वेंकटेश्वरा म्युझियम, तिरूपती, ८) दिंगबर जैन म्युझियम, सोंगिर, ९) गणेश मूर्ती संग्रहालय सारसबाग, पुणे.

## ९. सृष्टीविज्ञान वस्तुसंग्रहालय :-

प्राणी, वनस्पती, भूगर्भ रचना, भूस्तर, भूकंप आदी नैसर्गिक हुबेहूब देखाव्यातून दर्शन घडवण्याच्या हेतूने उत्कृष्ठ आभासचित्राच्या माध्यमातून सृष्टी विज्ञान वस्तुसंग्रहालये स्थापन केली जातात. अशी सृष्टी विज्ञानविषयक स्वतंत्र अशी दालने तसेच स्वतंत्रपणे सृष्टी विज्ञान वस्तुसंग्रहालय स्थापन केली जातात. उदा. १) महाराजा महाविद्यालय, एर्नाकुलम, २) मद्रास ख्रिश्चन कॉलेज, मद्रास, ३) प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, मुंबई.

## १०. वन आणि कृषी वस्तुसंग्रहालय :-

वन आणि कृषी वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून जंगलातील दुर्मिळ बहुगुणी विविध वनस्पती, झाडांचे विविध प्रकार, वन्यजीव, पशुपक्षी व शेती उदयोगांशी निगडीत विविध उपकरणे, कृषी औजारे, कृषी बी-बियाणे, किटक प्रकार, विज्ञान तंत्रज्ञानाची जोड देवून शेती उद्योगांची प्रगती. कृषी मालांचे प्रदर्शन, विविध दालनाचे प्रदर्शन वन व कृषी प्रकाराच्या वस्तुसंग्रहालयांत प्रदर्शित केले जाते. भारतातील वन व कृषी प्रकारातील वस्तुसंग्रहालये पुढीलप्रमाणे :- १) ग्रास फॉरेस्ट म्युझियम, कोईम्बतूर, तामिळनाडू (१९०२), २) फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट म्युझियम, डेहराडून (१९१४), ३) फॉरेस्ट स्कूल म्युझियम, शिवपूर, म. प्रदेश (१९४६), ४) आसाम फॉरेस्ट म्युझियम, गुवाहाटी-आसाम (१९४८).

## ११. सैनिक व संरक्षण वस्तुसंग्रहालय :-

जगातील प्रत्येक देशाच्या भूमीचे व संपत्तीचे संरक्षण करणे हे प्रत्येक देशाच्या सरकारबरोबरच नागरिकांचे आद्य कर्तव्य असते. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राचे बाह्य शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी भूदल, नौदल, हवाईदल इ. सैन्यदलाची उभारणी करून त्यांस विविध नवनवीन शस्त्रास्त्रे देश संरक्षणासाठी निर्मिती केलेली विविध साधने प्रधान करते. अशा राष्ट्र संरक्षणांसाठी विकसित केलेले विविध शस्त्रास्त्रे, साधने यांच्यात झालेली प्रगती मुख्यत: सैनिक संरक्षण प्रकारच्या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून प्रदर्शित केली जात. अशा संग्रहालयामध्ये संरक्षण हत्याराचे विविध प्रकार, त्यात झालेला विकास व आधुनिक तंत्रज्ञानाची शस्त्रास्त्रे, विविध युध्द पध्दती प्रकाराच्या प्रतिकृती, कालबाह्य झालेले विविध यंत्रे, शस्त्रास्त्रे इ. विविध

घटकांचा समोवश केला जातो. उदा. १) नॅशनल डिफेन्स अॅकॅडमी म्युझियम, खडकवासला-पुणे (१९५५), २) एअर फोर्स म्युझियम, पालम-नवी दिल्ली (१९६०), ३) सेंट्रल पोलिस म्युझियम, पुरम्-नवी दिल्ली (१९९१).

## १२. विद्यापीठ महाविद्यालय व शैक्षणिक वस्तुसंग्रहालय :-

भारतामध्ये वेगवेगळ्या राज्यातील विद्यापीठे, महाविद्यालये व शाळांमधून विद्यार्थ्यांना विविध विषयांचे वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करून शिक्षण दिले जाते. प्रयोग, प्रात्यक्षिक, दृक-श्राव्य इ. साधनांचा वापर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक संस्थांना वस्तुसंग्रहालयाची आवश्यकता असते. म्हणून अनेक शाळा महाविद्यालये तसेच विद्यापीठांनी शैक्षणिक दृष्टिकोन पुढे ठेवून वस्तुसंग्रहालयांची निर्मिती केली. उदा. १) झूलॉजी अॅन्ड बॉटनी म्युझियम, महाराजा कॉलेज, इरनाफुल-केरळ (१८७४), २) अॅर्थ्रोपॉलॉजिकल म्युझियम, लखनऊ युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश (१९११), ३) आंध्र मेडिकल कॉलेज म्युझियम, विशाखापट्टणम-आंध्र प्रदेश (१९२३), ४) मराठी हिस्ट्री म्युझियम, डेक्कन कॉलेज, पुणे-महाराष्ट्र (१९३९), ५) जिऑलॉजी अॅन्ड जिऑग्राफी म्युझियम, पंजाब युनिर्व्हसिटी, चंदगड (१९४७), ६) अॅथ्रोपॉलॉजी म्युझियम, गुवाहाटी युनिव्हर्सिटी, आसाम (१९४८), ७) हरी सिंह गौर आर्किऑलॉजिकल म्युझियम, सागर युनिव्हर्सिटी सागर, मध्य प्रदेश (१९८५), ८) मंडनापल्ले कॉलेज म्युझियम, गुंठर-आंध्र प्रदेश (१९९८).

## १३. स्थापत्त्य वस्तुसंग्रहालय :-

स्थापत्त्य वस्तुसंग्रहालयामध्ये प्रामुख्याने इमारत उभारणीसाठी लागणाऱ्या वस्तू, इमारत बांधणी तंत्रे, बांधकाम तंत्रज्ञानातील प्रगती, इमारत प्रतिकृती, इमारत बांधणीसाठी वापरले जाणारे साहित्य यांचे नमुने इ. स्थापत्यशास्त्रविषयक माहिती प्रदर्शित केली जाते. भारतामध्ये राष्ट्रीय इमारती संघटन केंद्र, निर्माण भवन, नवी दिल्ली येथे स्थापत्त्य वस्तुसंग्रहालयांची निर्मिती करण्यात आली.

## १४. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय :-

राष्ट्रीय प्रकारचे वस्तुसंग्रहालय स्थापन करणे हे सरकारचे आद्य कर्तव्य मानले जाते. भारत सरकारने दिल्ली येथे राष्ट्रीय वस्तुसंग्रहालय निर्माण केले. कलकत्ता येथील भारतीय वस्तुसंग्रहालय व हैद्राबाद येथील सालरजंग वस्तुसंग्रहालयांस राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयांचा दर्जा दिला. राष्ट्रीय प्रकारातील वस्तुसंग्रहालये ही केंद्रशासनाच्या पुरातत्त्वीय विभागाच्या अधिपत्त्याखाली येत असल्यामुळे त्याचे कार्य केंद्रीय पुरातत्त्वीय विभाग यांच्या अधिपत्त्याखाली कार्य चालते. राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयात प्रामुख्याने प्राचीन काळापासूनच ते आधुनिक काळापर्यंतची राष्ट्रीय ओळख असलेल्या विविध विद्या, कलाविषयक प्रातिनिधीक वस्तूचे संरक्षण व प्रदर्शन शास्त्रीय पध्दतीने केलेले असते.

## १५. प्रादेशिक वस्तुसंग्रहालय :-

प्रादेशिक वस्तुसंग्रहालये प्रामुख्याने प्रादेशिक विभागातील स्थानिक वैशिष्ट्यपूर्ण गोष्टीसंबंधी माहित व प्रादेशिक कला, संस्कृतीबाबत माहिती प्रदर्शित केली जाते. देखावे, हवामान, भूप्रदेश, वनस्पती, पशुपक्षी, कृषी प्रेक्षणीय, धार्मिक व ऐतिहासिक स्थळे, संस्कृती इ. माहिती प्रादेशिक प्रकारच्या वस्तुसंग्रहालयातून प्रदर्शित केली जाते. उदा. १) कच्छ म्युझियम, भूज, गुजरात (१८७७), २) एस. पी. एस. गव्हर्मेंट म्युझियम, श्रीनगर (१८९८), ३) धार डिस्ट्रीक म्युझियम, धार-मध्यप्रदेश (१९०२), ४) गव्हर्मेंट म्युझियम, अलवार-राजस्थान (१९०८), ५) स्टेट म्युझियम, जमुनाबाग-मध्य प्रदेश (१९२२), ६) सेंट्रल म्युझियम इंदोर-मध्य प्रदेश (१९२९), ७) स्टेट म्युझियम, भारतपूर-राजस्थान (१९३७), ८) मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर-महाराष्ट्र (१९४५), ९) सेंट्रल म्युझियम, भोपाळ-मध्य प्रदेश (१९४९), १०) गया म्युझियम, गया-बिहार (१९५२), ११) सेंट्रल म्युझियम, पिलानी-राजस्थान (१९५४), १२) सेंट्रल म्युझियम, जयपूर-राजस्थान (१९६०), १३) महाराज जीवाजीराव म्युझियम, ग्वाल्हेर-मध्यप्रदेश (१९६४), १४) तुलसी संग्रहालय, सतना-मध्यप्रदेश (१९७७).

## १६. स्थानिक वस्तुसंग्रहालय :-

स्थानिक वस्तुसंग्रहालय ही त्या-त्या ठराविक भागातील पुरातन अवशेष, इतिहास, कला, शिल्प, मानववंशशास्त्र, निसर्ग इतिहास इ. प्रकारातील त्या स्थानिक प्रदेशातील वस्तूच्या माध्यमातून त्या राज्याच्या विशिष्टतेनुसार स्थानिक संस्कृतीच्या ऐतिहासिक कला वस्तूचे जतन, संवर्धन व प्रदर्शन करण्याचे कार्य स्थानिक प्रकारच्या वस्तुसंग्रहालयाच्या माध्यमातून केले जाते. अशा प्रकारची संग्रहालये स्थानिक व जिल्हा पातळीवरती, नगरपालिका, महानगरपालिका व स्वायत्त संस्था यांच्या माध्यमातून मुंबई, अलाहाबाद, पुणे, कोल्हापूर, कलकत्ता, बडोदा, अहमदाबाद, अहमदनगर इ. ठिकाणी स्थापन झाली आहेत.

## १७. मानववंशशास्त्रीय वस्तुसंग्रहालय :-

पृथ्वीवरती मानव प्राण्यांची वर्गवारी वेगवेगळ्या वंश गटामध्ये केली जाते. प्राचीन मानववंशाचा विकास कशा पध्दतीने झाला, यांच्या अध्ययनासाठी, अभ्यासासाठी व माहितीसाठी मानववंशशास्त्रीय प्रकारातील वस्तुसंग्रहालय स्थापन केली जातात. अशा संग्रहालयामध्ये प्रामुख्याने विविध मानवी वंश प्रकार गट जीवाच्या उत्पत्तीपासून आधुनिक काळातील मानववंशात होत आलेल्या उत्क्रांती व स्थित्यंतरविषयक पुरावे, त्याचे पोषाख, आहार, वस्त्र, अलंकार, दागदागिने, शस्त्रास्त्रे, राहणीमान इ. महत्त्वपूर्ण संग्रह प्रदर्शित केलेला असतो. भारतात अशा प्रकारातील वस्तुसंग्रहालये प्रामुख्याने मद्रास, मुंबई, नागपूर, पुणे, बडोदा इ. ठिकाणी निर्माण करण्यात आली.

## १८. वैयक्तिक स्मारक वस्तुसंग्रहालय :-

थोर व्यक्तींची कार्य इतिहासाला, मानवी जीवनाला प्रेरणा देणारे ठरते. अशा व्यक्तीच्या जीवनाशी

निगडीत घटना, कार्यस्थळ, जन्मस्थळ, वास्तव्य स्थळ ही मानवी समाजाला सतत प्रेरणादायी ठरतात. थोर व्यक्तीच्या कार्याची आठवण भावी पिढीस सतत राहावी व थोर व्यक्तीच्या कार्याचा आदर्श हा भावी पिढीने घ्यावा. व्यक्तीकार्याचा सन्मान व्हावा आणि थोर व्यक्तीच्या जडण-घडणीतील विविध पैलूंचे दर्शन भावी पिढीस होत राहावे व्यक्तीची स्मारके बांधली व उभारली जातात. उदा. १) राणा प्रताप म्युझियम, उदयपूर-राजस्थान (१८८७), २) व्हिक्टोरिया ज्युबली म्युझियम, विजयवाड-आंध्र प्रदेश (१८८७), ३) वॉटसन म्युझियम, राजकोट-गुजरात (१८८८), ४) सरदार व्ही. पटेल म्युझियम, सुरत-गुजरात (१८९०), ५) भुरीसिंग म्युझियम, चंम्भा-हिमाचल प्रदेश (१९०४), ६) टिपू सुलतान म्युझियम, श्रीरंगपट्टणम्-तामिळनाडू (१९०८), ७) इंडियन वॉर मेमोरियन म्युझियम, नवी दिल्ली (१९१८), ८) छोटूराम म्युझियम, संगरिया-राजस्थान (१९३७), ९) महात्मा गांधी हिंदी संग्रहालय, काल्पी-उत्तर प्रदेश (१९५०), १०) गांधी स्मारक संग्रहालय, नवी दिल्ली (१९५०), ११) प्रभास पटाण म्युझियम, पाटण-गुजरात (१९५१), १२) गांधी स्मारक संग्रहालय, साबरमती-गुजरात (१९५२), १३) गंगा गोल्डन ज्युबली म्युझियम, बिकानेर-राजस्थान (१९५४), १४) नेताजी म्युझियम, कलकत्ता-पं. बंगाल (१९५७), १५) रविंद्र भारती म्युझियम, कलकत्ता-पं.बंगाल (१९६१), १६) महाराजा फत्तेसिंह म्युझियम, बडोदा-गुजरात (१९६१), १७) नेहरू मेमोरियल म्युझियम, नवी दिल्ली (१९६४), १८) गांधी स्मारक संग्रहालय, आगाखान महल, पुणे-महाराष्ट्र (१९७२), १९) महात्मा फुले स्मारक संग्रहालय, फुलेवाडा, पुणे-महाराष्ट्र (१९७२), २०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्युझियम ॲन्ड मेमोरियल, सिंबायोसीस सोसायटी, पुणे (१९९६).

### १९. महाराजा वस्तुसंग्रहालय :-

भारत देशास स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ५५० देशी संस्थानाचे विलीनीकरण भारतीय गणराज्यात केले गेले. ब्रिटिश काळात मिळणारे तनखे (पैसे) संस्थान विलीनीकरण नंतर बंद झाल्यामुळे संस्थानिकांना आर्थिक चणचण भासू लागली. आपली आर्थिक चणचण दूर करण्यासाठी काही संस्थानिकांनी आपल्या संपत्तीची व संग्रही असणाऱ्या दुर्मिळ कलाकृतींची विक्री केली. तर काही संस्थानिकांनी व त्यांच्या वारसदारानी, उत्तराधिकाऱ्यांनी आपल्या संग्रहीत असलेल्या दुर्मिळ कलाकृतीची विक्री न करता त्या वस्तूंचे संग्रहालये उभारली. अशा प्रकारच्या संग्रहालयांस 'महाराजा संग्रहालय' म्हणून ओळखली जाते. उदा. १) महाराज सवाई मानसिंह संग्रहालय, सिटी पॅलेस, जयपूर-राजस्थान (१९५१), २) महाराज फत्तेसिंग संग्रहालय, बडोदा-गुजरात (१९६१), ३) महाराज जिवाजीराव शिंदीया संग्रहालय, ग्वाल्हेर-मध्यप्रदेश (१९६४), ४) महाराजा बनारस विद्यामंदिर संग्रहालय, वाराणसी-उत्तर प्रदेश (१९६०), ५) श्री भवानी चित्र वस्तुसंग्रहालय, औंध-महाराष्ट्र (१९६८).

### २०. विशेष वस्तुसंग्रहालय :-

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेष वस्तुसंग्रहालये निर्माण केली गेली. अशा विशेष संग्रहालयामध्ये प्रामुख्याने, सी.बी.आय. संग्रहालय, हवाई दल संग्रहालय, राष्ट्रीय तिकीट संग्रहालये, कृषी संग्रहालय, परिवहन संग्रहालय

इ. समावेश होतो. त्याचबरोबर राष्ट्रीय खेळ संग्रहालय, संरक्षण विषय संग्रहालय, व्यक्तीचित्रण संग्रहालय, ग्राम संग्रहालय, फिरते संग्रहालय अशा विविध संग्रहालयांचा समावेश विशेष प्रकारातील वस्तू संग्रहालयात होतो.

## क) कलादालने :-

### ❑ भारतातील विविध कलादालने :-

कला हे मानवाच्या उत्कट भावनांचे प्रतिबिंब असून ती मौखिक अथवा लिखीत स्वरूपात अस्तित्वात अथवा प्रतीत होते. भारतामध्ये कला व कलेवर प्रेम करणाऱ्या कलाकारांची मोठी परंपरा लाभलेली आहे. आधुनिक काळात कलाक्षेत्राविषयी स्वंतत्र अभ्यास व प्राचीन परंपरा प्रतीत करणारी व प्राचीन इतिहासविषयी प्रमुख माहिती साधन म्हणून कार्य करणारी कलाविशेष साधने आज विविध कला दालनांत ठेवण्यात आलेली आहेत. भारतामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असून भूतकाळांतील संबंधित कला आधुनिक कलाकारांना कलेविषयी प्राचीन परंपरा व मार्गदर्शन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते. कला दालनांतील वस्तु अथवा चित्रे भलेही निर्जीव असले तरी इतिहासकारांनी वास्तविक बोलत असतांस परंतु त्यासाठी काय? कसे? कोठे? कशासाठी? का? इ. प्रश्नांचा भडीमार त्या वस्तूला इतिहासकाराकरवी केल्याशिवाय त्यातून इतिहास प्रतीत होऊ शकत नाही. कला ही तत्कालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक विचारांना प्रतिबिंबीत करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम असलेले आढळते. परिणामी इतिहासाला समजून घेण्यासाठी अत्यंत मुलभूत कामगिरी बजावते.

भारतातील कला दालनांची सुरुवात ब्रिटीश कालखंडात झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात विविध कला दालने अस्तित्वात आली. उदा.

### १. ॲकडमी ऑफ फाईन आर्टस्, कोलकत्ता :-

सन १९३३ मध्ये हे कला दालन अस्तित्वात आले असून भारतातील महत्त्वपूर्ण आहे. नामवंत कलाकार व परदेशातील कलाकारांचे कलाअविष्कार या दालनांत प्रदर्शित होतात. कला दालनामध्ये रविंद्रनाथ टागोर कृत 'गर्ल विथ अ पिचर' व 'अ विन्टरस इव्हिनिंग' इ. पेंटींग्ज असून त्याचबरोबर जामिनी रॉय, एम्. एफ. हुसेन, नंदलाल बोस यांच्यादेखील विविध पेंटींग्ज जतन करून ठेवल्या आहेत.

### २. शासकीय वस्तुसंग्रहालय व कला दालन, छत्तीसगड :-

कला दालन सार्वजनिकपणे १९६८ मध्ये करण्यात आले असून यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये शिल्पाकृती विभाग, पेंटींग्ज विभाग, वास्तुशैली विभाग असे एकूण ३ विभाग स्वतंत्र असून प्रत्येक विभाग प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक व समकालीन इतिहासांची माहिती प्रदर्शित आहे. या शासकीय कलादालनांतील प्रमुख विभाग पेंटींग असून त्यामध्ये तत्कालीन काळातील प्रसिध्द चित्रकार राजा रवि वर्मा, अमृता शेटगील,

जामिनी रॉय, रविंद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, अबानिंद्रनाथ टागोर इ.च्या कलाकृती जतन करण्यात आलेल्या आहेत.

### ३. शासकीय वस्तुसंग्रहालय, चेन्नई :-

या संग्रहालयांस मद्रास संग्रहालय असे देखील संबोधले जाते. भारतातील सर्वात जुने असणारे द्वितीय क्रमांकाचे वस्तुसंग्रहालय असून सन १८५१ मध्ये स्थापन करण्यात आले, यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रसिध्द फुटबॉलपटूच्या भेटीच्या शिल्पाकृती यामध्ये आढळतात. त्याचबरोबर राजा रवि वर्मा यांच्या चित्रकृती, तंजावर, मुघल, मुघल व समकालीन पेंटींग्ज यामध्ये संविर्धत करण्यात आलेल्या आहेत.

### ४. भारतीय वस्तुसंग्रहालय, कोलकत्ता :-

सन १८१४ मध्ये हे संग्रहालय स्थापन करण्यात आलेले असून यांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे भारतांच्या चित्राकृतीचा इतिहास जतन करण्यात आला आहे. हे वस्तुसंग्रहालय ६ विभागात विभाजीत असून त्यामध्ये कलादालनाचे ४ विभागांत स्वतंत्र विभाजन करण्यांत आलेले आहे. कलादालनामध्ये मुघल पेंटींग, बेंगाल, पेटींग, सजावट कलाकृती, वस्तु कलाकृती व साऊथ ईस्ट आशियन गॅलरी इ. समावेश असून अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

### ५. जहाँगिर आर्ट गॅलरी, मुंबई :-

जहाँगीर आर्ट गॅलरी सन १९५२ मध्ये स्थापन झालेले असून हे खाजगी कला दालन आहे. यामध्ये प्रसिद्ध भारतीय चित्रकार जामिनी रॉय ते अर्पिता सिंग इ. कलाकारांच्या कलाकृतीचे जतन करण्यात आलेले आहे. देशातील व परदेशातील नामवंत कलाकारांच्या कलाकृतीचे प्रदर्शन आजतागायत या ठिकाणी भरविले जाते. जहाँगीर आर्ट गॅलरी, मुंबई ही सर्वाधिक लोकप्रिय आर्ट गॅलरी असून कला प्रेमींसाठी अत्यंत माहिती देणारे संग्रहालय आहे.

### ६. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, बंगलोर :-

भारतातील नवे कला दालन असून यांचे उद्घाटन सन २००९ मध्ये बंगलोर मध्ये झाले. या कला दालनामध्ये ५०० पेंटींग्ज असून त्यामध्ये पारंपारिक ते आधुनिक कलाकृतींचा समावेश आहे. यामध्ये राजा रवि वर्मा अमरीता शेरगील, जामिनी रॉययांच्या चित्रकलाकृतीचे जतन करण्यात आलेले असून त्याचीकालानुक्रमे मांडणी कला दालनामध्ये करण्यात आलेली आहे.

### ७. नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न आर्ट, मुंबई :-

हे कला दालन १९९६ मध्ये लोकांसाठी सार्वजनिक करण्यात आले असून यामध्ये वेगवेगळ्या नामवंत कलाकारांच्या कलाकृती, शिल्पाकृती, वास्तुकृती आणि विविध संस्कृत्यांच्या चित्राकृती जतन करण्यात आलेल्या आहेत. हे कला दालन कुलाबा या ठिकाणी स्थित आहे.

## ८. नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट, न्यू दिल्ली :-

'भारतीय सांस्कृतिक मंत्रालय' द्वारे २९ मार्च १९५४ रोजी दिल्ली येथील जहाँगिर हाऊसमध्ये कलादालन स्थापन करण्यात आले. देशातील व परदेशातील विविध कलाकारांच्या माध्यमातून तयार केलेल्या सुमारे १४००० पेंटींगजचे कला दालन उभारलेले असून त्यामध्ये नामवंत चित्रकार थॉमस डॅनियल, राजा रवि वर्मा, जामिनी रॉय, अमृता शेर गिल यांच्या चित्राकृतीचा समावेश होतो. हे जगातील सर्वाधिक मोठे कला दालन आहे. या कला दालनामध्ये १९५७ च्या उठावांच्या कलाकृती संवर्धित केलेल्या असून आधुनिक कालखंडापर्यंत विविध कलाकृतींचे प्रदर्शन या ठिकाणी करण्यात आलेले आहे.

## ९. नॅशनल म्युझियम, न्यु दिल्ली :-

सन १९४९ मध्ये हे वस्तुसंग्रहालय अस्तित्वात आले. यामध्ये भारतातील सर्वात जुन्या कलाकृती संवर्धित व जतन करण्यात आलेल्या आहेत. या कलादालनामध्ये मुघल, राजस्थानी, शिख, डेक्कन, काश्मीरी चित्रकारांच्या चित्राकृती असलेल्या आढळतात. इ.स. १० वे शतक ते ३.२० च्या शतकापर्यंतच्या विविध कलाकृती यामध्ये असलेल्या आढळतात.

## १०. व्हिक्टोरिया मेमोरियल कोलकत्ता :-

व्हिक्टोरिया मेमोरियल कोलकत्ता हे कलादालन सन १९२१ मध्ये सार्वजनिक स्वरूपांत सुरू करण्यात आले. यामध्ये विभिन्न कला दालन असून त्यामध्ये भारतीय, परदेशी पेंटीग्ज, कलकत्ता गॅलरी, रॉयल गॅलरी, भारतीय पेटींग्ज असे स्वतंत्र विभाग कलादालनांचे असलेले आढळतात. रॉयल गॅलरी ही व्हिक्टोरिया राणीला अर्पित करण्यात आली असून परदेशी नामवंत चित्रकार चार्लस डॉयली, जॉन झॉफनी, विल्यम हेजस, विल्यम सिम्पसन इ. चित्र कलाकृती संवर्धित व जतन करण्यात आलेल्या आहेत.

## ११. आकृती आर्ट गॅलरी :-

आकृती आर्ट गॅलरी ही भारतीय आधुनिक ऑर्ट गॅलरी असून ती कोलकत्ता व न्यु दिल्ली या दोन भागातून चालविली जाते. यामध्ये पेंटींग्ज, शिल्पाकृती, प्रिंटमेकींग्ज, व्हिडिओ आर्ट. या माध्यमातून प्रदर्शित केले जाते. कलाप्रेमींसाठी ऑनलाईन स्वरूपांत एखादी कलाकृती विकत घेण्याची परवानगी असून ती केवळ ऑनलाईनच खरेदी करता येते. याचा प्रमुख उपदेश प्रमुख समकालीन कलाकृतीना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवणे असा आहे.

## १२. जवाहरलाल कला केंद्र, जयपूर :-

जवाहरलाल कला केंद्रांच्या विविध शाखा असून ३ जयपूर या ठिकाणी स्थित आहे. यांची बांधणी राजस्थान सरकारद्वारा करण्यात आलेली असून त्यामागचा प्रमुख उद्देश राजस्थानी कला व हस्तकौशल्य कारागिरी' संवर्धित व जतन करणे होय. हे कला दालन अतिशय भव्य असून ८ विभिन्न गृहे, १ ॲम्फी

थियटर, २ कायमस्वरूपी कला दालने व ३ इतर कला दालने असून याठिकाणी दरवर्षी थिअटर फेस्टीवल भरविण्यात येतो.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-2

**अ) खालील रिकाम्या जागी अचूक पर्याय निवडून पुन्हा लिहा.**

१. प्राचीन काळातील ........... या वेदांस संगीत कलेचा वेद म्हटले जाते.

*अ) ऋग्वेद* *ब) यजुर्वेद* *क) अर्थव वेद* *ड) गंधर्व वेद.*

२. मध्ययुगात .............. च्या माध्यमातून भक्तीसंगीत कला प्रकाराचा विकास झाला.

*अ) देव संप्रदाय* *ब) वेद संप्रदाय* *क) कवी संप्रदाय* *ड) भक्ती संप्रदाय.*

३. .............. हे भारतातील शहनाई वादक आहेत.

*अ) उस्ताद बिस्मिल्ला खान* *ब) अमीर हुसेन खाँ*

*क) रुस्तम सोपोरी* *ड) दादा मोडक.*

४. भारतातील पहिले वस्तुसंग्रहालय .............. साली स्थापन झाले.

*अ) १७८४* *ब) १८१४* *क) १८५७* *ड) १८६१.*

५. मुंबई येथे १९५२ साली ............... या आर्ट गॅलरीची स्थापना झाली.

*अ) नॅशनल* *ब) भारतीय* *क) जहागिर* *ड) आकृती.*

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा.**

१. हालगी हे कोणत्या वाद्यवर्गातील वाद्य आहे?

२. गरबा नृत्य कोणत्या उत्सवात करतात.

३. महाराष्ट्रातील नाट्यकलेचे आद्यप्रवर्तक कोण होते?

४. श्री भवानी चित्रवस्तुसंग्रहालय हे कोणत्या प्रकारातील संग्रहालय आहे?

५. नॅशनल गॅलरी ऑफ आर्ट नवी दिल्ली हे कलादालन कोणी स्थापन केले?

## ३.२.३ भारतीय सण आणि उत्सव

प्राचीन काळापासून भारत विविध परंपराने व विविधतेने नटलेला देश म्हणून ओळखला जातो. विविध पंथ, धर्म, जात, भाषा, विचार आदी बाबतीत असलेली विविधता असली तरी भारतीय संस्कृतीची एकात्मता कायम आहे. भारतात विविध पंथ, धर्म, जाती, संस्कृतीमध्ये वर्षभर विविध सण आणि उत्सव साजरे करण्याची प्रथा आहे. सण-उत्सव यांच्या माध्यमातून लोक जीवनात आनंद वातावरणाची निर्माती

होऊन तेथील वातावरणात मंगलमयता, चैतन्य निर्माण होण्यास मदत होते. सण-उत्सवांच्या निमित्ताने लोकांना आपल्या दैनंदिन जीवनातून विसावा मिळून हौस-मौज, गौड-धोड जेवण करण्यास उसंत मिळते. सण-उत्सव काळात आबाल-वृध्द लोक एकत्रित येऊन एकमेकांशी हितगुज तसेच आपल्या सुप्त भावभावना पारंपारिक लोकगीत, लोकसंगीत याचा आविष्कार करतात. सण-उत्सव साजरे करण्यापाठीमागे धार्मिकता, रूढी, परंपरा, श्रध्दा यांचे अधिष्ठान लाभले असून त्या माध्यमातून लोक परंपरेचे एकप्रकारे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होत असते. भारतीय सण-उत्सव यांच्या पाठीमागे काही ज्ञान, विज्ञान, निसर्ग, आरोग्य, आयुर्वेद, कृषीजीवन, लोकपरंपरा यांचा सहसंबंध असल्याचे दिसते.

सण-उत्सव म्हणजे आनंद उत्साहाचा क्षण मानला जातो. 'सण' हा शब्द 'क्षण' या संस्कृत शब्दावरून आला आहे. 'क्षण'-'छण'-'सण' अशी 'सण' या शब्दाची उत्पत्ती दिली आहे. हेमचंद्र कृत प्राकृत व्याकरण या ग्रंथात 'छण' शब्दाचा अर्थ 'उत्सव' असा दिला आहे. मेघदूत, दशकुमारचरित, श्रीमद् भागवतगीता आदी संस्कृत ग्रंथामध्ये 'क्षण' हा शब्द उत्सव या अर्थाने आलेला आहे. ''ज्या एखाद्या धार्मिक समारंभात तो करणाऱ्या व त्यामध्ये भाग घेणाऱ्या, सहभागी होणाऱ्या लोकांना हर्ष, आनंद आणि मन:प्रसाद यांचा अनुभव घडतो, त्यास उत्सव असे म्हटले जाते.'' अशी व्याख्या भारतीय संस्कृती कोशकरांनी उत्सव बाबत दिली आहे.

सण-उत्सव बाबतच्या व्याख्या व अर्थ लक्षात घेता सण आणि उत्सव यांना धार्मिक व लौकिक अशा दोन बाजू असल्याचे दिसून येते. भारतातील सण-उत्सव हे वेगवेगळ्या पुराणकथा, मिथके यांच्याशी जोडली गेलेली आहेत. त्यातील काही सण-उत्सव समारंभात धार्मिकतेला फार महत्त्व दिले जाते. तर काही सण-उत्सव समारंभात धार्मिक बाबींचा थोडा अंश असेल किंवा ते सण-उत्सव समारंभ पूर्णत: धर्मनिरपेक्ष असतात. सण-उत्सव यामध्ये सामुदायिकता व एकोपा आदी घटक अत्यंत महत्त्वपूर्ण असतात. समाजातील व्यक्तीना एकत्रित करण्याचे व त्यांच्या भाव-भावना, कल्पना यांना प्रेरित करण्याचे 'क्षण' म्हणजे सण-उत्सव होय. सण-उत्सव यांच्या निमित्ताने समूह भोजन, गायन, संगीत, नृत्य, भजन, कीर्तन, तमाशा, नाटक, मैदानी खेळ, प्राण्यांच्या शर्यती आदी विविध घटकांत लोक उत्साहाने सहभागी होतात.

भारतीय समाज मोठ्या प्रमाणावरती शेती व्यवसायावरती अवलंबून आहे. त्यामुळे शेतात राबणाऱ्या शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर वर्गांना आपल्या जीवनातील आनंद घेता यावा यासाठी गुढीपाडवा, वटपौर्णिमा, नागपंचमी, राखी पौर्णिमा, बैलपोळा, दसरा, दिवाळी, वेळ अमावस्या, मकर संक्रांत, होळी, जत्रा, यात्रा आदी सण उत्सव साजरे होताना दिसतात. भारतीय सण उत्सव हे विशिष्ट महिन्यात, विशिष्ट तिथी, ठराविक ऋतू, ठराविक दिवशी साजरे करण्यास महत्त्व दिले आहे. निसर्गातील ऋतुचक्र व प्रत्येक ऋतुमानात घेतली जाणारी, येणारी विविध पिके, फळे, पाने, फुले, झाडे ही त्या-त्या ऋतुकाळात येणारे सण-उत्सव या निमित्त अन्नपदार्थ म्हणून वापरण्याची प्रथा, परंपरा ह्या खाद्यसंस्कृतीशी जोडलेल्या गेल्याचे दिसून येतात. या सण-उत्सव व जत्रा-यात्रा यांच्या माध्यमातून त्या-त्या प्रदेशातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक. धार्मिक जीवनाची ओळख होऊन पर्यटनांस चालना मिळण्यास मदत होते.

## ❑ हिंदू धर्मातील पारंपारिक सण व उत्सव

भारतीय उपखंडातील अनेक धर्म संस्कृतीपैकी हिंदू धर्म संस्कृती ही सर्वात प्राचीन धर्म संस्कृती म्हणून ओळखली जाते. हिंदू धर्मात प्राचीन काळापासून संस्कृतीचे व परंपराचे संमिश्रण होत जावून वेगवेळ्या उपासनापध्दती, मत, दर्शने, संप्रदाय यांच्याबरोबरच सण व उत्सव परंपरा निर्माण झाल्या आहेत. त्यातील प्रमुख सण उत्सव पुढीलप्रमाणे :-

### ❋ मकरसंक्रांत :-

पौष महिन्यातील एकमेव सण म्हणजे मकरसंक्रात होय. निसर्गाच्या दृष्टीने हा सण महत्त्वपूर्ण असून त्यांस सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. मकरसंक्रांत हा निसर्गाचा सण म्हणून त्याकडे पाहिले जाते. मकर सक्रांत म्हणजे सूर्यांचा मकर राशीमध्ये प्रवेश होणे होय. संक्रमण म्हणजे ओलांडू जाणे. संक्रातीच्या दिवशी सूर्य दक्षिणेकडून उत्तरेकडे जाऊ लागतो. सूर्याच्या या स्थितीस उत्तरायण असे म्हटले जाते. मकर संक्रांत या दिवसापासून भारतीय उपखंडात दिवस आणि रात्र यांचा कालावधी बदलत जावून दिवसाचा कालावधी मोठा होतो व रात्र लहान होत जाते. मकर संक्रांतीपासून सूर्यप्रकाश अधिक मिळू लागल्यामुळे मानवी जीवनावरती परिणाम होतात. मकर संक्रांतीदिवशी आप्तस्वकीयांना तीळगुळ वाटून 'तीळगुळ घ्या आणि गोड बोला' असे म्हणून स्नेह वृध्दिगत होण्यासाठी शुभकामना करतात. मकरसंक्रांत सणास सुवासिनी स्त्रीया मातीच्या पाच घट व पाच बोलीत स्थानिक ठिकाणी पिकवली जाणारे पिकांचे दाणे तसेच स्थानिक फळे भरलेल्या मातीचा घटांस वाण असे म्हणतात. या मातीच्या घटाना सुघट, सुगड या नावानेही संबोधले जाते. वाण घेऊन स्त्रीया मकरसंक्रांती सणांदिवशी ग्रामदवेवतेला ओवाळतात. तसेच इतर सुवासिनी स्त्रीयांबरोबर हळदी-कुंकू कार्यक्रम करून एकमेकांना तीळगुळ देऊन एखादी संसार उपयोगी वस्तू एकमेकींस भेट देतात. मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी भोगी साजरी केली जाते. यामध्ये मुगाच्या डाळीची खिचडी, तीळ लावलेली भाकरी, लोणी, पालेभाज्या यांचे एकत्रितपणे शिजवून खेदट केले जाते. प्रथम खेदटांचा नैवेद घरातील देव-देवतांना समर्पन करून नंतर घरातील सर्व मंडळी त्याचे सेवन करण्याची परंपरा आहे.

### ❋ धनत्रयोदशी :-

आश्विन महिन्याच्या १३ व्या दिवशी धनत्रयोदशी/धनतेरस हा सण साजरा करतात. या सणांच्याबद्दलची एक परंपारिक कथा हिंदू धर्मात प्रचलित असल्याची दिसून येते. 'जेव्हा असूरांबरोबर इंद्रदेव यांनी महर्षि दुर्वास यांच्या शाप निवारणासाठी समुद्र मंथन केले, तेव्हा त्या समुद्र मंथनातून लक्ष्मी देवी प्रकट होऊन तिने आपल्याबरोबर धन्वंतरी अमृत कुंभ बाहेर आणला. अशा प्रचलित पारंपारिक कथेतून या दिवशी लक्ष्मी देवतेबरोबर धन्वंतरीची ही यादिवशी पूजा करतात. आर्युवेद शास्त्रात हा दिवस धन्वंतरी जयंती म्हणून त्याकडे पाहिले जाते. वैद्य मंडळी यादिवशी धन्वंतरी (देवांचा वैद्य) ची पूजन करून प्रसाद म्हणून

कडूनिंबाच्या पानांचे बारीक तुकडे करून त्यामध्ये साखर मिसळून ते लोकांना प्रसाद म्हणून वाटतात. तसेच धनत्रयोदशी सणानिमित्त सोने-चांदी यापासून बनवलेली भांडी, नाणी, आभूषणे खरेदी करण्याची प्रथा-परंपरा हिंदू धर्मातील लोकांच्यात असल्याचे दिसून येते.

## ❋ होळी :-

भारतातील विविध भागामध्ये होळी सणास होळी पौर्णिमा, वसंतोत्सव, धुळवड, रंगपंचमी, होलिकादहन, शिमगा, हुताशनी महोत्सव, दोल यात्रा, कामदहन, गौर पौर्णिमा आदी नांवानी संबोधले जाते. हिंदू पंचांगानुसार फाल्गुनी पौर्णिमा ते फाल्गुन वद्य पंचमीपर्यंत दोन ते पाच दिवस होळी सणांचा उत्साह वेगवेगळ्या भागात साजरा करण्याची प्रथा प्रचलित आहे. होळी या सणांबद्दल हिंदू धर्मामध्ये वेगवेगळ्या आख्यायिका प्रचलित असल्याचे दिसून येतात. होळीच्या सणांदिवशी झाडाच्या फांद्या, पाला, गव्हाचे काड, शेणकुटीपासून बनविलेल्या होळीस मंत्रोच्छारात पेटविले जाते. या पेटलेल्या होळीभोवताली लोक प्रदक्षिणा मारत बोंब मारतात. होळीस नारळ अर्पण करून पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची परंपरा असते. होळीच्या दुसऱ्या दिवशी धुलिवंदन साजरी केली जाते. त्यांस 'धुळवड' असेही म्हटले जाते. यात होळीची राखेची उधळण करून एकमेकांवरती गुलाल रंगाची उधळण करतात. होळीनंतर ५ व्या दिवशी रंगपंचमी साजरी करताना एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो.

शेतकरी वर्ग होळी सणात कृष्ण-बलराम या देवतांचे स्मरण करून पूजा करतात. शेतात आलेली नवीन पिके देवतांना प्रसाद म्हणून अर्पण करण्याची प्रथा शेतकरी वर्गात प्रचलित आहे. कोकणात होळी सणांस शिमगो असे म्हटले जाते. हा सण कोकण भागात सुमारे १५ दिवस साजरा केला जातो. यामध्ये होम, होळी अग्नी, पूजा, पालख्या, प्राणीबळी, रंगोळ्या, ग्रामदेवतेची पूजा, बाहुला-बाहुलीचे लग्न आदी विविध स्थानिक प्रथा-परंपरानियुक्त होळी सणांचा उत्सव साजरा करण्याची प्रथा कोकण भागातील शेतकरी वर्गात प्रचलित आहे.

समुद्र किनारपट्टीतील कोळी समाजबांधव होळी सणांच्या दुसऱ्या दिवशी आपल्या होड्यांची पूजा करून स्त्रीयांना होडीवरती जाण्याचा मान दिला जातो. कोळी समाजात होळी सणांत स्त्रीयांना विशेष मान दिला जातो. पूजेसे साहित्य, फळे, खाद्यपदार्थ आदी साहित्य घेऊन पारंपारिक वेशभूषेत कोळी समाजातील स्त्रीया समुद्रातील नांगरून ठेवलेल्या होडीची पूजा करून समुद्रातून होडीतून फेरी मारत-मारत होड्या किनाऱ्यावरती आणल्या जातात. आदिवासी जमातीत होळी सणांचा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून स्त्री-पुरुष उत्साहितपणे साजरा करून भोजनामध्ये गोडधोड पदार्थांबरोबर मासळी, गोड भात यांचे सणांनिमित्त विशेष आयोजन केले जाते. आदिवासी स्त्रीयां होळी सणादिवशी पारंपारिक वेशभूषा, दागदागिने परिधान करून स्त्री-पुरुष वाद्यांच्या तालावरती त्यांची पारंपारिक नृत्य करण्याची प्रथा, परंपरा प्रचलित असल्याचे दिसते.

## ❋ गुढीपाडवा :-

हिंदू धर्मातील प्रथा, परंपरांनुसार हिंदू वर्षाची हिंदू दिनदर्शिका, पंचांग प्रमाणे नववर्षाची सुरुवात गुढी पाडवा सणाच्या दिवसापासून मानली जाते. हिंदू धर्मात चैत्र शुध्द प्रतिपदेला साजरा होणारा गुढीपाडवा सणांचा दिवस हिंदू पुराणात सांगितल्याप्रमाणे साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त महत्त्वपूर्ण मानले जाते. गुढीपाडवा सण प्रामुख्याने मराठी, कोकणी, कानडी व तेलगू भाषिक भागामध्ये मोठ्या उत्साहात साजरा होतो. कर्नाटक व आंध्र प्रदेशात प्राचीन काळातील गौतमीपुत्र यांचा राज्यात स्वातंत्र्य प्राप्तीचा विजयदिन व आनंदाचा दिवस म्हणून जो उत्साह साजरा करण्याची प्रथा प्रचलित झालो. तो दिवस म्हणजे गुढीपाडवा सणाचा दिवस असल्याचे मानले जाते.

गुढीपाडवा सणांच्या शुभदिनी घरोघरी हिंदू नववर्षानिमित्त बांबू वृक्षाची उंच वेळूच्या काठीच्या टोकाला तांबडे, अथवा रेशमी वस्त्राचे कापड, अथवा साडी गुंडाळून त्यामध्ये कडुनिंबाची डहाळी, आंब्याची पाने, फुलांचा हार लावून त्यावरती तांब्या, पितळ धातूचे गडू अथवा फुलपात्र बसवून घराच्या प्रवेशद्वारावरती लाकडी पाटावरती गुढीचा बांबू उभारला जातो. गुढीच्या काठीस गंध, फुले, अक्षता वाहून गुढीची पूजा करून दूध साखर, पेढा, शेवया व डाळ, गुळ आणि कडुलिंबाचा पाला यापासून तयार केलेल्या मिश्रणांचा नैवेद्य गुढी पुढे ठेवण्याची व नैवेद्यसाठी तयार केला पदार्थ कुटुंबात प्रसाद म्हणून वाटण्याची प्रथा, प्रचलित असल्याचे दिसून येते. सूर्यास्तापूर्वी गुढीला पुन्हा हळूद-कुंकू, फुले वाहून अक्षता टाकून गुढी उतरवण्याची प्रथा असते. गुढीपाडवा सणांदिवशी आनंद साजरा करीत आप्तेष्टांना, मित्रपरिवारांना नववर्षाचे अभिष्टचिंतन केले जाते. शेतकरी वर्गात गुढीपाडवा हा सण नवीन कामाच्या सुरुवात करण्यासाठीचा शुभ दिवस म्हणून मानला जातो. यादिवशी शेतकरी शेती उपयोगी साहित्य खरेदी तसेच विहीर खुदाई, घर बांधणीसाठी सुरुवात करतो. तसेच आपल्याजवळ असणारे पशुधन यांना धुवून त्यांना रंग लावून सजवण्याबरोबरच पशुंच्या पायाचे नखे, शिंगे यांना व्यवस्थित करण्याचे प्रामुख्याने शेतकरी वर्गात कार्य करण्याची प्रथा, परंपरा प्रचलित आहे.

## ❋ रामनवमी :-

श्री विष्णू देवतेचा सातवा अवतार म्हणून श्रीराम यांच्या जन्मदिवस श्रीरामनवमी चैत्र शुध्द नवमीला साजरा करण्याची प्रथा आहे. रामजन्माच्या दिनानिमित्त मठ-मंदिरात भजन, पूजन, किर्तन, प्रवचन, पोथीवाचन इ. कार्यक्रम सोहळा साजरा करण्याची परंपरा आहे.

## ❋ अक्षय्यतृतीया :-

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वैशाख शुध्द तृतीया या दिवशी येणाऱ्या अक्षय्यतृतीया या सणांस साडेतीन शुभमुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त साजरा करण्याची प्रथा आहे. अक्षय्यतृतीया या दिवसापासून उत्तराखंडातील बद्रीनारायण मंदिराचे दरवाजे उघडले जावून ते दिपावली भाऊबीज या सणांदिवशी बंद करण्याची प्रथा आहे.

अक्षय्यतृतीया या दिवशी दान व हवन केले तर त्याचा क्षय होत नसतो. म्हणून देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते ते अविनाशी अक्षय असे मानले जाण्याची प्रथा हिंदू धर्मियांच्यात प्रचलित आहे. अक्षय्यतृतीयाला हिंदू धर्मीय आपल्या पूर्वजांचे ऋण फेडण्याचा दिवस मानतात. यादिवशी पूर्वजांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून विविध गोडधोड पदार्थांचा नैवेद्य दावून तो नैवेद्य पशुपती तसेच पाळीव प्राण्यांना ग्रहण करण्यासाठी ठेवण्याची प्रथा, परंपरा प्रचलित आहे. शेतकरी वर्ग यादिवशी आपल्या शेता जमिनीचे पूजन करून बी-बियाणे, तसेच नवनवीन वृक्ष झाडे यांचे रोपण करण्यास सुरुवात करतो.

### ❋ गुरुपौर्णिमा :-

प्राचीन काळात भारतामध्ये गुरुकूल शिक्षण पध्दती अस्तित्वात होती. हिंदू धर्मात देवदेवतांना जितके महत्त्व विविध देव-देवतांना दिले जाते, तेवढेच महत्त्व गुरूना दिले जात असल्याने गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आषाढ पौर्णिमा या दिवशी गुरूंच्या स्मृतीस समर्पित करण्याची प्रथा आहे. गुरू या शब्दाचा अर्थ खूप व्यापक स्वरूपाचा आहे. ते स्वरूप पुढील श्लोकातून दिसून येते.

***गुरु ब्रह्मा गुरु विष्णू गुरू देव महेश्वर।***
***गुरू: साक्षात् परब्रह्म, तैस्मय: श्री गुरूवे नम:।।***

या श्लोक मधून गुरूला वंदन करून गुरू ला देवतुल्य चा दर्जा दिल्याचे दिसून येते.

गुरूपौर्णिमा हा सण शाळेत, मठ, मंदिर, अभ्यास मंडळ, आश्रम, गुरुकुल इत्यादी ठिकाणी उत्साहात साजरा करण्याची प्रदीर्घ परंपरा आहे. आपल्या गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करून गुरूजनांना विद्यार्थी फुले देवून, भेटवस्तू देवून, नारळ-हार आदी गोष्टीतून शिष्य आपल्या गुरूचे नमन करून आपल्या मनात, जीवनात गुरूजनांचे असलेले अनन्य भावाची शरणांगती व्यक्त करण्याची प्रथा आहे.

### ❋ रक्षाबंधन :-

श्रावण महिन्यातील नारळी पौर्णिमाच्या दुसऱ्यादिवशी राखी पौर्णिमा साजरी केली जाते. याला 'रक्षाबंधन' असे संबोधले जाते. रक्षाबंधन हा सण बहीण भावाच्या अतूट, उत्कट प्रेमाची आठवण करून देणारा आहे. बहिण आपल्या भावाचा उत्कर्ष व्हावा, त्यांस दिर्घायुष्य लाभावे, आपल्या भावाने आपले रक्षण करावे, ही मनोकामना रक्षाबंधनाच्या सणा निमित्त करते. यादिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावरती राखी बांधते. रक्षाबंधन या सणातून परस्पर मित्रत्व, स्नेह, प्रेम वृध्दिंगत करण्याची प्रथा आहे.

### ❋ जन्माष्टमी :-

श्रीकृष्ण ही देवता हा माधव, गोपाळ, मुकुंद, मुरारी, मधुसुदन, श्रीहरी, श्रीकृष्ण इ. अनेक नावांने

ओळखली जाते. जन्माष्टमी उत्सवानिमित्त दही, दूध, लोणी एकत्रित करून ते कालविले जाते. यालाच दहीकाला असे म्हटले जाते. जन्माष्टमीच्या आदल्यादिवशी रात्री कथा, पुराण, नृत्य, गीत आदी कार्यक्रमांतून श्रीकृष्ण देवताचा जागर करण्याची प्रथा आहे. जन्माष्टमीच्या दुसऱ्यादिवशी प्रामुख्याने गोपालकाला, गवळणकाला, दहीहंडी या वैशिष्ट्यपूर्ण उत्साह साजरा करण्याची प्रथा आहे. या उत्सवानिमित्त दहीकाला तयार करून त्याचे सेवन केले जावून ''गोविंदा आला रे आला, गोकुळात आनंद झाला'' आदी गाणे गात अनेक लहानथोर पुरुष मंडळी एकत्रितपणे उंचावरती मातीच्या मडक्यात बांधून ठेवलेली दहीहंडी मानवी मनोऱ्याच्या सहाय्याने फोडण्याची प्रथा प्रचलित असते. दहीहंडी उत्साहानंतर जन्माष्टमी उत्साहाची सांगता होते.

## ❋ पोळा :-

श्रावण महिन्यातील अमावास्या किंवा भाद्रपद अमावास्या यादिवशी 'पोळा' हा सण उत्साहात साजरा करण्याची प्रथा प्रचलित आहे. या सणांस बैल पोळा असेही संबोधले जाते. तसेच कर्नाटक भागात 'बेंदूर' म्हणून हा सण वटपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी साजरा करण्याची परंपरा आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. शेतकऱ्यास आपल्या पशुधनप्रती विशेषत: बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सण म्हणून यास महत्त्व असते. हा सण विशेषत: महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तेलंगणा तसेच कर्नाटक भागात वटपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी मोठ्या उत्साहात शेतकरी वर्ग साजरा केला जातो. पोळा या सणांच्यादिवशी विशेषत: शेती काम करण्यास उपयुक्त व शेती काम करण्यासाठी ज्या-ज्या पशूंचा वापर केला जातो, त्या-त्या पशूंना विशेषत: बैल या प्राण्यांचा सर्व कामातून त्यास विश्रांती दिली जाते. पोळा सणांच्या आदल्या दिवशी सायंकाळी पशुधनाची 'खांदे मळणी' केली जाते. खांदे मळणी म्हणजे पशुं खांद्याच्या शरीर भागावरती हळद आणि तूप यांचे मिश्रण केलेले घट्ट स्वरूपातील तेलद्रव्य चोळले जाते. यांस खांद शेकणे, खांड शेकणे असेही म्हटले जाते.

पोळा सणादिवशी शेतकरी घरामध्ये आनंदाचे, उत्साहाचे वातावरण असते. आपले पशु, विशेषत: बैल सर्वात उठावदार दिसावा म्हणून शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांचा साजशृंगार करून त्यांची गाव भागात सवाद्य मिरवणूक काढण्याची प्रथा असते. गावभागातील सर्व शेतकऱ्यांचे उठावदार, रूबाबदार पशूंचे दृश्य मन मोहून टाकणारे असते.

## ❋ नवरात्रोत्सव :-

आश्विन महिन्यातील शुध्द प्रतिपदा ते नवमी दिवसापर्यंतचा काळ नवरात्रोत्सव म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे. नवरात्रोत्सवाचा कालखंड हा तिथीनुसार ८ ते १० दिवस इतका असून या प्रत्येक दिवशी वेगवेगळे उपक्रम, उपासना केल्या जातात. हिंदू धर्मात विशेष स्त्री-देवीची आराधना करण्याचा उत्साह म्हणून नवरात्रोत्सव साजरा केला जातो. भारतातील विविध प्रांतात हा उत्साह ९ दिवस स्त्री

आदिशक्ती देवीची आराधना करण्याचा कालखंड म्हणून साजरा केला जातो. उग्र व सौम्य अशा दोन रूपांमधील विविध स्त्री देवता हिंदू धर्मात प्रचलित असल्याचे दिसून येते. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी या देवींना सौम्य रूप म्हणून मानले जाते तर दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा या देवींना उग्र रूप म्हणून हिंदू धर्मात मानले जाते. या उग्र आणि सौम्य देवींची शैलपुत्री, ब्रम्हचारिणी, चन्द्रघंटा, कुष्मांडी, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी व सिध्दीक्षत्री इत्यादी ९ एकत्रित रूपे नवरात्रोत्सवात साजरा केले जाते. नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजे आश्विन शुध्द प्रतिपदेदिवशी हिंदू लोक आपल्या घरी घट स्थापन करून सुरुवात करतात, त्यांस 'घटस्थापना' म्हटले जाते. या नवरात्रीत देवीपुढे अखंड दिप लावून देवीची उपासना, जप, ग्रंथवाचन, देवीची भजने, स्तोत्र इ. विविध पध्दतीने नवरात्रोत्सव साजरा केला जातो.

## ❋ दसरा :–

आश्विन शुध्द दशमी या दिवशी 'दसरा' हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्याची प्रथा आहे. दसरा या सणांस 'विजयादशमी' म्हणून ही संबोधले जाते. चामुंडा देवीने महिषासूर राक्षसाचा युध्द करून आश्विन शुध्द दशमीला पराभव करून वध केला अशी आख्यायिका आहे. तसेच श्रीराम देवाने ९ दिवस उपवांस करून स्त्री शक्तीची म्हणजे देवीची उपासना करून देवीना प्रसन्न करून घेऊन रावणाचा वध केल्याच्या आख्यायिका हिंदू धर्मात दसरा या सणाबद्दल प्रचलित आहे.

'दसरा' साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ मुहूर्त दिवस म्हणून मानले जाते. यादिवशी सिमोल्लंघन, शमीपूजन, अपराजिता पूजा व शस्त्रपूजा इत्यादी कार्यक्रम करण्याची परंपरा आहे. उत्तर भारतात यादिवशी ठिकठिकाणी रावण प्रतिमेचे दहन करण्याची प्रथा आहे. या सणाच्या मुहूर्तावरती बहुसंख्य लोकांच्यात नवीन खरेदीमध्ये शेती अवजारे, वाहने, नवे करार, नव्या योजनांचा प्रारंभ करण्याचा प्रघात लोकांमध्ये दिसून येतो.

## ❋ महाशिवरात्री :–

माघ महिन्यातील कृष्ण चतुर्दशी या तिथीदिवशी महाशिवरात्री साजरी करण्याची प्रथा आहे. अग्नीपुराण, शिवपुराण, पद्मपुराण आदी संस्कृत पुराण साहित्यामध्ये महाशिवरात्रीविषयक महत्त्व अधोरेखित केल्याचे दिसून येते. हिंदू धर्मातील भयंकर रूद्र, सौम्य व कल्याणकारी देवता म्हणून शिव देवतास ओळखले जाते. भारतामधील विविध प्रांतात शिव देवतेची विविध रूपामधील अनेक मंदिर असल्याचे दिसून येते. महाशिवरात्री या सणादिवशी भारतातील विविध ठिकाणाच्या शिव देवतेच्या विविध रूपातील मंदिरात शिवलिंगाची विशेष पूजा करण्याची परंपरा आहे. महाशिवरात्रीदिवशी शिवलिंगास पंचअमृताचा अभिषेक करून त्यांस धोत्रा आणि बेलाची पाने व पांढऱ्या रंगांची फुले वाहून शिवभक्त शिवदेवतेची पूजा करतो. महाशिवरात्रीनिमित्त शिवदेवतेची असलेले प्रसिध्द विविध तीर्थक्षेत्रे तसेच शिवदेवतेची बारा जोतिर्लिंगांच्या ठिकाणी विशेष पारंपारिक भरणाऱ्या यात्रांना मोठ्या संख्येने शिवभक्त भाविक दर्शनासाठी भेट देतात.

## ❋ नागपंचमी :-

श्रावण महिन्यातील शुध्द पंचमी या दिवशी साजरा केला जाणारा नागपंचमी हा सण भारतातील महत्त्वाचा सण म्हणून ओळखला जातो. या सणाबद्दल विविध आख्यायिका प्रचलित आहेत. श्रीकृष्णाने कालिया नावाच्या नागाचे दमन करून विजय प्राप्त केल्याच्या दिवसाचे प्रतिक म्हणून कृष्ण व नागाची पूजा प्रचलित होऊन नागपंचमी हा सण सुरू झाल्याची आख्यायिका आहे. नाग ही द्रविड लोकांचे दैवत असून आर्य व द्रविड यांच्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीतून नागपूजा सुरू झाल्याची आख्यायिका आहे. नाग हा प्राणी मनुष्य प्राण्यांस त्रास देणारा प्राणी असल्याचा प्राचीन काळापासून मनुष्याचा समझ होऊन त्याचे भय मनुष्याच्या मनात निर्माण झाल्यामुळे वर्षातून एक दिवस त्यांची पूजा केली तर त्यापासून भय राहणार नाही.

उत्तर प्रदेशातील काशी या ठिकाणी असलेला 'नागकूप' येथे नागाची पूजा करण्याची प्रथा आहे. बंगालमध्ये सर्पदेवता म्हणून मनसादेवीची, राजस्थानमध्ये पीपा, तेजा इ. नागदेवतांची पूजा करण्याची प्रथा आहे. नागांच्या मातीच्या, रक्तचंदनाच्या, हळदीच्या प्रतिमा, आकृत्या पाटावरती काढून त्यांची पूजा करण्याची प्रथा आहे. यावेळी लोक नागास दूध, लाह्या इ. पदार्थ वाहून त्यांची पूजा करतात. महाराष्ट्रातील बत्तीस शिराळा येथे जिवंत नागाची यात्रा भरविण्याची परंपरा आहे. स्त्रीया-मुली नागपंचमी सणानिमित्त गावाबाहेर जावून वारूळाची तसेच मंदिरातील नागाची पूजा करतात. नागपंचमी सणानिमित्त स्त्रीया-मुली झाडाला झोके बांधून गाणे म्हणत झोके खेळतात. तसेच फेर धरून नृत्य, झिम्मा-फुगडी आदी खेळही स्त्रीया नागपंचमी सणानिमित्त खेळून आनंदोत्सव करतात.

## ❋ दिवाळी :-

हिंदू संस्कृतीतील एक प्रमुख सण उत्सव म्हणून दिवाळी मोठ्या उत्साहात, आनंदाने साजरा केला जातो. हिंदू पंचांगाप्रमाणे आश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुध्द द्वितिया या तिथीतील सहा दिवसाचा कालावधी दिवाळी साजरी करण्याची प्रथा आहे. या सणानिमित्त घराबाहेर तेलाचे लहान दिवे व उंच जागेवरती आकाश दिवा (आकाश कंदील) लावण्याची प्रथा आहे. 'यक्षरात्री' असे दिपावलीचे नाव हेमचंद्र तसेच वात्सायन यांनी आपल्या ग्रंथात नोंदवलेचे दिसून येते. नीलमत पुराणात या सणास 'दीपमाल', हर्षवर्धनकृत नागनंद नाटकात या सणांस 'दीप प्रति पदुस्सव' ज्योतिषरन्तमाला या ग्रंथात या सणांस दिवाळी, भविष्योत्तर पुराणात 'दीपालिका', काल्विवेक ग्रंथात 'सुखरात्रि', व्रतप्रकाश ग्रंथात 'सुख सुप्तिका' इ. प्राचीन ग्रंथातील दिवाळी सणांबद्दलचे उपरोक्त विविध उल्लेख नांवे आढळतात.

दिवाळी सणांतील प्रत्येक दिवसाचे विशेष महत्त्व आहे. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चथुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा आणि भाऊबीज इ. साजरे केले जातात. वसुबारस या दिवशी सुवासिनी स्त्रीया गाईची पूजा करतात. धनत्रयोदशी निमित्त घरोघरी बहिण आपल्या भावांस मंगलस्नान घालून ओवाळणी

करून दीप लावते. नरकचतुर्दशी यादिवशी बहिण आपल्या भावाला सूर्योदयापूर्वी मंगलस्नान घालून ओवाळणी करते. लक्ष्मीपूजन निमित्त घरोघरी अष्टदल कमळ फुलावरती लक्ष्मी देवतेची स्थापना करून तिची पूजा केली जाते. लक्ष्मीदेवी ही सौंदर्याचे, प्रेमाचे व वैभवाचे प्रतिक मानून तिची मनोभावे पूजा लक्ष्मीपूजनादिवशी करण्याची प्रथा आहे. बलिप्रतिपदा हा दिवस दिपावली पाडवा, दिवाळी पाडवा म्हणून साजरा केला जातो. बलिप्रतिपदा हा दिवस साडेतीन शुभ मुहूर्तापैकी अर्धा मुहूर्त मानला जातो. विष्णू देवतेने वामनावतार घेऊन बळीराजाला पाताळी लोटून दीपदान करील त्यास यमयातना भोगाव्या लागणार नाहीत असा वर वामनाने बळीला दिल्याची आख्यायिका प्रचलित आहे. या दिवसापासून विक्रम संवत कालगणना सुरू झाली म्हणून यांस दिवाळी पाडवा असे म्हटले जाते. बालप्रतिपदा या दिवशी पत्नी आपल्या पतीला ओवाळून गोवर्धनपूजा करण्याची प्रथा असल्याचे दिसून येते. भाऊबीज या दिवशी बहिण आपल्या भावाला ओवाळून भावाविषयी शुभ चिंतन आनंद व्यक्त करते.

### ❋ रथयात्रा :-

हिंदू संस्कृतीमध्ये विशिष्ट दिवशी देवतेच्या उत्सवमूर्तीस रथामध्ये विराजमान करून जी मिरवणूक काढण्याची प्रथा आहे. तिला रथयात्रा किंवा रथोत्सव असे संबोधले जाते. 'रथ' या शब्दाचे वीर, शीर आदी अर्थ आहेत. देवतांनी दैत्यांवर जो विजय मिळवला त्या प्रित्यर्थ लोक विजयाच्या देवतांची मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्याची परंपरा आहे. वैष्णव पंथातील आख्यायिकेनुसार भगवान विष्णू रामेश्वर या ठिकाणी स्नान, द्वारका याठिकाणी शयन, बद्रीनाथ याठिकाणी ध्यान आणि जगन्नाथपुरी या ठिकाणी भोजन केल्यांच्या गोष्टी प्रचलित आहेत. भगवान जगन्नाथाचे दर्शन घेतल्याशिवाय चारधाम यात्रा पूर्ण होत नाही अशी धारणा आहे. आषाढ शुक्ल द्वितीय यादिवशी जगन्नाथपुरी या ठिकाणी रथयात्रा या उत्साहास प्रारंभ होतो. या रथयात्रेमध्ये बलराम यांच्या रथाला 'ताळध्वज', देवी सुभद्र यांच्या रथाला 'दर्पदलन' व भगवान जगन्नाथ यांच्या रथास नंदीघोष, गरूडध्वज म्हणून संबोधले जाते. वैष्णव जनामध्ये अक्रूराने कृष्णास व बलराम यांना गोकुळातून रथात बसवून मिरवत मथुरेत आणले, त्या दिवसापासून रथयात्रा उत्सवाची प्रथा सुरु झाली, अशी वैष्णवांची धारणा आहे. जगन्नाथपुरी येथे सर्वात मोठी रथयात्रा महोत्सव म्हणून प्रसिध्द केले. वैष्णव जनभाविक देवतांच्या मूर्ती ठेवून सजवलेला रथ जनसमुदायाच्या ताकिदी ओढतात.

## ❑ मुस्लिम धर्मियांचे सण-उत्सव

मुस्लिम धर्मियांनी धार्मिक, सामाजिक, भाषिक, व्यवहारिक, वैचारिक, शैक्षणिक, आर्थिक इत्यादी विविध बाबतीत आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे. धर्म उपासनेच्या माध्यमातून धार्मिक सणांना मुस्लिम समूहात दिले जाणारे महत्त्व त्याच्या पारंपारिक पद्धतीने साजरे केले जाणारे सण उत्सव पुढीलप्रमाणे :-

### ❋ ईद-ए-मिलाद :-

इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिवस मुस्लिम समाजात ईद-ए-मिलाद म्हणून

आनंदाने साजरा केला जातो. यादिवशी प्रेषितांच्या जीवनाचे दर्शन घडविणारे विविध कार्यक्रम, सभा भरवण्याची प्रथा आहे. इस्लामी दिनदर्शिकेनुसार रवि उल अव्वल या तिसऱ्या महिन्यातील १२ व्या दिवशी मोहम्मद पैगंबर यांचा जन्म दिनानुसार हा सण जगभरातील मुस्लीम बांधव साजरा करतात.

### ❋ शब-ए-मेराज :-

इस्लाम दिनदर्शिकेतील रज्जब महिन्यातील सत्ताविसाव्या दिवसाची रात्र ही शब-ए-मेराज म्हणून साजरी करण्याची प्रथा मुस्लिम समाजात प्रचलित आहे. या रात्री प्रेषित मोहम्मद पैगंबर यांना अल्लाह यांचे दर्शन व स्वर्गात सफर होवून अल्लाहकडून नमाज अदा करण्याविषयक आज्ञा प्राप्त झाली, असे मुस्लिम धर्मात मानले जाते.

### ❋ शब-ए-बारात :-

'शब्बान' या इस्लामी दिनदर्शिकेतील आठव्या महिन्यातील १४ व्या दिवशी शब-ए-बारात साजरा करण्याची परंपरा आहे. शब-ए-बारात या दिवशी मुस्लीम समाज कबरीस्तानात आपल्या पूर्वजांच्या कबरीसमोर जावून प्रार्थना करतात. इस्लाम धर्मातील शिय्या आणि सुन्नी या दोन्ही पंथातील लोक शब-ए-बारातची रात्र अल्लाहाची माफी मागण्यासाठी व आपल्या चुकांची कबुली अल्लाकडे देवून भविष्यातील सुख, शांती, यश समृध्दी यासाठी प्रार्थना करतात.

### ❋ रमझान :-

इस्लामी दिनदर्शिकेतील 'रमझान' हा नववा महिना इस्लाम धर्मात पवित्र महिना व उपवास करण्याचा महिना म्हणून ओळखला जातो. इस्लाम धर्मात पवित्र मानला जाणार 'कुरआन' हा धर्मग्रंथ निर्माण झाला असे मानले जाते. मुस्लीम समाज 'रमझान' या महिन्यात प्रामुख्याने रोजा, नमाज, तराविहची विशेष नमाज, शब-ए-कद्रची रात्र, कुरआन व जकातुल फित्र इ. विविध धार्मिक, पारंपारिक गोष्टी केल्या जातात.

रोजा म्हणजे पहाटे सूर्योदयापूर्वी न्याहारी करून संध्याकाळी सूर्योस्तानंतरच जेवण करून पाळला जाणारा उपवास असतो. सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंतच्या मध्यंतरीच्या काळात अन्नपाणी, खाणे-पिणे वर्ज मानले जाते. रोजा हा पूर्ण महिन्यातील ३० दिवस पाळला जातो. पहाटे फजरची नमाज, दुपारची जोहर नमाज, दुपारी सूर्यास्ताअगोदरची असरची नमाज, सायंकाळची मगरीब नमाज आणि रात्रीची इशाली नमाज इत्यादी विविध प्रकारातील नमाज रमझान महिन्यातील प्रत्येक दिवशी आदा करण्याची प्रथा आहे. रमझान महिन्यातील जकातुल फित्र (दानधर्म) हा महत्त्वाचा भाग इस्लाम धर्मात मानला जातो. आपल्या आर्थिक उत्पन्नातील २.५% भाग प्रत्येक व्यक्तीनी गरीब व गरजू कुटुंबाना दान करण्याची परंपरा आहे.

### ❋ रमझान ईद :-

इस्लाम दिनदर्शिकेतील 'रमझान' महिन्यातील कडक उपवासाची सांगता ज्या दिवशी केले जाते,

त्यास रमझान ईद (ईद उल फित्र) असे म्हटले जाते. रमझान ईद हा दिवस आनंदाचा सण म्हणून मुस्लिम समाजात प्रचलित आहे. या दिवशी मुस्लिम स्त्री-पुरुष बांधव सुवासिक तेल, अत्तर लावून, नवीन कपडे परिधान करून ईदच्या विशेष नमाजासाठी ईदगाह मैदान, मस्जिद या ठिकाणी एकत्रित येऊन नमाज आदा करतात. या दिवशीच्या विशेष नमाजास 'ईद-उल-फितर'ची नमाज असे संबोधले जाते. ईदच्या नमाजानंतर मुस्लीम बांधव एकमेकांना अलिंगन देवून ईद मुबारक अशा शुभेच्छा देतात. ईदच्या दिवशी घराघरात आप्तजनांना आपल्याकडे शिरखुर्मा/शिरखुरमा खाण्यासाठी आमंत्रित करण्याची प्रथा आहे.

### ❋ बकरी ईद :-

जिल्हज या इस्लामी दिनदर्शिकेतील महिन्यातील दहाव्या दिवशी बकरी ईद साजरी करण्याची प्रथा आहे. या सणांस 'ईद-उल-अजहा' म्हणून ही संबोधले जाते. या सणानिमित्त मुस्लीम धर्मियांच्या घरोघरी चौपाया जनावरांची विशेषत: बकरी प्राण्याची कुर्बानी देण्याची प्रथा आहे. कुर्बानी दिलेल्या प्राण्याच्या मांसाचे समान तीन हिस्से करून एक हिस्सा गोरगरीब व अनाथ एक हिस्सा आप्तस्वकीय व नातेवाईक यांना व एक हिस्सा स्वत: व शेजारी यांना वाटप करण्याची प्रथा आहे.

### ❋ मोहरम :-

'मोहरम' हा सण इस्लाम धर्माचे इमाम हुसेन व त्यांच्या अनुयायांच्या हौतात्म्याच्या पुण्य स्मृती म्हणून साजरा करण्याची परंपरा आहे. मोहरम इस्लाम दिनदर्शिकेतील पहिल्या महिन्याचे नाव असून मोहरम सण एकूण १० दिवस साजरा केला जातो. इस्लाम धर्मातील पवित्र मानल्या जाणाऱ्या विविध व्यक्तीमधील इमान हसम व हुसैन यांच्या दु:खद हत्येबद्दल शोक व्यक्त करण्यासाठी म्हणून मोहरम सण साजरा करण्याची प्रथा आहे.

## ❑ ख्रिश्चन धर्मियांचे सण-उत्सव

भारतामध्ये भूप्रदेश इतर धर्माप्रमाणेच ख्रिश्चन धर्म अनुयायी मध्ययुगीन कालखंडात वास्तव्यास आले. ख्रिश्चन धर्म परंपरेप्रमाणे विविध सण उत्सव साजरे केले जातात.

### ❋ नाताळ :-

ख्रिश्चन धर्मामध्ये इंग्रजी दिनदर्शिकेनुसार २५ डिसेंबर हा दिवस 'नाताळ' सण म्हणून साजरा केला जातो. नाताळ या सणांस ख्रिसमस डे, बडा दिन या नावांनी ही संबोधले जाते. यादिवशी ख्रिश्चन धर्माचे संस्थापक येशू यांचा जन्म झाला म्हणून ख्रिश्चन धर्म अनुयांयी हा दिवस 'ख्रिसमस डे' म्हणून साजरा करतात. ख्रिश्चन अनुयांयामध्ये नाताळ निमित्त एकमेकांना भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन परस्परांचे अभिनंदन करण्याची परंपरा आहे. नाताळनिमित्त चर्चमध्ये सकाळ समयी सामूहिक प्रार्थनेचा कार्यक्रम होतो. नाताळ निमित्त सांता क्लॉज हा लहान मुलांना भेटवस्तू वाटतो, असे ख्रिश्चन धर्मात मानले जाते म्हणून यादिवशी

ख्रिश्चन धर्मअनुयांचा घराममध्ये चॉकलेट, केक आदी खाद्य पदार्थ बनवून लहान मुलांना वाटण्याची प्रथा आहे.

### ❋ गुड फ्रायडे :-

ख्रिश्चन धर्मात मार्च महिन्याच्या अखेरीस शुक्रवार या दिवशी ख्रिश्चन धर्म गुरू येशू यांच्या बलिदानाचा दिवस म्हणून ओळखला जातो. गुड फ्रायडे या दिवसास होली फ्रायडे, ब्लॅक फ्रायडे, इस्टर फ्रायडे, ग्रेट फ्रायडे इत्यादी नावानेही ओळखला जातो. ख्रिश्चन धर्म परंपरेनुसार या दिवशी येशू ख्रिस्त यांना क्रॉसवरती लटकवून ठार मारण्यात आले. त्याची आठवण म्हणून हा शोकदिवस म्हणून सुध्दा मानला जातो. यादिवशी ख्रिश्चन अनुयायी चर्चमध्ये जावून येशू ख्रिस्त यांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात.

### ❋ इस्टर :-

ख्रिश्चन धर्म परंपरेनुसार येशू ख्रिस्त मृतातून पुनः उठून त्याचे पुर्नरुत्थान झाले. म्हणून ईस्टर साजरा करण्याची परंपरा आहे. येशू ख्रिस्त यांना गुड फ्रायडे या दिवशी क्रॉसवरती लटकवून मारले, त्यानंतर तीन दिवसांनी रविवारी पुन्हा जिवंत झाले म्हणून ईस्टर साजरा करण्याची परंपरा आहे.

## ❑ इतर धर्मातील सण व उत्सव

### ❋ गुरूनानक जयंती :-

कार्तिक पूर्णिमा या दिवशी शीख धर्म समुदायात शीख धर्म संस्थापक पहिले धर्मगुरू गुरूनानक यांचा जन्मदिवस गुरू नानक जयंती म्हणून साजरी केली जाते. गुरूनानक जयंती हा सण शीख धर्माचे अनुयायी त्यांच्या मोठ्या आनंदाने व श्रध्देने साजरी करतात. या सणादिवशी शीख गुरूद्वारामध्ये भजन, किर्तन, त्याचबरोबर गुरूवाणीचे वाचन करण्याची प्रथा प्रचलित असते. गुरूनानक जयंनी निमित्त शीख बांधव लंगरचे आयोजन करून अन्नदान करतात.

### ❋ बैसाखी :-

शीख संप्रदायात बैसाखी या सणास ऐतिहासिक, सामाजिक, धार्मिक संस्कृतीत दृष्टीकोनातून अनन्यसाधारण महत्त्व आहे. बैसाखी या सणास वैशाखी, बैसाख, बिशु, बीहू इत्यादी विविध नावांनी संबोधले जाते. १३ किंवा १४ एप्रिल दरम्यान बैसाखी सण साजरा करण्याची तिथी शीख आहे. या सणाच्या दिवसापासूनच शीख संप्रदायाच्या खालसा संवत नववर्षाचा आरंभ मानला जातो. तसेच इ.स. १६९९ मध्ये शीख धर्माचे एक गुरू गुरू गोविंद सिंह यांच्या नेतृत्वाखालीच खालसा पंथाची स्थापना झाली तो दिवस म्हणून बैसाखी सण साजरा करण्याची प्रथा आहे. उपरोक्त विविध बाबींची पार्श्वभूमी असलेल्या बैसाखी

सणानिमित्त शीख संप्रदायात गुरूद्वाराचे सुशोभिकरण करून कीर्तन, जत्रा, लंगर, भोजन यांचे आयोजित केले जाते. तलवंडी साबो या ठिकाणी गुरू गोविंद सिंह यांनी शीख धर्माचा धर्मग्रंथ गुरू ग्रंथ साहिब ग्रंथाचे लेखन पूर्ण केले म्हणून तलवंडी साबो या ठिकाणी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. खालसा पंथाची आनंदपूर साहिब येथील गुरूद्वारात स्थापना झाली म्हणून या ठिकाणी विशेष उत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. शीख धर्म अनुयायी बैसाखी सणादिवशी शहरामधून विशेष मिरवणूक काढण्यासाठी खालसा पंथाचे पारंपारिक वेशभूषा करून मिरवणूक काढतात. मिरवणुकीत सहभागी शीख अनुयायी गुरू ग्रंथ साहिबा या धर्मग्रंथातील संदेशाचे, वेच्यांचे उच्चारण, पठन करत मिरवणूक काढण्याची प्रथा वैशाखी दिवशी असते. बैशाखी सणादिवशी शीख शेतकरी वर्ग सामूहिकरित्या आपल्या शेतातील गव्हाच्या कापणीची सुरूवात करून दिवस मावळती वेळीस ढोल वाजवून शीख धर्मातील विविध दोहे गात भांगडा नृत्य करतात.

### ❋ गुरू गोविंद सिंह (सिंग) जयंती :–

शीख धर्म संप्रदायाचे १० वे धर्मगुरू गुरूगोविंद सिंह यांचा २२ डिसेंबर १६६६ रोजी जन्म झाला तो दिवस गुरू गोविंद सिंह जयंती साजरा करतात. गुरू गोविंद सिंह यांनी आपल्या कार्यकाळापासून गुरू ग्रंथ साहिब हा धर्मग्रंथच शीख धर्माचे गुरू बनविले. गुरू वाणी व गुरू ग्रंथ साहिब यांना शीखांचे अनुयायीसाठी सामान्यत: गुरू बनविले. गुरू गोविंदसिह जयंती निमित्त शीख गुरूद्वारामध्ये विविध कार्यक्रमसह गुरू ग्रंथ साहिब ग्रंथांचे वाचन व सामूहिक लंगर यांचे आयोजन केले जाते.

### ❋ लोहड़ी :–

शीख संप्रदायातील कृषी व्यवस्थेशी संबंधीत एक प्रमुख आनंदोत्सवाचा पारंपारिक सण म्हणून लोहडी सण साजरा केला जातो. मकर संक्रांत या हिंदू सणांच्या आदल्या दिवशीच्या स्त्री लोहडी सण साजरा करण्याची प्रथा शीख संप्रदायात प्रचलित आहे. लोहडी म्हणजे लाकडी गठ्यांना अग्नी देवून निर्माण केलेली आग होय. लोहडी सणानिमित्त रात्रीच्यावेळी वाळलेल्या वाकडी गठ्ठयांना अग्नी देवून निर्माण केलेल्या लोहडी भोवताली शीख लोक समूहाने एकत्रित येऊन लोहडी भोवताली केलेल्या लोहडी भोवताली शीख लोक समूहाने एकत्रित येऊन लोहडी भोवताली गोल फेरा धरून नृत्य, लोकगीत गायन करत लोहडीमध्ये रेवडी, मूगफळी इत्यादी धान्याची आहुती देऊन सदर सण उत्साहात साजरा केला जातो. मुख्यत: शीख संप्रदायातील नवविवाहित जोडप्यासाठी पहिली लोहडी सण विशेष मानला जातो.

### ❋ बुध्द पौर्णिमा :–

बौध्द धर्म अनुयायींचा सर्वात महत्त्वाचा सण म्हणून बुध्द पौर्णिमा या सणांस ओळखले जाते. बौध्द धर्माचे संस्थापक, प्रवर्तक, सिध्दार्थ गौतम बुध्द यांच्या जीवनातील जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण आदी महत्त्वपूर्ण घटना वैशाख महिन्यातील शुध्द पक्षातील पंधराव्या तिथीला घडल्या त्या तिथीला 'बुध्द पौर्णिमा'

असे म्हणतात. बौध्द पौर्णिमा या सणांस बुध्द जयंती, वैशाखी पौर्णिमा आदी नावांनीही संबोधले जाते. गौतम बुध्दांनी आपल्या धर्माच्या माध्यमातून मानवतावादी व विज्ञानवादी धम्म सिध्दांत मांडून मानवी जीवनातील दु:ख कमी करण्यासाठी शांती, अहिंसा व समतेचा मार्ग दाखवला याची आठवण म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली १९५१ पासून भारतात सार्वजनिकरित्या बुध्द जयंती महोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली.

बौध्द जयंती सणानिमित्त बौध्द अनुयांयी आपल्या घरामध्ये दिवे प्रज्वलित करून आपले घर फुलांनी सजवतात. यादिवशी बौध्द धर्मग्रंथाचे अखंड वाचन, पठन केले जाते. बुध्द विहारांमध्ये तसेच घरामधील बुध्द मूर्तीसमोर अगरबत्ती लावून फळे-फुले, दिवे लावतात. गौतम बुध्द यांना ज्या वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाले तो बोधिवृक्षाच्या फांद्याची प्रतिकात्मक पूजा करतात. बौध्द जयंतीनिमित्त शांतीचे प्रतीक म्हणून पक्षांना पिंजऱ्यातून मुक्त करून खुल्या आकाशात मुक्त संचारासाठी सोडून दिले जाते. गोरगरिब लोकांना भोजन व वस्त्र यांचे दान देण्याची प्रथा बौध्द जयंतीनिमित्त प्रचलित असल्याचे दिसून येते. भारत सरकार बौध्द अयुयार्यींना गौतम बुध्द यांच्या आस्थीचे दर्शन घेता यावे म्हणून बौध्द जयंतीदिवशी दिल्ली येथील संग्रहालयातील बौध्द आस्थी दर्शनासाठी प्रदर्शित ठेवते.

### ❋ पतेती :-

भारतातील फारशी/पारशी धर्मियांचा पारशी नववर्षाच्या पहिल्या दिवशी धार्मिक प्रथा व परंपरेनुसार साजरा केल्या जाणाऱ्या सणांस पतेती म्हणून संबोधले जाते. पतेती सणास नवरोज, पारशी दिन आदी नावांनी ओळखले जाते. पतेती या सणानिमित्त पारशी धर्म अनुयायी स्नान करतात त्यास 'नहान' असे म्हटले जाते. पारशी धर्मियांची अग्नी या पूजनीय देवता मानली जाते. अग्यारी या पारशी धर्म स्थळात यादिवशी अग्नी सतत प्रज्वलित ठेवण्याची प्रथा आहे. पारशी लोकांसमवेत पारशी धर्मोपदेशक विशेष प्रार्थना करून एकमेकांना नूतन वर्षाच्या शुभेच्छा देवून गोरगरीबांना अन्नदान करण्याची प्रथा आहे. पारशी लोक आपल्या घरी साली बोटी, मावा निबांई, पत्र निमाची, रवा फालुदा आदी खाद्यपदार्थ बनवून पारंपारिक पतेती हा सण साजरा करतात.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-3

### अ) खालील रिकाम्या जागी अचूक पर्याय निवडून पुन्हा लिहा.

१. मकरसंक्रांत सणानिमित्त ............. हा खाद्य पदार्थ वाटला जातो.

*अ) पुरणपोळी* *ब) लाडू* *क) तीळगुळ* *ड) भाकरी.*

२. पेटलेल्या होळी भोवताली लोक .............. मारत प्रदशिक्षणा घालतात.

*अ) दगड* *ब) लाकूड* *क) बोंब* *ड) चाबूक.*

३. कनार्टक भागात पोळा सणांस ........... म्हणून संबोधले जाते.

*अ) बैलपूजा* *ब) गायपूजा* *क) बकरीपूजा* *ड) बेंदूर.*

४. रमजान महिना सणांचा शेवट ............. या सणाने होतो.

*अ) ईद-ए-मिलाद* *ब) बकरी ईद* *क) मोहरम* *ड) रमझान ईद.*

५. भारतात सार्वजनिकरित्या बौध्द जयंती सण साजरा करण्याची सुरुवात .......... साली झाली.

*अ) १९५१* *ब) १९४१* *क) १९६५* *ड) १९६०.*

**ब) खालील प्रश्नांची एका वाक्यांत उत्तरे लिहा.**

१. पारसी नववर्षानिमित्त कोणता सण साजरा करतात?

२. लोहडी हा सण कोणत्या धर्मात साजरा केला जातो?

३. नाताळ हा सण कोणत्या तारखेस साजरा केला जातो?

४. दिवाळी सणानिमित्त कोणते विशेष सण दिवस साजरे होतात?

५. आयुर्वेदशास्त्राची देवता म्हणून कोणत्या देवतेस ओळखले जाते?

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **तिर्थ :** पवित्र स्थळ, यात्रेची जागा.
- **गोंधळ :** देवीच्या जागरणामध्ये गोंधळी लोकांनी सादर केलेली लोकगीते.
- **सात्विक :** परिपूर्ण आहार.
- **राज्जासिक :** मध्यम प्रतीचा आहार.
- **तम्मस :** निकृष्ठ प्रतीचा आहार.
- **सोमरस :** धुंधी आणणारे द्राव्य/मादक पेय द्राव्य.
- **देवदासी नृत्य :** देवदेवतांचे नवस फेडणे, देवतांचा महिमा सांगणे व देवतांची सेवा करण्यासाठी देवास अर्पण केलेल्या स्त्रीया.
- **सुवासिनी :** पती जिवंत असलेली स्त्री/सौभाग्यवती.
- **खेदट :** विविध पालेभाज्या एकत्रितपणे शिजवून बनविलेले घट्ट द्राव्य खाद्यान्न.
- **असूर :** दुष्ट राक्षस.
- **ख्रिसमस ट्री :** ख्रिसमस वृक्ष, नाताळ सणानिमित्त सजवलेले एक सूचिपर्णी झाड.

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❋ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ची उत्तरे**

**अ)** १. *अ) आयुर्वेद.*

२. *अ) डॉ. गोडे.*

३. *ड) वात, पित्त, कफ.*

४. *अ) अरेबिन.*

५. *ड) बैसाखी.*

**ब)** १. *सात्त्विक, राज्जासिक व तम्मस.*

२. *मिश्रीत खाद्यसंस्कृती.*

३. *दूधापासून.*

४. *ओनम.*

५. *मिसळ, ताबंडा-पांढरा रस्सा.*

❋ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ची उत्तरे**

**अ)** १. *ड) गंधर्व वेद.*

२. *ड) भक्ती संप्रदाय.*

३. *अ) उस्ताद बिस्मिल्ला खान.*

४. *ब) इ.स.१८१४.*

५. *क) जहागिर.*

**ब)** १. *चर्मवाद्य.*

२. *नवरात्री.*

३. *बळवंत पांडुरंग किर्लोस्कर.*

४. *कला संग्रहालय.*

५. *भारतीय सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार.*

❋ **स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ची उत्तरे**

**अ)** १. *क) तीळगुळ.*

२. *क) बोंब.*

३. *ड) बेंदूर.*

४. *ड) रमझान ईद.*

५. *अ) इ.स.१९५१.*

**ब)** १. *पतेती, पारसी दिन.*

२. *शीख.*

३. *२५ डिसेंबर.*

४. *वसुबारस, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व भाऊबीज.*

५. *धन्वंतरी.*

## ३.५ सारांश

भारतीय संस्कृतीस ऐतिहासिक, सांस्कृतिक अशी समृध्द परंपरा लाभली असून विविधतेने व परंपरेने नटलेल्या भारतीय देशांत पंथ, धर्म, जात, भाषा, आचार-विचार, कला, खाद्य परंपरा, मनोरंजन, सण-उत्सव इत्यादी चालीरिती, प्रथा, परंपरातून भारतीय सांस्कृतिक सानधे यांचे दर्शन घडून येते. भारतीय खाद्य संस्कृती ही भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती तसेच पीकपध्दती आणि धार्मिक, सामाजिक चालीरिती यांच्या प्रभावातून विकसित होत गेली. हिंदू, मुस्लीम, बौध्द, जैन, ख्रिश्चन, शीख, पारशी, ईसाई आदी धर्म व त्यांच्या परंपरांतून विकसित झालेली संमिश्र स्वरूपातील खाद्यान्नाचे विविध प्रकार भारतातील विविध प्रांतात, विभागात, समाजात, पंथात, लोकसमूहात प्रचलित आहेत. भारतीय खाद्य संस्कृतीतून चालीरिती, परंपरा, धर्म, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीच्या इतिहासावरती प्रकाश टाकण्यास मदत होते.

प्राचीन कालखंडापासून भारतीय लोककलेचा विकास होत ती समृध्द बनली. नृत्य, गायन, संगीत, नाट्य आदी लोक आविष्कारांना धार्मिक पार्श्वभूमी लाभत जावून ती उत्क्रांत होत जावून संगीतकला भारतीय संस्कृतीचे एक मूलभूत अंग बनले. नाट्य, नृत्य, गायन, वादन आदी प्रकारातून नवनवीन आविष्कार निर्माण होऊन सामान्य लोकांची ती लोकसंस्कृती बनली.

वस्तूसंग्रहालयाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीची पार्श्वभूमी असलेल्या विविध दुर्मिळ, मौल्यवान, कलापूर्ण वस्तूंचे जतन, संवर्धन होवून त्यांस नवीन झळाळी मिळत जावून ती मानवी संस्कृतीचा इतिहास म्हणून समाजाला मार्गदर्शक ठरत आहे. मानव हा कलाप्रिय प्राणी असून त्यांनी आपल्या कलेचा आविष्कार विविध माध्यमातून व्यक्त केला, त्यातील एक कला म्हणून चित्रकलेस ओळखले जाते. या चित्रकलेच्या आविष्कारातून चित्रकार मानवी समाजाशी संवाद साधू लागला, त्यांस विविध कलादालने मोठे योगदान देवून ते समाज मनापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले.

भारतीय लोकसंस्कृतीवरती विविध धर्म, परंपरांचा प्रभाव असल्याने भारतीय संस्कृती ही उत्सवप्रिय बनली. प्रति वर्ष विविध सण-उत्सव यांच्या माध्यमातून मानवी समाजाने आनंदी वातावरण निर्माण करून मानवी समाजाला आनंद, समाधान मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. भारतातील खाद्य संस्कृतीची पार्श्वभूमी विशद करा.

२. भारतीय खाद्य पदार्थ व त्यांचे ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट करा.

३. भारतातील सण, उत्सव यांतून उत्क्रांत झालेली खाद्यसंस्कृती स्पष्ट करा.

४. भारतातील विविध राज्यातील खाद्यसंस्कृती विषयक चर्चा करा.

५. भारताच्या विविध राज्यातील नृत्यकलाविषयक चर्चा करा.

६. वस्तूसंग्रहालयांच्या विविध व्याख्या सांगून त्यांची चर्चा करा.

७. वस्तूसंग्रहालयाच्या विविध प्रकारविषयक चर्चा करा.

८. भारतातील विविध कलादालने विषयक माहिती सांगा.

९. हिंदूंच्या सण-उत्सवाची चर्चा करा.

१०. मुस्लीमांच्या सण-उत्सवाची माहिती सांगा.

**ब) टिपा लिहा.**

१. महाराष्ट्राची खाद्यसंस्कृती.

२. पंजाब खाद्यसंस्कृती.

३. राजस्थान खाद्यसंस्कृती.

४. तामिळनाडू खाद्यसंस्कृती.

५. भारतीय लोकसंगीत.

६. मणिपुरी लोककला प्रकार.

७. महाराष्ट्र लोककला प्रकार.

८. दिपावली सण.

९. नवरात्रोत्सव सण.

१०. रमजान.

११. बैसाखी सण.

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **सरोजिनी बाबर** : *'आदिवासींचे सण-उत्सव'.*

२. **दा. कृ. सोमण** : *'आपले सण आणि उत्सव'.*

३. **डॉ. स्वाती कर्वे** : *'भारतीय सण आणि उत्सव'.*

४. **श्रीमती करूणा ढापरे** : *'राष्ट्रीय व धार्मिक सण आणि उत्सव'.*

५. **प्रा. जास्वंदी बांबूटकर** : *'इतिहासातील नवे प्रवाह'.*

६. **उषा शर्मा** : *'फेस्टीवल इन इंडियन सोसायटी वॅल्यूमर'.*

७. **डॉ. शरदचंद्र परांजपे** : *'भारतीय संगीत का इतिहास'.*

८ **म. वि. भागवत** : *'लोकसंगीत आणि त्याचे स्वरूप'.*

९. **मराठी विश्वकोष खंड-४, ५, ६, ७, ८, १०, ११, १४, १५, १६, १७, १८, १९, २०.**

१०. **श. मं. केतकर** : *'संग्रहालय परिचय'.*

११. **संजय नवले** : *'पुणे शहरातील वस्तुसंग्रहालय : एक ऐतिहासिक अभ्यास'*, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध.

१२. **अनिल कुंभार** : *'महाराष्ट्रातील शासकीय वस्तुसंग्रहालयांचा ऐतिहासिक अभ्यास'*, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध.

१३. **डॉ. कठारे, डॉ. साखरे** : *'पुरातत्त्व विद्या, वस्तुसंग्रहालयशास्त्र आणि पर्यटन'.*

१४. **डॉ. अलका खाडे** : *'भारतीय चित्रकला आणि संगीत'.*

१५. **दिव्या तिवारी** : *'इंडियन कुर्जिन्स रिप्रेझेन्टींग इंडियन कल्चर'.*

घटक-४

# समकालीन पर्यटन प्रवाह

## ( Contemporary Trends )

---

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ पर्यावरण (इको) पर्यटन

  ४.२.२ वैद्यकीय पर्यटन

  ४.२.३ साहस पर्यटन

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ सूची

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील मुद्दे स्पष्ट करता येतील.

१. पर्यावरण (इको) पर्यटनाची व्याख्या, संकल्पना, प्रकार व महत्त्व स्पष्ट करता येईल.

२. पर्यावरण पर्यटनातील आर्थिक, सांस्कृतिक व नैसर्गिक घटकांचे महत्त्व सांगता येईल.

३. वैद्यकीय पर्यटनाची संकल्पना व महत्त्व सांगता येईल.

४. वैद्यकीय पर्यटन क्षेत्रात भारताचे महत्त्व अधोरेखित करता येईल.

५. साहस पर्यटनाची व्याख्या, संकल्पना, प्रकार स्पष्ट करता येतील.

६. साहस पर्यटनातील रोजगाराच्या संधी कशा आहेत याचे आकलन होण्यास मदत होईल.

## ४.१ प्रस्तावना

जागतिक अर्थव्यवस्थेतील एक प्रमुख क्षेत्र म्हणून पर्यटन उदयास आलेले आहे. जगातील सर्वात मोठा व वेगवान सेवा उद्योग, जागतिक अर्थव्यवस्थेवर क्रांतिकारी व मूलगामी स्वरूपाचा प्रभाव पाडणारा उद्योग अशा विविध दृष्टीकोनातून याची ओळख आहे. विकसीत व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या देशामध्ये या उद्योगाला मोठा वाव आहे. आर्थिक संतुलन साधण्यास मदत होते. रोजगार निर्मितीची प्रचंड मोठी क्षमता या उद्योगात आहे. परकीय चलन प्राप्त करण्याचे एक प्रभावी माध्यम, पर्यावरण संरक्षण, ऐतिहासिक वास्तूंचे जतन व संवर्धनाचे माध्यम आणि संस्कृतीचे पुर्नरुज्जीवन घडवून आणण्याची मोठी क्षमता या उद्योगामध्ये आहे. कमीत-कमी भांडवली गुंतवणूक असलेला उद्योग, रोजगार आणि गुंतवणुकीस उत्तेजन देणारा, विपणन व जाहिरात क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घटक आहे. संपूर्ण जगभरात सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक महत्त्व प्राप्त झालेला एक उद्योग अशी ओळख झालेली आहे. भारतामध्ये विविध ठिकाणी, विविध वातावरणात व ऋतुमध्ये साहस पर्यटन, पर्यावरण पर्यटन व वैद्यकीय पर्यटन करण्याची खूप मोठी संधी आहे. वैद्यकीय पर्यटनात विकसनशील देशात भारताचा क्रमांक बराच वरचा आहे. सद्यस्थितीत पर्यटन व्यवसायाचे स्वरूप आणि आयाम बदलत असून देश-विदेशातील पर्यटकांचा ओढा भारताकडे वाढलेला आहे. भारतामध्ये पर्यावरण पर्यटन, साहस पर्यटन व वैद्यकीय पर्यटन या क्षेत्रात भविष्यात खूप मोठा वाव अपेक्षित असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होवू शकते, त्या दृष्टीकोणातून प्रस्तुत घटकात वरील तिन्ही पर्यटन प्रकारांच्या संकल्पना, प्रकार आणि महत्त्व समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ पर्यावरण (इको) पर्यटन (Eco-Tourism)

आधुनिक काळात पर्यटनाच्या संकल्पना व स्वरूप बदलत असून विविधांगी पर्यटन प्रकारांचा यामध्ये समावेश झालेला आहे व होत आहे. यामध्ये कृषी, ऐतिहासिक, साहसी, सांस्कृतिक, वैद्यकीय, अवकाश, ग्रामीण, क्रीडा, धार्मिक, बीच, बॅकवॉटर, मान्सून, आपत्ती, गार्डन, साहित्यिक व पर्यावरण पर्यटनाचा प्रामुख्याने समावेश आहे. पर्यावरण पर्यटनाचा अलीकडच्या काळात झपाट्याने विकास होत आहे.

#### १. भारतातील पर्यावरण (इको) पर्यटन :-

भारताची ओळख नैसर्गिक सौंदर्याची खाण अशी आहे. मॅक्स म्युलरने एक विधान केले होते की, ''जर निसर्ग देऊ शकत असेल अशा सामर्थ्य, समृध्दी आणि सौंदर्य लाभले आहे याची प्रचिती आणून देणारा देश शोधण्यासाठी जर जगभर बघितले तर मी भारताकडे बोट दाखविन.'' मॅक्स म्युलरचे हे विधान तंतोतंत खरे आहे कारण निसर्गाची पूजा आणि नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण हा प्राचीन भारतीय संस्कृतीचा एक

अविभाज्य भाग आहे. निसर्ग भारतीय प्रथा आणि परंपरेचा वारसा आहे. भारतीय संस्कृतीने मानव प्राणी हा निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे याची शिकवण दिलेली आहे. निसर्गावर प्रेम, दया करा व निसर्गाचा सन्मान करण्याची प्रथा आहे. अशा प्राप्त परिस्थितीमध्ये आपण जेव्हा पर्यावरण पर्यटनाकडे पाहतो तेव्हा भारतातील संपन्न आणि समृध्द निसर्गाची आपणास प्रचिती येते.

२१ व्या शतकात जग एक खेडे झालेले आहे. प्रत्येक व्यक्ती एकमेकांशी जोडला गेला आहे, मात्र तो निसर्गापासून दूर जात आहे. मानव आणि निसर्ग यांच्यामधील अंर्तसंबंध नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मानवाने निसर्गाचे अतोनात नुकसान केलेले आहे, यातील अनेक घटक कधीही न भरून येणारे आहेत. हे जरी खरे असले तरी या धकाधकीच्या जीवनात मानव पुन्हा या निसर्गाशी एकरूप होण्याचा, त्याच्या सानिध्यात जाण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामागे काही प्रमुख प्रेरणा व कारक घटक आहेत. या प्रेरणा व कारक घटक केवळ भारतापुरते मर्यादित नाहीत तर संपूर्ण जगभर समान स्वरूपात आहेत.

१) जागतिकीकरणाचे अपत्य असलेले आधुनिक दळणवळण व माहिती तंत्रज्ञानाच्या परिणामस्वरूप जागतिक स्तरावर लोक एकमेकांशी जोडले गेले. त्याच धर्तीवर जे जागतिक पर्यावरण घटकांशी जोडले गेले आहे व जात आहेत. जगाच्या कानाकोपऱ्यात पर्यावरणाची माहिती त्याला घरबसल्या प्राप्त होते. परिणामी दूरदूरची पर्यावरण पर्यटन स्थळे ज्ञात झाली.

२) संरक्षित अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानांची व्याप्ती वाढत आहे. पर्यावरण पर्यटनाची ही स्थळे पर्यटन चळवळीची प्रमुख माध्यम बनू पाहत आहेत की, ज्याद्वारे लोक पर्यावरणाचा अनुभव व संवाद साधू शकतात.

३) पर्यावरण पर्यटनाचा आल्हाददायक अनुभव अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित करत आहे.

४) नागरीकरणाचा दुष्परिणाम व त्याविरोधात उठलेला आवाज म्हणूनदेखील पर्यावरण पर्यटनाचा उदय झालेला आहे.

५) जागतिक स्तरावर पर्यावरण जागरूकता व चळवळ पर्यावरण पर्यटनाला उत्तेजन व चालना देणारा घटक आहे कारण लोक पर्यावरणविषयी वेगळ्या मनोभूमिकेतून पाहत आहेत.

६) पर्यावरण पर्यटनाची प्रेरणा मूलतः एक ऐतिहासिक पर्यावरणीय अनुबंध आहे. ज्यामध्ये गतकालीन निसर्गभान अंतर्भूत आहे. भूतकालीन मानवी संबंध आणि पर्यावरणीय जागरूकताही प्रमुख प्रेरणा आहे.

७) पर्यावरण पर्यटनाचा उदय रोगावरील उपाय अर्थात रामबाण औषध म्हणून झालेला आहे. जो मानवाला शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय स्तरावर सक्षम करण्यास मदत करतो. ज्यामध्ये आर्थिक संसाधन प्राप्त करणे, पर्यावरणीय नुकसान न करता, निसर्ग वृध्दी, जतन, संरक्षण या प्रेरणा अंतर्भूत आहेत.

८) प्राचीन भारतीय निसर्गाशी निगडीत प्रथापरंपरांची समृध्द परंपरा, मानवप्राणी आणि निसर्गाचा सहसंबंध, पर्यावरणीय सांस्कृतिक संबंध इत्यादी.

९) पर्यावरण पर्यटनात स्थानिकांचा सक्रीय सहभाग आणि त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक अनुबंध हे पर्यावरण पर्यटनातील प्रमुख कारक घटक आहेत.

## २. पर्यावरण पर्यटनाची संकल्पना :-

पर्यावरण पर्यटन हा निसर्गाच्या (पर्यावरण) शाश्वत विकासाचा पाया आहे असे संबोधले जाते. पर्यटन क्षेत्रात पर्यावरण पर्यटन ही नवीन संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर अतिवेगवान उद्योग म्हणून ओळखले जाते. त्याचबरोबर पर्यावरण पर्यटन हे शाश्वत पर्यटनाचा एक प्रकार देखील झालेला आहे. संयुक्त राष्ट्राच्या व्याख्येनुसार शाश्वत पर्यावरण पर्यटन म्हणजे, ''जे पर्यटन सध्याच्या आणि भविष्यातील आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय परिणामांना लक्षात घेते आणि अभ्यांगत उद्योग, पर्यावरण आणि रहिवाशी समुदायाच्या गरजा लक्षात घेते.'' रहिवाशी समुदायांना दीर्घकालीन आर्थिक प्रक्रिया, उत्पन्नाच्या संधी आणि सामाजिक सेवांद्वारे सर्वांना आर्थिक-सामाजिक फायद्याचा व्यवस्थित लाभ मिळावा यासाठी असलेली तरतूद हे शाश्वत पर्यटनाचे एक महत्वाचे अंग आहे, त्यामुळे नैसर्गिक स्रोतांचे संवर्धन आणि दारिद्र्य निवारण असे दुहेरी हेतू साध्य होतात.

इ.स. १९८० मध्ये सेबाल्लॉस लेसक्यूरने पर्यावरण पर्यटनाची व्याख्या केलेली होती. १९९६ मध्ये मॉट्रीआय येथे आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संस्थेच्या (जागतिक संवर्धन संस्था) पहिल्या जागतिक संवर्धन परिषदेने ही अधिकृत व्याख्या म्हणून स्वीकारलेली आहे. ती अशी की, ''पर्यावरण पर्यटन म्हणजे नैसर्गिक स्रोत संवर्धन करणाऱ्या बऱ्याच अंशी बाधित नसलेल्या विविध देशातील भागांना पर्यावरण अभ्यासांतर्गत भेट देणे, ज्यात पर्यटकांचा नकारात्मक प्रभाव कमी असेल आणि ज्यात स्थानिकांना सामाजिक-आर्थिक सहभाग मिळू शकेल.''

पर्यावरण पर्यटनाला इतर काही संज्ञानेही ओळखले जाते, ज्यामध्ये पर्यावरण पर्यटन, हिरवे पर्यटन, जैव पर्यटन, परिस्थितीकी जबाबदार पर्यटन इ. समावेश होतो. जगातील ८ देशांमध्ये पर्यावरण पर्यटनाला 'हिरवे पर्यटन' ही संज्ञा वापरली जाते. थोडक्यात इको टुरिझम म्हणजे निसर्गाचा ऱ्हास होऊ न देता निसर्गात भ्रमंती करणे तसेच लोकांच्यामध्ये वनसंपदा व वन्यजीवविषयक जागृती निर्माण करणे व स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देणे होय.

## ३. पर्यावरण पर्यटनाचा इतिहास :-

पर्यावरण पर्यटनाची संकल्पना इ.स. १९५० च्या दशकात उदयास आली. त्याअगोदर ही संकल्पना व्यापक प्रमाणात प्रचलित नव्हती, किंबहुना याबाबत गैरसमज होते. मात्र १९५० च्या नंतर पर्यावरण पर्यटन ही संकल्पना विविध प्रकारच्या प्रारूपामध्ये समोर येवू लागली, जी आपण सध्याच्या पर्यावरणीय परीप्रेक्ष्यातून अस्तित्वात आलेल्या पर्यावरण पर्यटनात पाहतो. वास्तविक पाहता १९५० च्या दशकात

आफ्रिकेमध्ये शिकारीच्या माध्यमातून ही संकल्पना कायदेशीरपणे पुढे आली, ज्याचा उद्देश मनोरंजनासाठी शिकार असा होता. त्यासाठी काही संरक्षित क्षेत्रे, राष्ट्रीय उद्याने आरक्षित केलेली होती. ज्याचे स्वरूप शिकारी खेळासारखे होते. पर्यावरण पर्यटनाच्या इतिहासासंबंधी तज्ज्ञ अभ्यासक दोन प्रमुख कारणे देतात.

१) १९७०-८० च्या दशकात पर्यावरण पर्यटन ही संकल्पना पर्यावरण चळवळीशी जोडली गेली.

२) जनसामान्य (Masstourisum) पर्यटनाचा अतिरेकी विकास, पर्यावरणीय प्रदूषण, सांस्कृतिक अतिक्रमण आणि आर्थिक विघटन करणारे पर्यटक.

वरील दोन कारणांच्या माध्यमातून लोकांच्यामध्ये पर्यावरणीय जागरूकता निर्माण झाली. जनमाणसात निर्माण झालेल्या असंतोषातून पर्यावरण पर्यटनाची संकल्पना अधिक जोर धरू लागली. परिणामी १९८० च्या दशकात ही संकल्पना व्यापक प्रमाणात विस्तारित व प्रसारित झाली. यातून आधुनिक पर्यावरण पर्यटनाचा (Eco-tourism) विकास झाला.

१९७० च्या दशकात रूढ झालेल्या पर्यावरण पर्यटनाच्या या संकल्पनेभोवती या दशकात मात्र एक गूढतेची झालर निर्माण झालेली दिसते. साधारणत: 'इको-सेल' या अर्थाने विपणन क्षेत्रात हा शब्द वापरला जात होता. त्यानंतर या संकल्पनेत बदल होवून पर्यावरणपूरक जबाबदार पर्यावरण पर्यटन, निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पर्यटन, पर्यावरणीय संवर्धनासाठी पर्यटन, निसर्गातील मानवाचा कमी हस्तक्षेप, स्थानिक स्तरावर जनसामान्यांच्या सक्रीय सहभाग व त्यांची सामाजिक-आर्थिक उन्नती करणे या दृष्टिकोनातून या पर्यटन क्षेत्राकडे पाहिले जाऊ लागले. १९८० च्या दशकात उदयास आलेल्या हिरव्या ग्राहकवादचा (Green Consumerism) उदय व सार्वजनिक सुट्टीची संकल्पना यामुळे या पर्यटन संकल्पनेला अधिक बळकटी प्राप्त झाली. जनसामान्य पर्यटनातून पुढे पर्यावरण पर्यटनाच्या शाश्वत विकासासंबंधी व प्रसारासाठी कार्य करण्यास सुरूवात झाली. याला अनेक पर्यावरणवाद्यांचा सक्रिय पाािठिंबा होता.

## ४. पर्यावरण पर्यटनाला शाश्वत बनवणारे घटक :-

पर्यावरण पर्यटनाला अनेक घटक शाश्वत बनविण्यासाठी मदत करतात किंवा पूरक ठरतात. यामध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

१) शक्य तेवढे माहितीपूर्ण बना.

२) जागेच्या अखंडत्वाचे समर्थन.

३) किमान पर्यावरणीय प्रभाव.

४) किमान प्रभाव व यजमान संस्कृतीचा जास्तीत जास्त आदर.

५) स्थानिकांच्या रोजगार संधीचे समर्थन.

६) संसाधनांचे संवर्धन.

७) स्थानिक संस्कृती आणि परंपरांचा आदर.

८) उत्पादनाचा गैरवापर टाळा.

९) संख्येपेक्षा गुणवत्तेला प्राधान्य.

१०) अविस्मरणीय आनंद देण्यासाठी क्षमता.

११) अद्भुतरम्य अनुभव देण्याची तयारी.

## ५. पर्यावरण पर्यटनातील मूलभूत घटक :-

### अ) निसर्गाशी जवळीक :-

पर्यावरण पर्यटन हे नैसर्गिक घटकाशी संबंधित आहे. यामध्ये पर्यटक निसर्गाशी जवळीक साधण्याचा, एकरूप होण्याचा व त्याच्या सानिध्यात जाण्याचा प्रयत्न करतो. निसर्गाशी सुसंग पर्यटन अर्थात इको पर्यटनात अभिप्रेत आहे. त्याचबरोबर निसर्ग पर्यटनाचा विकास, नियोजन व व्यवस्थापन करताना नैसर्गिक संपत्तीचे जतन, संवर्धन व संरक्षण क्रमप्राप्त करते.

### ब) निसर्ग परिसंस्थेशी सुसंगत :-

पर्यावरण पर्यटनामध्ये निसर्गातील जंगल, गवत, वाळवंट, नदी, सागर, तळी, खाडी, विविध किटक, पशु-पक्षी यांच्या परिसंस्था असतात. त्यांच्यावर पर्यावरण पर्यटनाचा परिणाम होणार नाही याची दक्षता घेवून त्या परिसंस्थेशी सुसंगत पर्यटन होणे गरजेचे आहे.

### क) स्थानिक लोकाचा सहभाग :-

पर्यावरण पर्यटनात स्थानिक लोकांना सामावून घेणे अभिप्रेत आहे. कारण स्थानिक लोकांना आपण ज्या प्रदेशात जातो तेथील इतिहास, जंगलवाटा, वन्य प्राणी, संस्कृती, परंपरा, खाद्य संस्कृती व वैशिष्ट्ये माहित असतात त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा आपल्यास फायदा होतो व आपली सहल अथवा पर्यटन अधिक आनंददायी होण्यास मदत होते त्याचबरोबर स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होते.

### ड) पर्यावरण संवर्धन शिक्षण :-

पर्यावरण संवर्धन कसे करावयाचे याचे मूलभूत ज्ञान असणे आवश्यक आहे. त्यासाठी पर्यावरण पर्यटन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. स्थानिक लोकांची मदत घेवून पर्यावरणाबद्दल जागृती करणे, जंगल, वन्यप्राणी, जलचर व दुर्मिळ वनस्पतीच्या संवर्धनाबाबत माहिती प्राप्त होते किंबहुना पर्यावरण पर्यटनाचा हाच मूळ हेतू आहे.

## ६. पर्यावरण पर्यटनाचे भारतीय परीप्रेक्ष्यातून महत्त्व :-

भारताला प्राचीन वैभवशाली ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे तेवढाच संपन्न व समृध्द असा निसर्गाचा ठेवा प्राप्त झालेला आहे. भारतात तिन्ही ऋतू अनुभवता येतात. भारताला विशाल असा

समुद्रकिनारा लाभलेला आहे. आफ्रिकेच्या धर्तीवर समृध्द अशी जैवविविधता व वन्यजीवन आहे. भारताच्या चारही विभागात वैविध्यपूर्ण पर्यावरण पर्यटनाची क्षेत्रे उपलब्ध आहेत. जगातील १२ जैवविविधतेचा वारसा लाभलेल्या देशात भारताचा समावेश आहे. याचबरोबर रोजगार निर्मितीची समस्या, साप्ताहिक सुट्टीची शेती पध्दती व उद्योग पध्दती, कमकुवत उद्योग यामुळे पर्यटन उद्योग हा सामाजिक-आर्थिक विकासाचा सर्वोत्तम पर्याय म्हणून याकडे पाहिले जाते. राज्याच्या उत्पादनाच्या साधनाबरोबर यामध्ये परकीय चलन प्राप्त करण्याची मोठी ताकद असून आर्थिक विकासाचा समतोल साधण्यासाठी पर्यावरण पर्यटन हा एक शाश्वत पर्याय आहे.

## ७. पर्यावरण पर्यटनासंदर्भात भारत सरकारचे धोरण :-

भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने १९९८ मध्ये विकसित केलेल्या पर्यावरण अर्थात निसर्ग पर्यटन धोरण आणि नियमावलीचा आधार घेऊन पर्यावरण आणि वन मंत्रालयाने जून २०११ मध्ये संरक्षित क्षेत्रात पर्यटन कार्यक्रम राबविण्यासाठी राज्यसरकारांना पर्यावरण पर्यटन धोरण तयार करण्यास सागितले होते. भारत सरकारने १२ व्या पंचवार्षिक योजनेत गरीबांसाठी पर्यटनाचे फायदे वाढवण्याचे लक्ष्य ठेवताना पर्यटनविषयक कृतीमधून मिळालेले उत्पन्न संरक्षित क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी वापरले जावे यावर भर दिला आहे. सध्या भारतात १०० राष्ट्रीय उद्याने, ५१५ वन्यजीव अभयारण्ये, ४३ संवर्धन प्रकल्प आणि ४ समुदाय प्रकल्प असे ६६१ संरक्षित क्षेत्रे आहेत.

## ८. भारतातील प्रमुख पर्यावरण पर्यटन स्थळे :-

भारताच्या विविध भागात निसर्ग पर्यटनासाठी मोठ्या प्रमाणात वैविध्यपूर्ण स्वरूपाची पर्यावरण पर्यटन स्थळे उपलब्ध आहेत. विशेषत: केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, सिमला, पश्चिम बंगाल, गोव, सिक्कीम, शिमला, उत्तरांचल, महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादींचा उल्लेख होतो.

| निसर्ग उद्याने | निसर्ग स्थळे | विशेष प्राणी |
|---|---|---|
| कर्णला पक्षी अभयारण्य | रंगबला | रूकस नेकड, हॉर्न बिल |
| परंविकुलम वन्यजीव अभयारण्य | चिल्का सरोवर | हिमालयीन वृक्ष पाईन |
| भिमरेश्वरी वन्यजीव अभयारण्य | सांगला घाटी | रेड-बिल्ड, ब्लू मॅम्बीपाई |
| सिमिलपाल व्याग्र प्रकल्प | नाग्गर | रेड फॉक्स |
| नाम दाफा राष्ट्रीय उद्यान | डलहौसी | हिमालयीन ब्लॅक बीयर |
| निमोर व्हॅली राष्ट्रीय उद्यान | ऋषिकेश | स्कार्लेट मिनेट |
| पेरियार अभयारण्य | नोकेरेक बायोस्कीयर | ब्लू मॉर्मन |
| बंदीपूर राष्ट्रीय उद्यान | द फ्लोटींग बेटे | ब्लू व्हिप्लिग थ्रश |

| | | |
|---|---|---|
| सरिस्का व्याग्र प्रकल्प | नोक्रेक बायोस्पियर | हिमालयीन गोरल |
| रणथंभोर राष्ट्रीय उद्यान | तवांस पास | हिमालयीन ग्रिफॉन |
| कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान | सिमोगा | हिमालयीन मस्क डियर |
| कान्हा व्याग्र प्रकल्प | कुर्ग | हॉलॉक गिब्बन |
| दक्षिणम राष्ट्रीय उद्यान | कुन्नुर | लॅम्पर गियर |
| दुधवा राष्ट्रीय उद्यान | महाबत्ती पूरम | रावेज |
| नागरहोते राष्ट्रीय उद्यान | सेला पास | सेब्रा |
| साइलेंन्ट व्हॅली राष्ट्रीय उद्यान | सोनामार्ग | मलयान जायर गिलही |
| | कुंभा घाटी | |
| | माऊंट अबू | |
| | सिगु गुफा | |
| | पंचमडी | |
| | चंदटल | |
| | सातपूडा | |

| **इको डेस्टिनेशन** | **इको ट्रिव्हिया** | **इको ट्रेक्स** |
|---|---|---|
| लडाख | इडकुल गुंफा | वायनाड ट्रेक्स |
| तिसारगधाम | कारला लेणी | बहमगिरी ट्रेक्स |
| अंबोली | पश्चिम घाट | तळभमान सर्किट |
| खेकणनाल | लोकणल हेमकुंड | बाबा बुडागिरी हिल्स |
| कारवार | तामी टी इस्टेट | कोडायादी |
| वेलघाट | नामपाद ट्रेझर्स | महाबळेश्वर ते प्रतापगड |
| अंदमान आणि निकोबार बेटे | स्टिगिग नेटल्स | भृगु झील |

**थंड हवेची ठिकाणे :–**

| **राज्य** | **ठिकाणे** |
|---|---|
| हिमाचल प्रदेश | चेल, चंबा–डलहौसी, धर्मशाळा, कसोली, कंगरा, कुल्लु, मनाली, नळदेहरा, पखानू, सिमला |
| जम्मू आणि कश्मिर | गुलर्मा, जज्जू, पटनाईत, सोमार्ग, श्रीनगर |
| झारखंड | रांची |

| | |
|---|---|
| केरळ | मुन्नार, नैल्लियामपली, वायनाड, देविकुलम, पेमरेड, पोपमुडी, इहुक्की, पलकुड |
| उत्तरांचल | अल्मोरा, देहराडूम, कसूनी, मसुरी, पिधोरागड |
| मध्यप्रदेश | भेडाघाट |
| राजस्थान | माऊंट आबू |
| महाराष्ट्र | महाबळेश्वर, पाचगणी, लोणावळा, कारला, माथेरान, अंबोली, पन्हाळा, चिखलदरा |
| सिक्कीम | गंगटोक |
| पश्चिम बंगाल | दार्जिलिंग |

## ९. पर्यावरण पर्यटनासाठी वैशिष्ट्यपूर्ण राज्ये :-

### १) केरळ :-

केरळ राज्याला 'God's own Country' अर्थात 'देवभूमी' म्हणून ओळखले जाते. नॅशनल जिऑग्राफीकने 'जगातील दहावे नंदनवन' म्हणून केरळचा उल्लेख केलेला आहे. जगातील सर्वात श्रीमंत जैवविविधता असलेले राज्य म्हणून केरळची ओळख आहे. आशिया खंडातील प्रथम पसंतीक्रमाचे पर्यावरण पर्यटनाचे ठिकाण म्हणूनही केरळाचा उल्लेख होतो. वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधतेबरोबर येथील वन्यजीव अभयारण्यदेखील प्रसिध्द आहेत. विशेषत: वाईनड/व्यानाड वन्यजीव अभयारण्य, इरवीकुलम नॅशनल पार्क, पेरियार नॅशनल पार्क, मूक राष्ट्रीय उद्यान इत्यादी. केरळमधील पर्यावरण पर्यटनातील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण भाग म्हणजे येथील 'बॅकवॉटर' हे बॅकवॉटर म्हणजे अद्वितीय जीवनशैलीचे अनोखे दर्शन. केरळमधील जगप्रसिध्द कॉफीचे मळे, रबर व सुंगधी वेलचीची शेती निसर्गरम्य आहे. सह्याद्रीच्या पश्चिम घाटातील डोंगररांगा केरळमधून जातात. उष्णकटिबंधीय जंगले आणि हिरव्यागार वनस्पती व वृक्ष हे या डोंगररांगाचे वैशिष्ट्ये. जैवविविधतेबरोबर वन्यजीव हाही तितकाच महत्त्वाचा घटक आहे. केरळमध्ये मुन्नार व नेल्लियाथमी सारखी थंड हवेची ठिकाणे महत्त्वपूर्ण आहेत. कोवालह हा जगप्रसिध्द समुद्र किनारा केरळला लाभलेला आहे. त्यामुळे देश-विदेशातील असंख्य पर्यावरण पर्यटक केरळाला भेट देतात.

### २) तामिळनाडू :-

देश-विदेशातील पर्यटकांसाठी तामिळनाडू प्रसिध्द आहे. न्यूयॉर्क टाइम्सने जगातील ५२ महत्त्वाच्या पर्यटन स्थळामध्ये याची गणना केलेली आहे. तामिळनाडूमध्ये जगातील सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा 'मरिना' बीच आहे. आशिया खंडातील सर्वात मोठे 'अटीग्नरझुयॉलॉजिकल' पार्क आहे. यामध्ये १५०० पेक्षा जास्त जातीचे वन्यप्राणी आहेत. भारतातील सर्वात जास्त १५ पक्षी अभयारण्ये या राज्यात आहेत. विशेषत: पुलीकत, बेट्टानगुडी, वेदानपंगल पक्षी अभयारण्य तामिळनाडू राज्यात वैशिष्ट्यपूर्ण खारीचे अभयारण्य व चेन्नई येथे मगर प्रजोत्पादन केंद्र आहे.

उटी, येरकौड/येरकुंड, येलगिरी, कोडाईकॅनॉल इत्यादी थंड हवेची ठिकाणे आहेत, यामध्ये उटीमध्ये निलगिरी पर्वतातील 'दोडाबेट्टा' हे उंच शिखर आहे. उटीचा उल्लेख 'क्विन ऑफ हिल स्टेशन्स' असा केला जातो. उटीकमंड येथे बॉटॅनिकल गार्डन, सिल्व्हर कास्केड धबधबा, कुकरस वॉक, ग्रीन व्हॅली, कुरूजी फुलांचे उद्यान, चिल्डोन लेक गार्डन आहे. कन्याकुमारी हे भारताचे दक्षिण टोक, या ठिकाणी अरबी समुद्र, बंगालचा उपसागर व हिंदी महासागर या तिन्हीचा संगम होतो, त्यामुळे जेथे मोठ्या संख्येने पर्यावरण पर्यटक भेट देतात.

### ३) आंध्र प्रदेश :-

आंध्रप्रदेश पर्यावरण पर्यटनाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. या ठिकाणी खऱ्या व गोड्या पाण्याची सरोवरे आहेत. त्याचबरोबर विशाखापट्टणमजवळील बोरा गुंफा, भवानी बेटे, आरकू दरी अर्थात आंध्र प्रदेशची उटी व भीमाली समुद्र किनारा इत्यादी पर्यावरण पर्यटनपूरक केंद्रे आहेत. जगातील सर्वात मोठा 'मरदीमनु' हा वृटवृक्ष आहे. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे खाऱ्या पाण्याचे 'पुलीकन सरोवर' या ठिकाणी आहे. कृष्णा व गोदावरी नद्यांच्या त्रिभूज प्रदेशातील 'कोलेरू' हे गोड्या पाण्याचे सरोवर पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक येतात. नागार्जुनसागर अभयारण्य व व्याघ्र अभयारण्य हेही निसर्ग पर्यटनाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. पुलंकित सरोवरात मोठ्या संख्येने स्थलांतरित पक्षी येतात.

### ४) कर्नाटक :-

भारतातील पर्यटनासाठी प्रसिध्द असलेल्या राज्यांच्यामध्ये कर्नाटकचा वरचा क्रमांक आहे. कर्नाटकातील शरावती नदीवरील जोग धबधबा व केमेनगुंडी, बाबा बुदाबगिरी, कुर्ग, कुदेमुख, कोडाघटी येथील थंड हवेची ठिकाणे प्रसिध्द आहेत. दांडेली अभयारण्य, घटप्रभा पक्षी अभयारण्य, बॅन्कपुरा येथील मोरांचे वन्यजीव अभयारण्य, पारोजी स्लोथ अस्वल अभयारण्य, देवराया वन्यजीव अभयारण्य, भीमगड वन्यजीव अभयारण्य, भद्राअभयारण्य, ब्रह्मगिरी अभयारण्य व कावेरी अभयारण्य इत्यादी विविध पशु पक्षी व जैव विविधतेसाठी प्रसिध्द आहेत.

### ५) तेलंगणा :-

तेलंगणा हे राज्य पर्यावरण पर्यटनाबरोबरच ऐतिहासिक व सांस्कृतिक पर्यटनासाठी प्रसिध्द आहे. नॅशनल जिऑग्राफिकच्या सर्वेक्षणानुसार हैद्राबाद हे जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकाचे पर्यटन शहर आहे. हैद्राबादमधील 'झू म्युझियम' प्रसिध्द आहे.

### ६) गोवा :-

गोवा विदेशी पर्यटकांचे घर मानले जाते. याठिकाणी लाखो पर्यटक प्रतिवर्षी भेट देतात. गोव्यातील स्वच्छ सूर्यप्रकाश हा विदेशी पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्यासाठी गोव्यातील कलगुट बीच की, ज्याला 'बीचेसची राणी' म्हणून ओळखले जाते. कोळवा, बागाबेट, सिरीडाओ, बायना, मॅनड्रीम बिचेस प्रसिध्द आहेत.

### ७) महाराष्ट्र :-

महाराष्ट्रामध्ये ऐतिहासिक पर्यटनाबरोबर पर्यावरण पर्यटनदेखील मोठ्या प्रमाणात चालते. सह्याद्रीच्या रांगामध्ये प्रचंड मोठी जैवविविधता आहे. त्याचबरोबर समुध्द निसर्ग सौंदर्य, विस्तारित समुद्र किनारे, अभयारण्ये आहेत. कोयना, नागझिरा, मेळघाट, दाजीपूर व राधानगरी अभयारण्ये पर्यावरण पर्यटनासाठी प्रसिध्द आहेत. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, तारकर्ली, तोंडवली, अलिबाग, मुरुड इत्यादी ठिकाणचे समुद्र किनारे पर्यटकांचे आकर्षण केंद्रे आहेत.

### ८) गुजरात :-

गुजरातमधील कच्छच्या रणापासून ते सातपुडा पर्वतरांगांपर्यंत सर्व प्रकारच्या पर्यावरण पर्यटनाचे केंद्र आहे. आशिया खंडातील 'सिंहाचे माहेरघर' म्हणून गुजरातची ओळख आहे. गिर अभयारण्य सिंहाच्या बरोबरच गरम पाण्याच्या झऱ्यासाठी देखील प्रसिध्द आहे.

### ९) राजस्थान :-

राजस्थानला 'राजेलोकांची भूमी' म्हणून ओळखले जाते. उदयपूरमधील अनेक तलाव, वाळूच्या टेकड्या, उंटावरील सफरी व माऊंट आबू येथील सर्वाधिक उंचीचे शिखरे व थंड हवेचे ठिकाण पर्यटनाचे आकर्षण आहे. 'नाक्की'सरोवर अबूमधील खास आकर्षण आहे. हिमालयखेरीज इतक्या उंचीवर दुसऱ्या ठिकाणी असे सरोवर पहावयास मिळत नाही. राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात 'केओलदेव राष्ट्रीय उद्यान' व 'रणथंबोर राष्ट्रीय उद्यान' आहे, यामधील केओलदेव हे 'पक्षाचे नंदनवन' म्हणून ओळखले जाते. याठिकाणी ३०० पेक्षा जास्त पक्षाच्या प्रजाती आहेत. मध्य आशिया-सैबेरियातील स्थलांतरित पक्षी मोठ्या संख्येने या ठिकाणी येतात, त्यामुळे मोठ्या संख्येने पर्यावरण प्रेमी पर्यटक राजस्थानला भेट देतात.

### १०) मध्यप्रदेश :-

मध्यप्रदेशची ओळख 'वाघांचे राज्य' म्हणून आहे. मध्य प्रदेशमधील कान्हा, बांधवगड, माधव कुनो व परलपूर राष्ट्रीय उद्याने खास वाघासाठी प्रसिध्द आहेत. सातपुडा व विंद्यपर्वतरांगा यामधून उगम पावणाऱ्या नद्या, धबधबे हे या ठिकाणचे आकर्षण आहे.

### ११) ओरिसा :-

कोणार्कच्या सूर्यमंदिरामुळे ओडिसाची जगभर ओळख आहे. त्याचबरोबर ओडिसामध्ये मोठ्या प्रमाणात निसर्ग सौंदर्याने नटलेला प्रदेशही आहे. 'रिजनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्री', 'बॉटॅनिकल गार्डन', 'खांडगिरी गुहा', 'पठाणी समतोप्लॅनिटोरिअम' इत्यादी निसर्ग प्रेमींची खास ठिकाणे आहेत. ओरिसाच्या किनाऱ्यावरील 'चिल्का' हे खाऱ्या पाण्याचे सरोवर प्रसिध्द आहे. या सरोवरात मोठ्या संख्येने स्थलांतरित पक्षी प्रतिवर्षी येतात.

### १२) छत्तीसगड :-

पर्यावरण पर्यटनासाठी छत्तीसगड प्रसिध्द आहे. येथील ४१.३३% जमीन जंगलांनी व्यापलेली असून या जंगलांमध्ये समृध्द जैवविविधता पहावयास मिळते. या ठिकाणचे 'चित्रकोट' व 'काटाटोल' हे धबधबे प्रसिध्द आहेत.

### १३) पंजाब :-

पंजाब इतिहास व तेथील खाद्य संस्कृतिसाठी प्रसिध्द आहे, त्याचबरोबर रॉक गार्डन, झाकीर हुसेन रोझ गार्डन व सुरण सरोवर ही पंजाबमधील पर्यावरण प्रेमींची आकर्षण केंद्रे आहेत.

### १४) जम्मू आणि काश्मिर :-

भारताचे नंदनवन म्हणून जम्मू आणि काश्मिरचा उल्लेख होतो. याठिकाणचे 'पटणी टॉप' हे थंड हवेचे ठिकाण, मंतालाई व शिवखोरी ही स्थळे पर्यावरण पर्यटकांचे आकर्षण आहे. जम्मूमधील 'मानस सरोवर' व 'दल सरोवर' हे जगप्रसिध्द आहे. गुलमर्ग 'फुलांचे कुरण' म्हणून ओळखले जाते. जम्मू आणि काश्मिरमधील बर्फाच्छादित हिमालय, सूचीपर्णी वृक्षांची जंगले, हिमनद्या, हिमवृष्टी यासाठी गुलमर्ग, सोनमर्ग, पहेलगाव, खिलनमर्ग इत्यादी ठिकाणे प्रसिध्द आहेत. निसर्ग सौंदर्याने नटलेली लुब्रादरी, पॅगॉग सरोवर, मोरीरी सरोवर इत्यादीसह 'शालीमार गार्डन', 'मुघल गार्डन' प्रसिध्द आहे. हिवाळ्यामध्ये मोठ्या संख्येने पर्यटक या ठिकाणी भेट देतात.

### १५) हिमाचल प्रदेश :-

हिमाचल प्रदेश निसर्ग सौंदर्य व थंड हवेच्या ठिकाणासाठी जगप्रसिध्द आहे. हिमाचल प्रदेशमधील वशिष्ठबाय हे सल्फरयुक्त गरम पाण्याच्या झऱ्यासाठी प्रसिध्द आहे. हिवाळ्यातील बर्फ व बर्फावरील क्रिडा प्रकार हे येथील पर्यटनाचे वैशिष्ट्य आहे, त्याचबरोबर सिमला, कुल-मनाली, चंबा, धर्मशाळा ही थंड हवेची ठिकाणे प्रसिध्द आहेत. चंबा-डलहौसीची ओळख आरोग्यधाम म्हणून आहे.

### १६) उत्तराखंड :-

उत्तराखंड देवभूमी म्हणून ओळखले जाते. उत्तराखंडमधील पर्यावरण पर्यटकांचे खास आकर्षण म्हणजे हिमालयातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर 'नंदादेवी' येथे आहे. याशिवाय कांचनगंगा, नीतकांत, दूनागिरी इत्यादी उंच शिखरेही याच ठिकाणी आहेत. उत्तराखंडमध्ये हिमाच्छादीत पर्वतरांगाच्या बरोबर राष्ट्रीय जीम कॉर्बेट उद्यान, राजाजी राष्ट्रीय उद्यान, नंदादेवी राष्ट्रीय उद्यान, गोविद वन्यजीव अभयारण्य, अस्कोत हरणांचे अभयारण्य हे येथील निसर्गप्रेमीचे आवडते ठिकाण. पिंडारी, मिलान, दूनगिरी व टोकरानी इ. हिमनद्या पाहण्यासाठी विदेशी पर्यटक मोठ्या संख्येने येतात. ब्रिटीश काळात विकसित झालेली मसुरी, अल्मोडा, राणीखेत, नैनिताल, द्वारहर इ. प्रसिध्द थंड हवेची ठिकाणे याच ठिकाणी आहेत.

पाईन वृक्षांनी वेढलेले मसुरी 'हॅपी व्हॅली' म्हणून प्रसिध्द आहे. नैनितालमधील सरोवर हे पर्यटकांचे आवडते ठिकाण आहे.

### १७) पश्चिम बंगाल :-

व्याघ्र प्रकल्पांची सुरुवात पश्चिम बंगालमधून झाली. जागतिक वारसा स्थळ यादीत नोंद असलेली अनेक स्थळे या ठिकाणी आहेत. यातील 'सुंदरबन' हे जागतिक स्तरावरील मोठे खारफुटीचे जंगल याच राज्यात आहे. दार्जिलिंग, कालीमपॉग, कावा इत्यादी थंड हवेची ठिकाणे प्रसिध्द आहेत. पश्चिम बंगाल राज्यात सहा समृध्द अशी राष्ट्रीय उद्याने आहेत. विशेषतः सुंदरबन राष्ट्रीय उद्यान, बुक्सा वाघाचे राखीव क्षेत्र, जलदपारा राष्ट्रीय उद्यान, सिंगालिया राष्ट्रीय उद्यान, निओरा व्हॅली राष्ट्रीय उद्यान, गोरामाटा राष्ट्रीय उद्यान, दार्जिलिंग मधील लॉईड बोटॅनिकल गार्डन, पद्मा नायडू झुऑलॉजिकल पार्क इत्यादीचा पर्यावरण पर्यटक मोठ्या संख्येने आनंद घेतात.

### १८) सिक्कीम :-

'पीसफुल होम' अशी सिक्कीमची ओळख आहे. नथुला खिंड, रूमटेक विहार, सागपो सरोवर, ताशी व्हयू पॉईट, रिजपार्क, टिब्रटॉलाजी इत्यादी ठिकाणे पर्यावरण पर्यटनासाठी प्रसिध्द आहेत. सिक्कीममध्ये मोठ्या प्रमाणात ऑर्किडची झाडे आहेत. या ठिकाणी प्रतिवर्षी आंतरराष्ट्रीय 'फ्लॉवर शो' आयोजित केला जातो.

### १९) अरुणाचल प्रदेश :-

अरुणाचल प्रदेशामध्ये ऑर्किडच्या ६०० जाती आहेत, त्यामुळे त्याला 'होम ऑफ ऑर्किड' असे म्हणतात. ती पहाण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यावरण प्रेमी पर्यटक भेट देतात.

### २०) आसाम :-

पक्षी व वन्यप्राण्यासाठी प्रसिध्द असलेले राज्य अशी आसामची ओळख आहे. याठिकाणी पाय राष्ट्रीय उद्यान व २० पक्षी वन्यजीव अभयारण्ये आहेत. त्यापैकी काझीरंगा व मानस राष्ट्रीय उद्योनांची नोंद जागतिक वारसा यादीत आहे. आसामची ओळख चहाचे राज्य म्हणून देखील आहे. या ठिकाणचे पालामाऊ व्याघ्र प्रकल्प खास भारतीय चित्यासाठी प्रसिध्द आहे.

### २१) मिझोराम :-

मिझोराम राज्य सुंदर निसर्ग सौंदर्य व आल्हाददायक हवामानासाठी प्रसिध्द आहे. 'हमुई फंग' व 'रेईफ हिल्स' ही याठिकाणची थंड हवेची ठिकाणे आहेत. वानत्वांग धबधबा, मुर्लीन राष्ट्रीय उद्यान, डंपा टायगर रिझर्व्ह ही पर्यावरण पर्यटकांची खास आकर्षण केंद्रे आहेत.

### २२) मणिपूर :-

भारतातील सर्वात मोठं 'लोकतक' सरोवर मणिपूर मध्ये आहे. या सरोवरात वाढलेल्या पाणवनस्पतीची तरंगती बेटे तयार झाली आहेत. त्याला 'फूमडी' म्हणतात. विशिष्ठ मोसमात येणारी, फुले, झाडे, पक्षी व प्राणी यासाठी डझुक दरी प्रसिध्द आहे. याशिवाय येथील चून खडकातील प्रसिध्द यालॉन व खानगरखुई गुहा, सादू धबधबा हे येथील विशेष पर्यावरणीय आकर्षण आहे. हरीण व काळवीटासाठी प्रसिध्द असलेले कैबुल लाम जाओ राष्ट्रीय उद्यान याच राज्यात आहे.

### २३) मेघालय :-

भारतातील सर्वात जास्त पाऊस पडणारे राज्य म्हणून मेघालयाची ओळख आहे. विशेषत: 'चेरापुंजी' याठिकाणी १००० हून अधिक गुहा आहे, त्यामुळे याला 'गुहाचे राज्य' म्हणतात. सदाहरित जंगल वनस्पतीसाठी हा प्रदेश प्रसिध्द असून गारो खासी व जयंती या टेकड्यांचा प्रदेश वर्षभर हिरवागार असतो, त्यामुळे येथे निसर्गप्रेमी वर्षभर येत असतात.

### २४) त्रिपूरा :-

त्रिपूरा हे प्रदूषणविरहित पर्यावरण जपणारे राज्य म्हणून प्रसिध्द आहे. आल्हाददायक हवामानासाठी व निसर्ग सौंदर्यासाठी याची विशेष प्रसिद्ध आहे.

## १०. पर्यावरण पर्यटनाचे फायदे :-

पर्यावरण पर्यटनास शाश्वत पर्यटन असे म्हणतात. त्यामुळे त्याचे आर्थिक, सामाजिक व पर्यावरणीय फायदे खूप मोठ्या प्रमाणात आहेत. ते खालीलप्रमाणे पहावयास मिळतात.

१) पर्यावरण पर्यटन क्षेत्रात बाजारपेठ निर्माण होते.
२) शाश्वत आर्थिक विकास साधण्यास मदत.
३) प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी.
४) स्थानिक जमिनीचे वाढलेले मूल्य.
५) कमजोर घटकांच्या उत्पन्न वाढीचे माध्यम.
६) स्थानिक आणि प्रादेशिक विकास.
७) नैसर्गिक वातावरणाचे संरक्षण.
८) पर्यावरणीय प्रदूषणाचे निराकरण.
९) जैवविविधता संसाधनाचे संरक्षक.
१०) पर्यावरण संतुलनासाठी मदत.
११) वन्यजीव व प्रजातीचे संरक्षण.

१२) स्थानिक स्तरावरील भांडवली वाढ.

१३) सामाजिक अभिसरण.

१४) स्थानिकांच्या राहणीमानात वाढ.

## स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. जगातील ........... देशामध्ये हिरवे पर्यटन ही संज्ञा वापरली जाते.

२. भारत सरकारने .......... मध्ये पर्यावरण पर्यटन धोरण राबविले.

३. वाईनाड वन्यजीव अभयारण्य .......... राज्यात आहे.

४. ........... राज्याला सिंहाचे माहेरघर म्हणतात.

५. छत्तीसगड मधील ........... % जमीन व जंगलांनी व्यापलेली आहे.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. पर्यावरण पर्यटनाची संकल्पना कोणत्या दशकात उदयास आली.

२. केरळला कोणत्या नावाने ओळखले जाते.

३. जगातील सर्वात मोठा दुसऱ्या क्रमांकाचा मारिना बीच कोणत्या राज्यात आहे.

४. राजे लोकांची भूमी म्हणून कोणते राज्य ओळखले जाते.

५. फुलांचे कुरण हे नाव कोणत्या ठिकाणाला आहे.

## ४.२.२ वैद्यकीय पर्यटन (Medical Tourism)

वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांसाठी आपल्या देशातून दुसऱ्या देशात जाणे होय. केवळ वैद्यकीय उपचार घेणे इतका मर्यादित अर्थ अथवा संकल्पना वैद्यकीय पर्यटनात नाही, तर उपचारादरम्यान तिथल्या आनंददायी वास्तव्याचा पैलू जोडला गेलेला आहे. आधुनिक उपचार घेण्यासाठी भारतातील रूग्ण युरोपीय देशामध्ये जात होते. मात्र गेल्या एक-दोन दशकात ही परिस्थिती बदललेली असून वैद्यकीय पर्यटनाला भारतात आयुर्वेद व योगशास्त्राची भक्कम साथ लाभल्याने चालना मिळत आहे. अनेक अविकसित व गरीब देशांच्यामध्ये असाध्य रोगावर उपचार होऊ शकत नाही अथवा भीषण अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या रुग्णावर अवघड शस्त्रक्रिया व अनुरूप उपचार होऊ शकत नाहीत अथवा गंभीर रोगांच्या साथीला तोंड द्यायला स्थानिक यंत्रणा सक्षम नसतात. अशा रुग्णाना योग्य उपचारासाठी दुसऱ्या राज्यात अथवा देशामध्ये घेवून जातात.

## १. वैद्यकीय पर्यटनाचा अर्थ/संकल्पना :–

वैद्यकीय पर्यटन ही संकल्पना वैद्यकीय उपचारासाठी वापरली जाते. यामध्ये आरोग्य केंद्रीत विस्तृत निवारक आणि उपचारांचा पुर्नवास व पुर्नउत्पादक स्वरूपाच्या रुग्णांचा समावेश होतो. वैद्यकीय पर्यटन ही 'संकल्पना आरोग्य पर्यटन', 'वैद्यकीय प्रवास', 'जागतिक आरोग्य पर्यटन', 'आरोग्यासाठी पर्यटन' इत्यादी नावांनी वापरली जाते. याचबरोबर वैद्यकीय पर्यटन या संकल्पनेचा दुसऱ्या अंगानेही विचार होतो की, ज्यामध्ये जगभरातील विकसित देशातील पर्यटकांनी वैद्यकीय औषधोपचारासाठी विकसनशील देशामध्ये केलेला प्रवास या अर्थाने वैद्यकीय पर्यटन ही संकल्पना वापरली जाते. विशेषत: पर्यटकांच्या मूळ देशात त्यांना हव्या असलेल्या आरोग्य सेवांचा खर्च परवडत नाही, वैद्यकीय सेवा मिळविण्यासाठीची क्लिष्ठ प्रक्रिया, प्रतिक्षा कालावधी जास्त असणे इत्यादी कारणासाठी असे रूग्ण पर्यटक दुसऱ्या देशात जातात. या पर्यटनाला प्रभावी खर्च (Effective Cost) असेही म्हणतात. काही रूग्ण पर्यटकांना अतितात्काळ औषधोपचारासाठी दुसऱ्या देशात जावे लागते यानाही वैद्यकीय पर्यटक म्हणतात. अशा प्रकारची वैद्यकीय सेवा सध्या खाजगी, सामूहिक, सार्वजनिक व कॉर्पोरेट क्षेत्राकडून पुरविली जाते. वैद्यकीय पर्यटन अथवा प्रवास हा एका देशातून दुसऱ्या देशात दंत चिकित्सा, शल्यचिकित्सा प्राप्त करण्यासाठी किंवा काळजी घेण्यासाठी केला जातो. गुर्ड्रिच आणि गुड्रिच (Goodrich & Goodrich) यांनी दोन दशकापूर्वी वैद्यकीय पर्यटनाची खालील प्रमाणे व्याख्या केलेली आहे. "The attempt on the part of a tourist facility (for example a Hostel) or distination to attract tourist by deliberately promoting its health care service and facilities in addition to its regular tourists amenities."

## २. वैद्यकीय पर्यटनाचे स्वरूप :–

२१ व्या शतकामध्ये पर्यटनाची संकल्पना बदलत आहे. पारंपारिक पर्यटनाबरोबर आधुनिक पर्यटनाची जोड मिळत आहे. अत्याधुनिक या अर्थाने की, गेल्या काही दशकापासून समाजातील सर्वच स्तरावर आरोग्यविषयक जागृती मोठ्या प्रमाणावर होत आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये अनेक शोध लागले असून विशेषतज्ञांची संख्याही प्रचंड वाढली आहे. सामाजिक जागृतीबरोबरच वैद्यकीय क्षेत्रामध्ये पायाभूत सेवा-सुविधांच्यामध्ये दर्जात्मक वाढ झालेली आहे. वैद्यकीय क्षेत्रामध्ये नव्याने विकसित झालेला प्रकार म्हणजे 'वैद्यकीय पर्यटन' होय. आरोग्य आणि पर्यटन यांची ज्या वेगाने वृध्दी झाली ती लक्षात घेवून प्रवासी कंपन्या आणि प्रसार माध्यमांनी या पर्यटन प्रकाराला 'वैद्यकीय पर्यटन' असे नाव दिलेले आहे. थोडक्यात, जगातील कानाकोपऱ्यातून लोक पर्यटनासाठी एका देशातून दुसऱ्या देशात जातात, त्याचवेळी तेथील विशेषज्ञांकडून वैद्यकीय सेवाही घेतात. आधुनिक औषधोपचार पध्दतीमध्ये सर्वसाधारणपणे मुखावाटे औषधे दिली जातात. त्याचप्रमाणे जरूरी असेल तर शस्त्रक्रिया करणे, सांधे बदलणे, एखाद्या अवयवाचे प्रत्यारोपण करणे, विविध प्रकारच्या निदान चाचण्या करणे, सौंदर्यवृध्दीसाठी शस्त्रक्रिया करणे, बहुवैशिष्ट्यपूर्ण वैद्यकीय काळजी घेणे, वंध्यत्व निवारणासाठी उपचार घेणे, रक्ताविषयीचे आणि रक्तवाहिन्यांचे आजार यावर उपचार घेण्यासाठी वैद्यकीय पर्यटन मोठ्या प्रमाणात केले आहे.

## ३. वैद्यकीय पर्यटनामध्ये पर्यटकांचे प्रकार :-

वैद्यकीय पर्यटनाचे प्रमुख तीन प्रकार पहावयास मिळतात.

१. **आऊटबाऊंड :** यामध्ये रूग्ण उपचार करण्यासाठी स्वत:च्या देशातून इतर बाह्य देशात प्रवास करतात.

२. **इनबाऊंड :** यामध्ये परदेशी रूग्ण पर्यटक उपचारासाठी आपल्या देशात येतात.

३. **इन्ट्राबाऊंड :** देशातल्या देशात उपचार घेण्यासाठी रूग्ण पर्यटक प्रवास करतात ज्यामध्ये उत्कृष्ठ प्रतीची सेवा प्राप्त करणे हा हेतू असतो.

## ४. वैद्यकीय पर्यटनाचा इतिहास :-

वैद्यकीय पर्यटनाचा इतिहास अतिप्राचीन म्हणजे इ.स.पू. ४००० वर्षापासून मिळतो. इ. स. पू. ४००० मध्ये सुमेरियन लोकांनी औषधोपचारासाठी आरोग्य संकूल निर्माण केले होते. या संकुलामध्ये खनिजयुक्त गरमपाणी रूग्णाच्या अंगावर घातले जात असे म्हणजे 'अंगावर पाणी घेणे' अर्थात 'स्पा'. १८ व्या शतकात युरोपमध्ये ज्या 'स्पा' केंद्राचा विकास झाला तिच ही संकल्पना. यालाच 'पाण्याद्वारे आरोग्य' असेही म्हणतात. पुढे वैद्यकीय पर्यटनात ग्रीक लोकांचे नाव येते. वैद्यकीय उपचारासाठी प्रवास करणाऱ्या ग्रीकांनी पूर्वेकडील भूमध्यसागरी भागातून सारोनिक खाडीतील छोटासा भाग असलेल्या 'एपिडॉरिया' अथवा 'एपिडॉरिअन' येथे प्रवास केला. 'एपिडॉरिया' म्हणजे रूग्णांना उपचार देणारा देव 'आक्लिपियस' अथवा 'आस्केपियस' ज्या ठिकाणी राहतो तो प्रदेश. या आक्लिपियसची प्राचीन ग्रीक धर्मातील व पौराणिक कथामधील एक नायक व औषधांचा देव म्हणून ओळख होती. या ठिकाणी आक्किपियसचे मंदिर आक्सलेपीओयन होते. हे ठिकाण पुढे 'स्पा कसबे' (अंगावर पाणी घेण्याचे गाव) व 'सेनिटोरिया' म्हणून प्रसिध्द वैद्यकीय केंद्र म्हणून प्रसिध्दीस आले. (सेनिटोरिया म्हणजे दीर्घकालीन आजाराकरिता वैद्यकीय सुविधा असणारे केंद्र विशेषत: क्षय रोगासाठी).

रोमन साम्राज्याच्या काळात सुमेरियन लोकांच्यामध्ये असलेली अंगावर पाणी घेण्याची पध्दती पुन्हा प्रसिध्दीस आली. खनिजयुक्त गरम पाण्याचे, झऱ्याचे पाणी विविध (मिनरल थर्मल स्प्रिंग्ज व बाथ) कारणासाठी व उपचारासाठी अंगावर घेतले जात असे. रोमन संस्कृतीच्या ऱ्हासानंतर वैद्यकीय पर्यटनासाठी आशिया खंड प्रसिध्दीस आले. या काळात जपानमधील 'ऑन्सन' अथा 'ऑनन' हे गरम पाण्याचे झरे त्याच्या औषधी गुणधर्मामुळे प्रसिध्द झाले. समुराई लोक युध्दातील जखमा व वेदना कमी करण्यासाठी याचा उपयोग करत, ही उपचार पध्दती 'स्पा' मधीलच एक प्रकार होता. मध्ययुगाच्या सुरूवातीस कैरो येथे 'मन्सुरी हॉस्पिटल' बांधण्यात आले (११४८). या ठिकाणी १२०० बेडची सोय होती. युरोपमध्ये १४ वे ते १७ वे शतक हा पुनरुज्जीवनाचा कालखंड होता. या कालखंडात युरोपमध्ये वैद्यकीय पर्यटनाचा जोमाने विकास झाला. राजे-रजवाडे, गर्भश्रीमंत व व्यापारी वर्ग याकडे मोठ्या प्रमाणात आकृष्ठ झाले.

इ.स. १३२६ मध्ये इंग्लंड मधील विले डी ऑकस जवळ 'टॉऊन ऑफ वॉटर' हे गाव लोहयुक्त गरम पाण्याच्या झऱ्यासाठी पूर्ण युरोपभर प्रसिध्दीस आले. वैद्यकीय पर्यटनाचे आकर्षण क्रेंद झाले.

१६ व्या शतकामध्ये युरोपमधील श्रीमंत व उच्च कुळातील लोकांच्यामध्ये रोमनकालीन 'बाथ'ची संकल्पना पुन्हा प्रसिध्द झाली. 'बाथ' म्हणजे आरोग्यासाठी 'समुद्र विहार' करणे किंवा पाणी अंगावर घेणे. या अर्थाने 'स्पा' केंद्राचा खूप मोठ्या प्रमाणात विकास झाला. इ. स. १५६२ मध्ये विल्यम टर्नर याने प्रकाशित केलेल्या पुस्तकामध्ये पाण्याच्या औषधी गुणधर्माविषयी खूपच मनोरंजक माहिति प्राप्त होते. युरोपमध्ये मिशेल इक्वेन दे मॉन्टॅगने याला वैद्यकीय पर्यटनाचा उदगाता म्हणून ओळखले जाते. त्याने वैद्यकीय पर्यटनावर आधारित 'स्पा' केंद्रावर मार्गदर्शिका लिहिल्या. इ. स. १७२० च्या दशकात लंडन शहर वैद्यकीय पर्यटनामध्ये अग्रेसर होते. १८ व्या व १९ व्या शतकाच्या सुरुवातीस युरोपमधील लोक आपले आरोग्य उत्तम रहावे व सुधारण्यासाठी शेजारच्या देशामध्ये जावू लागले. यावर त्याकाळी कोणतीही बंधने नव्हती. प्राथमिक टप्प्यामध्ये शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्याकडे लोकांचा कल होता.

२० व्या शतकामध्ये वैद्यकीय पर्यटनाने खऱ्या अर्थाने व्यावसायिक स्वरूप घेतले. व्यावसायिक धोरण व व्यवस्थापन कौशल्याच्या आधारावर याकडे पाहिले जावू लागले. इ. स. १९३३ मध्ये 'अमेरिकन मेडिकल स्पेशालिस्ट' (एबी.एम.एस.) ची स्थापना झाली. या संस्थेने व्यावसायिक वैद्यकीय धोरण विकसित केले. त्यानंतर इ. स. १९५८ मध्ये 'युरोपियन युनियन ऑफ मेडिकल स्पेशॉलिटी'ची (यु.ई.एम.एस.) ची स्थापना झाली. याच्या परिणाम स्वरूप १९६० च्या दशकात अमेरिका व ब्रिटनमध्ये वैद्यकीय पर्यटनाला चालना मिळाली. इ. स. १९८० च्या दशकात अमेरिकेतील रूग्णांनी औषधोपचाराकरिता इतर देशात जाणे पसंत केले, कारण या काळातील औधषोपचारांचा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेर गेलेला होता. शिवाय मोठ्या प्रमाणात रूग्णाना प्रतिक्षा काळाला सामोरे जावे लागत होते. १९९७-९८ मध्ये आशियाई देशामध्ये आर्थिक मंदीमुळे संकट निर्माण झालेले होते. आशियाई देशांनी येथील पर्यटनावर लक्ष केंद्रीत करून पर्यटनाला चालना देण्याचा जोराचा प्रयत्न केला. यामध्ये थायलंड देशाने आघाडी घेतली व युरोपीयन लोकांचे आकर्षण केंद्र ठरले. इ. स. १९९७ मध्ये जागतिक स्तरावर वैद्यकीय पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. यातून आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्य-सेवा-सुविधा तपासण्यासाठी 'संयुक्त कमिशन इंटरनॅशनल'ची (जे.सी.आय.) स्थापना करण्यात आली. ही संस्था जगभरातील हॉस्पिटलला जागतिक स्तरावर मानांकन व त्याचे धोरण ठरविण्याचे काम करते आहे.

## ५. भारतातील आरोग्य/वैद्यकीय पर्यटन संकल्पना :-

मानवाला आपल्या शारीरिक आजाराबद्दल हजारो वर्षापासून कुतुहल आहे. रोग, व्याधी यांच्याबद्दलच्या संकल्पना मात्र काळाप्रमाणे सतत बदलत गेलयाचे दिसते. त्याचबरोबर शारीरिक आजाराचे अथवा व्याधीचे निदान व उपचार करण्याचे तंत्र व जबाबदारीही प्राचीन काळी रोगांना दैवी प्रकोप अथवा चेटूक समजले जात असे. हा प्रकोप उतरवण्याकरिता मांत्रिक, जादूटोणा करणाऱ्याकडे जावे लागत असे. पुढील काळातही

जबाबदारी पुजारी व धर्मगुरूंच्यावर आली. प्राचीन काळातील 'चरक', 'सुश्रुत' या वैद्यकांची ख्याती चीन, पर्शिया व अरबस्तान पर्यंत पोहचली होती. त्याकाळातील वैद्यकीय संकल्पना व्यापारी मार्गाने इतरत्र पोहचत असत. प्राचीन ग्रीक, अरबी व भारतीय वैद्यकामधील संकल्पनामध्ये बरेच साम्य होते. प्राचीन चरक संहिता व सुश्रुतसंहिता हे ग्रंथ भारतीयांच्या वैद्यकशास्त्रातील सखोल वैद्यकीय ज्ञानाची प्रचिती देतात. आयुर्वेदीक उपचार पध्दतीचा प्रचार आणि प्रसार विविध देशांच्यामध्ये झालेला दिसतो, याचा अर्थ औषधोपचारासाठी विविध देशातील लोक भारतात येत होते. याचा उल्लेख मध्य आशियामधील 'नावनीतकम' या ग्रथांत मिळते. खलिफाच्या शासनकाळात भारतीय वैद्यकांना बगदादमध्ये आमंत्रित केल्याचा उल्लेख मिळतो.

मध्ययुगीन कालखंडात आयुर्वेदिक औषधोपचार पध्दती कायम राहिलेली दिसते. पारा व रसशास्त्राचा उपचारासाठी उपयोग होत होता. १६ व्या शतकात भारतीय वैद्यकांचा युरोपीय वैद्यकाशी संपर्क आल्याचे भावमिश्राच्या 'भावप्रकाश' या ग्रंथामधून दाखला मिळतो. तंजावरमधील राजे सरफोजी दुसरे (१७७७-१८३२) यांनी युरोपीय व भारतीय चिकित्सा पध्दतीचा समन्वय करून एक रूग्णालय (धन्वंतरी महल) स्थापन केले होते. १९ व्या शतकात भारतात आयुर्वेदिक उपचार पध्दतीचा खूप मोठ्या प्रमाणात विकास झाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांनी आधुनिक चिकित्सा पध्दतीचे शिक्षण देण्यासाठी एका संस्थेची स्थापना केली. पुढे लॉर्ड बेटिंगने कलकत्यामध्ये मेडिकल कॉलेजची स्थापना केली. या कॉलेजमधील विद्यार्थी मधुसुदन गुप्ते याने पहिल्यांदा शव विच्छेदन केले, त्याप्रसंगी फोर्ट विल्यिम यांनी तोफेची सलामी दिलेली होती. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर प्राचीन भारतीय योग आणि आयुर्वेदिक औषधोपचार पध्दतीचा जगभर प्रसार झाला, त्यातून वैद्यकीय पर्यटनाला चालना मिळाली.

## ६. भारतात उपलब्ध असलेल्या उपचार पध्दती :-

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आणि विविध स्वरूपाची औषधोपचार पध्दती आज उपलब्ध आहे. भारताला योगशास्त्राची व आयुर्वेदाची जननी म्हणून ओळख जाते. आयुर्वेदिक उपचार पध्दती ही भारतीय संस्कृतीची ओळख आहे. आयुर्वेद म्हणजे 'जीवनाचे विज्ञान' असे वर्णन केले जाते. योग व आयुर्वेदाबरोबर, भारतात युनानी, सिध्दी, होमिओपॅथी, ॲलोपॅथी, निसर्गोपचार, ध्यान, संगीतोपचार, सुगंधोपचार (अरोमा) प्राणिक उपचार आणि रेकी इत्यादी उपचार व चिकित्सा पध्दती उपलब्ध आहेत. युरोपीय पर्यटक योग व आयुर्वेदिक उपचाराकरिता भारताला पसंती देतात.

## ७. वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिध्द देश :-

जागतिक आर्थिक मंदीच्या काळात थायलंडमध्ये वैद्यकीय पर्यटन व्यवसायाचा खूप मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार झाला. परकीय चलन प्राप्त करून देण्याची क्षमता या व्यावसायात असल्याने पुढील काळात झपाट्याने याचा विस्तार इतरही देशात झाला. थायलंड पाठोपाठ, कॅनडा, कोस्टा-रिका, इक्वाडोर, इस्त्रायल, मलेशिया, मेक्सिको, सिंगापूर, दक्षिण कोरिया, तैवान, तुर्की, अर्जेटिना, क्यूबा इत्यादी देश वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिध्द आहेत. या देशांच्यामध्ये अतिशय गुंतागुंतीच्या व खर्चिक शस्त्रक्रिया स्वस्तात

केल्या जातात. विशेषतः दंतविकार, मूत्रपिंड विकास, अवयव प्रत्यारोपण, लिंग बदल, हेयर ट्रान्सप्लॉन्ट, हृदयरोग इत्यादीचा समावेश आहे. थायलंड प्लास्टिक सर्जरीसाठी प्रसिध्द आहे तर भारत दंतविकार व हेयर ट्रान्सप्लॉन्ट, योग व आयुर्वेदिक पंचकर्मसाठी प्रसिध्द आहे.

## ८. भारतात वैद्यकीय पर्यटनाला वाव का?

वैद्यकीय पर्यटनाबरोबरच भारतामध्ये इ.स. २०११ मध्ये 'अतिथी देवो भव' ही संकल्पना सुरू केली. यामध्ये भारतीयांनी परदेशी पर्यटकांशी कसे अदबीने वागावे, काय शिष्टाचार पाळावेत याबाबत स्थानिक लोकांना शिक्षित करण्यासाठीची मोहिम सुरू केली. भारतामध्ये येणारा पर्यटक हा देवासमान आहे आणि त्याला सर्व आवश्यक सेवा-सुविधा मिळाल्या पाहिजेत याविषयी व्यवस्था राबविण्यास सुरुवात केली. वैद्यकीय पर्यटनासाठी आलेल्या रूग्णाना विशेषज्ञांकडून उपचार, रूग्ण प्रवाशाला अतिशय आरामदायक वाटावे असे उपचार स्थान, कमी किंमत आणि प्रतिक्षेचा काळ कमी, याचबरोबर उपचारासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. सध्या भारतामध्ये उपचार घेणाऱ्या पर्यटकांच्यामध्ये सर्वात जास्त प्रवासी आफ्रिका, मध्यपूर्व अफगाणिस्तान, इराक व बांगलादेश या देशातील आहेत.

अलिकडच्या काळात अँजिओप्लास्टी, हृदयावरील शस्त्रक्रिया, सांध्यांचे प्रत्यारोपण, मोतीबिंदूसारख्या डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, पित्ताशय, मूत्रपिंड अशा अवयवांचे प्रत्यारोपण, कर्करोग यांच्यावर उपचार घेण्यासाठी येणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. भारतात या गुंतागुंतीच्या रोगांवर उपचार करण्याची सुविधा आहे, त्याचबरोबर विमा बाजार आणि औषधांचा बाजारही विस्तारला आहे. यामध्ये आरोग्य आणि कुटुंब कल्याण व पर्यटन मंत्रालय यांनी एकत्रित कार्याला सुरूवात केलेली आहे.

भारतातील वैद्यकीय, आरोग्य सुविधा, पर्यटन सेवा क्षेत्राचे जाळे आणि इतर घटक यासंदर्भात एस. डब्ल्यू.ओ.टी. यांच्यावतीने एक सर्वेक्षण करण्यात आले. सूक्ष्म विभागीय पर्यावरणीय नियोजनानुसार वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या पर्यटकांना भारत म्हणजे स्वर्ग वाटतो. इथे मिळणारी सेवा, इथला आल्हाददायक निसर्ग, आधुनिकता आणि पारंपारिकता यांची वैद्यकीय क्षेत्राने घातलेली सांगड यांच्यामुळे रूग्णाला अपेक्षेपेक्षा खूपच लवकर आराम मिळतो. भारतातील 'वैद्यकीय पर्यटन व्यवसाय' या विषयावर एक स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले आहे. भारतात वैद्यकीय पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या प्रतिवर्षी ३०% नी वाढत आहे. पश्चिम आशिया, मध्यपूर्व आफ्रिका या देशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक वैद्यकीय पर्यटनासाठी येतात.

## ९. वैद्यकीय पर्यटन विकसित होण्यास सहाय्यभूत घटक :-

वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचार घेण्यासाठी पर्यटक एका देशातून दुसऱ्या देशात जातात, वैद्यकीय उपचार पूर्ण झाल्यानंतर आजूबाजूच्या पर्यटन स्थळांनादेखील भेट देतात. भारतात ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक व निसर्ग पर्यटनाला खूप मोठा वाव आहे व मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळेही उपलब्ध आहेत. ही बाब वैद्यकीय पर्यटनासाठी भारताच्या दृष्टीकोणातून जमेची बाजू आहे. पूर्वी विकसनशील

देशातील लोक उत्तम हॉस्पिटल व डॉक्टर उपलब्ध नसल्याने विकसित देशात जावून तेथे उपचार घेत. उदा. कॅन्सरवर उपचार घेण्यासाठी भारतीय रूग्ण अमेरिकेला जात असत. मात्र गेल्या दशकापासून लोकांचा कल विकसित देशांकडून विकसनशील देशांमध्ये जाण्याकडे वाढला आहे. यासाठी पुढील घटक सहाय्यभूत ठरतात.

१) कमीतकमी खर्चात उपचार.

२) वैद्यकीय उपचारांना काही देशात कायद्याने मान्यता नाही, त्यामुळे जेथे मान्यता आहे तेथे हे लोक जातात. उदा. कृत्रिम गर्भधारणेला काही देशात बंदी आहे, काही देशात गर्भलिंग तपासणी करण्यास बंदी आहे.

३) अद्ययावत वैद्यकीय सुविधा व उच्चशिक्षित डॉक्टरांची उपलब्धता.

४) देशात आधुनिक सोयीसुविधायुक्त प्रशस्त, स्वच्छ, मोठी हॉस्पिटल्सची उपलब्धता. उदा. सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल.

५) एका देशातून दुसऱ्या देशात जाण्यास सुलभ हवाई वाहतुकीची सोय.

६) पेशंटबरोबर येणाऱ्या माणसांच्या जेवणाची, निवासाची तसेच प्रवासाची स्वस्तात उपलब्धता.

७) परदेशांमध्ये कोणत्याही वैद्यकीय उपचारांपूर्वी मोठ्या रकमेचा विमा उतरावा लागतो. विम्याचा हा प्रचंड खर्च टाळण्यासाठी दूर जाऊन उपचार करणे पसंत करतात. अनेक लोक पर्यटनासाठी म्हणून भारतात येतात आणि आपल्या व्याधीवर औषधोपचार करून घेतात.

८) परकीय नागरिकांना उपचारासाठी प्रतिक्षा यादी आहे म्हणून थांबावे लागत नाही.

९) अतिशय तज्ज्ञ, अनुभवी डॉक्टरांशी थेट संपर्क साधून ते उपचार घेवू शकतात.

१०) वैद्यकीय पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना व्हिसा मिळण्यात अडचणी येवू नयेत म्हणून व्हिसाच्या जाचक अटी रद्द केल्या आहेत.

११) काही देशातील लोकांना भारतात आल्यानंतर वैद्यकीय पर्यटनासाठी व्हिसा दिला जातो.

१२) नोएडा येथे वैद्यकीय पर्यटनाला आलेल्या लोकांना भाषेची अडचण भासू नये यासाठी दुभाषिक नेमले आहेत.

## १०. वैद्यकीय पर्यटनासंदर्भात सरकारी योजना :-

भारत सरकारने वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी अनेक योजना सुरू केलेल्या आहेत. रूग्ण पर्यटकांचा प्रवास सुखकारक होण्यासाठी २००२ मध्ये 'राष्ट्रीय आरोग्य धोरण' निश्चित केले. या योजनेंतर्गत परकीय पर्यटकांवर उपचार करण्यासंदर्भात विविध उपक्रम राबविण्यात आले. २०११ मध्ये रूग्ण पर्यटकांना वैद्यकीय व्हिसा अधिक सुलभ केला, तर २०१४ मध्ये ई-व्हिसाची सोय केली आहे. 'व्हिसा-ऑन-ॲग्रिम'

ही योजनाही सुरू करण्यात आली आहे. वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी 'राष्ट्रीय वैद्यकीय पर्यटन मंडळाची' स्थापना केलेली आहे. या मंडळाने वैद्यकीय पर्यटनाला प्रोत्साहन, विपणन, देखरेख, नियमन इत्यादी घटकाकडे विशेषत्वाने लक्ष केंद्रित केलेले आहे. सध्या भारत सरकारचे कुटुंबकल्याण व आरोग्य मंत्रालय व पर्यटन मंत्रालय विविध राज्यांच्यामध्ये वैद्यकीय पर्यटनासाठी व्यापक प्रमाणात योजना राबवित आहे, त्या खालीलप्रमाणे :-

१) भारतीय पर्यटन मंत्रालय अधिकृत वैद्यकीय पर्यटन एजन्टची यादी सतत अद्ययावत ठेवते.

२) भारतीय दूतावास, वाणिज्य दूतावास, भारतीय वैद्यकीय प्रवास संघटना, पर्यटन मंत्रालय व आंतरराष्ट्रीय रूग्णसेवा इत्यादी वैद्यकीय पर्यटनासंबंधी अद्ययावत माहिती व मार्गदर्शन करण्याचे काम करते.

३) भारत सरकारतर्फे वैद्यकीय पर्यटनासाठी वैद्यकीय व्हिसा अर्थात 'एम-व्हिसा' तात्काळ देते, त्याची मुदत १ वर्ष आहे. या मुदतीत आणखी वाढ करण्याचा अधिकार राज्य सरकारांना आहे.

४) वैद्यकीय उपचारासाठी भारतात येणाऱ्या रूग्णांच्या सोबत येणार असतील तर त्यांनाही 'एम-व्हिसा' अंतर्गत 'व्हिसा-को-टर्मिनस' दिला जातो. त्याला 'एमएक्स-व्हिसा' असे म्हणतात. या एमएक्स-व्हिसा अंतर्गत दोन मदतनीस घेण्याची परवानगी आहे.

५) पर्यटन मंत्रालयाने विदेशात वैद्यकीय पर्यटनाची जाहिरात करण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपक्रम हाती घेतलेले आहेत. या अंतर्गत जाहीरात, प्रचार पत्रक, सीडी, माहितीपट तयार करून ते वितरीत केले जातात.

६) जेसीआय, एनएबीएच व पर्यटन मंत्रालयाने मान्यता दिलेल्या रूग्णालयांच्या प्रतिनिधीना मार्केट डेव्हलपमेंट असिस्टंट स्कीम (MDA) अंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते.

७) पर्यटन मंत्रालय व आयुष विभागाकडून वेलनेस टुरिझमच्या प्रचाराकरिता देश-विदेशात प्रचार कार्यशाळा आयोजित केल्या जातात.

८) वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन मंत्रालय रुग्ण पर्यटकांना शारीरिक, मानसिक समाधान, शांती देण्याच्या उद्देशाने हरिद्वार, ऋषिकेश, पॉण्डेचरी येथे आरोग्य केंद्राचा विकास करीत आहे.

९) पर्यटन आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने २००७ मध्ये ऑस्ट्रेलिया, कॅनडा, युके, अमेरिका, न्युझीलंड आदीसह अनेक देशातील तज्ञ डॉक्टरांना भारतातील मान्यताप्राप्त रूग्णालयांच्यामध्ये काम करण्याची परवानगी दिलेली आहे. अत्याधुनिक ज्ञानाची आदानप्रदान व वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## ११. वैद्यकीय पर्यटनाचे आर्थिक व सेवा स्वरूप :-

वैद्यकीय पर्यटन हे नेहमीच पैसे वाचविण्यासाठी फायदेशीर आहे. पर्यटन व्यावसायाशी सहकार्य करून विशेष वैद्यकीय तज्ज्ञांकडून शस्त्रक्रिया अथवा इतर आवश्यक ते उपचार घेता येतात. कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्या आणि पर्यटन यांच्या संयुक्त विद्यमाने ही सेवा खाजगी आणि सरकारी पातळीवर पुरविणे सहज शक्य आहे. अनेक विकसनशील देशामध्ये अशा प्रकारच्या सेवेला आता मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. विशेष सद्यकाळात पर्यटन आणि वैद्यकीय ही संयुक्त सेवा बनविण्याचे सरकारचे अधिकृत धोरण बनले आहे. व्यावस्थापकीय कंपन्या परदेशातील वैद्यकीय पर्यटनाविषयी आर्थिक मदत पुरवतात. भारतात कोठे, कोण कोणत्या प्रकारच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत याविषयी माहिती पुरवतात. योग्य त्या प्रमाणात वैद्यकीय तज्ञांपर्यंत परकीय प्रवाशांना पोहोचविण्याचे महत्त्वाचे कार्य करणाऱ्या प्रशिक्षित व्यक्तिची गरज असते आणि भारतात अशा प्रकारचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. वैद्यकीय कारणांसाठी येणाऱ्या प्रवाशांना माहिती जाळाच्या (इंटरनेट) माध्यमातून ताबडतोब परदेशातील डॉक्टरांचा सल्ला प्राप्त करणे ही सुविधा भारतात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. वैद्यकीय उपचारासाठी भारतात येण्यासाठी प्रवाशांना अथवा रूग्णांना व्हिसा मिळण्यात कोणतीही अडचण येणार नाही यांची काळजी घेतली जाते.

**भारतामध्ये आणि अमेरिकेमध्ये वैद्यकिय प्रक्रिया शुल्क** *(अमेरिकी डॉलर्स)*

| | अमेरिका | भारत |
|---|---|---|
| बीन मेरी प्रत्यारोपण | २,५०,००० | ६९,००० |
| पित्ताशय प्रत्यारोपण | ३,००,००० | ६९,००० |
| ह्दय शस्त्रक्रिया | ३०,००० | ८,००० |
| सांधेविषयक शस्त्रक्रिया | २०,००० | ६,००० |
| मोतीबिंदू शस्त्रक्रिया | २,००० | १,२५० |

**काही विशिष्ट निवडक शस्त्रक्रियांचे तुलनात्मक दर** *(आकडे डॉलर्समध्ये)*

| प्रक्रिया | अमेरिका | थायलंड | सिंगापूर | भारत |
|---|---|---|---|---|
| ह्दय शस्त्रक्रिया | १,३०,००० | ११,००० | १८,५०० | १०,००० |
| ह्दयाच्या व्हॉल्व्ह बदलणे | १,६०,००० | १०,००० | १२,५०० | ९,००० |
| अँजिओप्लास्टी | ५७,००० | १३,००० | १३,००० | ११,००० |
| हिप रिप्लेसमेंट | ४३,००० | १२,००० | १२,००० | ९,००० |
| हिस्टेरेक्टॉमी | २०,००० | ४,५०० | ६,००० | ३,००० |
| गुडघे बदलणे | ४०,००० | १०,००० | १३,००० | ८,५०० |
| स्पायनल फ्युजन | ६२,००० | ७,००० | ९,००० | ५,५०० |

**काही विशिष्ट शस्त्रक्रियांचे तुलनात्मक दर** *(आकडे डॉलर्समध्ये)*

| प्रक्रिया | अमेरिका | इंग्लंड | भारत |
|---|---|---|---|
| हृदय शस्त्रक्रिया (सीएबीजी) | १,००,००० | ४३,००० | ७,५०० |
| संपूर्ण गुडघे बदलणे | ४८,००० | ५२,००० | ६,३०० |
| हिप सरफेसिंग | ५५,००० | ४८,००० | ७,००० |
| एल ए लॅपहिस्टेरेक्टॉमी | २२,००० | २४,००० | ४,००० |
| लॅप कॉलिस्टेक्टॉमी | १८,००० | २०,००० | ३०० |
| स्पायनल डीकॉमप्रेशन फ्यूजन | ६०,००० | ६५,००० | ५,५०० |
| ओबेसिटी सर्जरी (गॅसट्रिक बायपास) | ६५,००० | ७०,००० | ९,५०० |

**सौंदर्यवर्धक शस्त्रक्रिया** *(अमेरिकन डॉलर्समध्ये खर्च)*

| प्रक्रिया | अमेरिका | थायलंड | सिंगापूर | भारत |
|---|---|---|---|---|
| चेहऱ्यात सुधारणा | २०,००० | ४,८०० | ६,२५० | ३,१०० |
| वक्षांचे सौंदर्य वाढविणे | १०,००० | ३,१५० | ८,००० | २,२०० |
| वक्षाचा आकार कमी करणे | १०,००० | ३,९०० | ८,००० | ३,००० |
| डोळ्यांच्या पापण्यांची शस्त्रक्रिया | ७,००० | १,४०० | ३,७५० | २,२०० |
| लायपोस्कशन | १०,००० | २,१०० | ५,००० | २,५०० |
| नाकाची शस्त्रक्रिया | ७,३०० | ३,८५० | ४,४०० | १,८०० |
| पोट कमी करणे | ८,५०० | ४,०५० | ६,२५० | ३,४०० |
| स्रोत : संदर्भ : योजना, मे, २०१५. | | | | |

## १२. भारतातील प्रमुख वैद्यकीय सेवा पुरविणारी राज्ये :-

### अ) केरळ : आयुर्वेदिक उपचार पध्दतीचे केंद्र :-

जागतिक स्तरावर पारंपारिक आयुर्वेदिक उपचार पध्दतीसाठी केरळचे महत्त्व झपाट्याने वाढत आहे. परदेशी पर्यटक सुट्ट्या व्यतीत करण्यासाठी केरळाची निवड करतात यामध्ये त्यांचा दुहेरी हेतू असतो. एक निसर्ग व सांस्कृतिक पर्यटन व दुसरे आयुर्वेदिक उपचार घेणे. देश-विदेशातील पर्यटकांना दर्जेदार आयुर्वेदिक उपचार मिळावेत म्हणून केरळ पर्यटन विभागाने आयुर्वेदिक उपचार केंद्राचे 'ग्रीनलिफ' व 'ऑलिव्ह लिफ' असे वर्गीकरण केले आहे. पंचतारांकित सुविधा असलेल्या केंद्राना 'ग्रीन लिफ' व तीन तारांकित सुविधा असलेल्या केंद्रांना 'ऑलिव्ह लिफ' चा दर्जा दिलेला आहे. केरळमध्ये आयुर्वेदिक व पंचकर्म केंद्राचा खूप

मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. आरोग्य पर्यटनाला चालना देण्यासाठी केरळ सरकारने प्रारंभापासून जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. विशेषत: आयुर्वेदिक उपचाराबरोबर पारंपारिक औषधोपचार पध्दतीला जागतीक स्तरावर प्रसिध्दी मिळवून दिलेली आहे. आयुर्वेदिक उपचार केंद्रे पर्यटकांना सुलभ व्हावीत यासाठी जाणीवपूर्वक मोठमोठ्या शहरामध्ये निर्माण करण्यास प्रोत्साहन दिलेले आहे. त्याचबरोबर केरळमधील पारंपारिक सण, समारंभ, उत्सव, यात्रांच्यामध्ये सरकारच्यावतीने व खाजगी पातळीवर मोठ्या प्रमाणात आयुर्वेदिक व पारंपारिक उपचार पध्दतीचे प्रदर्शन केले जाते.

## ब) गोवा :-

गोव्यामध्ये वैद्यकीय पर्यटन विकसित होत आहे. केंद्रीय आयुष मंत्रालय व गोवा पर्यटन मंत्रालयाने यासाठी व्यापक मोहीम राबविलेली आहे. भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांच्या संख्येपैकी सर्वात जास्त संख्या गोव्यामध्ये पहावयास मिळते. त्यामुळे गोव्याला वैद्यकीय पर्यटन क्षेत्रात विकास करण्याची मोठी संधी आहे. १० वर्षांपूर्वी गोव्यामध्ये २०-२२ 'स्पा' केंद्रे होती, सध्या यांची संख्या १५० हून अधिक आहे. ३० पेक्षा जास्त योग केंद्रे आहेत. केंद्रीय आयुष मंत्रालयाने गोव्यामध्ये 'राष्ट्रीय नॅचरोपॅथी' ही संस्था उभी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. केरळ पाठोपाठ गोवा योग उपचारासाठी जगप्रसिध्द होत आहे. अमेरिका अथवा युरोपमधील औषधोपचारांच्या तुलनेत गोव्यात वैद्यकीय खर्चाचे प्रमाण फारच कमी आहे.

## क) तामिळनाडू :-

तामिळनाडू हे राज्य देश-विदेशामध्ये वैद्यकीय पर्यटनाचे केंद्र म्हणून विकसित होत आहे. तामिळनाडू सरकारने वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. चेन्नईमधील बहुआयामी सुपर स्पेशॉलिटी रूग्णालयांच्यामध्ये प्रतिदिन १५० पेक्षा जास्त परदेशी पर्यटक वैद्यकीय उपचारासाठी येतात. चेन्नई शहरामध्ये १२,५०० पेक्षा जास्त रुग्णालय बेडची सोय आहे. भारतातील ४५% रुग्ण पर्यटक आरोग्य सेवा घेण्यासाठी चेन्नईला पसंती देतात. विशेषत: हेल्थ केअर, आय केअर, ओन्कोलॉजी, आर्थोपेडिक्स, डायलिसिस व किडणी प्रत्यारोपण, डेन्टल केअर इत्यादी. चेन्नईमध्ये जेसीआय मानांकन प्राप्त हॉस्पिटलची संख्या मोठी आहे, शिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावर ये-जा अर्थात दळणवळण करण्याच्या दृष्टीकोणातून महत्त्वाचे स्थान आहे. चेन्नईची आणखी एक ओळख म्हणजे येथील 'नर्सिंग हाऊस' चेन्नई उत्तम दर्जाच्या व निरोगी नर्सच्या उपलब्धता मोठ्या प्रमाणात आहे. अत्याधुनिक नर्सिंगचे ज्ञान व वैयक्तिक स्तरावर रुग्णांची देखभाल यासाठी युरोपीय देशांच्यामध्ये यांना खूप मागणी आहे.

## क) गुजरात :-

गुजरातमधील लोक मोठ्या संख्येने वैद्यकीय पर्यटनाचा लाभ घेतात. गुजरात सरकारने आरोग्य सेवा पुरविणाऱ्या संस्था, विमा कंपन्या, टूर ऑपरेटर्स, विविध धोरणात्मक नियोजन करणाऱ्या संस्थांसाठी रुग्णालये खुली केलेली आहेत. वैद्यकीय पर्यटनाला चालना व प्रोत्साहन देण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहे. मुळात

गुजरातमध्ये 'गरम पाण्याचे झरे' मोठ्या प्रमाणात आहेत. पारंपारिक आयुर्वेदिक उपचार पध्दती व युरोपमधील 'स्पा' केंद्राच्या धर्तीवर या ठिकाणांचा विकास होत आहे. गुजरातसाठी ही एक प्रकारची नैसर्गिक देण आहे. संधिवाताच्या रुग्णासाठी या पाण्याचा उपयोग औषधोपचारासाठी केला जातो. गिरच्या जंगलातील तुलशी श्याम, बुलसर जिल्ह्यातील उनाई, पंचमहाल जिल्ह्यातील गोधराज व लुवा, केरा जिल्ह्यातील लासुंधरा इत्यादी ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत.

### ड) कर्नाटक :-

कर्नाटक राज्य विशेषत: बंगळुरू शहर जागतिक दर्जाचे वैद्यकीय केंद्र म्हणून विकसित होत आहे. उच्च गुणवत्ता, तज्ञ व अनुभवी डॉक्टर्स, मान्यताप्राप्त व नावाजलेल्या संशोधन संस्था, प्रवासासाठी मध्यवर्ती ठिकाण व अनुकूल हवामान या कारणांनी जागतिक स्तरावर एक वैद्यकीय केंद्र म्हणून बंगळूरूचा उल्लेख होतो. सन २००५ ते ऑगस्ट २००६ या कालावधीत बंगळूरू मधील कॉर्पोरेट रुग्णालयानी ४४५ कोटीचा व्यवसाय केलेला आहे. मणिपाल हेल्थ सिस्टम, व्हाकहार्ड ग्रुप ऑफ हॉस्पिटल, वन वर्ल्ड हॉस्पिटल, ग्लोबल हेल्थ केअर इत्यादी नावाजलेली वैद्यकीय रुग्णालये बंगळूरू मध्ये आहेत.

## १३. महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय पर्यटनासाठी संधी :-

महाराष्ट्रामध्ये वैद्यकीय पर्यटनास चालना मिळण्याची खूप संधी आहे. अलीकडेच जाहीर झालेल्या राज्याच्या पर्यटन धोरणात महाराष्ट्र वैद्यकीय पर्यटन परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याची बाब नमूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र हे वैद्यकीय पर्यटनासाठी पहिल्या क्रमांकाचे राज्य व्हावे या दृष्टीकोणातून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून पावले उचलण्यात येत आहेत. अमेरिकेच्या जॉईंट कमिशन इंटरनॅशनल (जेसीआय) ने गुणवत्तेसाठी प्रमाणित केलेल्या भारतातील २८ रुग्णालयांपैकी ७ रुग्णालये फक्त महाराष्ट्रात आहेत. याशिवाय महाराष्ट्र हे परदेशी पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षणाचे केंद्र ठरलेले आहे. महाराष्ट्रातील वैविध्यपूर्ण निसर्ग सौंदर्य, सर्व सुविधायुक्त आणि विकसित पर्यटन स्थळे, विमान, रेल्वे, रस्ते इत्यादी दळणवळणाच्या सोयीसुविधांमुळे पर्यटकांचा ओघ महाराष्ट्राकडे राहिलेला आहे. अलीकडच्या काळात वैद्यकीय पर्यटन मोठ्या प्रमाणात विकसित झाल्याने केवळ अनिवासी भारतीयच नव्हे तर इतर देशांचे नागरीकही महाराष्ट्रकडे आकर्षित होत आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर योगाला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. योग आणि आयुर्वेदाची भूमी म्हणून भारताचे नाव हजारोवर्षापासून जगप्रसिध्द आहे. २ वर्षापासून २१ जून हा जागतिक योगदिन म्हणून आंतरराष्ट्रीय समुदायाने मान्यता दिल्याने योग आणि आरोग्याचे महत्त्व आणखीनच अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय ख्यातीची योग व आयुर्वेदिक उपचार करणारे केंद्र आहेत, यामध्ये इगतपुरीचे विपश्यना केंद्र, लोणावळ्यामधील कैवल्यधाम, पुण्यातील अय्यंगार योग इत्यादी ठिकाणी परदेशी पर्यटकांची नेहमी गर्दी असते.

भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईचा उल्लेख होतो. याठिकाणी सर्व सेवा-सुविधा उपलब्ध आहेत, अत्याधुनिक सोयी-सुविधांनीयुक्त सुसज्ज रुग्णालये, उच्चशिक्षित वैद्यकीय तज्ञांची उपलब्धता आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे युरोपीयन अथवा इतर देशांच्या तुलनेत कमी खर्चात उत्तम वैद्यकीय सुविधा येथे उपलब्ध आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात वैद्यकीय पर्यटनास संधी आहे. केवळ मुंबईपुरतेच हे क्षेत्र मर्यादित नसून महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर, मिरज येथे उच्च दर्जाची वैद्यकीय सुविधा माफक दरामध्ये मिळते आहे. त्वचारोपण, दंत उपचार, वंध्यत्व उपचार, हृदयरोग इत्यादीसीठी हजारो परदेशी नागरिक महाराष्ट्रात येतात.

वेलनेस व अल्टरनेट उपचार पध्दतीपैकी योग, विपश्यना, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिध्दोपचार व निसर्गोपचार इत्यादीची ५०० हून अधिक केंद्रे महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. वैद्यकीय उपचारांना जोडून पर्यटक पर्यटनस्थळांनाही आवर्जून भेट देतात, त्यामुळे वैद्यकीय पर्यटनाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्यास सुरुवात केलेली आहे. वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी त्याच्याशी संबंधित सर्व घटकांमध्ये सुसूत्रता आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. यामध्ये रूग्णालये, हॉटेल्स, विमा कंपन्या, पर्यटन कंपन्या इ. घटकांचा समावेश आहे. रुग्णालयांना जागतिक दर्जाचे मानांकन (जेसीआय) प्राप्त करून घेण्यास उद्युक्त करणे, रुग्णालयामध्ये समान शुल्क, प्रभावी विमा पॉलीसी, भारतीय वैद्यकीय कायदे व मार्गदर्शक तत्वांची माहिती वैद्यकीय पर्यटकांना करून देणेसाठी प्रयत्न चालू आहे.

## १४. आंतरराष्ट्रीय रुग्ण पर्यटकांना भारतात आकर्षित करणारे मुद्दे :-

### अ) सुरक्षितता :-

कोणत्याही नागरीकास त्याच्या जिविताची आणि वित्ताची हमी हवी असते. विशेषत: एखादी व्यक्ती जेव्हा आपले घर सोडून राज्य, प्रांत अथवा देश सोडून दुसऱ्या राज्यात, प्रांतात अथवा देशात जाते, तेव्हा कारण तो संपूर्ण प्रदेश, व्यक्ती नवीन असतात. वैद्यकीय पर्यटनाचा जेव्हा आपण सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून विचार करतो, तेव्हा भारत विदेशी लोकांसाठी सर्वच दृष्टीकोणातून सुरक्षित वाटतो. भारतात जास्तीत जास्त हॉस्पिटल आहेत, प्रतिक्षा करावी लागत नाही, सुपर स्पेशालिटीची सोय शिवाय ही हॉस्पिटल मोठ्या शहरात असल्याने रस्ते अपघात, चोरी अथवा फसवणुकीची शक्यता फारच कमी आहे. येथील हॉटेलही सुरक्षित आहेत. गरज असेल तर क्लिनिकल नर्सिंग होम रूग्ण पर्यटकांची काळजी अथवा देखभाल घेण्याची हमी देतात.

### ब) विमानाची तिकीटे :-

भारतातील विमानांची तिकीट दर सर्वसामान्य पर्यटक ते उच्च श्रेणीतील पर्यटक डोळ्यासमोर ठेवून आहेत. त्यातच वाहतूक कंपन्यातील स्पर्धा त्यामुळे विमानाची तिकीटे वाजवी आहेत. भारतातील नामांकित

हॉस्पिटलमध्ये विविध वाहतूक कंपन्यातील एजंटशी अंर्तसंबंध आहेत, त्यामुळे कमी दरात तिकीट प्राप्त करून देतात. रूग्ण पर्यटकांना सर्जरी किंवा इतर उपचारातून बाहेर पडल्यानंतर कोणत्याही तणावाला सामोरे जावे लागत नाही.

### क) हॉटेल्स :-

भारतातील हॉटेल्सचे दर व परदेशातील हॉटेल्स व तेथील खानपानाचे दर यामध्ये ७० ते ८०% टक्क्यांचा फरक आहे. भारतात खूप कमी दराने व उच्च दर्जाची हॉटेल्स अगदी सहज रुग्ण पर्यटकांना उपलब्ध होतात. काही हॉस्पिटल्स आणि हॉटेल्स यांच्यामध्ये करार पध्दतीने सेवा दिली जाते.

### ड) देशी-विदेशी खाद्य पदार्थांची उपलब्धता :-

संस्कृती आणि देश यांचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा विदेशी रुग्ण पर्यटकांना त्यांच्या खानपानाचा संबंध येतो. काही पेशंटना भारतीय खाद्य पदार्थांशी जुळवून घेणे कठीण जाते. मात्र अलीकडे भारतात युरोपच्या धर्तीवर सर्व प्रकारच्या खाद्याची सोय भारतात उपलब्ध आहे, अगदी इटालियन, चायनीज, स्पॅनिश, मेक्सिकन, रशियन इत्यादी सगळ्या प्रकारचे खाद्य मागणीनुसार उपलब्ध होते.

### इ) भाषा :-

भारतामध्ये भाषेची विविधता असूनही वैद्यकीय क्षेत्रामध्ये इंग्रजी ही अधिकृत भाषा म्हणून वापरली जाते. त्यामुळे युरोपीय रुग्ण पर्यटकांना भाषेची अडचण भासत नाही. नोएडाचा वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून (हॉटस्पॉट) वेगाने विकास होत आहे. याठिकाणी मध्य आशिया व गल्फ व आफ्रिकेतील रुग्ण पर्यटक मोठ्या संख्येने येतात, त्यांना भाषेच्या समस्येला सामोरे जावे लागते. त्यामुळे तेथे अशा रुग्णासाठी दुभाषिकांची सोय केलेली आहे. भारतातील वैद्यकीय पर्यटनाकडे आकर्षित करणारे मुलभूत घटक.

### ई) गुणवत्ता आणि सेवा :-

भारतामध्ये जागतिक दर्जाची व कमी खर्चाची व गुणवत्तापूर्ण सेवा देणारी रुग्णालये उपलब्ध आहेत. ज्यामध्ये आधुनिक व विशेष तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता आहे. विशेषत: ऑर्थोपेडिक, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, ट्रान्सप्लांटस्, मूत्र विकार, कार्डिओलॉजी, कार्डिओथोरॅफि, नेत्ररोग, न्यूरॉलॉजी, न्यूरोसर्जरी, ओन्कोलॉजी, रूमेटोलॉजी, बालरोग, त्वचाविकार, दंतचिकित्सा, प्लॅस्टिक सर्जरी, मानसोपचार यामुळे खूप मोठ्या संख्येने पर्यटक वैद्यकीय सेवा घेण्यासाठी भारतात येतात. पायाभूत सेवा-सुविधा गुणवत्तापूर्ण सेवा, सेवांची गुणवत्ता यासाठी भारतातील अनेक कॉर्पोरेट हॉस्पिटल्स उपलब्ध आहेत. जसे की, अपोलो, मॅक्स हेल्थकेअर, फोर्टिस इत्यादी की, सिंगापूर, थायलंड, मलेशिया येथील रूग्णालयांच्या तोडीची आहेत.

### फ) मनुष्यबळ :-

भारतामध्ये प्रचंड मोठ्या संख्येने डॉक्टर, नर्स वा पॅरामेडिकल्ससह तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध आहे.

मोठ्या संख्येने उपलब्ध असलेले मनुष्यबळ हा चिंतेचा विषय असतो मात्र भारतासाठी तो फायदेशीर आहे. भारतामध्ये गुणवत्तापूर्ण वैद्यकीय शिक्षण उपलब्ध आहे, जी वाढत्या आरोग्य सेवांची पूर्तता करण्यास सक्षम आहे. इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व ही एक फायद्याची बाजू आहे. भारतातील अनुभव डॉक्टरांना युएस व युके सारख्या देशांच्यामध्ये मान्यता व मागणी आहे. या डॉक्टरांनी भारतातील वैद्यकीय पर्यायांच्या चालना देण्यासाठी व प्रचारासाठी काम केलेले आहे. परदेशामध्ये वैद्यकीय शिक्षण घेतलेले अनेक डॉक्टर भारतात सेवा देण्याचे काम करत आहेत.

### म) सर्वसामान्य व्यक्तीला परवडणारी रूग्णालये :-

जागतिक आरोग्य महोत्सवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'परवडणारी आणि समग्र वैद्यकीय सेवा जगाला देण्यात भारत नेतृत्व करू शकतो' असा आशावाद व्यक्त केला आहे. त्यांचे कारण आहे सर्वसामान्य व्यक्तीला परवडणारी रुग्णालये भारतात उपलब्ध आहेत. त्यामुळे भारतातील वैद्यकीय पर्यटन दरवर्षी १५ ते २०% पर्यंत वाढण्याचा अंदाज उद्योग क्षेत्रातील फिकी, सीआयआय व असोचॅम यासारख्या नामवंत संस्थानी व्यक्त केला आहे. अमेरिकेच्या तुलनेत भारतात मोठ्या आजारावरील ८०% पर्यंत स्वस्त होतात. त्यामुळे तेथील सर्वसामान्य नागरीक भारतात येवून उपचार घेणे पसंद करतात. अमेरिकेबरोबर युरोपच्या धर्तीवर अत्याधुनिक चिकित्सा कमी किंमतीत उपलब्ध आहे. गेल्या काही वर्षात दिल्ली, चंदीगढ, मुंबई, बंगळुरू व चेन्नई येथील रुग्णालयांच्या आर्थिक उलाढालीत वैद्यकीय व पर्यटनामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

भारताच्या वैद्यकीय पर्यटनाचा आकडा ५० अब्ज रुपयांपेक्षा जास्त आहे. त्याचे कारण अमेरिका व युरोपमधील देशांच्या तुलनेत येथे स्वस्त, अत्याधुनिक आणि पारंपारिक चिकित्सा सेवा उपलब्ध असल्याने जगाच्या नकाशात भारत वैद्यकीय पर्यटनाच्या बाबतीत उदयोन्मुख केंद्र म्हणून पुढे येत आहे. पर्यटन मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार वैद्यकीय व्हिजावर भारतात आलेल्या नागरिकांची संख्या २०१३ मध्ये ५६,१९९ इतकी होती. २०१४ मध्ये ७५,६७१, २०१५ मध्ये ती वाढून १,३४,३४४ इतकी झाली तर २०१६ मध्ये ही संख्या २,०१,०९९ इतकी होती. यामध्ये सर्वाधिक संख्या बांग्ला देशमधील रूग्णाची आहे. वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन मंत्रालय नोडल एजन्सी म्हणून काम करते आहे.

वैद्यकीय पर्यटनाशी संबंधित बाजारात नजर टाकली तर चिकित्सासाठी लागणारी ७५% उपकरणे परदेशातून आयात केली जातात, यावर औषध मानक नियंत्रण संस्था (सीडिएसओ) व प्रसाधन सामुग्री नियमावली १९४५ च्या आधीन राहून नियंत्रण ठेवले जाते. वैद्यकीय पर्यटनामध्ये भारत मलेशिया, थायलंड, सिंगापूर यासारख्या देशांना मागे टाकत आहे. बांग्लादेशाबरोबर अमेरिका, ब्रिटन, रशिया, इराक, अफगाणिस्तान येथील पर्यटकांची संख्या जास्त आहे. विशेषत: आखाती देशासाठी भारत चिकित्सा पर्यटन उद्योगाचे केंद्र बनत आहे. २०२० पर्यंत भारतातील वैद्यकीय क्षेत्रातील उलाढाल २८० अब्ज डॉलर्स इतकी होण्याचा अंदाज आहे. सध्या स्टार्टअपची नजर विदेशी रूग्णांवर आहे.

### भ) प्रतिक्षा कालावधी कमी :-

युरोपीय देशांच्यामध्ये क्लिष्ट व महत्त्वाच्या चिकित्सा व शस्त्रक्रियासाठी रूग्णांना खूप मोठ्या प्रतिक्षा कालावधीला सामोरे जावे लागते अगदी ५ ते १० महिन्यापर्यंत. भारतामधील मान्यताप्राप्त संख्या व रूग्णालयांच्यामध्ये हा कालावधी अगदी नगण्य आहे.

### स) अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :-

युरोपीय रुग्णालयाच्या धर्तीवर जेसीआय मान्यताप्राप्त व मानांकन प्राप्त केलेली रुग्णालये दिल्ली, मुंबई, पुणे, चेन्नई, बंगळूरू, नोएडा, अहमदाबाद येथे उपलब्ध आहेत. याठिकाणी सर्वप्रकारच्या चिकित्सा पध्दतीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचाा वापर केला जातो. तसा विश्वास भारतीय तज्ञ डॉक्टरांनी परदेशी रुग्ण पर्यटकांच्यामध्ये केलेला आहे.

## १५. जागतिक आरोग्यसेवा मानांकन :-

वैद्यकीय पर्यटनामध्ये एखाद्या रूग्णालयाला आंतरराष्ट्रीय मान्यता अथवा मानांकन आहे की नाही याला खूप महत्त्व आहे. जागतिक आरोग्यसेवा मान्यता हे एकापेक्षा जास्त देशांच्या आरोग्यसेवा प्रदात्यांसाठी आणि कार्यक्रमांसाठी गुणवत्ता प्रमाणित करण्याची प्रक्रिया आहे. रूग्णालयातील १०० हून अधिक सेवा जशा की, रूग्णालय, प्राथमिक देखभाल केंद्र, वैद्यकीय परिवहन, ॲबब्युलेटरी केअर सेवा, शुल्क, रेकॉर्ड, आदीसह अनेक सेवांचे मूल्यामपन करून दर्जा अथवा मानांकन दिले जाते. जागतिक स्तरावर 'कॅनडा कॉऊन्सिल ऑन हेल्थ सर्व्हिसेस ॲक्रेडिटेशन' हे संस्था सर्वात जुनी मानली जाते. अमेरिकेतील संयुक्त कमिशन इंटरनॅशनल (जेसीआय) ही संस्था जागतिक स्तरावर रूग्णालयांना मान्यता देण्याचे काम करते. या मानांकनाच्या आधारावर परदेशी पर्यटक रूग्णालयांना आपली पसंती देतात.

## १६. जागतिक आरोग्यसेवा मानांकन असलेली भारतातील रूग्णालये :-

१) आदित्य बिला हेल्थ सर्व्हिस लि; पुणे.

२) आहिका फाऊंडेशन आय हॉस्पिटल, पल्लकड, केरळ.

३) ॲपोलो ग्लेनेजल्स हॉस्पिटल, कोलकत्ता.

४) अपोलो हॉस्पिटल, चेन्नई.

५) अपोलो हॉस्पिटल, हैद्राबाद.

६) अपोलो हॉस्पिटल, बंगळूरू.

७) आर्टिमीस हेल्थ इन्स्टिट्यूट, गुडगांव.

८) एशियन हार्ट इन्स्टिट्यूट, मुंबई.

९) फोर्टिस एस्कॉर्टस् हार्ट इन्स्टिटट्यूट, नवी दिल्ली.

१०) फोर्टिस हॉस्पिटल, मोहली.

११) फोर्टिस हॉस्पिटल, बंगळूरू.

१२) फोर्टिस हॉस्पिटल, मुलुंड.

१३) ग्रेनन आय इन्स्टिटट्यूट प्रा.लि.चंदीगड.

१४) इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल, नवी दिल्ली.

१५) मेदांत दमेडिसिटी.

१६) मुलचंद हॉस्पिटल, नवी दिल्ली.

१७) नारायण हुड्यल प्रा. लि. बंगळूरू.

१८) नारायण मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, जयपूर.

१९) सतीगुरू प्रतापसिंह अपोलो हॉस्पिटल, लुधियाना.

२०) श्रॉफ आय हॉस्पिटल, मुंबई.

२१) श्री रामचंद्र मेडिकल सेंटर, मुंबई.

२२) अॅपेक्स हार्ट इन्स्टिटट्यूट, अहमदाबाद.

२३) अपोलो हॉस्पिटल एंटरप्राइज लि; नवी मुंबई.

२४) अपोलो हॉस्पिटल इंटरनॅशनल, गांधीनगर.

२५) एस्टर मेडिसिटी, कोची.

२६) कोलंबिया आशिया हॉस्पिटल, बंगळूरू.

२७) कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पीटल, मुंबई.

२८) महाराजा अग्रसेन हॉस्पिटल, नवी दिल्ली.

२९) मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नवी दिल्ली.

३०) मूलचंद हॉस्पिटल, नवी दिल्ली.

३१) राजगिरी हॉस्पीटल, एर्नाकुलम.

३२) सेव्हनहिल्स हॉस्पिटल, मुंबई.

३३) वॉकहार्स हॉस्पिटल, मुंबई.

## स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. 2

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. वैद्यकीय पर्यटनाला ................ प्रकारचे पर्यटन म्हणतात.

२. ग्रीकमध्ये ............... देवता औषधाचा देव म्हणून ओळखली जाते.

३. ............. व ............. हे प्राचीन भारतीय वैद्यक होते.

४. 'अतिथी देवो भवं' ही संकल्पना ............. मध्ये लागू केली.

५. भारतात ............. राज्य आयुर्वेदिक उपचार पध्दतीसाठी प्रसिध्द आहे.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'स्पा' म्हणजे काय?

२. 'टॉऊन ऑफ वॉटर' म्हणून कोणते शहर ओळखले जाते.

३. आयुर्वेदाला कोणत्या नावाने ओळखले जाते.

४. वैद्यकीय व्हिसा कोणात्या साली अधिक सुलभ झाला.

५. वैद्यकीय पर्यटनाला चालना देण्यासाठी कोणात्या मंडळाची स्थापना झाली.

## ४.२.३ साहस पर्यटन

आधुनिक पर्यटन प्रकारामध्ये साहस पर्यटनांचे महत्त्व वेगाने वाढत आहे. साहस पर्यटन म्हणजे रोमांचकारी उपक्रम की, ज्यामुळे साहस, धाडस, जिद्द, कष्ट व पैसा खर्च करण्याची तयारी असते. साहस पर्यटन हे तीन प्रकारात केले जाते. जमिनीवरील साहस, पाण्यामधील साहस व हवेतील साहस, या तिन्ही साहस प्रकारात खूप मोठी विविधता देखील आहे. आज अनेक पर्यटक दैनंदिन जीवनाच्या त्याच-त्याच जीवनगाड्यातून दूर जावून अशाप्रकारचे रोमांचकारी व थरारक अनुभव घेण्याचा प्रयत्न करतात. भारतात साहस पर्यटन हा प्रकार मोठ्या झपाट्याने विकसित होत आहे.

### १. साहस पर्यटन व्याख्या/अर्थ :-

पर्यटन उद्योगात साहस पर्यटन ही एक अनोखी व नवीन संकल्पना आहे. पर्यटन उद्योगाने साहस पर्यटन ही संकल्पना स्वीकारली, मात्र यांची निश्चित अशी व्याख्या अथवा परिभाषा नाही. अनेक अभ्यासक असे म्हणतात की, 'साहस पर्यटन' पर्यटन उद्योगाचे एक विशिष्ट क्षेत्र आहे. पारंपारिक पर्यटनाची काही समान वैशिष्ट्ये पहावयास मिळतात, तशी समान वैशिष्ट्ये साहस पर्यटनात पहावयास मिळत नाहीत. साहस

पर्यटन हा एक क्लिष्ट संकल्पना आहे. तरीही काही अभ्यासक व पर्यटन संस्थांनी पर्यटनाची व्याख्या केलेली आहे.

१. **एडव्हेंचर ट्रॅव्हल ट्रेंड असोसिएशन** या संस्थेने साहस पर्यटन हे पर्यटकांच्या अशा उपक्रमांशी निगडीत आहे, ज्यामध्ये शारीरिक हालचाली, सांस्कृतिक आदान-प्रदान व निसर्गाशी संबंधीत घटकांचा समावेश आहे, "Adventure tourism is a tourist activity that includes physical activity cultural exchang or activities in nature."

२. **मूलर आणि कलेव्हर** यांनी साहस पर्यटनाची व्याख्या पर्यटकांच्या अनुभवाच्या तुलनेत शारीरिक कष्ठ व आव्हानात्मक घटकावर अवलंबून असल्याचे म्हटले आहे. "Adventure tourism is characterized by its ability to provide the tourist with realatively high levels and sensory stimulation, usually achieved by including physically challenging experiential components with the tourist experience."

३. कॅनेडियन टूरिझम कमिशनने सन १९९५ मध्ये साहस पर्यटनाची व्याख्या करताना पारंपारिक वाहतूकीची साधने, पर्यटनाचे ठिकाण कसे आहे या घटकाला केंद्रस्थानी ठेवून व्याख्या केलेली आहे ते म्हणतात. "An outdoor leisure activity that takes place in an unusual, exotic, remote or wilderness destination, involves some form of unconventional means of transportation and tends to be associated with low or high levels of activity."

## २. साहस पर्यटनाची संकल्पना :-

साहस पर्यटन हा प्रवासाचा एक अतिविशिष्ट प्रकार आहे. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात जोखीम असते. पर्यटकाचे धाडस आणि कौशल्य पाहणारा हा प्रकार, ज्यामध्ये पारंपारिक पर्यटन ज्ञानापेक्षा अत्याधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान, साधने व तज्ञ मार्गदर्शकाची आवश्यकता असते. साहस पर्यटन हे जेवढे महत्त्वाचे आहे, त्यापेक्षा यामध्ये सहभाग घेणाऱ्या पर्यटकांची प्रबळ इच्छाशक्ती, कष्ट, हालअपेष्टा सहन करण्याची मानसिकता व त्यातून रोमांचकारी थरार आणि अनुभव घेण्याची तयारी महत्त्वाची असते, अन्यथा हा पर्यटन प्रकार पूर्णत्वास जात नाही. यासंदर्भात जॉन कॅनिंग असे म्हणतात की, "The fascination for the word adventure is perhaps the most people think of it as a life being lived a far greater intensity than normal. Adventure activities and sports are generally outdoor activities involving risk and excitement and are taken in conjugation with nature. Morever, the unpredicatability of nature adds to the thrill and unexpectancy of the adventure acitivies."

## ३. साहस पर्यटनाचा इतिहास :-

मानव प्राचीन काळापासून अन्नपाण्याच्या शोधासाठी भटकंती करत आलेला आहे. त्याची ही भटकंती तत्कालीन काळाचा विचार करता साहसपूर्णच होती. नव-नवीन स्थळे, समुद्री मार्ग व देश इत्यादीचा शोध हा मानवासाठी साहसपूर्णच होता. मात्र सद्यस्थितीतील साहस पर्यटन हे व्यावसायिक व हौसी आहे. ज्यामध्ये तज्ञ मार्गदर्शक, अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधनाचा वापर करून सांस्कृतिक-नैसर्गिक घटकांचा नव्याने अर्थ शोधण्याचा प्रयत्न होतो आहे. १९ व्या शतकाच्या मध्यास साहस पर्यटनाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली. १८६५ मध्ये मॅटर हॉन व १८६७ मध्ये कोलोराडो याने माऊंटन क्लाइंबिंग व नदीमधील राफ्टिंग करून या पर्यटनास चालना दिली. त्यानंतर नॅशनल जिऑग्राफिक सोसायटी व एक्सप्लोरर्स क्लबची स्थापना झाल्याने साहस पर्यटनाला खऱ्या अर्थाने व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले.

सन १९५० च्या दशकात जागतिक स्तरावर अनेक लोक, साहस पर्यटनाकडे आकर्षित झाले, स्वत:च्या साहस मोहिमासाठी प्रयत्न करू लागले. सर एडमंड हिलरी व टेन्सिंग नोर्गे यांनी माऊंट एव्हरेस्ट सर करून साहस पर्यटन दृढ करण्याचा प्रयत्न केला. साहजिकच याकडे जगभरातील प्रसार माध्यमांचे लक्ष वेधले गेले. आधुनिक साहस पर्यटनाला ही घटना प्रेरणा देणारी ठरली. सद्यस्थितीत साहस पर्यटन अतिशय वेगाने, व्यापक प्रमाणात विस्तारित होत असून व्यावसायिक पातळीवर यासाठी खूप प्रयत्न होत आहेत.

## ४. साहस पर्यटनांची वर्गवारी :-

साहस पर्यटन हे साहसपूर्ण मनोरंजन प्राप्त करण्याचा प्रकार आहे. अतिशय दुर्गम, निर्जन व दुर्लक्षित स्थळी पर्यटन करतात, त्यामुळे यामध्ये धोक्याची पातळी अथवा शक्यता जास्त असते. पर्यटनस्थळांचा धोका अथवा जोखीम लक्षात घेवून साहस पर्यटनाचे दोन वर्ग पडतात. (अ) कठिण अथवा अतिजोखमीचे साहस पर्यटन (ब) सुलभ अथवा कमी जोखमीचे साहस पर्यटन.

### (अ) कठिण अथवा अतिजोखमीचे साहस पर्यटन :-

साहस पर्यटनाचा हा प्रकार कठिण आहे. यामध्ये पर्यटकाची धोका पत्करण्याची तयारी, प्रबळ इच्छाशक्ती, प्रगत कौशल्य, अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्याची तयारी असली पाहिजे आणि यासाठी तज्ञ व अनुभवी मार्गदर्शकांची जरूरी असते. उदा. पॅराग्लायडिंग, पॅरॉसिलिंग, क्लाइबिंग इत्यादी.

### (ब) सुलभ अथवा कमी जोखमीचे साहस पर्यटन :-

साहस पर्यटनाच्या या प्रकारात जोखमी ही असते, मात्र त्याची तीव्रता व जोखमीची पातळी कमी असते. अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधने पाहिजेच असे नसते. ती पर्यटक कोणत्या प्रकारचे स्थळ अथवा प्रकार निवडतो त्यावर आधारित असते. मात्र भौगोलिक, पशु-पक्षी, किटक वनस्पतीचे जुजबी ज्ञान आवश्यक असते. बऱ्याच अंशी या प्रकारातील पर्यटन अथवा उपक्रम तज्ञ प्रशिक्षक अथवा मार्गदर्शक स्वत: करवून घेतात. उदा. पक्षी निरीक्षण, बॅक पॅकिंग, कॅम्पिंग, फिसिंग, स्कूबा ड्रायव्हिंग, सरफींग इत्यादी.

## ५. साहस पर्यटनाचे प्रकार :-

साहस पर्यटनाचे प्रकार ठरवत असताना प्रामुख्याने जमिन, पाणी व हवा यांचा विचार केला जातो, या तिन्ही घटकांना केंद्रभूत ठेवून साहस पर्यटनाचे तीन प्रकारात विभागणी होते.

(अ) जमिनीवरील साहस पर्यटन.

(ब) पाण्यातील साहस पर्यटन.

(क) हवेतील साहस पर्यटन.

वास्तविक पाहता आपण 'साहस पर्यटन' हा शब्द प्रयोग सामान्यत: वापरत असला तरी यातील अनेक पर्यटन प्रकार मूलत: खेळ प्रकारात मोडतात. मात्र ते साहसी खेळ आहेत. या साहसी खेळातूनच साहस पर्यटन केले जाते. वरील तिन्ही साहस पर्यटन प्रकारापैकी काही प्रमुख पर्यटन प्रकारांची चर्चा करणार आहोत.

## १. गिर्यारोहण :-

गिर्यारोहण म्हणजे पर्यतावर चढणे होय. हा एक साहसी, कठिण, शरीराची क्षमता पाहणारा प्रकार आहे. अखिल भारतीय क्रीडा मंडळाने याला क्रीडा प्रकाराचा दर्जा दिलेला आहे. १० ते १५ मीटर उंचीची टेकडी ते माऊंट एव्हरेस्ट पर्यंतची चढाई यामध्ये येते, यासाठी विशेष प्रशिक्षणाचे व अत्याधुनिक साधन सामग्रीची आवश्यकता असते. साहसवृत्ती व अज्ञात क्षेत्राचा शोध घेणे व निसर्गावर विजय प्राप्त करणे या मनोवृत्तीतून याचा विकास झालेला आहे. दैनंदिन जीवनातून थोडा हटके मात्र धोकादायक, चित्तथरारक आणि रोमांचकारी अनुभव यासाठी हा प्रकार प्रसिध्द झालेला आहे याचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

### (अ) खडकारोहण (रॉक क्लाइंबिंग) :-

गिर्यारोहणामधील एक प्रकार आहे. शिखराच्या अथवा डोंगराच्या अतिउंच निमूळत्या व खड्या भागावर चढाई करणे यालाच खडकारोहण असे म्हणतात. या प्रकारात धोका व जोखीमीची तीव्रता कमी असते. अतिशय कठिण, निमूळत्या, खड्या खडकावर कौशल्याने चढाई करावी लागते. यासाठी अत्याधुनिक साधने व तंत्रज्ञान वाढले जाते. त्याअगोदर संबंधितांना योग्य प्रकारे तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकाच्याकडून मार्गदर्शन केले जाते.

### (ब) हिमारोहण (आइस क्लाईबिंग) :-

गिर्यारोहणातील हा प्रकार आहे. यामध्ये हिमनदी अथवा बर्फाच्छादित प्रदेशात अथवा भागात अत्यंत घसरडी उभी चढण किंवा उतरण अथवा हिमकडा यावरील आरोहणाचा समावेश होतो. गिर्यारोहणातील हा अतिकठिण व धोकादायक प्रकार आहे. पर्यटक ज्या प्रदेशात जाणार आहेत त्या ठिकाणच्या भौगोलिक स्थितीची खडाण-खडा माहिती असणे, हिमकडांची सखोल माहिती असणे गरजेचे असते. यासाठी

निसर्गातील कठिण वातावरणाशी सामना करण्याची पर्यटकाने तयारी ठेवणे गरजेचे असते. यासाठी अतिविशिष्ठ पध्दतीचा पेहराव, शूज, चष्मा, हातमोजे व विविध उपकरणे असणे अपेक्षित असते. गिर्यारोहण हा प्रकार इ.स. १९५४ च्या मध्यास इंग्लंडमध्ये उदयास आला. याच्या सुरूवातीपासूनच याच्याशी संबंधित काही तत्त्वाचा विकास होत गेला. यामध्ये निसर्ग अथवा निसर्गनिर्मित घटकांचे प्रमुख आव्हान असते.

## २. ट्रेकिंग (भ्रमंती) :-

व्यायामाला नेहमीच तणाव नष्ट करणारा समजले गेले आहे. ट्रेकिंगद्वारे अर्थात भ्रमंतीद्वारे साहस आणि व्यायामाचा मेळ घालणे हा वेगळाच रोमांच आहे. सर्व वयोगटातील व्यक्तींसाठी ट्रेकिंग हा उत्तम पर्याय आहे. निसर्गाच्या सानिध्यात जाऊन आनंददायक ट्रेकिंग करणे व त्यातून निसर्गाच्या लहान-मोठ्या घटकांचा अनुभव घेणे अपेक्षित असते. ट्रेकिंगचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात यामध्ये जंगल भ्रमंती, डोंगर भ्रमंती व नाइट ट्रेकिंग अर्थात रात्र भ्रमंतीचा समावेश होता. ट्रेकिंगचा स्वर्ग म्हणून भारताची ओळख आहे. डोंगर, दऱ्या, जंगल, किल्ले, नदीकिनारे, फळबागा, फुलबागा अशा अनेक ठिकाणाहून ट्रेकिंग केले जाते. जम्मू आणि काश्मिर, हिमालय पर्वतरांगा, विंध्यपर्वत रांगा, सह्याद्री पर्वत रांगा, उत्तरांचलमधील गढवाल, कुमाऊ पर्वत रांगा ट्रेकिंगसाठी प्रसिध्द आहेत. हिमाचल मधील मनाली, चंबा, सिक्कीम मधील युकतम, लडाखमधील लेह, पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग ही प्रसिध्द ठिकाणे आहेत.

अभ्यास, निसर्ग अनुभव, पक्षी, प्राणी, वनस्पती, फुले, फळे व जंगलातील थरार अनुभवणे यासाठी जंगल भ्रमंती दिवसा अथवा रात्री केली जाते. जंगल भ्रमंतीसाठी भौगोलिक परिस्थिती, हिंस्र पशु-पक्षी व दिशांचे ज्ञान आवश्यक असते. भारताच्या विविध भागातील जंगले अशा प्रकारच्या भ्रमंतीसाठी प्रसिध्द आहेत. रात्र भ्रमंतीसाठी तज्ञ व प्रशिक्षित मार्गदर्शक सोबत असणे गरजेचे असते.

## ३. उंट सफारी :-

उंटाला वाळवंटातील जहाज म्हणतात. वाळवंटी प्रदेशात रात्री अथवा दिवसा पायी प्रवास करणे अशक्य आहे. वाळवंटी प्रदेशातील निसर्ग, भौगोलिक व संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी अनेक पर्यटक उंट सफारी करतात. भारतात यासाठी राजस्थान प्रसिध्द आहे. उंटाच्या पाठीवर बसून राजस्थानमधील वेगवेगळ्या भागातून प्रवास करून राजस्थानमधील पारंपारिक जीवन शैलीचा आनंद घेता येतो.

## ४. सायकलिंग व बायकिंग :-

तणावमुक्त जीवन, सुट्टीचा मुक्त आनंद आणि निसर्गाच्या सानिध्यात सायकलिंग म्हणजे सायकलवरून प्रवास करणे अथवा मोटरसायकलवरून प्रवास करणे. अलिकडच्या काळात तरुण वर्गामध्ये हा प्रकार खूपच प्रसिध्द आहे. उदा. लेह-लडाखमध्ये बायकिंग, सिक्कीम ते मेघालय, सायकलिंग, मुंबई ते गोवा सायकलिंग असे अनेक पर्याय आज तरुण वर्ग चोखाळू पाहत आहेत. पक्के-कच्चे रस्ते, दगड-धोंडे, नदी-नाले, दऱ्या, खाच-खळंगे व निसर्गातील विविध अडथळे सायकल अथवा मोटार सायकलद्वारे पार करणे हा रोमांचकारी व संस्मरणीय अनुभव घेण्यासाठी हजारोंच्या संख्येने पर्यटक यामध्ये सहभागी होत असतात.

## ५. व्हॉईट वॉटर राफ्टिंग :-

वॉटर राफ्टिंग म्हणजे नदीमधून बोटीच्या साहाय्याने प्रवास करणे. नदीचा उगम हा नेहमी डोंगरात असतो, तेथून नदी खाली वाहत येऊन समुद्राला मिळेपर्यंतचा तिचा प्रवास उंच सखल भागातून होतो. नदीच्या प्रारंभी ती उंचावरून, खडकावरून वेडी-वाकडी, जंगलातून, मोठ-मोठ्या दरडाच्यामधून वाहते, खडकावर आदळलेले पाणी फेसाळते व पांढरेशुभ्र दिसते. अशा पाण्यात प्रवास करणे म्हणजे 'व्हॉईट वॉटर राफ्टिंग'. जे पाणी खडकावर असे आदळते याला 'रॉपिड' म्हणतात. या रॅपिडमधून आपला तराफा म्हणजे 'राफ्ट' सही-सलामत बाहेर काढणे याला 'राफ्टिंग' म्हणतात. या रॅपिडची सहा प्रकारात वर्गवारी केलेली आहे. यातील ४ ते ६ प्रकारातील रॅपिड अतिधोकादायक असतात. त्यामुळे 'राफ्टिंग' हा प्रकार अतिजोखमीचा व धोकादायक मानला जातो. यासाठी भौगोलिक घटकांचे उत्तम ज्ञान, अत्याधुनिक तंत्रज्ञान व साधणे हाताळण्याचे कौशल्य व प्रशिक्षण गरजेचे असते. भारतात ब्रम्हपुत्रा, गंगा टोक, गोव्यातील म्हादई नदी इत्यादी ठिकाणे राफ्टिंगसाठी प्रसिध्द आहेत. जागतिक स्तरावर अनेक देशात हा प्रकार खेळला जातो.

## ६. वॉटर स्कीइंग :-

साहस पर्यटनाचा हा प्रकार नदी, तलाव व समुद्रामध्ये खेळला जातो. पाण्यावरती तरंगत वेगाने पुढे जाणे याला वॉटर स्कीइंग म्हणतात. पाण्यामध्ये एक मोटार बोट असते, त्या बोटीच्या मागच्या बाजूला एक दोरी असते, त्या दोरीला पकडून पर्यटक एका 'स्की' च्या सहाय्याने पाण्यावर तरंगत बोटीच्या वेगाने पुढे जातो. बोट जेव्हा वळणे घेते तेव्हा स्की वर स्वत:चा तोल सांभाळत हे वॉटर स्कीइंग करणे व त्याचा रोमांच अनुभवणे.

## ७. स्कूबा डायव्हिंग :-

समुद्राच्या तळाशी अथवा समुद्रातील जलचर वनस्पती पाहण्यासाठी विशिष्ठ उपकरणाच्या साहाय्याने पाण्यात डुबकी मारणे व तळाशी जावून येणे याला साधारणत: 'स्कूबा डायव्हिंग' म्हणतात. ४०-५० मीटर खोलीपर्यंत सूर्याची किरणे पोहचतात आणि तेथील सर्व काही स्पष्ट दिसते. मात्र इतक्या खोलीवर श्वास रोखून धरणे शक्य नसते. एक विशिष्ठ उपकरण त्यासाठी बनवलेले आहे, त्यास 'स्कूबा' असे म्हणतात. यासोबत ऑक्सिजनचे एक सिलेंडर व मास्क असते, त्याचा वापर करून ७० मीटर पर्यंत पाण्यात खोल जावून तेथील जीवन, जलचर व सौंदर्य पाहता येते. भारताच्या बऱ्याच समुद्र किनाऱ्यावर याची सोय झालेली आहे. यासाठी तज्ञ व अनुभवी मार्गदर्शक सोबत असणे गरजेचे असते.

## ८. स्नार्कलिंग :-

पाण्याच्या पृष्ठ भागावरून पाण्यातील वनस्पती, जलचर व इतर घटकांचे निरीक्षण करणे म्हणजे स्नार्कलिंग नदी अथवा समुद्रामध्ये चेहऱ्यावर विशिष्ठ प्रकारचा मास्क लावून पाण्याच्या पृष्ठ भागावरून

पोहत विशेषत: उथळ पाण्यात पाण्यातील विविध घटकांचे निरीक्षण करणे. यामध्ये पर्यटकांत श्वास रोखून धरण्याची कला अवगत असणे गरजेचे आहे.

### ९. कायकिंग/कॅनोइंग :-

नदी पात्रात एक चाटू अथवा दोन चाटूच्या साहाय्याने आपला तराफा अर्थात छोटी बोट हाकत प्रवास करणे याला कॅनोइंग अथवा कायकिंग म्हणतात. यामध्ये एका वेळेस एकच व्यक्ती प्रवास करू शकतो. नदीच्या शांत पात्रात निसर्गाचा अभ्यास व एकांत अनुभवण्यासाठी या प्रकारातील प्रवास केला जातो.

### १०. बंगी जम्पिंग :-

'बंगी जम्पिंग' हा अतिशय धाडसाचा आणि चित्तथरारक खेळ आहे. एखादा डोंगरकडा, पूल, क्रेन अथवा उंच इमारत याचा या खेळासाठी वापर केला जातो. विशिष्ठ प्रकारचे रोप अर्थात दोरखंड वापरले जातात जे रबरासारखे असता विशिष्ट पट्ट्यानी बांधून पर्यटकाला खाली उडी मारण्यास सांगितले जाते, जेवढया वेगाने तो खाली जाईल तेवढ्याच वेगाने तो पुन्हा परत वरती येतो ही प्रक्रिया वारंवार होते. या प्रकारामध्ये धाडस असलेल्या व्यक्तीस सहभागी होवू शकतात.

### ११. पॅराग्लायडिंग :-

इ.स. १९५२ मध्ये डोमिना जल्बर्ट याने ग्यालयडरचा प्रथम वापर केला. अतिशय जोखमीचा व धाडसाचा हवेतील उड्डाणविषयक क्रिडा प्रकार आहे. यामध्ये विशिष्ठ प्रकारचे कापड व दोरीच्या सहाय्याने पंख तयार करतात व ते हार्नेसला जोडून त्यात चालक बसला जातो. हवेच्या झोतावर स्वार होवून ते उंच भरारी घेते. ग्लायडरमध्ये कोणताही कठिण धातू नसतो, शिवाय त्याचा वेग हवेच्या दिशेप्रमाणे संतुलित होतो. कोणतेही मशीन न वापरता केवळ ग्यालयडरद्वारे तासनतास कित्येक हजार फुटापर्यंत उंच भरारी मारू शकतो. यांच्या पंखाला विशिष्ठ पध्दतीने वायरर्स (छोट्या दोऱ्या) जोडलेल्या असतात, त्यांच्या मदतीने त्याला दिशा देण्याचे काम होते.

### १२. पॅरासेलिंग :-

हा पाण्यामध्ये करावयाचा एक मनोरंजनात्मक व साहस प्रकार आहे. एका बोटीच्यामध्ये पॅराशूटसारख्या वेगळ्या स्वरूपाच्या कापडाच्या पंखामध्ये व्यक्तीला बसविले जाते. बोटीला वेग आला की, त्याला हळूहळू वरती सोडले जाते, बोटीच्या वेगाने ते पॅराशूट हवेत तरंगत राहते, शिवाय ते बोटीबरोबर वेगाने उडते. हा प्रकार तज्ञ मार्गदर्शकाच्या हाताखाली केला जातो.

### १३. स्काय डायव्हिंग :-

मनोरंजन व हवेतील थारर अनुभवण्यासाठी पॅराशूटच्या सहाय्याने विमान अथवा हेलिकॉप्टरच्या सहाय्याने आकाशात उडी मारली जाते. हा प्रकार वैयक्तिक अथवा सामूहीकपणे केला जातो. उंच आकाशात

विशिष्ट उंचीवर वेगवेगळी प्रात्यक्षिके ही याच्या माध्यमातून केली जातात. या प्रकारासाठी अगोदर प्रशिक्षण गरजेचे असते. प्रशिक्षणाशिवाय हा प्रकार अथवा त्यांचा थरार अनुभवला जाऊ शकत नाही.

### १४. व्हॅली क्रॉसिंग :–

डोंगराचा उंच कडा तिथे दोन डोंगर समांतर असतात अथवा समुद्र किनाऱ्यांच्या खाडीचा भाग येथे हा प्रकार केला जातो. डोंगराच्या एका टोकापासून दुसऱ्या डोंगराच्या टोकापर्यंत एक दोरखंड आडवा बांधून सुरक्षितेच्या खबरदारीसह दरी ओलांडण्याचा थरार. यासाठी 'झीपलाइन' हा गिर्यारोहणातील प्रकाराचा वापर केला जातो. यात दरीच्या दोन्ही बाजूला दोर बांधत असताना जेथून सुरूवात करावची असते ती बाजू उंच व जिथे उतरणार ती बाजू किंचित खाली ठेवली जाते. गुरुत्वाकर्षणाच्या नैसर्गिक शक्तीच्या सहाय्याने ती दरी ओलांडली जाते, त्याला व्हॅली क्रॉसिंग असे म्हणतात.

### १५. बर्फावरील साहस पर्यटन :–

बर्फावरून चढाई करणे, उतरणे व उंच बर्फाच्छादित भागावरून घसरत येणे असे अनेक साहस प्रकार आहेत. यामध्ये प्रामुख्याने आइस स्केटिंग, स्कीईग, स्की, आल्पाईन, बर्फावरील हॉकी, टोबॉगर्निंग, बॉब्स्लेडिंग इत्यादीचा समावेश होतो. युरोपीय देशांच्यामध्ये हे साहस प्रकार अतिशय लोकप्रिय आहे. भारतामध्ये काश्मिर खोऱ्यात यातील काही प्रकार खेळले जातात.

### १६. कॅविंग :–

कॅविंग म्हणजे खोल दरी अथवा गुहेत उतरणे व चढणे याला 'स्पॉलेओलाजी' असेही म्हणतात. गुढ, रम्य गुहामध्ये जावून तेथील विलक्षण निसर्ग चमत्काराचा अनुभव अथवा अभ्यास करण्यासाठी कॅविंग केले जाते. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा व साधनांचा वापर केला जातो. शिवाय सोबत तज्ञ मार्गदर्शक असणे गरजेचे असते.

### १७. बॅक पॅकिंग :–

बॅक पॅकिंग म्हणजे एकटा प्रवास. यामध्ये पर्यटक आपले सर्व सामान–सुमान आपल्या पाटीवर लादून सार्वजनिक वाहनांचा वापर करून प्रवास करतो. हा प्रवास एकटा अर्थात वैयक्तिक असतो. स्वस्तातील वसतिगृह, युवा वसतिगृह यांचा यामध्ये वापर केला जातो. प्रवासाचा कालावधी यामध्ये दीर्घ असतो. स्थानिक परंपरा व संस्कृतीचा अनुभव घेणे व बऱ्याचपैकी पायी प्रवास करणे अपेक्षित असतो.

### १८. कॅम्पिंग :–

कॅम्पिंग म्हणजे तंबूत राहणे. घरापासून दूर जंगलात, वाळवंटात, माळावर तंबूत रात्र घालवणे व अंधाऱ्या रात्रीला अनुभव उघड्या आकाशात घेणे यामध्ये अपेक्षित असते.

## ६. साहस पर्यटनासाठी आवश्यक घटक :-

पारंपारीक पर्यटनापेक्षा साहस पर्यटन हे खर्चीक, धोकादायक, जोखमीचे व थरार अथवा रोमांचकारी असते. यासाठी पर्यटकाचा शारीरिक तंदुरुस्तपणा, साहस वृत्ती, पैसा खर्च करण्याची तयारी, वेळ खर्च करण्याची तयारी, मानसिक क्षमता, खेळाची आवड, जिज्ञासा, उत्तम संवाद, मूलभूत वैज्ञानिक ज्ञान, भौगोलिक ज्ञान, अत्याधुनिक तंत्रज्ञान हाताळण्याची तयारी, नवीन साधनसामग्रीचे प्रशिक्षण घेण्याची व वापरण्याची तयारी असणे गरजेचे आहे. साहस पर्यटनासाठी काळ व स्थळापेक्षा हेच गुण अथवा मूलभूत घटक महत्त्वाचे आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे निसर्गाशी जुळवून घेणे, हाल अपेष्ठा सहन करण्याची मानसिक तयारी व साहस महत्त्वाचे आहे.

## ७. साहस पर्यटनासाठी सरकारी धोरण :-

भारतातील साहस पर्यटनाच्या विकासासाठी केंद्र सरकारच्यावतीने विशेष पुढाकार घेतलेला आहे. जागतिक स्तरावर या पर्यटन प्रकाराचा झपाट्याने विकास होत असून या पर्यटन प्रकाराच्या संभाव्य विकासासाठी भारतात खूप वाव आहे. साहस पर्यटन हे तिन्ही ऋतुत चालते आणि भारतात तिन्ही ऋतू अनुभवास येतात, तसेच त्यासाठी आवश्यक असे भौगोलिक वातावरण, स्थळे ही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. पर्यटन मंत्रालयाने साहसी पर्यटन आयोजित करणाऱ्या सहल आयोजकासाठी एक नियमावली तयार केलेली आहे. यामाध्यमातून पर्यटकांना सुरक्षित व दर्जेदार साहस पर्यटनाचा अनुभव देण्याचा सरकारचा विचार आहे. याला 'Basic minimum standards for adventure tourisim activities' असे म्हणतात. या नियमावलीमध्ये जमीन, आकाश आणि पाण्यातील साहसी उपक्रमांचा समावेश आहे.

साहस पर्यटन स्थळांच्यामध्ये पर्यटनासाठी पायाभूत सुविधांचा विकास करण्याची विविध राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांना केंद्र सरकार आर्थिक सहाय्य देते. यामध्ये ट्रेकिंग, रॉक क्लाइंबिंग, पर्वतारोहण, हवाई खेळ, पाण्यातील खेळ इत्यादीच्या संबंधीत उपकरणे खरेदी करणे. जानेवारी २००९ मध्ये गुलमर्गमध्ये येथे स्कीइंग व माऊंटनियरिंगचे संपूर्ण सेवा-सुविधा उपलब्ध केलेली आहे.

गोवा येथे पर्यटन मंत्रालयामार्फत 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ वॉटर स्पोर्टस्' या जलक्रिडा प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी नवीन इमारत, विविध सेवासुविधा दिलेल्या आहे. भारतामध्ये साहस पर्यटनाचा विकास करण्यासाठी भारतीय पर्वतारोहण संघटना व साहसी टूर ऑपरेटर असोसिएशन ऑफ इंडिया विशेष कार्य करीत आहे.

## ८. महाराष्ट्र शासनाची महाभ्रमण योजना :-

साहस पर्यटन व कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी व पर्यटनाच्या या नवीन संकल्पना जनमानसात दृढ करण्याबरोबरच या पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती आणि लाभार्थ्यांचा आर्थिक विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पर्यटन महामंडळामार्फत 'महाभ्रमण' ही योजना राबविण्यात येत आहे.

**स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. 3**

**अ) रिकाम्या जागा लिहा.**

१. साहस पर्यटन .............. दशकात प्रसिध्दीस आले.

२. ट्रेकिंगसाठी पश्चिम-बंगालमधील .............. ठिकाण प्रसिध्द आहे.

३. .............. याने ग्लायडरचा शोध लावला.

४. बॅकपॅकिंग ............... प्रकारचा प्रवास आहे.

५. ट्रेकिंगसाठी ................ ज्ञानाची मूलभूत गरज असते.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. साहस पर्यटन किती वर्गात वर्गीकृत केले आहे.

२. उंट सफरीसाठी कोणते राज्य प्रसिध्द आहे.

३. वॉटर राफ्टिंगसाठी गोव्यातील कोणती नदी प्रसिध्द आहे.

४. कॅबिंग म्हणजे काय?

५. महाराष्ट्र शासनाने साहस पर्यटनास चालना देण्यासाठी कोणती मोहिम सुरू केली आहे.

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **इको टूरिझम** : निसर्ग अथवा पर्यावरण पर्यटन.
- **मेडिकल टूरिझम** : वैद्यकीय पर्यटन.
- **एडव्हेंचर टूरिझम** : साहस पर्यटन.

## ४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

**अ)** १. *आठ.*

२. *१९९८.*

३. *केरळ.*

४. *गुजरात.*

५. *४१.३३ %.*

**ब)** १. १९५०.

२. देवभूमी.

३. तामिळनाडू.

४. राजस्थान.

५. गुलमर्ग.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

**अ)** १. खर्च प्रभावी.

२. आस्केपियस.

३. चरक व सुश्रुत.

४. २०११.

५. केरळ.

**ब)** १. अंगावर पाणी घेणे.

२. लंडन.

३. जीवनाचे विज्ञान.

४. २०११.

५. राष्ट्रीय वैद्यकीय पर्यटन मंडळ.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे

**अ)** १. १९५०.

२. दार्जिलिंग.

३. डोमिना जल्बर्ट.

४. एकटा.

५. दिशा.

**ब)** १. दोन.

२. राजस्थान.

३. म्हादाई.

४. गुहेत उतरणे.

५. महाभ्रमण.

## ४.५ सारांश

जागतिक स्तरावर पर्यटन एक सेवा उद्योग म्हणून प्रसिध्द झालेला आहे. कमी भांडवली गुंतवणुकीच्या बदल्यात मोठ्या प्रमाणात फायदा व रोजगार निर्मिती हे या सेवा उद्योगाचे वैशिष्ट्य आहे. जागतिक स्तरावर पर्यटनाचे स्वरूप झपाट्याने बदल असून अनेक नव-नवीन संकल्पना व प्रकार यामध्ये समाविष्ट होत आहेत, त्यामुळे पर्यटनाचे स्वरूप व्यापक व जनव्यापी झालेले आहे. पर्यटन म्हणजे आराम, पर्यटन म्हणजे आनंद. पर्यटन म्हणजे रोमांच, पर्यटन म्हणजे थरार या दृष्टीकोणातून जागतिक स्तरावर साहस पर्यटनाचा विकास होत आहे. अतिविशिष्ट ठिकाणी व अतिविशिष्ट परिस्थितीत जावून तेथील निसर्गाचा आनंद घेत तेथील रोमांच व थरार अनुभवण्याकडे पर्यटकांचा ओढा वाढलेला आहे. जागतिक पातळीवर जे विविध खेळ प्रकार आहेत त्याची जागा आज सहसा पर्यटनाने घेतलेली आहे. यामध्ये जमिनीवर साहस क्रिडा प्रकार, पाण्यावरील क्रिडा प्रकार व हवेतील चित्तथरारक कसरती याकडे पर्यटक आता साहस पर्यटन म्हणून पाहत आहेत. त्यामुळे पर्यटन विकासाचा माध्यमातून 'साहस पर्यटन' ही संकल्पना जनमानसात दृढ होत आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची विस्तृत उत्तरे लिहा.

१. भारतातील पर्यावरण पर्यटनाची माहिती द्या.

२. पर्यावरण पर्यटनाची नैसर्गिक व आर्थिक बाजू स्पष्ट करा.

३. वैद्यकीय पर्यटनाची संकल्पना सांगून प्रमुख घटकाची माहिती द्या.

४. भारतातील वैद्यकीय पर्यटनासाठी प्रसिध्द असलेल्या राज्याची माहिती सांगा.

५. साहस पर्यटनाचे प्रमुख प्रकार सांगा.

### ब) टिपा लिहा.

१. आयुर्वेदिक उपचार पध्दती.

२. वैद्यकीय पर्यटनासंबंधी भारत सरकारचे धोरण.

३. पर्यावरण पर्यटनातील मूलभूत घटक.

४. पाण्यातील साहस पर्यटन प्रकार.

५. साहस पर्यटनातील मूलभूत घटक.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **सांगळे, शैलजा,** *पर्यटन भूगोल*, डायमंड पब्लिकेशनस्, पुणे, २०१५.

२. **Mohanty D. & T. P. Madhav**, *"Medical Tourism : India's Competitive Advantage in Health Tourism and Introduction.*

३. **G. Addison**, *Adventure Tourism and Eco-tourism,* Venture Publishing.

४. **A. K. Bhatia**, *Tourism Development, Principles and Practices,* Sterling Publishers, New Delhi, 1995.

५. **B. S. Badan, Harish Bhatt**, *Eco-tourism,* Kanishka Publishers and Distributors, New Delhi, 2004.

६. **G. Addison**, *Adventure Tourism and Eco-tourism,* Venture Publishing.

७. **योजना, मे, २००५.**

८. www.ecotourism.org

९. www.tourism co.in.

१०. www.ecotuns.in.


❀ ❀ ❀